कवींद्रसेवक रचित

# सुमतिप्रकाश

(इ.स. १५६८ मध्ये रचलेले मराठी काव्य)

संशोधक व संपादक

प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## कवींद्रसेवक विरचित

# सुमतिप्रकाश

(इ.स. १५६८ मध्ये रचलेले मराठी मुक्तकाव्य)

संशोधक व संपादक

**गोमटेश्वर पाटील**

प्रकाशक

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

इ. सन २०२०

➢ **पुस्तकाचे नांव :** सुमतिप्रकाश

➢ **मूळ लेखक :** कवींद्रसेवक

➢ **संपादक :** प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील

➢ **प्रथमावृत्ती :** **२०२०**

➢ **प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

➢ **© प्रकाशकाधीन :**

➢ **मुद्रक :** व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
पुणे - ४११ ००१.

➢ **किंमत :** **३०३/-**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. निवेदन | ०५ |
| २. ऋणनिर्देश | ०७ |
| ३. प्रस्तावना | ०९ |
| ४. हस्तलिखिताची मूळ आवृत्ती | ३५ |
| ५. हस्तलिखिताचे मराठी लिप्यंतर | ११७ |
| प्रथम अध्याय | ११९ |
| द्वितीय अध्याय | १४२ |
| तृतीय अध्याय | १६२ |
| चर्तुथ अध्याय | १८१ |
| पंचम अध्याय | १९८ |
| षष्ठ अध्याय | २१५ |
| सप्तम अध्याय | २३० |
| अष्टम अध्याय | २४३ |
| नवम अध्याय | २६५ |
| दशम अध्याय | २८५ |
| एकादश अध्याय | ३०५ |

# निवेदन

भारतीय भाषा आणि साहित्य समृध्द करण्यामध्ये जैन साहित्याचे फार मोठे योगदान आहे. विशेषतः प्राचीन भारतीय प्राकृत भाषा आणि लिप्यांचे संवर्धन जैन साहित्याने केले आहे. अर्धमागधी, पैशाची, शौरसेनी आणि महाराष्ट्री या प्राचीन भाषांमध्ये जैन साहित्य भारतीय साहित्य समृध्द केले आहे. तसेच इसवीसनाच्या चौथ्या पाचव्या शतकानंतर संस्कृत भाषेतही जैन साहित्य लिहिले गेले आहे. उत्तर मध्ययुगीन प्रादेशिक भाषांच्या काळातही सर्वच भारतीय प्रादेशिक भाषांमध्ये जैन साहित्य मोठ्या प्रमाणात रचले गेले आहे. इसवीसनाच्या सातव्या शतकापासून अकराव्या शतकापर्यंत अपभ्रंश भाषांचा काळ समजला जातो. या काळातही जैन साहित्याची रचना सर्वच भाषांमध्ये झालेली आहे. मराठी साहित्याच्या पूर्व परंपरेचा शोध घेताना मराठी, महाराष्ट्री अपभ्रंश आणि महाराष्ट्री प्राकृत असा शोध घेतल्यास मराठी भाषेची जननी महाराष्ट्र ठरते. या महाराष्ट्री भाषेत भारतीय साहित्यात सर्वाधिक जैन परंपरेतील कवी लेखकांच्या रचना आहेत. म्हणूनच पिशेल या पाश्चात्य भाषा अभ्यासकाने महाराष्ट्री भाषेला 'जैन महाराष्ट्री' असे म्हटले आहे. हिच महाराष्ट्री उत्तर काळात अपभ्रंश महाराष्ट्री (मराठी) झाली आहे. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी शोधलेल्या सर्वच हस्तलिखित प्रतीमध्ये लेखक आणि महाराष्ट्री किंवा मराष्ट्री भाषेत रचना करत असल्याचे सांगतात. अगदी एकोणिसाव्या शतकातील हस्तलिखित प्रतींमध्ये ते मराठी हा शब्द न लिहिता मराष्ट्री हाच शब्द लिहितात. यावरुन मराठी आणि महाराष्ट्रीच्या परंपरेचे नाते दृढ होताना दिसते.

मध्ययुगीन मराठी साहित्याचा ग्रांथिक इतिहास बाराव्या शतकापासून सुरु होतो. मराठी जैन साहित्याचा इतिहास चौदाशे पन्नास पासून सुरु होतो. तेराव्या शतकातील महानुभाव आणि वारकरी साहित्याच्या रचनानंतर एकनाथ पूर्वकाळात मध्यवर्ती धारेतील मराठी साहित्यात पोकळी निर्माण झालेली दिसते. नेमके याच काळात, ज्याला मराठी साहित्याचे अंधारयुग म्हटले जाते, त्या काळात जैन कवी आपली मराठीतील प्रचंड रचना करताना दिसतात. महानुभावीयांच्या गद्य साहित्य नंतर खंडित झालेली मराठी गद्याची परंपराही गुणकीर्तींच्या धर्मामृत या ग्रंथाने भरुन निघालेली दिसते. चौदाव्या शतकानंतर मराठीतील मुख्य साहित्य परंपरेच्या समांतर अशी जैन साहित्याची परंपरा दिसते. संख्येच्या दृष्टीने मोजमाप केल्यास तुकाराम, रामदासादि शिवकाळात मराठी जैन कवींची गर्दी अधिक दिसते. ही साहित्य परंपरा दुर्देवाने आजही अप्रकाशित मठा-मंदिरामध्ये बंदिस्त आहे.

महराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने हाती घेतलेल्या या

संशोधन प्रकल्पामुळे मराठीतील फार मोठे साहित्यिक भांडार खुले होणार आहे. 'मध्ययुगीन कालखंडातील जैन साहित्यातील दुर्मिळ अप्रकाशित हस्तलिखित ग्रंथांचे संशोधन व प्रकाशन' या ब्रहद् संशोधन प्रकल्पांतर्गत डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी मध्ययुगीन काळातील सतरा हस्तलिखित ग्रंथांचे संशोधन व संपादन केले आहे. या ग्रंथांचे मूळ हस्तलिखित शोधून त्यावर विस्तृत प्रस्तावना लिहिल्या आहेत. या १७ ग्रंथांमध्ये पंधराव्या शतकातील गुणकीर्तींचा 'रामायण' हा ग्रंथ तीन खंडात संपादित केला आहे. पुढे नामा जिनदास यांचा सोळाव्या शतकातील 'हरिवंश पुराण' व अठराव्या शतकातील 'हरीलीळाप्रकाश' हे दोन ग्रंथ तीन खंडात जैन महाभारताची कथा मांडताना दिसतात. ही दोन्ही महाकाव्ये व वैदिक रामायण आणि महाभारत काव्ये अशी तुलना करता मराठी वाचकांची अभिरुची संपन्न करणारे हे ग्रंथ आहेत. 'यशोधरचरित्र','सुदर्शनचरित', 'शीलपताका', 'हनुमंत पुराण', 'श्रीपालचरित्र', 'कर्णामृत कथा' या कथा मध्ययुगीन पंडिती वळणाच्या सुंदर आख्यान कथा आहेत. 'उपदेश रत्नमाला' व 'धर्मामृत कथा' ही दोन कथाकाव्य आहेत. भारतीय कथा परंपरेतील कथामालिका अथवा साखळी कथा या प्रकारच्या या कथा आहेत. आधुनिक मराठीतील कथासाहित्यपूर्व, ही कथा वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'आदिपुराण', 'अष्टकर्म प्रकृती', 'सुक्तिमुक्तावली' हे ग्रंथ जैन तत्त्वज्ञानाची मराठी भाषेत सोप्या पध्दतीने उपमा दृष्टांतांनी मांडणी करणारे ग्रंथ आहेत. या सर्वांमध्ये 'सुमतिप्रकाश' हा सोळाव्या शतकातील एक महत्त्वाचा जैन ग्रंथ आहे. कोणतेही कथानक नसलेला एकनाथकालीन सामाजिक परिस्थितीवर भाष्य करणारा वऱ्हाडी भाषेतील हा ग्रंथ मराठी साहित्यातील महत्त्वाचा दस्ताऐवज आहे.

मराठी जैन साहित्य हे विशिष्ट साहित्य असले तरी ते इथल्या मराठी माणसांनी लिहिलेले साहित्य आहे. मराठी भाषा आणि साहित्यांचे दालन समृध्द करणारी ही महाराष्ट्रीय माणसांची व साहित्याची महत्त्वाची परंपरा आहे. या सर्व परंपरेची ओळख मराठी वाचकांना करून देण्याची संधी या संशोधन प्रकल्पाच्या निमित्ताने डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी दिली आहे. मराठी साहित्य परंपरेचा नव्याने उलगडलेला हा इतिहास मराठी परंपरा समृध्द करणारा ठरेल, असा विश्वास वाटतो.

**सदानंद मोरे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# ऋणनिर्देश

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'मध्ययुगीन कालखंडातील जैन साहित्यातील दुर्मीळ व अप्रकाशित हस्तलिखित ग्रंथांचे संशोधन व प्रकाशन' हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी २१ व्या शतकात मला मान्यता दिली याचाच मला अत्यंत आनंद होत आहे. मराठीतील मौलिक ऐतिहासिक साहित्याला पुनर्जिवीत करण्याच्या माझ्या संकल्पाला त्यांनी मूर्त स्वरूप दिले त्याबद्दल मंडळाच्या प्रत्येक सदस्याचे जितके आभार मानावे तितके कमीच आहेत. अभिजात असलेली मराठी भाषा अखंडपणे कशी प्रवाहित होती हे स्पष्ट करण्यासाठी हे संशोधन निश्चितच महत्त्वाचे ठरेल.

हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी अनेक व्यक्ती आणि संस्थाचे सहकार्य लाभले. **प्रा. महावीर कंडारकर** यांनी या प्रकल्पाचे संशोधन सहाय्यक म्हणून काम पाहिले. संशोधन सहाय्याबरोबरच मार्गदर्शन, हस्तलिखिताचे वाचन आणि डी.टी.पी. करण्याचे महत्त्वाचे काम अखंड दोन वर्षे सातत्याने केल्यामुळेच हा प्रकल्प वेळेत पूर्णत्वास जाऊ शकला. या प्रकल्पाचे मूळ प्रेरणास्थान **डॉ. राजन गवस** यांची मराठीतील दुर्लक्षित असलेल्या जैन साहित्याबद्दलची आस्था या संशोधनास कारणीभूत झाली. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष **मा. बाबा भांड** यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना आणि मार्गदर्शनामुळे अभ्यासास दिशा मिळाली. साहित्य संस्कृती मंडळाच्या सचिव **डॉ. मीनाक्षी पाटील** यांचा प्रकल्पाविषयीचा सकारात्मक व आश्वासक दृष्टीकोन संशोधन व संपादनास प्रेरक ठरला. संशोधन संपादनाचे कार्य चालू असताना **डॉ. रामेश्वर रोकडे** यांचे सहकार्य मोलाचे राहीले. संशोधनाचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी साहित्य संस्कृती मंडळाने नियुक्त केलेले तज्ञ परिक्षक **प्रा.डॉ. महावीर शास्त्री, सोलापूर** यांनी संपूर्ण प्रकल्प बारकाईने तपासून वेळोवेळी केलेल्या सूचना व दुरूस्त्यांमुळे हे संशोधन-संपादन अधिक दर्जेदार झाले. प्रत्यक्ष दुर्मिळ हस्तलिखितांचा महाराष्ट्रभर धांडोळा घेताना मला सहाय्य करणारे व तांत्रिक सहकार्य करणारे माझे मित्र **सचिन पाटील, राहुल मगदूम, विनोद पाटील, दिपक पाटील व माझी पत्नी प्रा. सौ. सुजाता पाटील** यांनी मोलाची साथ दिली. त्यामुळे हस्तलिखितांचे फोटो, झेरॉक्स, सूची करण्याचे काम सहज शक्य झाले. जैन साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक **डॉ. विद्याधर जोहरापूरकर,** नागपूर आणि भंडारकर इन्स्टिट्यूट, पुणे येथील **डॉ. कमलकुमार जैन** यांच्याबरोबर झालेल्या चर्चा संशोधनास पूरक ठरल्या. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर साहित्य संस्कृती मंडळाचे विद्यमान अध्यक्ष **डॉ. सदानंद मोरे** यांनी याचे महत्व जाणून त्याकरिता निवेदन लिहून प्रकल्प अग्रेषित केला. या सर्वांचे मी ऋण व्यक्त करीत आहे.

मध्ययुगीन काळातील दुर्मिळ जैन साहित्यातील मराठी हस्तलिखिते उपलब्ध होण्यासाठी अनेक संस्थानी आणि व्यक्तींनी मोलाचे सहकार्य केले. कारंजा लाड, जि.वाशिम येथील महावीर ब्रह्मचर्याश्रम मंदिरातील हस्तलिखिते **श्री. भारत भोरे** यांनी उपलब्ध करुन दिली. तसेच कारंजा येथील सेनगण मंदिराचे ट्रस्टी व बालात्कारगण मंदिराचे ट्रस्टी यांनी हस्तलिखिते पाहण्यास दिली. श्री काष्ठासंघ आदिनाथ मंदिर-अंजनगाव सुर्जी, सैतवाल मंदिर-अंजनगाव सुर्जी, परतवाडा जैन मंदिर, मुक्तगिरी मंदिर ट्रस्ट, आदिनाथ मंदिर-भातुकली, जि. अमरावती, रामटेक मंदिर हस्तलिखित संग्रह-नागपूर येथील बघेरवाल मोठे मंदिर येथील हस्तलिखित संग्रह, सैतवाल मंदिर हस्तलिखित संग्रह, महावीर मंदिर, जिंतूर, जि. परभणी, भांडारकर इन्स्टिट्यूट, पुणे येथील हस्तलिखित संग्रह, प्रा. डॉ. विद्याधर जोहरापूरकर संग्रह, जीवराज ग्रंथमाला-सोलापूर येथील हस्तलिखित संग्रह, आदिनाथ मंदिर-सोलापूर हस्तलिखित संग्रह, हिंगोली येथील **श्री. शशिकांत दोडल** यांचे घरी असलेले हस्तलिखित संग्रह, औरंगाबाद-पैठण येथील चिमणापंडितांचे हस्तलिखित संग्रह या सर्व विदर्भ आणि मराठवाड्यातील मंदिर व संस्थांनी हस्तलिखिते दाखविण्याचे व फोटोकॉपी घेण्यास सहकार्य केले. याशिवाय पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर येथील **स्वस्तिश्री डॉ. लक्ष्मीसेन महाराज** यांनी लक्ष्मीसेन मठातील हस्तलिखिते उपलब्ध करुन दिली. तसेच नांदणी येथील जिनसेन मठातील हस्तलिखिते **प्रा. आप्पासाहेब भगाटे** यांनी उपलब्ध करुन दिली. बाहुबली येथील अनेकान्त शोधपीठामधील हस्तलिखिते उपलब्ध होण्यासाठी **डॉ. नेमिनाथ शास्त्री** यांनी महत्वाचे सहकार्य केले. भोसे-ता. मिरज येथील जैन मंदिराचे ट्रस्टी, बेडग जैन मंदिर-ता. मिरज येथील जैन मंदिराचे ट्रस्टी यांनीही हस्तलिखिते उपलब्ध करुन दिली. कर्नाटकातील शांतिगिरी कुप्पानवाडी कोथळी व राजस्थान मधील अपभ्रंश ॲकडमी, जयपूर तसेच गणिवर्य श्री वैराग्यरति विजयजी महाराज, श्रुतभवन संशोधन केंद्र, पुणे यांनीही हस्तलिखिते उपलब्ध करुन दिली या सर्व संस्थांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार व ऋण व्यक्त करतो. श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिकारी व महावीर महाविद्यालयातील माझे सर्व सहकारी यांचेही ऋण व्यक्त करतो.

ग्रंथास अंतिम प्रारुप देण्यासाठी जैनबोधक प्रकाशन संस्थेद्वारे **श्री. सुरेश लामकाने** तसेच उत्तम मुद्रणासाठी महाराष्ट्र शासनाचे **फोटो झिंको प्रेस-पुणे** च्या सर्व सदस्यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

**- प्रा.डॉ. गोमटेश्वर पाटील**

प्रोफेसर, मराठी विभाग-महावीर कॉलेज, कोल्हापूर.

# संपादकीय प्रस्तावना

## कवींद्रसेवक

इसवी सनाच्या १५ व्या शतकापासून मराठी जैन साहित्याची सुरुवात होत असल्याचे आजवरच्या संशाधनातून सिद्ध झाले आहे. इ. स. १४५० या सालातील ब्रह्मगुणदासाची कविता कालानुक्रमे मराठी जैन साहित्यातील प्रारंभीची रचना असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यानंतर ब्रह्मजिनदास, गुणकीर्ती या कवींच्या रचनाही १५ व्या शतकाच्या उत्तरार्धात पाहावयास मिळते. मराठी जैन साहित्यातील महत्त्वाचे ग्रंथ, उदा. श्रेणिकचरित्र, पद्मपुराण (रामायण), हरिवंश पुराण इ. ग्रंथांसह काही स्फुट रचनाही या कवींनी १५ व्या शतकाच्या उत्तरार्धात लिहिलेल्या आहेत. १६ व्या शतकाच्या प्रारंभी मेघराज, कामराज, पंडित सूरिजन हे काही महत्त्वाचे कवी जैन साहित्याची निर्मिती करीत असताना दिसतात. १६ व्या शतकाच्या मध्यावर कवींद्रसेवक हा कवी साहित्यनिर्मिती करीत असलेला दिसतो.

## कवींद्रसेवकाचा काळ

कवींद्रसेवकाच्या काळाविषयी जैन साहित्याच्या अभ्यासकांध्ये मतभिन्नता आढळते. डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे यांनी मराठी जैन लेखकांचा कालखंड मांडताना कवींद्रसेवकाचा कालखंड अनिर्णीत मानला आहे. डॉ. विद्याधर जोहरापूरकरांनीही कवींद्रसेवकाच्या कालाविषयी अनिश्चितता व्यक्त केली आहे. अलीकडे इ. स. १९२० ते १९३०च्या दरम्यान सखाराम नेमचंद दोशी यांनी महतिसागरांचे आणि कवींद्रसेवकाचे काही विस्कळित अभंग संकलित करून ते पुस्तकरूपाने छापले. कवींद्रसेवकाच्या एकूण ५४५ अभंगांपैकी २८६ अभंग श्री दोशी यांनी छापले आहेत. या ग्रंथांचा कालखंड एकच असावा असे म्हटले आहे. महतिसागरांचा ालखंड इ. स. १७७२(१७७४)ते १८३२ असल्याचे निर्विवादपणे सिद्ध झाले आहे. काही अभ्यासकांनी कवींद्रसेवक हा महतिसागरांचा पूर्वकालीन किंवा समकालीन असल्याचे म्हटले आहे. कवींद्रसेवकाच्या उपर्युक्त सर्व अभ्यासकांना श्री. सखाराम हिराचंद दोशी यांनी संकलित केलेले अभंगच उपलब्ध होत. त्या उपलब्ध अभंगांमध्ये कवींद्रसेवकाच्या कालखंडाचा पुसटसासुद्धा

उल्लेख नाही, त्यामुळे वरील समस्त संशोधकांची मते म्हणे निव्वळ अनुमानावरच अवलंबून आहेत. शिवाय कवींद्रसेवकाच्या अभंग उपलब्ध हस्तलिखितांमध्ये विषयवार विभागणीही आढळत नाही, त्यामुळे कवींद्रसेवकाचे अभंग उत्तरकालात संकलित झाले असावेत, असे वाटते.

'सुमतिप्रकाश' या प्रस्तुत ग्रंथामध्ये कवींद्रसेवकाने स्वतःच ग्रंथसमाप्तीचा काळ निर्देशित केला आहे. तो असा आहे –

हे सुमतिकथा पंचेम काली। संमत सोळाशे पंचेवीस साली।।
कवींद्रशेवक श्रोत्याचे चेरणतळी। लीन जाला असे।।

इसवी सनानुसार हा काल १५६८ असा सिद्ध होतो.

कवींद्रसेवकाच्या साहित्यामध्ये ही एकमात्र ओवी त्याच्या कालनिश्चितीचे निर्धारण करताना दिसते. यावरून कवींद्रसेवकाचा काळ निर्विवादपणे वि. सं. १६२५ म्हणजेच इ. स. १५६८असा सिद्ध होतो. त्यामुळे कवींद्रसेवकाच्या कालनिश्चितीविषयी उपर्युक्त संपूर्ण चर्चेचे आपोआपच निरसन होऊन जाते.

**कवींद्रसेवकाचा परिचय व साहित्यरचना**

जैन साहित्याच्या हस्तलिखितांचे संशोधन करीत असताना कवींद्रसेवकाचे ५४५ स्फुट अभंग व सुमतिप्रकाश हा एक प्रबंधग्रंथ आढळला आहे. या दोनही ग्रंथामध्ये कवींद्रसेवकाने आपला पुसटसा सुद्धा परिचय दिलेला नाही. आपले कुल, स्थान, मातापिता किंवा गुरुपरंपरा यांचा कसलाही परिचय प्राप्त होत नाही. कवींद्रसेवक हे त्याचे नाव सुद्धा, विशेष नाम न वाटता त्याने काव्यलेखनासाठी घेतलेले उपनाम किंवा टोपण नाव असावे असे वाटते. पण तसे करताना त्याने स्वतःस कवींद्र किंवा कविश्रेष्ठ न म्हणता कवींद्रसेवक म्हणजेच श्रेष्ठ कवीचा सेवक किंवा दास संबोधले आहे. हे कवींद्र म्हणजे त्याचे पूर्वसूरी किंवा पूर्वाचार्य किंवा त्याचे गुरूही असावेत. पण त्यांचाही पुसटताही उल्लेख कुठे केलेला नाही. कवींद्रसेवकाच्या समकालीन किंवा उत्तरकालीन कवींच्या काव्यातही कवींद्रसेवकाचा उल्लेख आढळत नाही. या कालखंडातले समस्त जैन कवी भट्टारकांचे भक्त किंवा सेवक होते. त्यांनी तसे स्पष्ट उल्लेखही आपल्या साहित्यात केले आहेत. कवींद्रसेवक त्याच कवींच्या परंपरेतील असल्याने तोही भट्टारकांचा भक्त किंवा सेवक असावा. शिवाय

त्याच्या साहित्यावर वैदर्भी किंवा वऱ्हाडी मराठीचा स्पष्ट प्रभाव परिलक्षित होतो. आणि त्याच्या उत्तरकालीन समस्त विदर्भी मराठी कवी कारंजा येथील भट्टारकांचे सेवक किंवा भक्त होते. हे भट्टारक गुजरात व दिल्ली येथून महाराष्ट्रात आले. या भट्टारकांनी आपली पीठे कारंजा, शिरडशहापूर, लातूर इथे स्थापन केली. संपूर्ण विदर्भात आणि मराठवाड्यात त्यांचा शिष्यगण पसरलेला होता. समस्त जैन कवी याच परिसरातले असून त्यांची कर्मभूमीही हाच परिसर आहे. संपूर्ण भट्टारक संप्रदायाचा सविस्तृत परिचय 'भट्टारक संप्रदाय' या ग्रंथात मिळू शकेल. इ. स. च्या १५ व्या शतकापासून मराठीतून काव्यरचना करणारे अनेक जैन कवी स्वतःस या भट्टारक परंपरेस जोडून घेतात. कवींद्रसेवकाच्या दोन्ही उपलब्ध रचनांमध्ये त्याने स्वतःच्या गुरुपरंपरेचा किंवा कोणत्याही भट्टारकाचा उल्लेख केला नाही. गुरुचरणी किंवा तीर्थंकर चरणी बसून लिहिल्याचाही उल्लेख नाही. केवळ कवींद्रसेवक असा आपला उल्लेख प्रत्येक अभंगाच्या किंवा सुमतिप्रकाश च्या प्रत्येक अध्यायाच्या अंती आवर्जून केला आहे. त्यामुळे कवींद्रसेवकाच्या अधिक परिचयासाठी आणखी संशोधनाची आवश्यकता आहे.

कवींद्रसेवकाचे नाव, माता-पिता, कुल-वंश, गुरुपरंपरा आदींची ज्याप्रमाणे माहिती मिळत नाही, त्याचप्रमाणे त्याच्या स्थानाविषयीही काही संकेत मिळत नाही. परंतु ग्रंथात वापरलेली भाषा पूर्व मराठवाडा अथवा वऱ्हाडी आहे, त्यावरून कवी मराठवाडा-विदर्भातील असावा असे अनुमान काढता येते. ग्रंथाच्या पहिल्या अध्यायात

याच भरथ क्षत्रामाझारी। बत्तीस हजार देश थोर।
त्यात माळव देश सार। वनोपवन शोभती।।

अशी एक ओवी येते. हा मालवदेश अथवा माळवा उत्तर विदर्भाच्या लगत असल्याने ओवीत वर्णिलेल्या माळव्याप्रमाणे विदर्भाचा तो प्रदेशही वनोपवनांनी आणि नैसर्गित संपत्तीन समृद्ध संपन्न असला पाहिजे. प्रायः प्रत्येक अध्यायाचे समृद्ध निसर्गाचे, वृक्षवल्लींचे, पत्रपुष्पांचे, सुपीक भूमीचे, धान्यादिकांचे वर्णन कवीने दिलखुलासपणे केले आहे. तसेच ग्रंथामध्ये कवीच्या समकालीन समाजाचे, समाजात असलेल्या जाती-जमातींचे, ढोंगी-पाखंडी लोकांचे, लोकाचारांचे, देवी-देवतांचे, शुभाशुभ समजुतींचेही वर्णन कवीने केले आहे. हे सर्व वर्णन एकनाथकालीन महाराष्ट्राचे असल्याचे जाणवते.

यावरून हा कवी एकनाथाचा समकालीन असल्याचेही अनुमान काढता येते. त्यामुळे हा ग्रंथ अस्सल महाराष्ट्री प्रदेशात लिहिला गेला असल्याचे जाणवते.

**सुमतिप्रकाश : सामान्य परिचय**

या ग्रंथनाम सुमतिप्रकाश। जेणे आज्ञानतम पावे नाश।।
जेने जीव होय पुण्यरास। बैसे सावकाश मोक्षासी।।(अ. १, ओवी २६)

सुमतिप्रकाश म्हणजे उत्तम बुद्धीचा प्रकाश, अज्ञानाच्या अंधाराचा नाश करणारा. तत्कालीन समाजामध्ये व्याप्त असलेले धर्माचा, परंपरेचा, रूढिग्रस्ततेचा, अज्ञानाचा अंधार दूर करणारा हा सुबुद्धीचा प्रकाश. समाजामध्ये व्याप्त असलेले अज्ञान दूर करण्यासाठी कवीने हा ग्रंथ लिहिला असला तरी १६ व्या शतकातील महाराष्ट्रातील एकूणच सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक परिस्थिचीवर प्रकाश टाकणारा हा एक महत्त्वाचा ग्रंथ आहे, असे म्हणता येईल. जैनमत, अहिंसा, शाकाहार, आगम, सम्यक्त्व, सम्यक्चारित्र यांचा पुरस्कार करणारा हा ग्रंथ असून तत्कालीन समाजामध्ये व्याप्त भोंदूगिरी, जादूटोणा, भोंदू संन्यासी, मांसाहारी जोगी, पाखंड मताचे योगी–संन्यासी यांचा समाचार घेणारा हा ग्रंथ आहे. भ्रष्ट आचरणाने, विषयवासनेने, मांसाहाराने व मद्यपानाने बुद्धी नष्ट झालेले कुसंन्यासी आणि जैनविचाराने मतपरिवर्तन झालेला राजा यांचे चित्रण करणारा हा ग्रंथ आहे. या ग्रंथात ग्रंथात उल्लिखित ज्ञानपुरी आणि त्या नगरीचा राजा राम आणि त्याला वश करून घेतलेले कुसंन्यासी येथून ही कथा सुरू होते. अनेक राजांना स्वतःस वश करून घेऊन त्यांना यज्ञयाग करायला लावून, पशुबळी करायला लावून, त्यांना मांसभक्षण करायला लावून त्यांना व सामान्य जनांना स्वतःच्या स्वार्थासाठी कुधर्माच्या मार्गी लावणारे संन्यासी यांच्याविषयीची कथा या ग्रंथात येते. याचवेळी जैन साधूच्या सहवासात आलेला राजा आणि त्याने या पाखंडी संन्यासाच्या विरुद्ध आखलेली मोहीम, जनतेला धर्ममार्गास लावण्याचा प्रयत्न करणारा राजा आणि वारंवार त्या पाखंडी कुसंन्यासाच्या टोळीला क्षमा करणारा राजा अशी कथा यात येते. या कथेतील काही घटना म्लेच्छ पाटणनगरीतही होते.

'सुमतिप्रकाश' या ग्रंथात एकूण ११ अध्याय असून या सर्वच अध्यायांमध्ये सद्विचारांचा व कुविचारांचा संघर्ष तसेच जैनमत, अहिंसामत यांचा पुरस्कार केला आहे.

पहिल्या अध्यायात ज्ञानपुरीचा राजा पाखंडी साधूंच्या भूलथापांना बळी पडलेला राजा आपल्या निवडक सामंतजनांसह हिंसा करण्यासाठी हरणांची शिकार करण्यासाठी जातो. तेथे पर्वतीय वनामध्ये पारध करण्यासाठी गेलेल्या सैनिकांना शिकार काही सापडत नाही. शेवटी राजा स्वतःच वनामध्ये जाऊन सात हरिणे पकडून आणतो. तेथे वनामध्ये तपस्यारत मुनीसही पकडून आणतो. त्यांच्यावर तऱ्हेतऱ्हेचे उपसर्ग करतो, परंतु त्या महासंकटातही मुनींचा क्षमाभाव पाहून राजाचे मतपरिवर्तन होते. हिंसामार्ग व पांखंडी विचारांमधील फोलपणा त्याच्या लक्षात येतो आणि तो मुनींना शरण जातो. तेव्हा मुनी राजास पकडलेली सात हरणे मुक्त करण्यास सांगतो. मुनींच्या उपदेशानुसार राज्याची सर्व बाजूंनी भरभराट होते, सर्वत्र सुख-समृद्धी नांदू लागते. राजाचे मतपरिवर्तन होते. तो अहिंसाप्रसारक जैन मुनींचा शिष्य बनतो. नंतर पाखंडी संन्यासी राजाला मिथ्यात्वाच्या मार्गावर आणण्याचे प्रयत्न करतात. म्लेच्छ राजाही पाखंडी संन्याशाची अवमानना, अवहेलना करू लागतो. जो जो पाखंडी संन्यासी राजाला पाखंड शिकविण्याचे प्रयत्न करतात तो तो ते अधिकच उघडे पडत जातात. अंततः राजासह सर्वच पाखंडी संन्यासी जैनमार्गी व सम्यक्त्वी बनतात.

## 'सुमतिप्रकाश' मध्ये प्रतिबिंबित सामाजिक स्थिती

एकनाथपूर्व महाराष्ट्राच्या, विशेषतः विदर्भाच्या सामाजिक, सांस्कृतिक स्थितीचे वर्णन करणारा 'सुमतिप्रकाश' हा ग्रंथ मराठी साहित्याच्या आणि समाजाच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. दत्त संप्रदायाचा काळ, दासोपंताच्या साहित्यरचनेचा काळ आणि सुमतिप्रकाश ग्रंथाचा काळ एकच आहे. महाराष्ट्रातील मुस्लिम राजवटीच्या ऊर्जितावस्थेचा हा काळ, याच कालखंडात हा ग्रंथ लिहिला गेला आहे. एकनाथपूर्व मुस्लिम राजवटीच्या काळात उर्दू आणि फारशी शब्दांच्या प्रभावकाळात अस्सल मराठी देशी शब्दांत-भाषेत लिहिला गेलेला हा ग्रंथ आहे. तत्कालीन महाराष्ट्रातील ग्रामीण भागात, समाजात प्रचलित असलेल्या अंधश्रद्धा, मद्य-मांसादी अभक्ष्य भक्षणाचा सुळसुळाट, पवित्र आध्यात्मिक जीवनाचा ऱ्हास, हिंसामय जीवनाचा प्रचार, जटाधारी पाखंडी साधूंचा प्रभाव, त्यांची भोगलालसा अशा अनेक कुप्रथांमध्ये अडकलेल्या समाजाचे चित्रण प्रस्तुत ग्रंथात पडलेले स्पष्टतः दृग्गोचर होते. सामान्य जनांपासून अभिजात जनांपर्यंत अगदी राजेरजवाड्यांपर्यंत ठकविणारे गुरु, जारणमारणादी विद्या, मंत्रतंत्र,

जादूटोणे, अंगारेधुपारे, भोगप्रवणता हाच परमेश्वरभक्तीचा मार्ग सांगणारे कुगुरू यांचे चित्रणही या ग्रंथात आहे.

मनास आल्यासारिखे आन्न। च्यार वेळा करी भक्षण।।
रात्री भोगीती गोसावीन। कुजेन त्या मानीती।।
ज्याही फुंकुन घेतले कान। ते म्हणती गुरुपत्नी जान।।
नीत्य आणुन देती मद्यपान। भक्षावया तयासी।।

यासारख्या ओव्यांमधून तत्कालीन धार्मिक, आध्यात्मिक, सामाजिक स्थितीचे दर्शन घडते. कान फुंकणे, मौन धरणे, सोकासणे, फूस लावणे, आलिंगणे अशा प्रथा धार्मिक व गुरु-शिष्य संबंधाने होताना दिसतात. पिशाच काढणे, भंगाकार पुजणे (योनिपूजा), लिंगाकार पुजणे (लिंगपूजा), लोटांगणे घालणे, मिथ्यादेव पूजणे, झाडाच्या ढोलीत बसणे अशा अघोरी प्रथांचे उल्लेख या ग्रंथात आढळतात. वेश्यागमन करणे, विधवांचे गर्भवती होणे, गाढवावरून वरात काढणे अशांसारख्या समाजात प्रचलित होत्या असे उल्लेख आढळतात. मांगिणी, जोगिणी, रुषीणी, चुडेल, डाखिणी, शंखिणी, चांडाळिणी, कलाल अशासारख्या कदाचरणी जनांचे उल्लेखही या ग्रंथात झालेले आहेत. समाजात व्याप्त जातिव्यवस्था, विविध जातींचे व्यवसाय यांचे उल्लेखही या ग्रंथात कवीने केलेले आहेत. जसे -जैन लोक वस्त्रे विकीत, कलाल दारू विकीत, खाटीक आणि धनगर हिंसाव्यापार करीत, पंडित जन शब्दांचा विस्तार करीत, महार लोक ढोर ओढीत, तराळ निरोप्याचे काम करीत, भोई जाळ्यात मासे पकडीत असे विविध जातींचे व व्यवसायांचे उल्लेख आढळतात. तुळजाभवानी, लिंगाकार देव, अकरा रुद्र, नऊ नारायण, अकरा शंकर, नारद, बळिभद्र, इंद्र या देवदेवता आणि मगारी, म्हसोबा, खंडोबा, महारमेसाई या ग्रामदेवता, नृसिंह, हनुमंत, ब्रह्मा, विष्णू, महेश अशा देवतांचाही उल्लेख या ग्रंथात झाला आहे. जारकर्म, पोट पाडणे (गर्भपात), पारध करणे, शेंडी बोडणे, रमल विद्या, पिंगळ्याने वेळ सांगणे अशा सारखी कुकर्मेआणि समाजात व्याप्त अंधश्रद्धा यांचे उल्लेखही या ग्रंथात सापडतात. जैन, वारकरी, म्लेच्छ, नाथपंथी, मातंग, महार, भोई, तराळ, भंगी, वाघ्या, खात्या (लोहार), जोगी असे अनेक संप्रदाय व जाती यांचेही उल्लेख प्रस्तुत ग्रंथात मिळतात. समाजात प्रचलित कुप्रथा, प्राणिहिंसा, पशुहत्या यासारख्या सामाजिक कुप्रथांचे

वर्णनही या ग्रंथात झाले आहे. मद्यमांसादी अभक्ष्यभक्षण व अपेयपान करणारे लोक, जातिनिहाय मनुष्यांची प्रकृती, व्यक्तिमत्त्वे, समाजात व्याप्त व्यभिचार, अनैतिक संबंध, शिव्याशाप, परजातीय व आंतरजातीय विवाहाचा निषेध अशा दुराचाराचे वर्णनही या ग्रंथात झाले आहे. विविध व्यापारउदीम, उपजीविकेची साधने आदींचे उल्लेखही या ग्रंथात आले आहेत.

जैन धर्म आणि तत्त्वज्ञान, आचार-विचारांचा पुरस्कार करणारा हा ग्रंथ असल्याने साहजिकच हिंसानिषेध, मिथ्या देव-शास्त्र-गुरू यांचा निषेध या ग्रंथात करण्यात आला आहे. काही राजे-मांडलीक जैन धर्माचा पुरस्कार करणारे असावेत असे या ग्रंथातील राजांच्या वर्णनावरून दिसते. यातील सर्व कथा भरतक्षेत्रामध्ये घडतात, त्याचप्रमाणे ही कथासुद्धा भरत क्षेत्रातील माळव प्रांतात होताना दिसते. तत्कालीन मालव प्रदेश म्हणजे विदर्भाचा उत्तरपश्चिभ भाग व राजस्थानचा दक्षिण-पूर्व भाग असावा. या प्रांतातील तत्कालीन समाज, समाजातील विविधता, समाजामध्ये टोकापर्यंत व्याप्त झालेली अंधश्रद्धा, जोग्या-संन्याशांचे वाढलेले स्तोम, समाजातील दलिता-वंचितांची दुःस्थिती या सर्व परिस्थितीचे चित्रण या ग्रंथात दृष्टिगोचर होते. एकंदरीत एकनाथपूर्व विदर्भ-मराठवाड्याच्या दुःस्थितीचे वर्णन करणारा हा व तत्कालीन समाजाचे यथार्थ चित्रण करणारा हा ग्रंथ आहे.

**प्रस्तुत हस्तलिखिताचे स्वरूप व संगणकीय प्रतिलिपीचे स्वरूप**

प्रस्तुत हस्तलिखित वाशीमनिवासी श्री. महावीर जोगी यांच्याकडे होते. त्यांचे पिताश्री लालचंदजी जोगी यांनी या हस्तलिखिताच्या तीन प्रति बनवून घेतल्या आहेत. या प्रति एक मूळ प्रत व त्याच्या दोन कार्बन प्रती अशा आहेत. सर्व हस्तलिखिते चांगल्या स्थितीत असून त्यांचे कागद मात्र जीर्ण झाले आहेत.

सुमतिप्रकाशाचा रचनाकाल विक्रम संवत १६२५ असल्याचे कवी कवींद्रसेवक याने स्वतःच नमूद करून ठेवले आहे. इसवी सनानुसार हा काल १५६८ असा होतो.

ज्या मूळ हस्तलिखित प्रतीवरून श्री. लालचंद जोगी यांनी कार्बन प्रती बनवून घेतल्या ते मूळ हस्तलिखित उकळी जहागीर तालुका वाशीम (हल्ली जिल्हा वाशीम) येथील निवासी गोविंदा बोगार याने तयार केली आहे. हा गोविंदा बोगार भट्टारक विशालकीर्ती

यांचा शिष्य होता. ही प्रत त्याने भाद्रपद शुद्ध १४ संवत १९५० तदनुसार शके १८१५ रोजी पूर्ण केली आहे.

संपूर्ण ग्रथांची ओवीसंख्या २४०२ इतकी असून ती एकूण ११ अध्यायांमध्ये विभागलेली आहे. प्रत्येक अध्यायाची ओवीसंख्या स्वतंत्रपणे दिली असून प्रतिलिपिकाराने प्रत्येक अध्यायाच्या पुष्पिकेमध्ये ती नमूद केलेली आहे. प्रत्येक शंभर ओव्यांनंतर ओव्यांचे अंक पुन्हा १ पासून सुरू करून संबद्ध शतक संपल्यानंतर पुढचा शतकक्रमांक नमूद केला आहे.

या प्रतीची सर्व पत्रे आणि प्रत उत्तम स्थितीत आहे. प्रत्येक पत्राच्या खालच्या उजव्या बाजूस पत्र क्रमांक लिहिला आहे. शेवटचे पत्र बरेच जीर्ण झाले असून खालच्या बाजूस थोडेसे फाटले असून केवळ काहीच अक्षरे लुप्त झाली आहेत. प्रतीचा कागद सामान्य प्रतीचा असून प्रत्येक पत्राचा आकार २७ सें. मी. (१०।। इंच) बाय ) १८।। सें. मी. (७। इंच) इतका असून पृष्ठाच्या डाव्या-उजव्या बाजूंना ३-३ सें. मी. आणि वर-खाली २।। -२।। सें. मी. इतका समास सोडलेला आहे. हा समास लाल शाईने दुहेरी रेघांकित असून पत्राच्या समासाच्या आतील भागात २१ से. मी. बाय १३ सें. मी. इतक्या जागेत ग्रंथाची संहिता लिहिलेली आहे. प्रत्येक पत्रावर आडव्या जागेत १५-१५ ओळी आहेत. सर्वत्र अक्षरे समान असून काही ठिकाणी ती जाड तर काही ठिकाणी पातळ आहेत. सर्व ओव्या एकापुढे एक अशा लिहिल्या असून प्रत्येक ओवीच्या शेवटी दोन दंड मध्ये ओवीसंख्या व नंतर दोन दंड दिले आहेत. संपूर्ण ग्रंथ काळ्या शाईत लिहिलेला असून अधून मधून लाल शाईचा उपयोग केला आहे. प्रत्येक अध्यायाच्या शेवटी प्रतिलिपिकाराने नक्षी काढलेली असून तीमध्ये पाने-फुले चित्रित केली आहेत.

संपूर्ण प्रत बऱ्यापैकी शुद्ध आहे, परंतु काही ठिकाणी अशुद्ध्याही आढळतात. तत्कालीन शुद्धलेखनाचा विचार करताही या अशुद्ध्या ध्यानात येऊ शकतात. प्रतीच्या लेखनाचे स्वरूप व त्या प्रतीची संगणकीय प्रत तयार करताना केलेले बदल खालील प्रमाणे आहेत.

* प्रतिलिपिकाराने अनुस्वारांच्या बाबतीत बराच घोटाळा केलेला आढळून येतो. अनेक ठिकाणी अनावश्य ठिकाणी अनुस्वार आले आहेत, तर आवश्यक ठिकाणी

अनुस्वार नाहीत. असे अनुस्वार प्रतिलिपी करताना काढून टाकले आहेत. अनेक स्थानी अनुस्वारांचा स्थानबदलही झालेला दिसतो. ते योग्य ठिकाणी ठेवण्यात आले आहेत.

* अनेक ठिकाणी अनुस्वार, रेफ, दंड सुटेले आहेत किंवा मागे-पुढे झाले आहेत.

* अनेक ठिकाणी अक्षरे सुटली आहेत. प्रस्तुत प्रत तयार करताना आमच्या क्षमतेनुसार ती कंसामध्ये ठेवली आहेत.

* प्रतिलिपिकाराने बऱ्याच ठिकाणी ऐ च्या स्थानी औ चा वापर केला आहे. जिथे औ आहे आणि ऐ असायला हवे तिथे कंसामध्ये ठेवले आहे.

* म्ह साठी सर्वत्र ह्म लिहिले आहे.

* श, स, ष साठी सर्वत्र विकल्पाचा वापर करण्यात आला आहे. हे विकल्प पांडुलिपिकाराने मनसोक्त वापरले आहेत.

* बऱ्याच ठिकाणी द साठी द्य लिहिले आहे.

* ऱ्याच ठिकाणी अक्षरे किंवा शब्द सुटले आहेत. जिथे प्रतिलिपकाराच्या लक्षात आले तिथे काकपाद देऊन समासात लिहिली आहेत. परंतु प्रतिलिपिकाराच्या अनवधानामुळे जिथे ती अक्षरे सुटली आहेत, आम्ही ती आमच्या बुद्धीनुसार अनुमानाने कंसात टाकली आहेत.

* बऱ्याच ठिकाणी अक्षरे किंवा शब्द यांचा स्थानबदल झालेला आहे. अशा वेळी प्रतिलिपिकाराने अक्षरांवर किंवा शब्दांवर सुधारणासूचक अंक टाकले आहेत.

* अंत्य यमकामध्ये अनेक ठिकाणी अनावश्यकपणे स्वरागम झालेला आढळतो.

* अकराव्या अध्यायात काही स्थानी ओव्यांचे क्रमांक द्विरुक्त झाले आहेत, अशा स्थानी दुसऱ्या स्थानी अ हे अक्षर ठेवले आहे.

* * *

## मध्ययुगीन मराठी साहित्य आणि मराठी जैन साहित्य

महाराष्ट्राच्या इतिहासात १८ वे व १९ वे शतक हे प्रबोधनाचे, ऐतिहासिक व सांस्कृतिक संशोधनाचे शतक आहे. मुद्रणकलेचे आगमन व प्रसार हे या कालखंडाचे वैशिष्ट्य म्हणता येईल. परिणामतः १८ व्या शतकातच मराठी साहित्याच्या व संस्कृतीच्या संशोधनाचे प्रयत्न झाले आहेत. मराठी साहित्याच्या आणि इतिहासाच्या संकलनाचे प्रयत्न महाराष्ट्राच्या इतिहासात यापूर्वी

झाल्याचे उल्लेख आढळत नाहीत. याला अपवाद म्हणजे महिपतिबुवा ताहराबादकर यांनी संकलित केलेली मराठी संतांची चरित्रे व त्यांचे साहित्य म्हणता येईल. तदनंतर १९ व्या शतकात वि. ल. भावे यांनी लिहिलेला मराठी वाङ्मयाचा इतिहास. हा एकूणच मराठी वाङ्मयेतिहासाची प्रथमतः ओळख करून देण्याचा प्रयत्न होय. नंतर याला जोडलेली पुरवणी आणखी इतिहासात राहिलेले संदर्भ जोडण्याच्या प्रयत्नातून झालेली मांडणी होती. या दोहोंच्या मांडणीत नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, समर्थ या वैदिक परंपरेतल्या संप्रदायाच्या साहित्याची ओळख करून दिलेली आहे. यानंतर ल. रा. पांगारकरांनी पुढचा प्रयत्न केला आहे. डॉ. अ. ना. देशपांडे, ह. श्री. शेणोलीकर या विद्वानांनीही प्राचीन, मध्ययुगीन या शीर्षकांनी मराठी साहित्याचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. वैदिक परंपरेच्या पलीकडे जाऊन ख्रिस्ती, मुसलमान, वीरशैव, लिंगायत आदी संप्रदायांतील मराठी साहित्य त्रोटकपणे समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. अलीकडेच र. बा. मंचरकरांनी वीरशैव संप्रदाय, शैव-शाक्त प्रभावातले साहित्य या संप्रदायांचा उल्लेख करून काही वाङ्मयीन कृतींचा परिचय करून दिलेला आहे. डॉ. ल. रा. नसीराबादकर यांनी महाविद्यालयीन अभ्यासक्रम डोळ्यासमोर ठेवून मराठी वाङ्मयेतिहासाचा धावता आढावा घेतला आहे. यामध्ये कालखंडानुसार मांडणी केली आहे. या इतिहासलेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे यांनी संशोधन केलेल्या मध्ययुगीन साहित्याचा उल्लेख जैन साहित्याचा उल्लेख 'जैन धर्मीयांचे वाङ्मय या शीर्षकाने नसीराबादकर यांना केला आहे. वरील सर्वच इतिहास लेखकांचे वैशिष्ट्य असे की या सर्वांना वाङ्मयेतिहास लिहिताना सांप्रदायिक आणि धार्मिक भेदांच्या भिंती कल्पून वाङ्मयेतिहासाची मांडणी केली आहे. धार्मिक आणि सांप्रदायिक भेद करताना पुन्हा या सर्वांनी काही संप्रदायांना

अस्पृश्य मानले आहे. काही संप्रदायांचे उदात्तीकरण करून इतरांचे साहित्य दर्जेदार आणि विपुल असतानाही त्याकडे दुर्लक्ष केले आहे. प्राचीन मराठी साहित्य हे त्या त्या धर्मानुयायांचे भक्तिसाहित्य आहे ही अभ्यासाची दिशा प्रारंभापासून स्वीकारल्याने अनेक नवोदित आणि वाटाड्यांनाही धार्मिक आणि सांप्रदायिक वाटेनेच इतिहास शोधणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यामुळे एखाद्या विशिष्ट कवीलेखकाचा अभ्यास करतानाही त्याची परंपरा निश्चित करून त्याचे त्या संप्रदायाचे स्थान निश्चित करणे असा अभ्यासाचा प्रघात प्रत्येक विद्यापीठीय संशोधनात झाला आहे. या संदर्भात डॉ. वि. भि. कोलते यांनी स्वीकारलेला दृष्टिकोण वाङ्‌मयेतिहासकारांनी लक्षात घेतला असता तर कदाचित् मराठी वाङ्‌मयेतिहासातील ही अस्पृश्यता व जातिभेद काहीसा दूर झाला असता. या संदर्भात डॉ. कोलते म्हणतात की, ''महाराष्ट्रातील जनसमाजाची भाषा मराठी, तिच्यातून निर्माण झालेले वाङ्‌मय ते 'मराठी वाङ्‌मय', मग ते मग ते कोणत्याही पंथीयांनी किंवा धर्मानुयायांनी लिहिलेले असो. हा विचार आमच्या मनात का येत नाही? 'मराठी असे आमुची मायबोली, जरी भिन्न धर्मानुयायी असू। सहिष्णुता अंगी पुरे बाणलेले, हिच्या एक ताटात आम्ही बसू।' या केवळ शब्दांतून व्यक्त झालेल्या भावनांचे प्रतिबिंब मराठी साहित्याच्या इतिहासात आम्हाला का आढळून येऊ नये? मराठी साहित्याचा इतिहास लिहिताना हे सर्व लेखक मराठी आहेत, महाराष्ट्र सारस्वताचे उपासक आहेत ही दृष्टी समोर ठेवून त्या त्या कालखंडातील साहित्याचा विचार आम्ही का करू नये? हिंदू लेखकांचे साहित्य, मुसलमान लेखकांचे साहित्य, जैन मराठी लेखकांचे साहित्य असे भेद करून लिहिण्याची खरोखरच काही आवश्यकता आहे काय मराठी भाषिक जनतेच्या एकात्मतेच्या दृष्टीने अशी विभागणी करणे महाराष्ट्राच्या नव्हे, तर राष्ट्राच्या हिताचे होईल काय याचा विचार आमच्या वाङ्‌मयेतिहासकारांनी, विशेषतः प्राचीन वाङ्‌मयेतिहासकारांनी नीट विचार केला पाहिजे''. वाङ्‌मयेतिहासाची सद्यःस्थिती लक्षात घेता वरील विवेचनातील धर्मसंप्रदाय आणि घर्मसंप्रदायांच्या परंपेचा अभ्यास व इतिहास अशीच मांडणी होताना दिसते. वाङ्‌मयेतिहासाच्या कालिक अभ्यासाला व त्या त्या काळातील समकालीन सामाजिक राजकीय अभ्यासासह समकालीन कवी-लेखकांचा अभ्यास होणे गरजेचे वाटते. नाही म्हणायला एखादा संप्रदाय व त्याचा समकालीन अभ्यास असे प्रयत्न झाले आहेत. उदा. लीळाचरित्रातील समाजजीवन, महानुभावियांचे

साहित्य आणि समाज. वारकरी संप्रदायाचा अभ्यास करताना १३ व्या शतकातील राजकीय, सामाजिक व धार्मिक स्थिती इत्यादींचा अभ्यास. पण याच काळात इतर संप्रदायांतील व समाजातील लेखक काय करीत होते व त्यांच्या दृष्टीने समाजजीवन कसे होते याचे आकलन मांडण्याचा प्रयत्न वाङ्मयेतिहासकारांनी केल्याचे दिसत नाही. इतिहास व वाङ्मयेतिहास संशोधनातही १९ व्या व २० व्या शतकात विशिष्ट समाजांची मक्तेदारी असल्याने व वैदिक परंपरेच्या मांडणीतून लिहिलेल्या इतिहासाला सध्याच्या अनुयायांची मान्यता असल्याने विशिष्ट सांप्रदायिक वाङ्मयाचा इतिहास म्हणजेच मराठी वाङ्मयाचा इतिहास हे बहुतेक विद्यापीठीय विद्वानांसह अभ्यासकांनी मान्य केले आहे. परिणामतः मध्ययुगीन मराठी साहित्याचा अर्धवट इतिहास मराठी साहित्याचा अशी मान्यता आज प्रचलित झाली आहे.

दुसरी एक गोष्ट वाङ्मयेतिहासकारांनी हेतुपुरःसर अथवा अज्ञानातून वगळली आहे. ती म्हणजे मध्ययुगीन मराठी समाजाच्या बोलीतून लिहिलेले साहित्य आणि अपभ्रंश भाषेतून लिहिलेले साहित्य होय. अगदी १६ व्या शतकापर्यंत महाराष्ट्रामध्ये अपभ्रंश भाषेमध्ये साहित्य निर्माण होताना दिसते. मराठी भाषेशी जवळीक असणाऱ्या अनेक भाषांमधील रचना मध्ययुगीत काळात निर्माण होताना दिसतात. मराठी भाषा आणि उर्दू साहित्यातील रचना, मराठी भाषा आणि सूफी संप्रदायाचे साहित्य, इतर संप्रदायांमध्ये आनंद संप्रदाय, नागेश संप्रदाय, वीरशैवांचे साहित्य, मुस्लिम कवींनी लिहिलेले साहित्य (मध्ययुगीन मुस्लिम कवींनी वैदिक संप्रदायावरील साहित्य वगळता), ख्रिस्ती धर्मीयांचे साहित्य, हिंदू-मुस्लिम ऐक्याचे लिहिलेले साहित्य. गावोगावी चालणारे मेळे, तमाशे, यात्रा आणि बहुजन समाजातील बोलींमधून लिहिले गेलेले साहित्य या सर्वांसह मराठी जैन साहित्याचा इतिहासही उपेक्षित आहेच. मराठी वाङ्मयेतिहासाचा पुनर्विचार या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

*****

## मध्ययुगीन मराठी जैन साहित्य

महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांमध्ये मराठीतील जैन साहित्य विखुरलेले आहे. मध्ययुगीन काळात पूर्व मराठवाड्याची आणि विदर्भाची भूमी ही मराठी जैन कवी-लेखकांची सारस्वतभूमी आहे. विदर्भासह दक्षिण-पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्याचा पूर्व भाग, बेळगाव-धारवाडसह मिरज पूर्व भागातील सध्याचा कन्नड प्रदेश, सातारा, पुणे जिल्ह्यातील काही प्रदेशामध्ये मराठीतील जैन कवी लिहिताना दिसतात. याशिवाय मराठी जैन साहित्याचे कालिक वर्गीकरण करतानाही विशिष्ट काळात विशिष्ट प्रदेशात जैन साहित्य लिहिले गेल्याचे दिसते. प्रा. डॉ. विद्याधर जोहरापूरकर यांनी जैन साहित्याचे कालिक आणि प्रादेशिक वर्गीकरण केले आहे. इ. स. १४५० ते १५५० हा उपलब्ध संशोधनातील जैन साहित्याचा पहिला कालखंड मानला गेला आहे. गुजराती पंडितांची शिष्यपरंपरा गुजराती साहित्याच्या प्रभावाखाली लिहिताना दिसते.

## इ. स. १४५० ते १५५० या कालखंडातील प्रारंभिक जैन साहित्य

जैन साहित्याचे संशोधन आणि हस्तलिखितांचे संशोधन यांना मर्यादा असल्याने सध्या तरी दोनच संशोधकांनी मराठी जैन साहित्याचा अल्पसा खोदला आहे. त्यांमध्ये डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे यांनी एकूण ५४ जैन ग्रंथांचा परिचय करून दिला आहे, तर डॉ. जोहरापूरकर याच्यापुढे जाऊन ६४ ग्रंथरचनांचा परिचय करून दिला आहे. या दोन संशोधकांच्या संशोधनाच्या आधारे मराठी वाङ्मयाच्या इतिहासात जैन ग्रंथकारांच्या नोंदी घेतलेल्या आहेत. याशिवाय सन्मति मासिकाच्या -- १९५५ च्या लेखामध्ये जैन साहित्याच्या इतिहासाविषयी उल्लेख आलेला आहे. तसेच महाराष्ट्र साहित्यपत्रिका -- १९५६ च्या नियतकालिकामध्ये मध्ययुगीन काळातील २० जैन कवींचा उल्लेख आलेला आहे. या सर्व उपलब्ध संशोधनाच्या आधारे मध्ययुगीन मराठी जैन साहित्याच्या इतिहासातील पहिल्या टप्प्यात म्हणजेच इ. स. १४५० ते १५५० या काळातील पहिला कवी म्हणून गुणदास या कवीचा उल्लेख संशोधकांनी केला आहे. गुणदासाच्या नावावर पाच रचनांची नोंद आहे. यातील सर्वात महत्त्वाची रचना म्हणजे 'श्रेणिकचरित्र' ही होय. ३००० ओवीसंख्या असलेला हा ग्रंथ आहे. याखेरीज 'रामचंद्र हळदुली' ही ३० पद्यांची कविता, 'गाऱ्हाणे' ही ६ पद्यांची रचना, 'क्षमागीत' आणि 'विंचूगीत' या अनुक्रमे ६ व ५ पद्यांच्या रचना गुणदासाच्या नावावर संशोधकांनी नोंदल्या आहेत. गुणदासानंतर गुणकीर्ती

या कवीची विपुल रचना जैन साहित्यात आढळते. जोहरापूरकरांच्या मते गुणदास हेच कवी मुनिदीक्षा घेतल्यानंतर गुणकीर्ती या नावाने लेखन करतात. इ. स. १४७० च्या दरम्यान या कवीची 'पद्मपुराण' ही बृहद् रचना उपलब्ध होते. १५००० ओव्यांची ही जैन रामायणाची रचना तीन कवींनी पूर्ण केली आहे.

यांपैकी पहिले २८ अध्याय गुणकीर्ती यांनी, त्यानंतर दोनशे वर्षांनी चिंतामणी कवीने ७ अध्याय व नंतर पुण्यसागर या कवीने आठ अध्याय जोडून हा ग्रंथ पुरा केल्याचे सांगितले जाते. या पद्मपुराणाचे पूर्व रामायण व उत्तर रामायण असे दोन भाग एकत्रित रीत्या लिहिले गेले आहेत. मराठी गद्याच्या रचनेतही गुणकीर्तीचे योगदान महत्त्वाचे आहे. धर्मामृत नावाचा एक महत्त्वाचा ग्रंथ गुणकीर्तीच्या नावावर उपलब्ध आहे आणि तो गद्यात आहे. जैन तत्त्वज्ञानाची आणि आचारधर्माची माहिती सांगणारा हा महत्त्वाचा गद्यग्रंथ आहे. याशिवाय गुणकीर्ती याच्या नावावर नेमिनाथ पाळणा, नेमिनाथ विवाह, नेमिनाथ जिनदीक्षा, रुक्मिणीहरण, रामचंद्र फाग, धंदागीत अशा रचनाही आढळतात. गुणकीर्तीच्या नावावर काही गुजराथी रचनाही आढळतात.

जिनदास या पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धातील कवीच्या नावावर 'हरिवंशपुराण' ही एकमेव ११००० ओव्यांची बृहद् रचना उपलब्ध आहे. ५५ अध्यायांतील या विशाल ग्रंथामध्ये श्रीकृष्ण, बलराम आणि नेमिनाथ यांच्या संबंधी महाभारताची कथा आहे. अत्यंत विद्वत्तापूर्ण व काव्यगुणांनी नटलेला हा ग्रंथ १५ व्या शतकातील मराठी साहित्याचा उत्कृष्ट नमुना आहे.

मेघराज हा १६ व्या शतकातील प्रारंभीचा कवी. 'जसोधररास' ही प्राचीन काळापासून जैन कवींना आवडणारी कथा मेघराजाने मराठीत आणली आहे. ही कथा अनेक कवींनी जैन कवींनी लिहिली आहे. पार्श्वनाथ भवांतर, कृष्णगीत, गोम्मटस्वामी गीत इत्यादी रचनाही मेघराजाने रचल्या आहेत. शांतिनाथ चरित आणि तीर्थवंदना या दोन गुजराथी रचनाही मेघराजाने केल्या आहेत.

मेघराजानंतर या कवीच्या समकालीन काव्यरचना करणाऱ्या कासघराज या कवीने 'सुदर्शनचरित' हे चरितकाव्य लिहिले असून चैतन्यफाग, धर्मफाग या रचनाही केल्या आहेत. यानंतर पंडित सूरिजन या कवीने याच कवीच्या नावावर 'परमहंसकथा' ही एकमेव रचन या काळात आहे. या रचनेचे वैशिष्ट्य म्हणजे हे एक आध्यात्मिक रूपक काव्य

आहे. इ. स. १५४० च्या सुमारास नागो आया या कवीने पाच अध्यायांचे व २२२ ओव्यांचे 'यशोधर चरित' हे काव्य लिहिले आहे.

याच काळातील भट्टारक परंपरेशी संबंधित नसलेला कवी म्हणून कवींद्रसेवकाचे नाव घ्यावे लागेल. या कवीच्या स्थळाचा व गुरुपरंपरेचा उल्लेख मिळत नसल्याने हा कवी भट्टारक परंपरेशी संबंधित नाही. या कवीने रचलेला 'सुमतिप्रकाश' हा २१ अध्यायांचा ग्रंथ तत्कालीन समाजरचनेवर प्रकाश टाकणारा आहे. समाजामध्ये व्याप्त अंधश्रद्धा, हिंसा व अनेक जोग्या-बैराग्याचा झालेला सुळसुळाट यांचे वर्णन या ग्रंथात मिळते. या ग्रंथामुळे तुकारामपूर्व मराठीतील अभंगरचनांची व बोलींची माहिती मिळण्यास मदत होते. याशिवाय या कवीचे ५४५ अभंगही तत्कालीन समाजदर्शनाचे व भाषेचे दस्तऐवज म्हणून पाहता येतील. इ. स. १५४८ मध्ये या कवीने सुमतिप्रकाश ही रचना पूर्ण केल्याचे म्हटले आहे. मराठी जैन साहित्याच्या पहिल्याच शतकात इतक्या विपुल आणि विविध रचना झालेल्या आढळतात. १३ व्या शतकात ज्याप्रमाणे मराठी साहित्यात मराठी ग्रंथनिर्मितीची लाट उसळली त्याचप्रमाणे इ. स. १४५० ते १५५० हे मराठी जैन साहित्याचे पहिले शतक महत्त्वाचे आहे.

**जैन साहित्याचे पहिले शतक व मराठीची वाङ्मयधारा**

इ. स. च्या १३१८ ला यादव राजवटीचा पाडाव, इ. स. १३४७ च्या सुमारास बहामनी राज्याची स्थापना, याचबरोबर वारकरी संप्रदायाची नामदेव व चोखामेळ्यानंतर ओसरलेली स्थिती, नागदेवाच्या पश्चात् महानुभावियांची झालेली वाताहत या घटनांमुळे मराठी वाङ्मयात तमोयुग पसरल्याचे अनेक अभ्यासकांनी म्हटले आहे. भास्करभट्ट बोरीकर हे महानुभाव पंथाचे तिसरे आचार्य. यांच्या काळात नारोव्यासांनी लिहिलेला 'ऋद्धिपूरवर्णन' हा ग्रंथ (१३६३), 'स्थानपोथी' (१३५३) हे ग्रंथ महानुभावियांच्या ठिकाणांची माहिती देणारा ग्रंथ, याशिवाय पं. भीष्माचार्य यांच्या नावे असलेले काही व्याकरणग्रंथ अशी तुरळक ग्रंथरचना मराठीत या काळात झाल्याचे उल्लेख वाङ्मयेतिहासात येतात. नाथपंथीयांचा 'सिद्धान्तरहस्य', मुकुंदराज नावाच्या कवीचा 'योगविवेकमार्तंड' (१४२८) या ग्रंथांचा उल्लेखही ह. श्री. शेणोलीकरांनी केला आहे. १५ व्या शतकाच्या प्रारंभीच्या या ग्रंथांनंतर महाराष्ट्रात उदयास आलेल्या नागेश संप्रदायाचा रचनांचा उल्लेख येतो. वडवाळसिद्ध नागेशांचा शिष्य अज्ञान या कवीचा 'वरदनागेश' (१४३०) यासह

अन्य काही रचना आढळतात. बहिरापिसा जातवेद याची 'गीतगीता', वैष्णवपंथी चोंभा कवीचे 'उखाहरण' नामा पाठकाचे 'अश्वमेघ', कान्हो त्रिमलदासाचे 'पाताळकांड रामायण', निर्मळ पाठककृत 'पंचोपाख्यान' या ग्रंथांच्या कालाचा उल्लेख नसला तरी १५ व्या शतकाच्या प्रारंभीचे हे ग्रंथ असल्याचे अभ्यासकांनी मानले आहेत.

धामधुमीचा आणि वाताहतीचा काळ आणि मराठी साहित्य अशी मराठी साहित्याची या काळातील स्थिती असताना पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी जैन कवींची रचना महत्त्वाची मानली पाहिजे. वर उल्लेख केलेला इ. स. १४५० ते १५५० हा मराठी साहित्याचा सुवर्णकाळ म्हटला पाहिजे. प्रादेशिक दृष्ट्या विदर्भात लिहिणारे हे कवी मध्य महाराष्ट्र आणि दक्षिणपश्चिम महाराष्ट्रापासून दूर होते. मराठी साहित्याचा इतिहास मात्र या काळातील विदर्भातील साहित्याला वगळून लिहिलेला दिसतो. उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भ प्रांतात गुजराथी परंपरेतून वाढीस लागलेले मराठी जैन साहित्य प्रचंड ताकदीचे व विपुल प्रमाणात निर्माण होताना दिसते.

वारकरी संप्रदायातील कान्होपात्रेचे अभंग व भानुदासाच्या काही रचना वगळता १५ व्या शतकात मराठीतील मध्यवर्ती वाङ्मयधारेत अन्य कोणत्याही रचना आढळत नाहीत. १५ व्या शतकात ऐन मुसलमानी राजवटीच्या काळात दत्त संप्रदायाने (श्रीपाद श्रीवल्लभ व नृसिंह सरस्वती) आपले कार्य पश्चिम महाराष्ट्रात व उत्तर कर्नाटकात सुरू केल्याचे दिसते, परंतु या संप्रदायाची साहित्यरचना गुरुचरित्राच्या रूपाने (१५५८) १६ व्या शतकात सुरू झाल्याचे दिसते. त्यामुळे वाङ्मयेतिहासाच्या अभ्यासकांनी ज्याला तमोयुग म्हटले आहे तो मराठी साहित्याच्या पोकळीचा काळ म्हटला गेला आहे. अशा काळात आपल्या प्रतिभेने हे शतक प्रकाशित करणाऱ्या जैन कवींची नोंद मराठी वाङ्मयाच्या इतिहासाने का न घ्यावी हे आश्चर्य आहे. पुढे दासोपंतांची रचना (१५५१) सुरू होईपर्यंत लाखभर ओव्यांची रचना व मराठी गद्याची रचना जैन कवींनी या काळात करून ठेवली आहे. महाराष्ट्राचा साद्यंत इतिहास लिहिणाऱ्या वि. का. राजवाडे यांनी एकनाथपूर्व महाराष्ट्राचे केलेले वर्णन मराठीच्या अभ्यासकांना ज्ञात आहेच. राजवाडे यांनी महाराष्ट्राच्या पडझडीचे, इस्लामी राजवटीच्या प्रभावाचे अत्यंत रोचक वर्णन करून एकनाथ हेच महाराष्ट्राचे पुनरुज्जीवन करतील अशी वर्णने केली आहेत. अशा साक्षेपी इतिहासकारांनेही हे मराठीतील साहित्य दुर्लक्षित करावे याचे आश्चर्य वाटते.

## जैन साहित्याचा दुसरा कालखंड : इ. स. १६५० ते १८५०

इ. स. १५५० पूर्वीच्या प्रमुख जैन कवींच्या रचनांनंतर काही काळ तरी रचना तूर्तास तरी आढळत नाहीत. परंतु इ. स. १८५० नंतर कारंजा व विदर्भातील भट्टारकांच्या प्रभावाखालील रचनांचा काळ येतो. कारंजाचे तत्कालीन भट्टारक धर्मभूषण यांचे शिष्य गुणनंदी यांच्या नावावर 'जसोधरपुराण' ही एकमेव रचना मिळते. मराठीतील अनेक जसोधर चरित्रांपैकी ही महत्त्वाची व श्रेष्ठ दर्जाची रचना असल्याचे डॉ. अक्कोळे यांनी म्हटले आहे. १३१६ ओव्यांची ही रचना मोरंबपूर येथील माळातीर्थ मंदिरात पूर्ण केल्याचे कवीने सांगितले आहे. सकलकीर्ती यांच्या मूळ संस्कृत रचनेवरून ही रचना झाल्याचे कवीने सांगितले आहे. १६ व्या शतकाच्या अखेरचा हा कवी आहे. यानंतर बऱ्याच कालखंडानंतर अभयकीर्ती या कवीच्या रचना उपलब्ध होतात. या कवीची 'अनंतव्रत कथा' ही इ. स. १६१६ ची रचना आहे. कवी वीरदास उर्फ पासकीर्ती (पार्श्वकीर्ती) यांची 'सुदर्शनचरित्र' ही रचना इ. स. १६२७ साली लिहिली गेली आहे. या कवीची औरंगाबादच्या भट्टारक पीठावर त्यांच्या गुरूंनी नियुक्ती केल्याचे उल्लेख आहेत. या कवीने गुणकीर्तिकृत 'अनुप्रेक्षा' व 'विश्वतत्त्वप्रकाश' या रचनाही केल्या आहेत.

१७ व्या शतकाच्या मध्यावर काही कवींच्या उल्लेखनीय रचना मिळतात. दामापंडित हा दयासागर यांचा शिष्य, याच्या दोन रचना उपलब्ध आहेत. १६ अध्यायातील 'जंबूस्वामीचरित्र' व 'दानशीलतप भावना' या त्या रचना आहेत. यांपैकी 'जंबूस्वामीचरित्र' ही जैन साहित्यातील प्राचीन भाषांमधली प्राचीन कथा आहे. 'दानशीलतपभावना' हा कवितेचा दुसरा भाग पुढे भानुकीर्ती या कवीने केला आहे.

दयासागर उर्फ दयाभूषण हा एक कवी या काळातील असल्याची नोंद केली गेली आहे. दामापंडित, दयासागर व दयाभूषण हे तीनही कवी एकच असावेत असेही संशोधकांचे म्हणणे आहे. दामापंडिताचा गुरू दयासागर असल्याचेही म्हटले गेले आहे. या कवीच्या कालनिश्चितीबाबत संदिग्धता असली तरी हा याच काळातील कवी असावा, याविषयी त्याच्या आधीच्या व नंतरच्या कवितेतील उल्लेखांवरून मानले गेले आहे. या कवीच्या नावे सम्यक्त्वकौमुदी, भविष्यदत्त बंधुदत्त पुराण, धर्मामृतपुराण हे तीन महत्त्वाचे ग्रंथ आहेत. जैन साहित्याचे दुसरे शतक या ठिकाणी समाप्त होते.

**इ. स. १५५० ते १६५० या काळातील समकालीन मराठी साहित्य**

इ. स. १५५१ ला दासोपंताचा कालखंड सुरू होतो. यापूर्वी दत्तसंप्रदायाचा गुरुचरित्र हा ग्रंथ इ. स. १५५८ मध्ये लिहिला गेला आहे, तर याच काळात 'महाराष्ट्राचे नाथ' म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो त्या एकनाथांचा काळ इ. स. १५३३ ते १५९९ असा सांगितला गेला आहे. जैन साहित्याच्या तुलनेत दासोपंताची प्रचंड रचना व एकनाथांचीही विशाल रचना आहे. 'गीतार्णव', 'गीतार्थबोधचंद्रिका', 'ग्रंथराज', 'पदार्णव', 'पासोडी' व इतर काही स्फुट रचना दासोपंतांच्या नावावर आढळतात. दासोपंतांच्या समकालीन एकनाथांचेही 'चतुःश्लोकी भागवत', 'एकनाथी भागवत', 'रुक्मिणीस्वयंवर', 'रामायण' व इतर पदरचना या सर्व रचना मराठी साहित्यात सर्वज्ञात आहेत. याशिवाय पुढे मराठी साहित्यात जे एकनाथ पंचक झाले त्यात त्र्यंबकराज (१५७३), विष्णुदास नामा (१५९५), महालिंगदास (१५६५), रमावल्लभदास (१५८८) या कवींची रचना पुढे १७ व्या शतकात सुरू असल्याचे दिसते. इ. स.१५४९ ते १६१९ हा फादर स्टीफन यांचा कालखंड होय. मराठीतील ख्रिस्ती साहित्याचा उगम याच काळातला आहे. पंडिती साहित्याच्या उगमाचा काळही हाच आहे. मराठी साहित्यातील कोहिनूर अथवा कलाकवी म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो त्या मुक्तेश्वरांचा काळही हाच आहे. इ. स. १६१८ ते १६३८ हा मुक्तेश्वरांच्या 'महाभारत' या रचनेचा काळ सांगितला जातो. यापुढे इ. स. १६३२ नंतर तुकारामांच्या कर्तृत्वाचा काळही येतो. इ. स. १५५० ते १६५० हे शतक मध्यवर्ती मराठी साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. दत्तसंप्रदायातील गुरुचरित्र आणि दासोपंतांचे साहित्य पंडिती साहित्याचा उदय व तुकारामाच्या साहित्याच्या सुरुवात अशा विविध सांप्रदायिक आणि विविध रचनांच्या दृष्टीने मराठीतील समकालीन साहित्य समृद्ध होताना दिसते. याच काळात मराठीतील जैन कवींनीही महाराष्ट्र सारस्वत समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. समकालीन कवींनी हाताळलेले ओवी आणि अभंग यासारखे रचनाप्रकारच समकालीन जैन कवींनीही स्वीकारलेले दिसतात. आख्यानकाव्यांची परंपरा याच काळात सुरू झालेली दिसते. जैन कवींनीही या काळात आख्याने व महापुराणे रचली आहेत. ही सर्व आख्याने जैन तत्त्वज्ञानाचा व आचारधर्माचा पुरस्कार करणारी आहेत. अर्थातच इ. स. १५५० ते १६५० याही शतकात जैन सारस्वतांचे योगदान मध्यवर्ती साहित्यधारेत लक्षात घेणे गरजेचे ठरते.

**जैन साहित्यातील इ. स. १६५० ते १७५० हा कालखंड**

इ. स. १६५० च्या दरम्यान चिमणापंडित या पैठणच्या कवीच्या रचना जैन साहित्यात महत्त्वाच्या आहेत. इ. स. १५९९ ला एकनाथांचा काळ संपतो. पुढे एकनाथपंचक आणि मुक्तेश्वरानंतर तुकारामांचा काळ येतो. इ. स. १६३० ते १६५० हा तुकारामांच्या रचनांचा काळ आहे. रामदासांचाही काळ हाच आहे. याच काळात जैन साहित्यात इ. स. १६५० ते १६७५ मध्ये चिमणापंडिताच्या रचना मिळतात. या कवीच्या नावावर जवळ जवळ २० रचना आढळतात. तीर्थवंदना, पार्श्वनाथ आरती, चंद्रप्रभ आरती, त्रिकाल तीर्थंकर पूजा, नेमिनाथ पाळणा, नेमिनाथ भवांतर, गुरुगीत, शिवानेमी संवाद, गोम्मटस्वामी स्तोत्र, बाळकछाटी, बालरक्षा यांखेरीज तुकारामाच्या अभंगात येणाऱ्या रचनांसारख्या फुगडी, झंपा, पिंगा, लयलाखोटा, चेंडूफळी, टिपरी अशा लहानमोठ्या पद्यरचना व अनंतव्रतकथा अशा विविध प्रकारच्या रचना चिमणापंडिताने केल्या आहेत.

चिमणापंडितानंतर पुण्यसागर, विशालकीर्ती, पंत साबाजी, विशालकीर्ती (दुसरा), भानुकीर्ती, पद्मकीर्ती, राय, रत्नसा, गंगादास, महीचंद्र आणि महीकीर्ती अशा अनेक कवींनी या काळात रचना केलेल्या दिसतात. १७ व्या शतकातील या कवींच्या रचना पाहिल्या म्हणजे मराठी जैन साहित्याच्या पहिल्या काळातील समृद्धतेची स्मृती झाल्याशिवाय राहात नाही. १३ व्या शतकानंतर १७ वे शतक मराठी साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. तुकाराम, रामदासादी कवींसह पंडिती साहित्याची परंपराही याच काळात सुरू झाल्याचे दिसते. वरील कवींपैकी पुण्यसागर या लातूर भट्टारकांच्या शिष्यांनी जिनदासांनी रचलेले ‘हरिवंशपुराण’ पूर्ण केले आहे. रविवार व्रतकथा ही आणखी एक रचना त्यांच्या नावावर आढळते.

लातूरच्या अजितकीर्तीनंतरच्या विशालकीर्ती या भट्टारकांच्या नावावर ‘रुक्मिणीव्रतकथा’ ही रचना आढळते. यांपैकी पुण्यसागरांचा काळ इ. स. १६५० ते १६७५ हा सांगितला गेला आहे, तर ‘रुक्मिणीव्रतकथा’ इ. स. १६७० साली लिहिली गेली आहे. पंत साबाजी याने ‘सुगंधदशमी व्रतकथा’ इ. स. १६६५ साली पूर्ण केली आहे. विशालकीर्ती (दुसरे) यांनी ‘धर्मपरीक्षा’ हा ग्रंथ लिहिला आहे. पुढे नेमाप्पा या कवीच्या नावावरही हा ग्रंथ आढळतो. या ग्रंथात धर्माची चिकित्सा तसेच हिंदू धर्मातील अनेक

चमत्कारिक व अविश्वसनीय कथांची चिकित्सा केली गेली आहे. विशालकीर्तींचे शिष्य पद्मकीर्ती आणि राय या कवींच्या नावावर एकदोन छोटेखानी रचना उपलब्ध होतात. १५ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत अशा मराठी जैन लेखकांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. याच वेळी रत्नसा यांनी पूर्ण केलेले दामापंडिताचे 'जंबूस्वामीचरि', गंगादासाचे 'पार्श्वनाथ भवांतर गीत', 'चक्रवर्ती पाळणा', 'नेमिनाथ आरती', हेमकीर्ती यांच्या पदरचना व कवी मकरंद यांचे 'रामटेक छंद' अशा स्फुट रचना आढळतात. यातील महत्त्वाची रचना म्हणजे गंगादासाचे 'भवांतर गीत'. हे 'भवांतर गीत' एक गाणे असून मराठीतील पोवाडा या प्रकारचे प्रारंभीचे उदाहरण आहे. पोवाड्याच्या इतिहासामध्ये अजीनदासानी लिहिलेल्या शिवछत्रपतींच्या पोवाड्यानंतर या पोवाड्याला स्थान द्यायला हवे.

या शतकातील अखेरच्या व १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात काव्यलेखन करणाऱ्या महीचंद्राच्या रचना या मराठी जैन साहित्यात उल्लेखनीय आहेत. महीचंद्राची पहिली रचना 'आदिपुराण' ही इ. स. १६९६ मध्ये पूर्ण केली असल्याचे कवी सांगतो. लातूर पीठाचे भट्टारक विशालकीर्ती यांच्या या शिष्याने आदिनाथपुराणाखेरीज 'सम्यक्त्वकौमुदी', 'नंदीश्वरव्रतकथा', 'गरुडपंचमीव्रतकथा', 'निर्दोषसप्तमी व्रतकथा', 'नेमिनाथ भवांतर', 'नेमीश्वर गीत', 'महावीर पाळणा', 'शांतिनाथ स्तोत्र' अशा अनेक रचना व व्रतकथा लिहिल्या आहेत. महीचंद्र हा १८ व्या शतकातील महत्त्वाचा कवी आहे. महीचंद्राचा शिष्य चिंतामणी याने पुढे गुणकीर्तींचे 'पद्मपुराण' पूर्ण केले आहे, रामकीर्ती या दुसऱ्या शिष्याने पद्मावतीची आरती लिहिली आहे.

१८ व्या शतकाच्या पूर्वार्धात येणाऱ्या आणखी काही महत्त्वपूर्ण कवींच्या महत्त्वपूर्ण रचना पुढे येतात. यांमध्ये देवेंद्रकीर्ती, पुण्यसागर (दुसरा), छत्रसेन, सटवा, नीबा, यादवसुत, जिनसागर, माणिकनंदी हे कवी पहिल्या पाव शतकात लेखन करताना दिसतात. यांपैकी देवेंद्रकीर्ती हे महीचंद्राचे आणखी एक शिष्य होत. कालिकापुराण ही यांची महत्त्वाची रचना आहे. तत्कालीन समाजजीवनाचे चित्रण करणारी ही साहित्यकृती मराठी जैन समाज व जैन समाजातील अंतर्गत समाजजीवनाचे चित्रण करते. पद्मावती देवी म्हणजेच कालिका, हिचे हे पुराण आहे. याचवेळी औरंगाबाद येथील भट्टारक परंपरेतील भुवनकीर्तिशिष्य आनंदकीर्ती व त्याचा शिष्य पुण्यसागर याने गुणकीर्तींचे पद्मपुराण पूर्ण

केले आहे. छत्रसेन हा कोल्हापूरचा कवी, त्याने इ. स. १७०३ च्या दरम्यान आदीश्वर भवांतरगीत लिहिले आहे. याशिवाय सरस्वती आरती, रत्नत्रय आरती, नंदीश्वर आरती व इतर रचना उपलब्ध आहेत.

१७१८ च्या दरम्यान सटवा या कवीने शिवानेमी संवाद, कंसाचे पद व अरहंत स्तुती अशा रचना केल्या आहेत. लातूर भट्टारक महीभूषण यांचा हा शिष्य होता. नीबा हा या काळातील अहिराणी भाषेत लेखन करणारा कवी. याने धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथील मंदिरात पार्श्वनाथ स्तुती व नेमीश्वर गीत अशा रचना केल्या आहेत. यादवसुत सोयरा या कवीने याच काळात अष्टकर्मप्रकृती ही २२२ ओव्यांची रचना केली आहे. याशिवाय माणिकनंदी याच्या नावावर काही याच्या नावावर काही स्फुट रचना आढळतात.

भट्टारक देवेंद्रकीर्ती यांचा शिष्य जिनसागर या कवीने या काळात विपुल रचना केली आहे. या कवीच्या नावावर एकूण २६ रचना आढळतात. जीवंधर पुराण ही याची सर्वात मोठी रचना आहे. या काळातील पंडिती रचनापरंपरेची भाषा, विविध वृत्ते, अलंकार व प्रौढ मराठी भाषेचा वापर या कवीने आपल्या रचनांमध्ये केला आहे. वर्धानिवासी जिनदास चवडे यांनी १९०४ च्या सुमारास प्रसिद्ध केल्या, पण त्या आता उपलब्ध नाहीत. अलीकडेच इ. स. १९५९ मध्ये विद्याधर जोहरापूरकर यांनी जिनसागराची समग्र कविता या नावाने या कवीच्या समग्र रचना संपादित केल्या आणि त्या जीवराज जैन ग्रंथमाला, सोलापूर या संस्थेने प्रकाशित केल्या आहेत. आदित्य, अनंतत, पुष्पांजली, निर्दोषसप्तमी, कलशदशमी, सुगंधदशमी अशा पूर्वी महीचंद्राने लिहिलेल्या व्रतकथा जिनसागरांनी पुन्हा लिहिल्या आहेत. याशिवाय भक्तामर स्तोत्रासह अनेक स्तोत्रे, आरत्या, कयकोगीत, जिनागमकथा, पद्मावती कथा, लवअंकुश कथा याही रचना जिनसागर यांनी केल्या आहेत.

कवी लक्ष्मीचंद्र, सया, सोयरा, यमासा, तानू पंडित या कवींनी १७५० पर्यंत काव्यरचना केल्या आहेत. कृपासागरशिष्य लक्ष्मीचंद्र यांनी १७२८ च्या दरम्यान मेघमालाव्रतकथा व जिनरात्रिव्रतकथा लिहिल्या आहेत. सया या कवीच्या नावावर तीर्थंकर स्तुती व नेमिनाथ भवांतर या रचना इ. स. १७३८ साली लिहिलेल्या आढळतात. सोयरा याने कर्माष्टमी कथा व काही आरत्या लिहिल्या आहेत. कारंजा येथील भट्टारक समंतभद्र यांचे ते शिष्य होत. अर्जुनसुत असा स्वतःचा उल्लेख करणाऱ्या यमासा याने आदित्यवार कथा व अन्य काही स्फुट रचना केल्या आहेत. इ. स. १७५१ असा आपल्या रचनांचा

काल या कवीने उल्लेखिला आहे. इ. स. १६५० ते १७५० या काळातील कवींच्या विपुल रचनांची माहिती या शतकात मिळते. कारंजा, लातूर, वाशीम, कोल्हापूर येथील भट्टारक पीठांशी संबंधित हे सर्व कवी आहेत. पंडिती साहित्याच्या ऊर्जितावस्थेच्या काळात मराठी जैन कवींनीही विविध छंद-वृत्तांमध्ये आपल्या रचना केल्या आहेत. जैन आख्यानकाव्ये, पुराणांची रचना, व्रतकथा व विविध पदरचना, स्तोत्ररचना, आरत्या, डफगाणी अशा विविध प्रकारच्या रचनाही या जैन कवींनी केल्या आहेत.

### इ. स. १६५० ते १७५० या कालखंडातील मध्यवर्ती धारेतील मराठी साहित्य

कोण्ही उभे झाडोझाड खोडी[५]। सेवा पाड[६] दावीती।।७८।।
कोण्ही आणती सोकासण[७]। कोण्ही आनीती तुरंग साण[८]।
जे तुरकी[९] चालती स्थीरपण। ते वहन देति पै।।।७९।।
याते जवळ येता आहरी[१०]। नृपती बैसला हास्तीवरी।
कोण्ही माघे ढाळीति चवरी। बाजा गर्जना होतसे।।८०।।

१. सोडून दे. २. महामृत्यु. ३. हत्ती.४.मोठेपणा. ५. झाडाचा बुंधा. ६. मोल. ७. सुखासन ८.लहान (ला. तरुण). ९.दुडकी, जलदीने पण जवळ जवळ पावले टाकीत टाकीत चालण्याची पद्धत. १०.(सं. आ+हृ) स्वीकारणे.

राजा ह्मणे रे सर्व सेवक। या पर्वता बोला जीवरक्षक।
ऐसी सेब्द दवंडी सत्ये भाका[१]। तुह्मी द्या देशोदेशी।।८१।।
सेवक ह्मनीति हे सत्ये वाके[२]। पर्वता नाम जीवरक्षक।
जैसे नाम तैसे सार्थक । सुख आहे येथे जीवासी।।८२।।
सर्व मीळोनी येकवटा। टाळ्या वाजवीती पटपटा।
आर्हंत नाम श्रेष्ट। पुःन्हा पुन्हा बोलति।।८३।।
ह्मनती धन्ये धन्ये हा धर्म। धन्ये धन्ये ते तिर्थंकर नाम।
धन्ये धन्ये हे पापत्येक्त काम। सार्थक केले राजेश्री।।८४।।
ऐसा बोलोनी सर्व सैन्य नाथ। चाल केलि ज्ञानपुरी पंथ।
तेव्हा नगरी भवते शोभा तेथ। कैसी दीसु लागली।।८५।।
की पुर्वि प्रथम चक्रवर्ति। आला सा[३] खंड साधुन क्षीती।
शोभा दाटली ज्यो योध्याभवति। तैसी नगरी शोभतु।।८६।।
की पुर्वी प्रथम नारायेन। त्रीखंड पृथ्वी आला साधुन।
तैसे हे पापत्येक्त सैन्ये। शोभा दीसे आपार।।८७।।
की तीर्थंकर जेन्म उछाव[४]। होता ईंद्र आनी शैन्ये वैभव।
तैसी ते ज्ञानपुरी गावराव। शोभीवंत दीसतु।।८८।।
की बळ केशव आयोध्या राजा। चढोनी लंका घेतली सहजा।
ते येतेवेळस शोभा साजे। पापत्यक्त तैसा शोभतु।।८९।।
की पांडव गेले वनवासा। राजकन्या प्रनील्या[५] रत्नरासा।
परतोणी आले ग्रामवासा। सैन्ये शोभा तैसी पै।।९०।।
की आंजनीभर्ता पवनंजयो। रण जीकोनी पावला जयो।
रत्नपुरा आला हार्शेहृदयो। दळ शोभे तयापरी।।९१।।
की राजगृहि उपश्रीणीका। भील्लकन्या आणीले कनक।
गांवातुन आले पुत्र सेवक। हा राजा तैसा शोभतु।।९२।।

१.१. भाषा. २. भाषा, कथन. ३. सहा. ४. उत्सव. ५.(सं. प्र+नी) विवाह करणे.

की श्रेणीका होता राज्येपट्टा। ते भरल्या दिसती ग्रामवाटा।
की आसंख्यात होये शब्दघंटा। राजा शोभे तयापरी।।९३।।
श्रेणीक गेला विपुला नगी[१]। जाउन जाला सम्यक्त संगी।
तैसे या राज्या द्रदं(इंद्र) या भागी। धर्म लाधला आपार।।९४।।
या उपमे आगळा पापत्येक्त। कां ह्मणाल ते ऐका सत्योक्त।
या पंचम काळी धर्म तत्त्म (त्व)। दृष्टि पटे हे कठीण।।९५।।
जया काळी न हो याची गोष्ट। ते धर्मातिशये पाहेली दीष्टी।
ह्मणोनी हे राजा थोर श्रृष्टी। तुम्ही ऐका श्रोते हो।।९६।।
ऐसी शोभा वैभवासहीत। तो राजा आला नीज ग्रामात।
लोक चढोनी माहालावती(र्ती)। राजीयासी पाहाती।।९७।।
सैन्यासहित वाद्य गर्जणा। करीत गेले राज आंगणा।
राजा उतरोनी चाले चेरणा। स्नानमंदिरा गेला पै।।९८।।
शौच्य श्नान केले नंतर सार। आंतरी मंत्र जप न(व)कार।
आजपासुन कुदेव मंदीर। ह्मणेन न पाहे या दृष्टीने।।९९।।
जे राज अन्न पक्कान्न सार। ते राज्याणे भक्षीले मनभर[२]।
आचवोनी[३] गेला पलंगावर। धर्म उद्योत करील।।२००।।
माहा मोहाचे नीद्रा झोपीत। सुस्वप्न देखीले धर्मस्छापीत।
दया ह्रदई जाला जाग्रुत। हिंसा आवस्था उडाली।।१।।
कुगुरु मंत्र भुत संचेरले। जाले होता पापत्येक्त शरीर।
वीवक भेटला पंचाक्षेरी[४] नर। सुधर्म देहि सावध।।२।।
पापत्येक्त बुध साकर गोण। कुगुरु हाल्या[५] वर होति जान।
जळिन बैसता घेतली काढुन। जन्मआवेज[६] वाचला।।३।।
ग्राम सदनासी वैश्वानर। हे होनार कळले राज्यांतर।
आधीच काढीली सर्व वर सार। नीश्चय वणी बैसले।।४।।

१. (नग-पर्वत) विपुलाचलावर. २.मनसोक्त. ३. (जेवण करून) चूळ भरूने.
४, अ सि आ उ सा रूप नमोकार मंत्र. ५. रेडा. ६. ऐवज, धन.

**पापत्येक्त प्रवासी जेन्म आंग। जाउन बैसला मधी नीमग्न।**
**कुधर्म जल पुर येता संग। सम्येक्त काठी पळाला।।५।।**
**पुन्ये धान पेरा संसार वणी। थोर होता पुर्व दया जळाणी।**
**तेथ कुगुरु येता ढोर[1] सणी[2]। परीक्षा धनी धावला।।६।।**
**संसार तमी राजा चालता। कुगुरु तक्षेक आला आवस्ता।**
**त्याचा क्रुत्ये डौंश[3] न होता। झाला नीर्भय भवासी।।७।।**
**परीव्रढ[4] मती मनस्वी नारी। कुगुरु आविवेक व्येभीचारी।**
**तो वंचु[5] आला येकांत मंदीरी। ते वीवेक वाढ नीष्ठीली।।८।।**
**प्रभु प्रजा जीव चळचेर। काळे जाळ पडता पान्यावर।**
**सर्व लपा(प)ले कोकाड[6] आचार। कुगुरु भोई जातीचे[7]।।९।।**
**प्रभु भवचेर वनात संसे। कुशास्त्र गळा गुंतला पाशे।**
**तो धर्मस्थापीत येता तापस। क्षेमा द्रव्य न सोडीले।।१०।।**
**ते कुगुरु मैदं[8] ग्रामांतरी। हींडत होते भेक सावकारी।**
**वीभु वचन वित्त जाली चोरी। केली उघडी श्रुंगीन।।११।।**
**कुगुरु आचार आडेल हारी। नाथा सकळ विचारांतरी।**
**प्रीत शृंगार आवरीला करी। सुतप रथी बैसला।।१२।।**
**कुवीद्या महिमा कळसुत्र। सत्ये भाषल होत मीथ्या नेत्र।**
**उलटुन पाहाता सुशास्त्रांत्र[9]। कुकर्म्म दोरी देखीली।।१३।।**
**धृव पती आयुष्ये नंदन। आगी होत सत्क्रीया वस्तू सोण[10]।**
**वेषधारी नेणता चाळउण। सुटका केला आतीशये।।१४।।**
**नरेंद्र सुमती ते शेवरी[11]। कुमती रोग जालेत्ता(या) भारी।**
**प्रस्तावा औशेध घालीता करी। हीत सुर्य पाहीला।।१५।।**

१. पशू. २. सन्निध, जवळ. ३. दंश, चावा. ४. दाट) अत्यंत बुद्धिमान. ५. वंचना, फसवणूक करण्यासाठी. ६. दुराचार. ७. (भडभुंज्या) हीन जातीचे. ८. बुद्धिमंद, घातकी, ढोंगी. ९. सत्य शास्त्राचे अंतरंग. १०. सोने. ११. एक औषधी वनस्पती.

हे पुर्व बोली शेतमान श्लोक। त्यावर्तेदशेक आधीक।
हे उपदेशी चेक्रेश्वरी मुख। हास्तानापुरी राज्याशी।।१६।।
याच काळि गजेपुरात। म्लेंछ नृपान योजीले होते।
की पल[1] चारावे सर्व लोकात। येकंकार करावा।।१७।।
त्याच वेळी पापत्येक्त कथन। पुस्तक पडले आकाशीहुन।
राज्या सहीत सभासदन। आश्चीर्यासी पावले।।१८।।
त्याचा आर्थमंत्री सेनसुरी। करीत बैसले सभागारी।
दश श्लोकाचा आध्या आकारी। ते ग्रामजन ऐकीती।।१९।।
ते आक्रा[2] आध्येवास वचेन। त्यातील प्राक्रुत येक संपुर्ण।
शेष हेच बोली कथा गहन। वीश्वास काणी ऐकीजे।।२०।।
पुढीले आध्याई दया कउल[3]। हे होता धर्मधान्ये पीकले।
ते न खोटा आधर्म दुक्काळ। हारपोन जाये या जगी।।२१।।
जीवरक्षेक पर्वतावर। धर्म आतीशेये जाले थोर।
हे ग्रामवासी नर नारी पोर। सांगति त्या जोगीयासी।।२२।।
कुजोग्या हृदईं सुटला कंप। ह्मनति आज रात्रि न ये झोप।
कोण्ही ह्मणताति वीसर्प[4]। आला येथुन पळा रे।।२३।।
हा आध्या जाला येथ प्रथम। ऐकता लुटति मिथ्या भ्रम।
सुखी राहे हे संसार धाम। दया धर्म आचरता।।२४।।
ईति श्रीकथा सुमतिप्रकाशे। शेब्द माहाराष्ट्र उतळ दिसे।
आर्थ वीहीर जळ ये हातास। श्रोते घेती कर्ण करी।।२५।।
कवी त्या नामक कवींद्रसेवक। सद्भावीक श्रोत्याचे बाळक।
जीनकथा गावी ऐसी भुक। लागलि मम आंतरी।।२६।।
मी पुर्वीचा प्राणी आहे द्वाड। तुह्मी प्र(प्री)तिने घ्या मला कडे।
हाति द्या ज्ञान आंब्रफळ पाड[5]। तेव्हां मम मन संतोष।।२७।।

१.मांस. २. अकरा. ३. कौल. ४. विषसर्प. ५. वृक्षावर पिकू लागलेले फळ.

हा प्रथम आध्या प्रथमाधीप। ज्यास ह्मनती आदेश्वर रूप।
की याहाचा पुत्र चेक्री स्वरूप। हा आध्या तैसा जानीजे।।२८।।

की प्रथम आध्या जैसा ॐकार। सेवट दाखवी श्रोत्यासी सार।
श्रवनार्थ सुख उत्पन्न फार। ऐका पुढे श्रोते हो।।।२९।।

पुर्वेस नीघता सुर्यकार। लोक आशा धरती च्यार प्रहर।
तैसा तुह्मी भाव लावा आंतर। ऐका पुढे श्रोते हो।।३०।।

की सबंधु[१] जाये परदेशा। घरबंधु न्याहाळी दश दीशा।
तैसे तुह्मी राहु द्या आशा। ऐका पुढे श्रोते हो।।३१।।

की स्त्रीकुसि गर्भ राहता वेळा। ते वाट पाहे ह्मने हो बाळा।
तैसे येथे हृदयकमळ। आसु द्या तुह्मी श्रोते हो।।३२।।

कुनबी बी पेरे सेति। पीकाची ईछा वागवे चीती।
तैसी तुह्मी कान नेत्र जाती। लावा येथे श्रोते हो।।३३।।

सुमतिप्रकाशे पुर्ण दुकाळ। आज्ञान तम न उरे देवळा।
ज्ञान उजेड दावी सोहोळा। आर्थ पु(र)वी चीत्ताचे।।३४।।

सुमति कथा सुये(र्ये) उगवला। या उज्येड करा हीता कार्याला।
या उजेड जो सेवट आध्याला। जोडा सार्थक सर्वेश्रे।।३५।।

सुमतिप्रकाशे सींधु[२] पोत[३]। यात आध्ये रत्न पाहा द्रीष्ट।
ऐकुन ठेवा हृदया संपुष्ट[४]। जातील कष्ट श्रोत्याचे।।३६।।

सुमती कथा सुमती मंदीर। दीष्टी पड सरस्वती आकार।
त्याचा पंच मीथ्या जाये आंधार। सुशास्त्र घोकी वीशेस।।३७।।

सुमती नावाची आहे ललना। परी पुरुशे वर्जीत हे आंगना।
आंतरी भोगी शुक्ल ध्यान राना। सुगुन पुत्र देतसे।।३८।।

ईला आहे पीता नाही जेननी। जेन्म आकार परी नाही योनी।
बैसे ठाई गमन त्रीभुवनी। वय तारुने आक्षेयो।।३९।।

१.नातेवाईक. २. समुद्र. ३. जहाज. ४. पेटी, मंजूषा.

शेदुरू कृपा बीज कवी। धात्री सुधी[1] मुख तीफण[2] पड आंत्री[3]।
आयुश्ये पाणी वर्षेता नेत्री। वोवी रोप वाढतील।।४०।।

ते प्राकृत पीक कीथा[4]. प्रबळ। कवीस धन श्रोत्यास बळ।
ते कानांचेळ[5] घ्या वक्ता कमळ। व्हाल सुखी समाधीस्त।।४१।।

घ्या घ्या ह्मणणे हे आघ्रहे। ते सज्ञानासी कामा न ये।
याचे औ(ऐ)का गुन नीर्नये। ते पुर्वीचे श्लोकोत्तर।।४२।।

की स्त्री आंगी ल भ( ?) दांत खेवडे[6]। पयोधर[7] रिते उघडी हड[8]।
की वृंदा वेलाचे पीकले पाड। मण न धावे तेथे पै।।४३।।

की पुष्पी नाही सुगंध वास। कीर्तने ह्मनाल त्या पवणास।
की उणाख[9] साडी उंच मोलास। ते न वीके बळात्कार।।४४।।

की मुखी न पढे व्याकर्ण संधी। बोलु जाये कवी कुड[10]बुध्धी।
की ये रथी गळ पाटावामधी। ते मिरवणीसी न शोभे।।४५।।

की बाळक आती स्वरूपवंत। वरी सुगुण खेळे बोले मात।
की राजा आनी वैभवसहीत। हे घेती पाहाती आपस्त्या(त्या)।।४६।।

की गुळ बोलु आला गोडपण। शर्करा चवीचा धरी मौन्य।
की होये आहांकारी ईछेमान। तो न वाढे या जेगात।।४७।।

की मीऱ्याचा तोल कंडु जीर। मुख बोलले बळ चवीकारे।
की नाही कळा गळा गाणारे। ते हाश्ये होये सज्ञाना।।४८।।

की कापुर तुरटी सारकी। जोत लावीता येक दीसे फीक्की।
की कापसातील काढीता सरकी। ते रुसली[11] कामा नये।।४९।।

की जत्रे जाता समेद शीखरी। आडवे भेटले लघु गीरी।
ते वदले की आह्मा नमस्कारी। तो आदर कामा नये।।५०।।

१. बुद्धिमान. २. शेतात पेरणी करण्याचे साधन ३अंतरी, आतमध्ये. ४. कथा ५. कानरूपी पदर.
६. वेडेवाकडे. ७. स्तन. ८. हाडे. ९. उणी, कमी मूल्याची. १०. कूटबुद्धी, अज्ञानी.
१०.गळपट्टा. ११. कापसाचे बोंड.

की आंगी नाही पंडीत कळ[१]। आर्थ करू जाये काव्ये रसाळ।
आपुन भीकारी बंधु भुपाळा। ते थोराई कामा नये। ५१।।
की गारगोट्या झळकती फार। त्याचा छीलोन केला बीध्येर[२]।
की मुख सुरत्व बोलीला सुर। वपुन नाही तैसा पै।।५२।।
की ठाव नाही आक्षेर बहुत। लीहीत बैसला शास्त्रार्थ न येण।
की वत्छात ढोर प्रधान[३]। कळपी लाजे चालता।।५३।।
की फळात नाही सुरस गोडी। ते जनात कैसी वाढे आवडी।
बोर ह्मणे मी कल्पतरू पाड[४]। वाचा बडाई कैसी।।५४।।
पतंग वदला मी पक्का रंग। तो नीर्धुनीत[५] धुता झाला भंग।
की वीदृप टाक आपल आंग। ते जनी केवी साजे पै।।५५।।
ऐसी आसली कवीत कळा[६]। ते मान्ये न पडे श्रोते मेळा।
माझे पढा ऐका हो व्याघ्रये बळा। ते वृथा दीसे नीरस।।५६।।
कथा काननात नाही वोवी वृक्षे। त्याला आर्थ फळ आसली दक्षे।
तर श्रोते येतील भावपक्षे। का न मुखी चाखतील।।५७।।
त्यातच नसला सुशेब्द रस। ते पुन्हा न येतील त्या ठायास।
जरी जीव्हे लागला गोड ग्रास। धावा येती आपआप।।५८।।
कवीचा वाचांक(कु)र युगुळ। बांधोणी दील्हे श्रोत्याजवळ।
हे सोडा आथवा ठेवा बळ। घेणे देणे तुम्हाकडे।।५९।।

ईति श्री सुमतीप्रकास कथा

जीवरक्षा भवत् नृपती भाव शुधं। या पंचेम काळी जीन धर्म आतीशये आवलोकन्नाम प्रथमो ध्याये संपुर्ण समाप्त। वोवीसंख्या २५९।। मीती आशाड शुध्ध द्यादशी।।१२।। संपुर्ण अध्य प्रथमं।।

***

१.पांडित्य. २. मणी. ३. वासरात लंगडी गाय शहाणी. ४. पाड -साम्य, बरोबरी. ५. भट्टी. ६.कवित्व कला, काव्यकला.

# सुमतिप्रकाश

## द्वितीय अध्याय

ॐ नमो सीध्धभ्ये। संकष्टहरणाये नम। आजीतं तीर्थंकराये नमोनमा।
जो दुःखीयासी सुखीकर्ता। ज्याची त्रीभुवणी चाले सत्ता।
ज्यासी ईंद्र ह्मनती माता पीता। त्या आरीहंता नमोणी।।१।।
कथा ऐका सुमतीप्रकाश। ज्यात आहे प्राकृत ईक्षुरस।
ते श्रवणमुखी पीय हृदयास। देहकांती येईल।।२।।
कथा वरदाईक प्रसन्न। पाशानासी फुटती कान।
जे मेल्यासी ये जीतेपण। कैसेनी ते ऐकावे।।३।।
जो हृदईक हींसीक पाशाण। केले कर्तुत्व दे सोडुन।
याते ह्मनीजे फुटले कान। तो सहजचि नीर्मळ।।४।।
जो पुराण आर्थ संपुर्ण पो(पी)ला। जो कठीण तप करू लागला।
त्याच देह मरोन तो वाचला। जीव गेला मोक्षासी।।५।।
श्रोते हो तुह्मी ज्ञान उत्पन्न। माझे शेब्द हे हालकेपण।
केले कवित्वात नसता गुन। धन्ये तुह्मी ऐकिता।।६।।
दुसरे दीनी उद्योत राजा। येउन बैसला तक्ती[१] वोजा[२]।
चींती ह्मणे करीन धर्मकाजा। जन पर जीव सुखी।।७।।
राजकचेरी होती आपुर्ति[३]। लोक बोलउन केली पुर्ती।
जवळील लेख करी आरति। ह्मणे जी कार्येसांगावे।।८।।
तेथे सेठ माहाजन पाटील। शेब्द जी जी कार बोलती बोल।
शैनापती उभे जवळ। ह्मणती आज्ञा सांगावी।।९।।
त्या ग्रामी सर्व जैन लोक। आसंख्यात क्षुल्लक सेवक।

१. तक्ती -सिंहासनावर. २. वोजा -उत्तम रीतीने. ३. आपुर्ति -अपूर्ण.

ह्मणती आह्मी धर्म बाळक। काये आज्ञा सांगावी।।१०।।

राजा ह्मणे मुखे पांडीयासी[१]। तुह्मी पत्रे ल्याहा देशोदेशी।

जिन दयाधर्म येउ ह्दयासी। हेच आज्ञा लीहीजे।।११।।

जेथे आसले हींसा मेढी। तेथे करा दयाचा हाडी[२]।

हिंसीकासी लागे धर्म गोडी। हेच आज्ञा लीहीजे।।१२।।

जेथे आसे मुशेक[३] स्थारा। तेथे न ये उंदीर मार्जेर।

मार्जर पोसा आन्न आहार। हेच आज्ञा लीहीजे।।१३।।

तेथ तक्षेक[४] नीघेती फार। ते यत्न धरूनी भरा घागर।

ति नेउन टाकावी वनांत। हेच आज्ञा लहीजे।।१४।।

जेथ हींसक देवीचे मठ। पाडोनी करा सपाट।

जेन नष्ट दया पाळी धीट। हेच आज्ञा लीहीजे।।१५।।

जेथ आसे पारधी कर्म। तेथ दुजा सांगीजे उदीम[५]।

उदर पोसोनी चाले धर्म। हेच आज्ञा लीहीजे।।१६।।

जेथ करीती हींसा पाखांडी[६]। त्यासी द्यावा तुह्मी द्रवे दंड।

तेथ दयाधर्म चाले आखंड। हेच आज्ञा लीहीजे।।१७।।

जेथे दर्दुरा[७] माघे आही[८]। लागता देखला कोण्हि।

त्याते न सोडवी दंडही। आह्मी घेउ लीहीजे।।१८।।

जरी वृश्चीक डसला आंगा। त्यासी न मारीजे सोडीजे वेगी।

हींसीकाला नका करू संग। हेच आज्ञा लीहीजे।।१९।।

जरी व्याघ्र हास्ती हास्ती जाला मस्त। तो धरोनी पाडा त्याचे दंत।

त्यासी जीव सोडोनी द्या वनात। हेच आज्ञा लीहीजे।।२०।।

चीमणी पक्षी आदी करूनी। जे भक्षीती पर जीवा लागुणी।

---

१पांडे, कुलकर्णी, हिशेब ठेवणारा, आज्ञा लिहिणारा कारकून. २. सौजन्य. ३. मुशेक - मूषक, उंदीर. ४. तक्षेक -साप. ५. उदीम -उद्यम, व्यापारधंदा. ६. ढोंगी. ७. बेडूक. ८. सर्प.

त्याते पुरुष पाहाता नयेणी। जीवरक्षा करावी।।२१।।
श्वान पीसाळलीयासी कोण्ही। दयाहीन धावती चहू कोनी।
त्याते मारीत असता वर्जोनी। जीवरक्षा करावी।।२२।।
कोण्ही प्राणी नीजलियावरी। घात करू आला दुष्ट वैरी।
ते तीजीया न पाहाता नजेरी। जीवरक्षा करावी।।२३।।
जरी कोण्ही धरला तस्कर। त्या आंगी डाव(ग) द्यावा सार।
परी त्याचे न मारावे सीर। जीवरक्षा करावी।।२४।।
जरी कोण्ही आहे पशु जीव। त्यान खादल[१] वावर सर्व।
त्याते न मारावा शस्त्र घाव। जीवरक्षा करावी।।२५।।
जात खाटक आणि धनगर। त्याचा वर्जावा हिंसा व्यापार।
सेळी अथवा ढोर माहातार[२]। जीवरक्षा करावी।।२६।।
तुम्ही सांगान घ्या वीक्रीत। मेले विन न करावा घात।
ऐसी ताकीद देशोदेशात। जीवरक्षा करावी।।२७।।
कुदेवता मोहोरे[३] नवस। करून मारीती पशु जीवास।
ते सोडवा करून सीक्षास। जीवरक्षा करावी।।२८।।
मृग न घालावे बंदीखाणी। आणीक पक्षा न करावी हाणी।
मौंशे[४] वस्तु न भक्षाव्या रसणी। जीवरक्षा करावी।।२९।।
वणी न लावावा वणवा जाळ। कार्यार्थी न झोडावे मोहोळ।
वारूळाचे ण खांदावे मुळ। जीवरक्षा करावी।।३०।।
संसारक्रुत्ये सारीता कर्म। आंतरी ठेवीजे दयावर्म।
देखत हींसा न करी आधर्म। धर्मभाव जानावा।।३१।।
घरी न घालाव्या सेणी डगारी[५]। फोडलेवीण न जाळी गवरी।
झाडलेवीण न सारवी करी। धर्मभाव जाणावा।।३२।।
धान्यातील कीडे आणी आळी। ते काढोनी टाकावे सावुली।

१. खाल्ले. २. म्हातारे. ३. समोर. ४. मौंशे -मांस. ५.गोवऱ्यांचे ढीग.

जंतुस्थळी न करावी आंघोळी। धर्मभाव जानावा।।३३।।
जीव पाहेलेवीण जात्यास। घरस्त्रीन न घालावा घास।
रात्री भोजेनाचा माणावा त्रास। धर्मभाव जाणावा।।३४।।
ढेकुण पीसावाची लट[१] तणी। हे रक्षोनी करा दिव्य साकणी[२]।
सेवकसहीत श्रुद्री सद्गुणी। धर्मभाव जानावा।।३५।।
जेथ आहे सीदड[३] भुमीका। तेथ जागा उकरू नका।
नका तोडु वृक्षेली वृथा। धर्मभाव जाणावा।।३६।।
नका मोडु कातणीचे[४] घर। नका फोडु कीडे फळ फार।
नका फीरउ आले भीकार। धर्मभाव जानावा।।३७।।
आग्नी आकटी[५] आंगण दारी। ते न घालावी पुरुशे चेतुरी।
उघडी न ठेवी पाक[६] घागरी। धर्मभावना जानावा।।३८।।
ज्या ज्या पत्री मोवा[७] अंडी दीसती। ते ते वेल न तोडावे हाती।
न घालावे ढोरा[८] पुडती। धर्मभाव जाणावा।।३९।।
जेथ आहे स्वयेपाक मंदीर। तेथ नसावा फार आंधार।
वाचेन आणी हिंसा आक्षेर[९]। धर्मभाव जाणावा।।४०।।
आता फार बोलोनी काये। जेण जीव तरे छेकाये।
जे नीर्दय दयावंत होये। हेच सांगी जेगासी।।४१।।
नका करू कुदेव पुजेण। नका घेउ कुगुरु दर्शेण।
नका करू कुशास्त्र श्रवण। हेच सांगी जगा।।४२।।
तुम्ही नका जाउ कुतीर्थासी। नका करू हिंसा पाप रासी।
नका धरू खोट भावणेसी। हेच सांगी जेगासी।।४३।।

---

१. अळी. २.वस्ती, रहिवास. ३ पाणथळ दलदलीची, ओलसर जमीन(?). ४. कातणी - कोळ्याच्या जातीचा एक क्षुद्र जीव. ५. धुनी, खड्ड्यामध्ये केलेली आग, शेकोटी.
६. स्वयंपाक, शिजविलेले अन्न. ७. मावा, पिकावरील कीड. जनावरे.
८.मावा, पिकावरील एक रोग . ९. अक्षर, शब्द.

नका करू पंधरस[१] हुताशन[२]। नका सांडु बीन कारणी पाणी।
नका बोलउ वैद्ये कुगुणी। हेच सांगी जगासी।।४४।।
आहो या प्रपंचक संसारी। भांडण भांडावे नाणा परी।
परी कोण्ही जीव घाते करि न। हेच सांगी जेगास।।४५।।
आहो ज्या ज्या येत्न कडोन[३]। जीवदया घडे थोरपण।
तोच उपाव रचा गहण। हेच सांगी जगासी।।४६।।
ज्या ज्या वाटने घडे पुण्ये। त्या त्या मार्गी करावा गमण।
श्रावक धर्मी लावा मण। हेच सांगी जगासी।।४७।।
हिंसा त्याग करावा उदीम। जेने नफा मीळे दया धर्म।
जे आध्धर्माचा होये उंतम। हेच सांगे जगासी।।४८।।
हींसा नका करू आपुले मती। नका करउ दुसरीया हाती।
न उपद्रवी जे धर्म पाळीती। हेच सांगी जगासी।।४९।।
जरी संकष्ट आले जीवावर। तरी न करावे कर्म आघोर[४]।
ज्या अर्थी दया धर्म रीघे[५] धरा। हेंच कर्तुत्व करीजे।।५०।।
ऐसे णीघता राजे वाक्ये थोर। लेखके लीहीजे कागदावर।
पत्र लीहीली येक हाजार। सत्याधीक जाणीजे।।५१।।
सांगीतल्या सद्गुण विस्तार। पुराण आर्थ लीहिले थोर।
जे ऐकि ह्रदईचा कटोर। होये शांत तद्रुप।।५२।।
राज्यवचेण जे जे वृक्षे फळ। परीता वीस्तार होये प्रबळ।
तैसी येक वैखर रसाळ। करी वीस्तार पांडीया।।५३।।
की धान्ये पेरीता[६] येक सेर। सेवटी पीक होये खंडी[७]भर।
तैसा शब्द नीघता येक थोर। करी वीस्तार पांडीया।।५४।।
की जैसी कापुस पळ[८] येक। कातीता[९] सुत वीस्तारे अनेक।
तैसी पापत्येक्त सत्येभाक। करी वीस्तार पांडीया।।५५।।

१. पंधरस -(?). २. अग्नी. ३. -च्या माध्यामातून. ४. भयंकर. ५. प्रवेशणे, पसरणे.
६. वाणी, बोलणे. ७. वीस मण. ८. पेळू, कापसाची जाड वात. ९. सूत काढणे.

पांड्या मुळीचा श्रावकधर्मी। आनंद वाटे आरीहंत णामि।
त्याग करी आवक्रया[१] आधर्मी। जाणे ज्ञान केवळीचे।।५६।।
ऐसीया चेतुर पुरुषाण। कागद लिहिले दया सद्गुण।
जवळ बोलावी सेवक साणे[२]। सांगे वीचार तयासी।।५७।।
राजा ह्मणे सर्व सेवकासी। तुह्मी जावे गावोगाव देशी।
परी न छेडी कवनासी। मम शब्दा चीत्त देई।।५८।।
ग्राममार्गी करीता गमण। पडली वस्तु कोणाची न घेन।।
न दुखवी झाड थोरला लाहान। माझे वचन ऐकावे।।५९।।
जरी वाटण देखील शेत। कणस वाळुका[३] न लावी हात।।
दील्हेवीन नका घालु पदरात। सेंगा अथवा फळादी।।६०।।
कोण्हासी न बोले क्रोध वचेण। णका करु आती आभीमाण।।
कोण्ही आसला पुर्व पुण्यहीन। चेष्टा त्याची न करावी।।६१।।
कोटबाग[४] फळ न पीकली। तेथ राखण न दीशे माळी।।
त्यास नका करु चोरकळी[५]। पर जीव हीत जाणीजे।।६२।।
आमचे राजसत्तेचे भयान। नका करु कोणाचा आपमाण।।
खोटी चाहाडी ऐकु नका काने। दयाखबर सांगीजे।।६३।।
नका मोडु हुरडा उस। नका घेउ ओंब्या टाहाळास[६]।।
नका टाकु दील्हे आन्नास। हाल मस्ती न करावी।।६४।।
नका भेडसाउ ढोर पोरासी। नका थारा देउ स्त्रीपासी।।
न नींदी धर्मवंत लोकासी। न्याये मार्गेचालावे।।६५।।
बाजारात बैसले व्यापारी। त्याची फुकट न घेइ सुपारी।।
तैसीच पत्र फळ नाना परी। उपद्रव कोण्हा न दीजे।।६६।।
वस्त्र वीकती जैण लोक। त्यासी न दावी आमचा धाक।।
द्रव्ये घेउन सणंग[७] घे ईकत। नफा हाण न करावी।।६७।।

१. अपक्रिया. २. शहाणे. ३. काकडी. ४. गावाच्या शीवेजवळची बागाईत. ५. चोरी.
६.टाहाडा -हरभऱ्याचे घाटे लागलेले रोप. ७. सणंग -लुगडे, साडी.

तैसीच पितळ तांब कांसोट। भरली दीसे चाऱ्ही रस्ते पेठ।।
त्यासी उपद्रवी कोण्ही दुष्ट। तेथ दाहि आमची द्यावी।।६८।।
हा जरी ने काढीला माहार। त्यासी पोटभर घाला भाकर।।
फुकट न राबवी मजुर। हे पर दुख जाणावे।।६९।।
द्रव्यासाठी न करावी बळजोरी। माझी खर्ची बांधुन न्या पदरी।
गावोगांव भेटती नरनारी। त्यासी दयाधर्म सांगीजे।।७०।।
कोण्ही आहे परदेशी जीव। त्याचे देहचा राहीला उपाव।
त्यासी आवघे मीळुन पोसावे। हे शब्द दवंडी वाजवी।।७१।।
या खोटे काळगति कडोन। पोटी आले कुपुत्र कुगुण।
माता पीता लावीती पीटाउन। दंड यासी करावा।।७२।।
कोण्ही येकमेका घेतले कर्ज। देयास जवळ रूपा हे आवेज।
तो नीरार्थक भांडे बेसमज। दंड त्यासी करावा।।७३।।
जरी रूप घेऊनी भक्षीले। आवीजे देयास नाहि उरला।
त्याची फजीत कोण्ही करी ष(ख)ळ। दंड त्यासी करावा।।७४।।
जरी कोण्ही घरी पाळीले ढोर। ते काळकर्म[1] जाला ह्मातार।
त्यासी चारा पाणी घाला साचार[2]। त्याची सेवा करीजे।।७५।।
नका घेउ लाच लुचपत। न बोली  तोंडदेखली मात।
न छेळावे जैनी संत। दया समाचार सांगीजे।।७६।।
यक वर्शेझालीयावर सार। आह्मी पटी[3] घेउ घरोघर।
ज्याचे सदनी रुपये हाज्जार। त्यासी माघु येक रुपया।।७७।।
जे पराचे घेती भांडवल। त्यासी जेन्मवर दिल्हा कउल।
झट बीगार[4] नाहि सांगा बोल। सदा सुखी राहीजे।।७८।।
देखीले बीन न काढावे कर्म। पक्षीयाचा थारा न मोडी धाम।

१. काळाच्या प्रभावाने. २.नीट, व्यवस्थित.  ३. वर्गणी, सारा, कर. ४.वेठबिगार.

जे आर्थी सर्व जीव वीश्राम। होती ऐसे करावे।।७९।।
श्रीमंत मुखीचे शेब्द सुमन। सभे वृक्षावर घेती तोडुन।
हृदये पदरी साठउन। सेवक उभे राहाती।।८०।।
कागद[1] गणीत मनुशे। पाठविली सर्व देशोदेश।
ते सांगती दयाधर्मास। राज आज्ञा करावी।।८१।।
सेवक पत्र देती गावोगाव। हींसीक नरा पाडती ठाव।
ह्मणती मोंश[2] खाण वर्जाव। पाहा पत्री हाच आर्थ।।८२।।
लघु खेडी आणि थोर पाटण[3]। पत्र देती घरोघर नेउन।
सांगती राज आज्ञा प्रमाण। मोडीता दंड पावला।।८३।।
कागद वाचती ज्ञान नर। पुराण आर्थ दयामये सार।
जे ऐकीता हींसीक आंतर। मरे नर जीतपण।।८४।।
कागदी आर्थ पाळावी दया। येनेच जीव नीर्मळा जीवकाया।
येणेच प्राप्त मोक्षे छाया। आक्षेय पद होतसे।।८५।।
दया पाळीता संसार सुखी। दया पाळीता कर्म फीटे बाकी।
दया पाळीता जीव येकायेकी। होये पुण्यवान तद्रुप।।८६।।
येनेच भगवंत प्रसन्न। येनेच दरीद्र जाये पळुन।
येणेच वैरी मान खंडन। होय जान येह लोकी।।८७।।
ऐसा आर्थ गावोगाव जाणा। प्रगट जाला समस्ताचे काना।
शुद्रासहीत हे लोक णाना। दयाधर्म पाळीती।।८८।।
राज उपदेश जेवी हिंगुळ[4]। प्रजा कपाट हृदये कमळ।
देता दयारंग बैसला बळ। तो न नीघे जन्मवरी।।८९।।
उपदेश सुवर्ण साहागी। सांगीता झोंबली रहीत आंगी।
धर्म जडाव[5] हृदय भागी। जन लोकाचे शोभतु।।९०।।
उपदेश जैसा ज्ञानसुर्ये। जेन हृदयेमध्ये लोकभावे।

१. कागद -पत्र, संदेश, आदेश. २. मोंश -मांस. ३. पाटण -नगर. ४. हिंगुळ -पारा व गंधक यांचे एक प्रकारचे मिश्रण, वॉर्निश. ५. जडाव -दागिना, अलंकार.

उद्योत पडता लागली सोये। श्रावक धर्म मार्गाची।।९१।।
उपदेश जेवी तेल भडका। लोक उदकी पडला नीका।
तेल न नीघे काढीता वीवेका। तैसा जनी लाधला।।९२।।
उपदेश जैसा सुरंजी[1] रंग। लोकवस्त्र रंगले आभंग।
कच्चा हींसकु सब रंग। गेला नीघुनी ते वेळी।।९३।।
प्रजा लोक जैसा मुद्रीका येड[2]। राज उपदेश त्याचे ठीकड[3]।
दोही आंगी भावार्थ दीशे जोड। मेदणी[4] करा शोभतु।।९४।।
प्रजा जेवी माळोद[5] चवपट। उपदेश चुनगच्ची थाट।
चीत मंदीरी न ये पापवाट। भावार्थ द्रव्ये खर्चीले।।९५।।
प्रजा जेवी दुध पक्के झाले। उपदेश वीर्जण पडले।
श्रावक धर्म दधी जेन्मला। दया नवनीत नीघतु।।९६।।
जनलोक जेवी कोरा कागद। उपदेश लीहीला शाई रंग बींदु।
ओजीवासी केले जीवछेद। दुसरीयासी बोतु[6]।।९७।।
रहित जेवी आंग मस्तक। उपदेश वर शोभे तीलक।
की सुवर्णासी लागे आग्नी सेक। दया सु--स्व झळके पै।।९८।।
रहीत जेवी हस्ती शरीर। उपदेश शोभा वर शृंघार।
लोक धरणी लस्करात थोर। दया उंची शोभे पै।।९९।।
जन लोक जेवी मेदणी। उपदेश वर पडले पाणी।
दया धान्ये पेरीता मनी। धर्म चौगुणी वाढला।।१००।।
लोक भोगभुमी वृक्षे। उपदेश फळ आली दक्षे।
तेणे तृष्णा खंडली आपक्षे। दया समाधानी दीसतु।।१।।
जन लोक ग्राम वस्ती घर। उपदेश गावकोस झाला थोर।
त्या भये न येती तस्कर। दया जागल बैसली।।२।।
लोक जैसे फुटक कासांड[7]। उपदेश ताउन[8] केल धड[9]।
की जैसे फोडता चंदन खोड। दया सुगंध सुटला।।३।।

१. रक्तचंदनाच्या रंगाचे. २. वळे, वेढणी. ३. अंगठीतला हिऱ्याचा खडा. ४. मेदिनी, पृथ्वी. ५.माळवद, माडीचे अंगण. ६. शेला. ७. चरवी, मोठे तांब्या-पितळेचे भांडे. ८. तापवून. ९. बळकट, निश्छिद्र.

रहित जेवी काळा पाषाण। उपदेश टाकीन फोडोन।
वीहिर बांधली भावे चीऱ्याण[१]। दया जीवन भरले।।४।।
लोक जेवी जवस करडी[२]। राज उपदेश देश यत्न रगडी।
ते तेल घेती जे भावार्थ पारडी[३]। धर्मदीप लावीले।।५।।
रहीत जेवी चांदी स्वरूप। उपदेश घडले रुपये रूप।
वर्तेयासी क्येटोकले हारप[४]। धर्ममोल पावले।।६।।
जे लोक हिंसा लोक होते पाटी। त्याला उपदेश बैसता कसोटी।
राजसीक्षा ताव[५] देता सेवटी। जेन्मे मोला चुकले।।७।।
ते हिंसाहिन तोडोनी पाणी। वीवेक मुस केली आटणी।
उपदेश सेक लागता आग्नी। पापहीन मळ उडाला।।८।।
रहित जेवी कमळ पुष्प। तळी उपदेश संचले आप।
भाव दया शोभा दीसे स्वरूप। धर्मपद्मी वाढली।।९।।
हींसा दाटला होता आंधार। उपदेशेनी घाला भास्कर।
तेणे लोकमंदीरी आंगण दार। दया उजेड दीसतु।।१०।।
ऐसा उपदेश जन लोकासी। सांगता जडला सर्व आंगासी।
यापुढे कथा कैसी वर्तली। ते ऐकली पाहीजे।।११।।
दया धर्म लाधला ह्मणोनी। आनंद वर्तेसर्व सदनी।
दुःख दरीद्र गेले हारपोणी। जेन सुखासी पावले।।१२।।
ज्याचे घरी नव्हते खायास आन्न। त्याचे घरी आले धन कन।
तैसेच पुत्र संतत[६] संपुर्ण। संपती दुन[७] वाढली।।१३।।
ज्याचे घरी नव्हते यक ढोर। त्याचे घरी कळप जाले थोर।
तैसीच केली चुनगच्ची घरी। सुख वस्तीने नांदति।।१४।।
जे प्रानी आत्यंत होते रोगी। ते रोग जाउनी जाले भोगी।
पुन्हा सुखावती हृदये भागी। ह्मणती धन्ये हा धर्म।।१५।।
मुर्खासी येउ लागले काम। ते आधमाचे जाले उत्तम।

१. चीरा -घडविलेला चौकोर दगड. २. जवस करडी -एक प्रकारच्या तेलबिया.
३. पारडी -तराजूच्या एका बाजूमध्ये. ४. ? ५. ताप, दाह. ६. संतति. ७. दुप्पट

कष्ट न होता चालला उदीम। चींता चीन्ह उडाली।।१६।।
देशात वस्त्रहीन नाही कोन्ही। उदमास नफा होये चौगुणी।
मुदलास न होये कधी हाणी। धर्म प्रभावने कडोन।।१७।।
वांज स्त्रीसी झाले गर्भ प्राप्त। पापीष्ट दुष्टाचे जाले संत।
धणे[1] रासी पीकली पर्वत। हींसा महीमा उडाली।।१८।।
ज्या वृक्षासी येती पुष्पभार। ते कच्ची न गळती तीळभर।
पुष्प तीतुकी फळ फार सार। पीकती तया वृक्षासी।।१९।।
मनोकल्पीत पडे पाणी। जनाची गेली अवदशा पीशे।
घरोघरी नफ्याचे दीसे रास। राजे दारा सहीत।।२०।।
मांस वीकरा जाला मना। तस्करी सोडीले कुगुणा।
बुरट[2] ह्मैसीसी आला पान्हा। नदीजळासारीखा।।२१।।
पृथ्वीत नाही कोन्ही आंधळे। न दीसे कोण्ही आती दुर्बळ।
नाही कोणा उपद्रव सळ[3]। वैरी आथवा आनंद।।२२।।
रुपये पैशात नाही खोट। जाली बाळक आती बळकट।
रीकामी नाही कोटकृपट[4]। हीतार्थ कार्य करीती।।२३।।
कटु वस्तुसी आले गोडपण। आमृततुल्य जाली जीवण[5]।
आल्प आयुस्सु न मरती जाण। सम्येक्त महीमा वाढली।।२४।।
सेवक नाही कोण्ही आळसी। देशात नाही कोन्ही परदेसी।
नाही कोन्ही सासुरवासी। सगुन रासी वाढली।।२५।।
मनुष्ये नाही कोन्ही कस्मळ[6]। सरीता पोटी णाहि कोटगाळ[7]।
पदार्थ पीकती आती रसाळ। धर्म आला फळासी।।२६।।
जेथ पडली होती चैताळी[8]। तेथ नरी केली जैसी हेळी[9]।
जे पाहाताची हृदये कमळी। सम्यक्त बैसे वीशेष।।२७।।

१. धान्ये. २. खाटी, भाकड, वांझ. ३. शल्य. ४. खोपट, झोपडी. ५. पाणी.
६. मल, दुर्गुण. ७. माती, गाळ. ८. चैत्यालये, जिनमंदिरे. ९. जोडणी, डागडुजी.

जे ग्रंथ जाले होते आबंध[१]। ववीता[२] मेळउन केले शुद्ध।
जे ऐकता तुटती पापबंध। पुण्ये छंद जीवा लागे।।२८।।
जीन पुजाचे पाटी[३] जाले फार। माहुन[४] काढती घरोघर।
त्याही आभीमान त्यागीला दुर। धर्म घडो ह्मणोनी।।२९।।
जीनाघरी होती जीन कीर्तन। पाह्या येती आवघे मीळुन।
ऐकता पळती कुलक्षेन। दयाभाव उपजे पै।।३०।।
जे जीन प्रती(मा) होत्या भंगल्या। ते सर्व सावरून नीट केल्या।
ते रूप पाहाती नेत्र बाहुल्या। पवीत्र होती वीशेष।।३१।।
जे गणधर भाषीत पुराण। ते चालती सर्व देशात जाण।
ऐसे वाहाडल महीमान। श्री जैन धर्माच पै।।३२।।
आरीहंत नाम जये जये कार। जाला सर्व देशात घरोघर।
मुखीचे उडाले कुदेव आक्षर। राज उपदेश लाधला।।३३।।
ज्या ग्रंथाची गेली होती बीज। ते आपुलि आपण आली सहज।
ऐस धर्म आतीशये काज। जालेत त्या देशात।।३४।।
जे तीर्थंकर भाखीत वचेन। याचे उद्योत जाला गहण।
कुशास्त्र तम गेला हारपुन। ज्ञानसुर्य उगवला।।३५।।
सुंस्कृताच्या जाल्या साळा। जीन कीर्तनाच्या लाधल्या कळा।
फार जणी भाव धरीला भोळा। सीद्ध क्षेत्रा जायाचा।।३६।।
सीद्धक्षेत्राची आखंड वाहे वाट। तेथ चुने गच्ची बांधेली कोट।
व्रत उद्यापन होती पाट। आन्नदान करीती।।३७।।
देव तीर्थंकर आदी करोणी। सर्व पदवी पुरुषाची कथणी।
श्रुत जाली समस्ताचे काणी। खरे खोट जाणती।।३८।।
जीन धर्माचे ज्योतीष्ये। सांगती पुराण पुरुशे।
द्वादशे आंग पंच्यांगास। सर्व लोक जाणती।।३९।।

१. अबंध, सुटे, मोकळे. २. ओवणे, गुंफणे, बांधणे. ३. पाठक. ४.?

नीत्य उदई पंत शाळत। पंच गुरु वेन मन करीत।
नीग्रंथ गुरुचे गाती गीत। जये जयेकार शब्द हा।।४०।।
ह्मणती जेय गुरु गणधर। ह्मणती जये गुरु दीगांबर।
त्याग करीती आबंध्ध[१] आक्षेर। व्याकर्ण संधी जाणती।।४१।।
मनोकल्पीत पीके धान्ये। मनोकल्पीत मीळे धन।
मनोकल्पीत घरी वहण। प्राप्त होती आपल्या।।४२।।
मनोकल्पीत मीळे सोयरा। मनोकल्पीत जाल्या दारा।
मनोकल्पीत सुटे वारा। उष्णता नाही।।४३।।
मनोकल्पीत धर्म घडली। मनोकल्पीत तीर्थ करीती।
मनोकल्पीत वाढली कीर्ति। ज्या सहीत लोकाची।।४४।।
राज्यान सांगितल्या च वर्शा। धर्म फळा आला माळव देशा।
तेव्हा सर्व श्रावक लोकाची आशा। संपुर्ण जाली त्यावेळी।।४५।।
राज्यानं उपदेशे बी पेरीले। त्याची सावुलीच वर्षोजाली।
तेणे लोक हृदई नीवाले। वीवेक दुजाष्टी पाहता।।४६।।
राज्यान धर्मबाग लावीला। तोच वर्षावर फळा आला।
हे सर्व जन लोकी पाहिला। तुस्ती (स्तुती) करीती राजीया।।४७।।
धन्य धन्य हे पापत्येक्त नाव। धन्ये धन्ये हे ज्ञानपुरी गाव।
मुखे ह्मणती हे राज्ये आसावा। चीरंजीव आह्मासी।।४८।।
जैसे नाम तैसे गुण। शोभती तया राज्या लागुण।
तैसेच नगरीचे महीमाण। जयेवंत हे आसो का।।४९।।
देवा हे राजा आसो हे कल्याण। यासी पुत्र हो सद्गुण।
याची संपत्ती वाढो चवगुण। ऐसे जन बोलताती।।५०।।
आह्मी पडलो होतो हिंसापुरी। तेथ राजा भेटला उतारी[२]।
काढीले पापनीरा बाहेरी। धर्मबंधु भेटवीला।।५१।।

१. सुटे, अर्थहीन. २.उद्धारकर्ता.

आह्मी धान्ये कोंभ[१] नीघालो होतो। हींसा पाप उष्णे वाळत होता।
राज वचेण आला पाउस तो। धर्मझडीन[२] वाढलो।।५२।।
आह्मी प्रजा लोक वाटसार। मेळवीले होते हींसा तस्कर।
ते राज उपदेश आले सार। दया आवेज वाचला।।५३।।
आह्मी रहीत सती स्त्री आंग। हिंसा पुरुशे बळ झोंबे संग।
तेथ आला उपदेश लाग। कुआचार संग भ्याला पै।।५४।।
कुधर्म दुःखे होतो आंधळे। राज जन्म वैद्य दील्हे डोळे।
ह्मनुन देखली जीन चेताळे। मीथ्या सळ[३] उडाले।।५५।।
आह्मास होते कुदेव पीस[४] । हाती धरीला पापाग्नी रास।
लावीत होतो धर्मघरास। राज वीवेके वारीला[५]।।५६।।
आह्मी आज्ञानी महा होतो दुष्ट। गमन केल कुकर्माचे वाट।
तेथ राजा भेटला सुभट। नरक पेट चुकवीली।।५७।।
आह्मी वसान[६] होतो खेडी। धर्मवस्ती केली परवडी[७]।
हींसीक लोका लावीली गोडी। दया धर्म उदमाची।।५८।।
आह्मी आंधळे होतो पशु जीव। कुपी पडत होतो लोक सर्व।
तेथ धावला पापत्येक्त राव। धर्मा चेत्यासी लावी।।५९।।
आह्मी होतो पाणझड वृक्ष। राज जन्म आला चैत्र पक्ष।
धर्म पल्लव फुटले आक्ष[८]। सुखवारा सुटला।।६०।।
आह्मी पडलो होतो हींसावनी। तेथ पेच(ट)ला पापवह्नी।
राजा वर्शेला तेथ धर्मपाणी। जन्म मरण चुकवीले।।६१।।
आह्मी होतो पाप लोहरास। राजा जन्मला धर्मपरीस।
या दोघा भेट होता आगासी[९]। धर्म सुवर्ण जाहले।।६२।।
आह्मा खादला होत हींसा सर्प। राजान दयामंत्र दील्हे आप।

१. अंकुर. २. धर्मरूपी वर्षाव. ३. शल्य, पीडा. ४. पिसे, भुतावळ.आवेज -ऐवज. सळ -शल्य, बोच. ५. वारणे -अडविणे. ६. वसान -वस्ती, निवास. ७. परवड, सुकाळ. ८.पिकाचा डोळा, कोंब. ९. आकाश, माडीवरील गच्ची.

तेणे उतरले कुधर्म पाप। मोक्षरूप जाहलो।।६३।।
आह्मी मृग गेलो होतो झोपी। तेथ गवसील हींसा व्याघ्र कोपी।
माघ आला धर्मगज प्रतापी। दयाशरीर वाचले।।६४।।
आह्मी होतो आज्ञान मीथ्याती। मार्गी भेटला हींसा मैंदमती।
तो करू पाहे सुगत घाती। दया पाहुन भेला पै।।६५।।
आह्मी होतो दयावीण नग्न। धर्मवस्त्र लेवविली राज्यान।
पुण्यपदी बैसविले जाण। क्रीया शेर्म राखीली।।६६।।
आह्मा धर्मवच्छा[1] तडातोड[2]। जालि होति बऊ दीनी वाड[3]।
आजी भेट केली जडजोड। पापत्येक्त राज्यान।।६७।।
आह्मा कन्येचे धर्म माहेर। फार कोस लांब होते दुर।
दया सामोग्री देउन सार। भेट केलि राजेश्री।।६८।।
आह्मा स्त्रीयाचा प्राणेश्वर धर्म। टाकुन गेला होता काळ कर्म।
मुखी येता आरीहंत नाम। पुण्यपती घरा आले।।६९।।
आह्मा बाळकाची धर्म जननी। जर्ज(र) होती हींसा रोगाणी।
दया औषध दील्ह राज्यानी। श्रावक देही वाचले।।७०।।
आह्मा रहितीचे[4] धर्मघर। फोडीले होते हींसा तस्कर।
तेथ आले दया जागले नर। सुगती द्रव्ये वाचले।।७१।।
आह्मी प्रजा सुक्ल[5] होतो विहीरी। राज्ये दये भरल्या नीरी।
तेथ धर्मवृक्षा पीकली सरी। श्री राजेश्रीच्या प्रसादे।।७२।।
याते उपमा सोभे तीर्थपती। याते उपमा शोभे चक्रवर्ती।
याते उपमा सोभे श्रेष्ठमती। कीर्त गाती राज्याची।।७३।।
याते उपमा सोभे स्वर्गवासी[6]। याते उपमा शोभे गुणराशी।
सत्ये केले पापत्येक्त णावासी। कीर्त गाती राज्याची।।७४।।

१. धर्मरूपीवत्स, वासरू (हिं. बछडा). २. तडातोड -ताटातूट, वियोग. ३. वृद्धी.
४राहात असलेले; अभागग्रस्त. ५. सुकलेले. ६. स्वर्गात राहणारे, देव.

याते ह्मणीजे परोपकारी। याते ह्मणे दयावर्शेरी[१]।
याते ह्मणीजे हींसाआरी[२]। कीर्त गाती राज्याची।।७५।।
ऐसे त्या देशीचे सर्व जन। राजेश्रीचे बोलती सद्गुण।
श्रोते हो ऐका चीत देउन। सर्वात श्रेष्ठ धर्म हा।।७६।।
धर्म ह्मणीजे दवपाये। धर्म ह्मणीजे धर्महृदये।
धर्म ह्मणीजे मोक्षे सोये। हे सत्ये जाण श्रोते हो।।७७।।
धर्म ह्मणीजे गुरुस्वरूप। धर्म ह्मणीजे माये बाप।
ज्या धर्मेदुर होये पाप। तो धर्म आधी करावा।।७८।।
धर्म ह्मणीजे सरस्वती। धर्म ह्मणीजे विश्वज्योती।
ज्या धर्मेजाये आज्ञानराती। तो धर्म आधी करावा।।७९।।
धर्म ह्मणीजे तप आर्क[३]। हा हा धर्म स्वयपाक।
त्या धर्मेसुख होये आनेक। तो धर्म आधी करावा।।८०।।
धर्म ह्मणीजे पोर्णीमा चेंद्र। धर्म ह्मणीजे स्वर्गद्र।
धर्म ह्मणीजे मध्ये लोकेंद्र[४]। सर्वोत्तम धर्म हा।।८१।।
धर्म जीवाचा जगजट। धर्म जेन्मोजन्माची दीवटी।
धर्म आचरता सेवटी। जीवा स्वर्ग मोक्ष होय।।८२।।
धर्म ह्मणीजे गुरु। धर्म जीवाचा सखा सहोदरु।
धर्म जैसा कल्पतरु। आर्था पुरवी जीवाचे।।८३।।
धर्माये होड[५] थोर कोण्ही। न दिसे या त्रैलोक्यभुवनी।
धर्म म्हणीजे तो पुण्य प्राणी। पाप तृषा खंडतु।।८४।।
धर्म ह्मणीजे पुण्येकर्ता। धर्म ह्मणीजे सुखदाता।
धर्म ह्मणीजे जीवा त्राता। लक्ष चौऱ्याशी माझारी।।८५।।
धर्म ह्मणीजे ज्ञानयु(सु)र्ये। धर्मे घडे आवघड कार्ये।

१.बरसणारा. २. अरी, शत्रू. ३. सूर्य. ४. मध्य लोकीचा इंद्र, चक्रवर्ती राजा.
५. तुल्य, समान.

धर्मप्राप्त नवनीधी होये। जेन्मोजेन्मी या जीवासी।।८६।।
धर्मेप्रसन्न भगवंत। धर्मेनाम आग्नी होये शांत।
धर्म तारी पडता वनात। धर्म संगती (जी)वाचा।।८७।।
धर्म ह्मणीजे केवळ डोळे। आकळ वस्तुते सर्व कळे।
धर्मेफीटती मुख सोहोळे। जन्मोजन्मी जीवाचे।।८८।।
धर्म मित्र केलियावरी। जीवाचे दुर पळती वैरी।
धर्म दुःखार्णव पार करी। सुख संगती जीवाचे।।८९।।
धर्म जीवाचा सखा मोटा। धर्म घडकी(वी) मोक्षवाटा।
आथवा दावी स्वर्ग दाऱ्हवंटा। सुख मंदीरी नीजवी।।९०।।
धर्म जीवाचा प्रधान मणी। नेउन बैसवी मोक्षासणी।
सेवेस लावी आक्षये राणी। धर्म मैत्र जोडा हो।।९१।।
धर्म जीवाचा सावकार। सुख द्रव्ये देतो आपार।
जीवा हिंडु न दे नरक द्वार। पुण्याकार करीतसे।।९२।।
धर्म जीवाचा जैसा जेनक। खांद्यावर घेउन बाळक।
दाखवी सुख रस्ते कै(कौ)तुक। जीनशास्त्रासी रंजवी।।९३।।
धर्म जीवाचा वनपाळ। चींतील्या फळ देतो फळ।
सुख फुले गळा घाली माळ। आकृत्य[1] कळा दावीतो।।९४।।
ऐसीया धर्माचे मुळ। कैसे ते ऐका श्रोते सकळ।
ज्या आंतरी दया वशे जेळ। तेच बीज धर्माचे।।९५।।
हे पाहाता दिशे तीळ तुल्ये। परी हेच जीवाचे कैवल्ये।
ह्याच मार्ग मुनी सर्व गेले। देव तीर्थंकरादिक।।९६।।
श्रोते हो हा मार्ग नव्हे भयान। चालता दीसे कल्पवृक्ष वन।
तेथ आहे आसोक जीवन। जेन्म पाव कोसात।।९७।।

१. आकृत्य –आकृती, आकार.

मि बोलतो हे घ्या ऐकुन। येक जन्म दया मार्ग जान।
तथापी कठीण लागे राण। मग फीरा माघारे।।९८।।
आधीच नका भेउ मणी। आधीच न जाव कुमार्गाणी।
आधीच न भावी[1] पाप मनी। धर्ममार्गी चालावे।।९९।।
जया मार्गी जाता भेले। तेच दुःखा वनी पडले।
तेच कुरूप जेन्मे गांजले। भोग भोगीती पापाचे।।२००।।
पापमार्गी दुःख कंटक। काळ पसरलेत आनेक।
ते मार्गी जे गेले दुष्ट लोक। दुःखे जन्म प्रस्तावले।।१।।
ऐसेया जेन्म बाजारी केने[2]। बैसले हे दो प्रकारी जाण।
सुवर्ण आणि मद्येपान। काळ वीकरा[3] करीतो।।२।।
जे तुमचे मना भावे बरे। ते करा सर्व आंगीकार।
परी फीरवी ज्ञान नजेर। तोटा नफा उमजा हो।।३।।
पाहाया पापत्येक्त राज्यासी। जेव्हा दया आली हृदयासी।
तेव्हा बोलवीले मुनीसी। मग जाला आतीशेये।।४।।
ऐसा ह्मणे कवींद्रसेवक। मुळीचा मीच आज्ञान मुर्ख।
माझे मी मी पन आले मुख। हेच काळंकी[4] तोंडीसी।।५।।
मी मी पन न ह्मणती कवी। मी मी पन हे मुखी नसावी।
मी मी पण हेच मुळी सीवी[5]। ज्ञानपुरुशा वाटतसे।।६।।
श्रोते हो तुह्मी सज्ञानी जेळ। माझे मीपण धुवा काजळ।
नीर्मळ करा मुखकमळ। कवींद्रसेवक ह्मणे।।७।।
कवींद्रसेवक आसो खोटा। परी श्रोते न पळो बारा वाटा।
या ग्रंथास लाउन दश बोटा। आर्जी वीनंती करा हो।।८।।
ईति श्री सुमती कथा बीज। सद्गुरुने पेरला सहज।

१. भावी –भावणे, चिंतन करणे. २. व्यापार करण्याचा माल. ३. विक्रय.
४. –काळिमा, दूषण. ५. सीवी –शिवी.

कवींद्रसेवका आली लाज। मी मी पण वागवीता।।९।।
हा येथ दुजा जाला प्रसंग। ऐकता कर्मबंध सोडी संग।
येथ संचला दयारंग। ते कर्ण नेत्री पाहा हो।।१०।।
पाहा ह्मणण हे खोटे बोल। जरी शास्त्रार्थ आसतील फुल।
तरीच न देउ न घेतील मोल। भावार्थ द्रव्ये जीवाचे।।११।।
यात पापत्येक्त कथा सुवास। ते कर्ण नाकी भोगा ह्रदयास।
वीवेक जाना त्या लागला अस। होये ग्राहीक प्रीतीचा।।१२।।
ज्याचे परीक्षा घ्राण गेला सेंडा[१]। तो सुमतीस न दाखवी तोंडा।
त्याला शाद्याद[२] सुगंध नीवाडा। कैसा लाभे आंतरी।।१३।।
सुमती तीर्थंकराची कन्या। जीवास नेते वैकुंट परन्या।
आक्षये स्त्रीभोग दावी कन्या। ते मीथ्यातासी आकळ।।१४।।
सुमती जालीयावरती देही। जीव पडे कुगत आपाई।
तेव्हाच केवळीची वाटे गही। सत्य होये नाकी[४] ईंद्रा।।१५।।
सुमती सद्गुरुचा देकार। सम्येक्त धडा मणी लाभे कर।
पंचे मीथ्यात फाटके पदर। आंत्री[५] घाला सांडे[६] पै।।१६।।
ज्ञान नेत्रावर सुमती जोत। श्रोत्यास आसावी श्रवन पंथ।
तेव्हाच दीसे जीन सुर्येदीप। कुज्ञान रोगी दीपती।।१७।।
पुढील आध्यायी वचेन रोखा। ते मागु येतील कुजोगी मुखा।
खोट पडता आंतर धोका। लागला तयासी भारी।
लागला तयासी भारी।।१८।।
कुशास्त्र तस्कर राजसभेत। धरून सोडतील आत्मपंथ।
नगर संदेह तमो होता आस्त। सम्यक्त सोम[७] मनाद्री[८]।।१९।।
हा दुसरा आध्या श्रुन्यास फाटा। सद्गुरुने वोढीला करांगुष्टा।

१.? २. परिणयासाठी, विवाहासाठी. ३. जाणणे. ४. स्वर्गामध्ये.
५.अंतरी, मनामध्ये. ६.सांडणे, गळून पडणे. ७. चंद्र. ८. मनरूपी पर्वत.

नव आध्ये आंख चढता घाट। कुभ्रम श्रुन्ये उडे पै।।२०।।

ईती श्री सुमतीप्रकाशेक कथा। या पंचम काळी हींसा त्येक्त दयाधर्म उद्योत शुभं भवतु। योगो न्नाम द्वीतीयोध्याये संपुर्ण समाप्त। वोवीसंख्या ।।२२०।। छ।। मीती आशाड वदे प्रतीपदा।।२।। रोज बुधवार प्रहर दोन ते वेळा संपुर्ण।। छ।।छ।।छ।।छ।।छ।।छ।।

।। इति सूमतिप्रकाश पुराणग्रंथ द्वीतीमोध्याये समाप्त।।

* * *

# सुमतिप्रकाश

## तृतीय अध्याय

ॐ न्मासीध्धभ्ये। श्री वीतरागाये नमां।
श्रीसंभवनाथ तीर्थंकरायेन्मा।
श्री छेताळीस सुगुणासहीत देवाये नमा।

त्रीदशेपती[1] वंदीती जया। अरीहंत नाम महा ह्मणती तया।
तया देवाचे चरण काया। मन माझें भावार्थी।।१।।
तोच ह्मनवी त्रैलोक्येधनी। तोच ह्मणवी केवळज्ञानी।
तोच बैसोनी समोशरणी। सांगे धर्म जेगासी।।२।।
ते चेरण आणोनी ध्यानास। कथा गातो सुमतीप्रकाश।
जे ऐकती जीवे सावकाश। होये वीश्राम स्वर्गीचा।।३।।
व्हावे सावध पुराणपंथी। शेब्द घेऊण लावा जीवार्थी।
श्रवणपुण्ये हे मोक्षेपंथी। होती संगती जीवाचे।।४।।
प्रथ(म) आध्याईची कथा। चालता राहीली पंथा।
पापत्येक्त येता नगरपंथा। कुजोग्याची राहेली।।५।।
ते ऐका सर्व श्रोते जेण। सम्येक्त उघडे टेवा नयन।
सुमती कथा दीशेल भुवन। सज्ञाननेत्री पाहा हो।।६।।
दीनकर जालीया आस्त। येक ठाई मीळाले महंत।
तैसेच आले शीष्ये स्थापीत। वीचार जान करीती।।७।।
कोण्ही ह्मणती हे न बरे। सकाळ राजा लुटील घरे।
सेवटी मारील आपले शीर। हींसाके ह्मणोनी।।८।।

१. स्वर्गीच्या देवांचे अधिपती इंद्र.

कोण्ही ह्मणती पळावे। कोण्ही ह्मणती न जावे।
कोण्ही ह्मणती चेटक करावे। आपुले कुवीद्या बळे।।९।।
कोण्ही ह्मणती धर्मापुढे। कुवीद्या बळ कीती बापुडे।
चुकता पाई पडतील खोडे। खोटे औ(ऐ)स न करावे।।१०।।
काय करील हे राजा जाण। आपण फुंकला त्याचा कान[१]।
याचे राखील काही ईमाण। आह्मी भांड[२] त्या संगे।।११।।
कोण्ही ह्मणती भेउ मनी। ह्मणती बैसा शास्त्र आवरोनी।
आपण आहो फौजवाणी। सातशाचा जमाव।।१२।।
या वेगळी ढोर पोर। येथ येथ शीष्ये हे तर थोर थोर।
या वेगळी वीद्या आहे फार। मोहनी स्तंभनी टोण्याची[३]।।१३।।
ह्मणती ती नका बोलु थोर वाणी। कळता कळल राज्ये काणी।
या साठी बोलाल धुव[४] चेणी[५]। चाहाळी[६] सावध धरा हो।।१४।।
ह्मणती नका करू शैष्यासना। ह्मणती नका वाजउ वीणा।
नका करू आज हारीकीर्तना। गुप्त रूप राहाणे।।१५।।
ह्मणती जाले दोन प्रहरा। परी राजा नाही आला घरा।
उदईक नीघता भास्करा। क्रोध पुरा करील।।१६।।
पर्वती ऐकीली दया सार। आपले कर्तुत्व हिंसाकारी।
कैसी लजा राखील श्रीहारी। सर्वजण बोलती।।१७।।
आपला गुंता जाला येथ फार। दुसरे गावी न केला घर।
पळता वोझे नीघेल फार। कवन बुधी करावी।।१८।।
ऐसा वीचार करीता जोगी। थर थर कांपती सर्वेआंगी।
ह्मनती दीवस न नीघे वेगी। कुजपां जेपताती।।१९।।
जैसा पुरुष कोण्ही व्यभीचारी। कर्म आचरोनी भीतो आंतरी।
तैसे कुसन्य(ा)सी सर्व घरी। भये राज्याचे मानती।।२०।।

१.मंत्र देणे, फूस लावणे. २. नाटक-तमाशातील कलाकार. ३. जादू, हातचलाखी. ४.

जैसा कोण्ही तस्कर नर। सोडोनी न दुजीयाचे ढोर।
उद्योत जाल्या कापे आंतर। तैसे भेती कुसन्यासी।।२१।।
की कोण्ही खोटी करी पंचाईत। कार्येजालीया भेती चींतात।
तैसे हे सर्व खोटे महंत। राजभयाने भेताती।।२२।।
की जुह्यारी खेळती चोरुन। की वरते घरात फीरे श्वान।
की कोण्हीया पुरुषा जाले रुण। भय दुज्याचे मानती।।२३।।
की पशु बार्गळ[1] खाये वावर। रांड स्त्रीचे पोट वाढता थोर।
की सं(छ)तीस तुफान घेता सार। आणी भये चित्तात।।२४।।
की हाती घेतो धरण मोल। सवदा देतो उण्या मोल।
ह्मणवी पंडीत खोट बोल। आंतेरी भये तयाचे।।२५।।
की द्रव्य घेउन भोळ्या जाती। की दीक्षा घेउन टाकुन देती।
की खोटा होता राजसभेत। भय सुटे अनीवार।। २६।।
की आप कार्यार्थी देई मान। घरी चोरी करून जाये जाण।
पुन्हा धन्येचे होता दर्शन। सर्वेआंगासी कापतु।।२७।।
जगात आपुली दाखवी थोरी। गुह्ये कर्म करी नाना परी।
ते ठाउक होता लोक नजेरी। मग होये भयाभीत।।२८।।
जेन पाहील जेन केल हात। ते खर करू गेला सभेत।
न्याय पाहाता खोटी जाली मात। तो भयाभीत जाला पै।।२९।।
या दृष्टांत ते सर्व सन्यासी। भयाभीत जाले हृदयासी।
सर्व बैसोनी यकांतवासी। नीश्चये कृत्य करीती।।३०।।
त्यातील मुख्य बाबा जटाधारी। ते ह्मणे बाधा सर्वावर सारी।
उदईक नीघता भास्करी। आपण जाउ तीर्थासी।।३१।।
हा शब्द मुखी राहु द्या धट्ट[2]। सर्व चला ये कायेसी वाट।
मग होईल ते पाहु या दुष्ट। बोलता सुर्येउगवला।।३२।।

१. उनाड, स्वच्छंदी, माजोरी. २. दृढ

सर्वेही केली तयारी। वझे भरले बईल भारी।
यक जमावे गेले बाहरी। परगावासी पोहोचले।।३३।।
जेव्हा नगर लोक राजान। नेले होते बोलाउन जान।
तेव्हा हे गेले गावातुन। न पुसता कवणासी।।३४।।
जव्हा उपदेश लीहिली पत्र। तेव्हा लोक होते कचेरी तंत्र।
गावातुन गेले हे आपवीत्र। न पुसता कवनासी।।३५।।
हेच आंतरीचे मोठे खोटे। राजा याहाचे नाही गेला वाटे।
ते गेले ढोर वेळा[१] पाहाटे। न पुसता कवणासी।।३६।।
राज्योपदेश पत्र लोकाणी। अंगीकार केला सर्वेजनी।
तेव्हा हे त्या देशात कुगुणी। लपुन राहिले होते।।३७।।
हे कथा होती प्रथम प्रसंगी। राहिली होती सेवठ भागी।
ते मेळवीली तीसरे प्रसंगी। करा पवीत्र श्रोते हो।।३८।।
दुसरे आधाई दया पाउस। पडता पीकली धर्म रास।
तेने तृप्त जाली संसार आस। प्रज्यासहीत राज्याची।।३९।।
हे जाली दुजे प्रसंगी सीमा। तयात उगवली दया पुणीमा।
खंड जाला हिंसा तस्कर कामा। कुमार्ग गुरू लपाले।।४०।।
राजा मनोदय जाला पुर्ण। देशात उगवला दया भाण[२]।
तेणे मीथ्या तीमीर गेला जाण। हे जाल दुजे आध्यात।।४१।।
ईकडे जीवरक्षक पर्वती। नीत्य श्रावक पोर पढती।
नीत्य श्री जीनकीर्तन गाती। धर्म उद्योत जाला पै।।४२।।
भोवते वन होते भयानक। वरती आले उत्तम लो(क)।
मार्गी झाले वीहीरी उदक। राजेसत्ते कडोन।।४३।।
या ग्रामपासाव[३] गीरीनीकट। सोपी जाली जातायेता वाट।
आवघड राहिला नाही घाट। पर्वती पायेऱ्या केल्या पै।४४।।

१.गोचारण वेला, सकाळ. २. सूर्य. ३. गावापासून

ऐसीया पर्वत उचासणी। बैसले धर्मस्थापीत मुनी।
नीत्ये सांगती पुरान कथनी। पुण्यश्लोकी जीवाची।।४५।।
तेथ सदईव जातो राजा। तैसी नीत्ये जाये नगर प्रजा।
मुनी सु(मु)ख ऐकती धर्मकाजा। पुरान आर्थ पुर्वीचे।।४६।।
नीत्य जाउन ऐकती पुराण। नीत्य गातो श्री जीनकीर्तन।
नीत्य करी मुनीच स्तवन। पुण्य वीशेष जोडीतु।।४७।।
नीत्ये करी सामाईक। नीत्य सुवीद्या मुख घोक।
नीत्य चींत्तात आनी हारीख। पुण्ये वीशेष जोडीतु।।४८।।
मुनीश्वर जे सांगती आर्थ। ते ते ठेवी ज्ञान हृदयात।
मोहरे[१] वीशेष धरी प्रीती। पर्वती येया जायाची।।४९।।
नीत्य घेतो मुनी दर्शेन। चीती न मानी आळसु सीण।
केल्या कर्मा करी खंडण। पुण्य वीशेष जोडीतु।।५०।।
ऐसीया वर्शेजाली च्यार। यापुढ कथा ऐका सादर।
ज्या गावी कुसन्यासी होते सारे। तेथ काये जाल पै।।५१।।
त्या गावा नाम हिंसीपुरी। तेथ दया फीरली होती सारी।
तेथ कोण्ही न करी हींसा करी। राज्या भरे भिताती।।५२।।
तेथ कुसंन्यासी केली वस्ती। खोपड्या करून नांदती।
भीक्षा आंन्न घरोघर माघती। आवीच्यार कडोन।।५३।।
हे करू पाहाती पहिलेवानी[२]। तेथील लोक शाहाने चोगुनी।
कोन्ही हींसा बोलता वदनी। मारीती तोंडात याचे।।५४।।
ते घरी परीवार ठेउन। सन्यासी हिंडती स्थानवन।
गेल्या आन्न मीळे वस्त्र दान। परी हींसा न दीसे कोठ।।५५।।
देशात फीरता होती कष्टी। द्रव्ये रुपये बांधोणी गाठी।
परी मांस न दीसेया द्रीष्टी। ते दुःखी कष्टी आपार।।५६।।

१. समोर. २. आधीप्रमाणे.

खाया न मीळे मांस आहार। देही झुरझुरू जाली पांजर।
त्याहाचे डोळे खोल गेले फार। ते मांस चीत्ता करीती।।५७।।
त्याही सोडीले हारीभजन। त्याही सोडीले सीष्यकरण।
त्याहा न मीळे पीया मद्यपाण। चींता करीती मांसाची।।५८।।
ते मीष्टंन्न भक्षीती। उत्तम वस्त्र उचलेती।
परी शरीरा लागली खांती[१]। आभक्षे हींसा पापाची।।५९।।
आपमाण न होता मनी भेले। न मारी उगेच कोमावले[२]।
कोण्हासी न बोलती या बोल। जाले वेड मोसासाठी।।६०।।
जैसा व्याघ्र भोग जालीया। दु:ख लागे त्याचे काया।
की गाईच वच्छ मेलिया। व्यर्थ चींता करीती।।६१।।
की काग पक्षी हृदये कमळ। जैसा स्वप्नी दीसे मांस गोळा।
जागृत जाल्या न दीसे डोळा। चींता लागे तया मनी।।६२।।
जैसे कुश्चीळका[३] मुखी संग। वीषयार्थी करू जाये भोग।
तीचे दु:खे सडे याचे आंग। तो पुन्हा ईछा करी पै।।६३।।
की जैसी कुंळवंताची नारी। कळा कर्म झाली व्येभीचारी।
तीते आराखा करीता धरी। करी ईछा पर पुरुशा।।६४।।
की गो गोरणी[४] आंडेल[५] गोऱ्होरा[६]। चारा भक्षीती आपार पोरे।
त्याहाचे आंग भोगार्थी झुरे। तैसे वाया गेले पै।।६५।।
जैसे वसांन[७] पडल्या नगर। वीष्टा खाया न मीळे शुकरी[८]।
ते वाया जाती सर्व शरीरा। तैसे जाले कुसन्यासी।।६६।।
की कोण्हे समर्थाची कन्या रांगर[९]। जे न लज्ये न करी भर्तार।
आंतरी ह्मणे भोगावे नर। त्या दु:खे ते होये कष्टी।।६७।।

---

१.खंत, खेद, दु:ख. २. कोमेजले. ३. कुशील, कुलटा. ४. माजावर आलेली गाय.
५. ज्याचे वृषण बडवलेले नाही असा बैल. ६. माजावर आलेला वळू. ७. ओसाड.
८. डुकरीण. ९.रांगडी, कामातुर.

की वीशये भोगी बैसे ध्याणी। तो चीत लावी वेश्यासदनी।
तैसे हे कुसन्यासी मणी। इंछा करीती मांसाची।।६८।।
की चोरासी प्राप्त बंदीखाणा। होतो कर्त्तुत्व आठवे नाना।
तो दीवस गेलीया आस्तमान। करी ईछा चोरीची।।६९।।
की मेलीया मुडद्याभवते। नर णारी मीळताती बहुत।
तेथ स्वान जंबुकाचे चीत्त। वडवे[1] खायासाठी।।७०।।
की आंस्वणीचे[2] माघे गाढव। आंग हालवीत घेतो धाव।
तेथ काही न चाले उपाव। होये कष्टी मनात।।।७१।।
की रोगीया मनी दुःख बसे। की दरीद्र्या आन्न वस्त्र न दीसे।
की कोण्ही लागे व्येंतर[3] पीसे। तैसे हे चींता करीती।।७२।।
जैसे कामीक पुरुशाचे मनी। स्त्रिचे सर्वांगी दीसे योनी।
तैसे याहा हृदई लोचणि। हिंसा बैसली आपार।।७३।।
की जैसे आनामीकाचे द्या(दा)री। भरल्या दीसती आस्ती[4]गारी[5]।
तैसे या कुसन्यासाचे आंतरी। हींसा भरली वीशेस।।७४।।
हे सन्यास मानव देहा वृक्षे। त्याहा हींसा कोप लागला दक्षे।
ते सरव जन्म चुकले मोक्षे। मांसा(ची) चींता करीती।।७५।।
देशात जेंन्मला दया राणा। याहाची गेली हिंसा वासना।
ऐसीया कृष्न पाप पाषाणा। कोण काढी नरकातुण।।७६।।
ऐसीया हींसा चींतेचा वन्ही। पेटला त्या कुसन्यासाचे मणी।
मग सर्वेयेकवट होवोनी। वीच्यार करीती वादाचा।।७७।।
ह्मणती चला पाहु ज्ञानपुरी।। पापत्यक्त राजा आपुला वैरी।
त्यासी भांडु आपण परोपरी। वाद करू शास्त्रार्थी।।७८।।
जवळ नका घेउ आवेज[6]। सडी[7] स्वारीने चला सहज।

१.बोडण २. अश्विनी, घोडी. ३.निर्जन स्थानी राहणारे अतृप्त आत्मे. ४. अस्थी, हाडे.
५. खड्डे. ६. ऐवज, धन. ७. एकटी.

कार्य करील पापत्यक्त राज। नका भेउ तयासी।।७९।।
जरी राजा खोटा आसत्य जाण। तो न नीघु ते गावातुन।
तेव्हाच करीता आपमान। न चुकता या कार्यासी।।८०।।
परी आपनच खोटे आंतरीचे। उगीची सोडीली ते नगरी।
आता चला जाउ राज्य दारी। हींसा घेउ मागुन।।८१।।
त्याते सांगु आर्थ सीखुण[१]। करून दाउ हारीकीर्तन।
मग तो होईल प्रसणं मन। हींसा मागु तयासी।।८२।।
कुदेवता दाखउ माहात्म। ज्यात आहे हींसा वर्म।
जेने राज्या त्याचा हेरि धर्म। हाच उपाव करू हो।।८३।।
त्यासी करावे कुवीद्या टोन[२]। तेणे राजा दुःखी पडेल जाण।
आपण होउन वैद्य सगुन। प्रचीती दाउ राज्यासी।।८४।।
त्यास गुन होईल वश्ये। मग आपण हींसा मागु मांसे।
तेने शेरीर होतील संतोष। ऐसा वीचार केला पै।।८५।।
तेथुन नीघाले सर्वेजन। चालले ज्ञानपुरी मार्गान।
परी आंतरी भयोभीत मन। ते न सांगती कोन्हासी।।८६।।
ते लेलेत आस्तीमाळा धरे। शेरीर मोळक्या[३]वानी थोर।
आंगी पांघरले व्याघ्रांबर। चालले राजग्रामासी।।८७।।
ते पाहु चालले ज्ञानपुर। परी हृदई नाही ज्ञान पुर।
सर्वेवाव्हवले आज्ञान पुर। चेर्म नेत्रा न पाहाती।।८८।।
ढोरा[४]सारखे गेले गावा खरा। तैसेच बोलती मुख आक्षेरा।
तैसेच दीसती सर्व शरीरा। परी सींग पुस[५] नाही।।८९।।
या वीन शरीर दिसे भोंड[६]। आंगी चर्चीली राख ची खांड[७]।
पुन्हा गावा आले दाखउ तोंड। या लाज नाही पापीष्टा।।९०।।
ते सर्वेमीळोनी कुसन्यासी। गेले पापत्यक्त राजापासी।
बैसले तळी[८] भोईसी[९]। योगांसन न दील्हे।।९१।।
तया भरले कचेरी स्थान। यकमेका बोलती वचेन।

१.शिकवून. २. जादूटोणा. ३. लाकूडतोड्यासारखे धडधाकट. ४. गुरे. ५. पुच्छ, शेपूट. ६. भेसूर, बावळट. ७. खंड, तुकडा. ८. खाली. ९. जमिनीवर.

ह्मनती हे कुलक्षेन वदण। काशा येथ आलेती।।९२।।
ऐसे तेथ धरीता संशेये। तो राज्या बोलीला त्याची सोये।
ह्मणे कीं कार्येकोण होये। पुसा वीच्यार तयासी।।९३।।
ऐसे नीघता राज्या वचेन। सन्यासाची खळव(वळ)ली मन।
बडबडा करीती क्रोधाण। शेब्द बोलती राज्यासी।।९४।।
ह्मनती तु आमचा शीशा[1]। का करुन बोलतु णीराशा।
आईसी बेईमान पुरुशा। गत नाही येहे लोकी।।९५।।
त्वाच मंत्र घेतला कानी। त्वाच बैसवीले श्रष्ठासनी।
त्वाच लेखीले कीवलवानी। हे पाप तुज लागो।।९६।।
त्वाच नेम घेतला जान। त्वाच न पुसता दील्हा टाकुन।
तुझेच आधम जाले मन। ते नव्हे गुन तुझे की।।९७।।
तुच भक्षेक जाला मांसास। त्वाच मानीला त्याचा त्रास।
त्वाच काढीला देवता ग्राया(मातु)न। पापी होसील पै।।९८।।
जे आहे कुदेवता भवानी। ते आली होती आमचे स्वप्नी।
सांगुन गेली कथा कानी। -----।।९९।।
ते ह्मने का न केली हींसा मना। कोन केली हे मांस खंडना।
का केली आमची पुजा मना। हे खबध्या[2] जोगे हो।।१००।।
ते ह्मने पशु जीवासाठी जान। मी आवतरले या भुवना।
ते होम कोन केले रे मना। खबर सांगा तयासी।।१।।
ते ह्मने का पाडले माझे मठ। भक्त येयाची का मोडली वाट।
ऐसा प्रानी कोण प्रानी हे दुष्ट। खबर घ्या रे तयाची।।२।।
ह्मणे माझे भुते देव कर। कोनाही दीसत घरोघर।
पाया न पडती पोर थोर। हे वीचारा देशात।।३।।
म्हने माझ्या मांगीणी जोगीणी। त्या का न येती माझे सदनी।

१.शिष्य. २. एक शिवी, तुच्छतादर्शक संबोधन.

कोन्ही न गाती माझे काहानी। हे काये जाले वीचारा।।४।।
ते ह्मने मी तर गुप्त सदनी। आताची राहेली आहे लपोनी।
तेथुन प्रगट होता या जनी। घेईन जीव लोकाचे।।५।।
ह्मने जगा करीन वेड पीशे। आंगास फोडीन नायटे।
जाउन झोंबीन त्या राज्यास। हे तुह्मी सांगा वेगीन।।६।।
ह्मणे मांसवीन माझे ह्रदया। आग लागली काळीज काया।
तेणे माझे देह गेले वाया। खाज सुटली आंगासी।।७।।
ते ह्मने माझे आले मरण। परी मी राज्याचा घेईन प्रान।
नाही तरी मी भुत होईन। या मांसे आहारासाठी।।८।।
तीचे शरीर फार जाले क्षीन। दीश जैसी दुर्बळ माहारीन।
नख केशे थाण लांब डाकीन। आह्मी देखीले स्वप्नात।।९।।
औ(ऐ)सी देवीची ऐकुन कारुण। येथ आलो सर्वेतुझे सदना।
परी तीचा आन्याय नाहि जान। रुषीन केली चावटी[१]।।१०।।
ते ह्मनती त्या व्यास पुरानी। थोर केली तुळजाभवानी।
तीच पुजेन औ(ऐके) राज्या कानी। शास्त्रार्थ मी वदतो।।११।।
तीचे केलीया पुजेन। प्रसन्न होतो भगवान।
ऐसे सर्वेरुषी जंन। ग्रंथांतरी बोलवु।।१२।।
तीच्या भाळी कुंकु लावावे थोरु। तीच्या भक्तास पाजावी दारू।
तेव्हा प्रसन्न होतो सद्गुरु। पाहा षेक्ती माहात्मात।।१३।।
तीच्या मोहोर जे वाव्हावे जीव। ते मेल्या पावती स्वर्गा सर्व।
ऐसा आमचे पुरानी भाव। कथीला हे राजींद्र।।१४।।
मछे मृग ससी पक्षी थोर। तीच्या पुढे जो मारीती नर।
लक्ष्मीन त्याचे भरे घर। हे सत्ये जानावे जी राया।।१५।।
तीच्या कार्यार्थी होमी पुजनी। वृक्ष पाला आनीती तोडुन।

१.चावटपणा, खोडसाळपणा.

तेथ जे मरतील लघु प्रानी। ते सर्वेजाती मोक्षासी।।१६।।
तुह्मी ऐका सर्व श्रोते जनी। त्याचे भवानी आली स्वप्नी।
हींसा खोटी सांगुन कथनी। खर करू पाहाती।।१७।।
ऐसे खोटे बोलोनी संन्यासी। हींसा मागु पाहाती राज्यासी।
ह्मनती तु आमचे देवरुषी। प्रसन्न होईजे आता।।१८।।
ह्मनती हींसा मांस देई दान। याने शांत होईल देवी जान।
तु जयेता पीडा हारल वीघ्न। हे सत्य मानी राजींद्रा।।१९।।
आमचा मंत्र घेतल्यावरी। मनसा न केली आमची पुरी।
नाहाक गेलासी त्या गीरीवरी। दान आमुचे राहीले।।२०।।
चेतुर्दश हारनाचा रोखा। त्वाच लीहीला आपुले मुखा।
ते मांस द्रव्ये का ठेवीले फुका। हे घेउ तुजपासी।।२१।।
हे खरे की लटके वचन। ते पाहे आपुले ध्यान मन।
आता नको होउ बेईमान। मांस देया वीषयी।।२२।।
याची आम्ही सांगीतो उगवनी। ते त्वा राजा धरावी जीवी मनी।
प्रसन्न होउनी बोल वदनी। मोकळीक दे मांसाची।।२३।।
आह्मी ज्या गावी राहांतो सत। त्या गावी मोकळीक दे ताकीत।
आह्मास लागली क्षुदा भुत। ते काडावी राज्याश्री।।२४।।
पत्रात ल्याहा कुसन्यासासी। उदरभर खा उद्या मांसासी।
याचे नका धरू हाता तोंडासी। हे सांगा जन लोकासी।।२५।।
सीक्का मोर्तु करी पत्रावर। येका गावावर दे आभये सार।
हे आह्मी को(खो)ट न बोलु आक्षेर। वचेन घेण राजेश्रि।।२६।।
ह्मनजे आमचे फिटले कर्ज। वचेनपुर्जा१ फटला सहज।
संतोषे होईल तुळजाभाजा (माता)। होये प्रसन्न राज्याश्री।।२७।।
हे कुजोग्याचे नीघता वाणी। कटाळा आला मनी राज्यश्री।

मळीक[१] सुटली चित्ती भुवनी। ज्ञानोत्तर बोलतु।।२८।।
ऐका श्रोते हो राज्योत्तर। ज्या श्रवन पाप पळे दुर।
ज्याने सुख प्राप्त होये थोर। पवीत्र वाचा राज्याची।।२९।।
पवीत्र आहे आथवा नाही। हे आर्थ पाहा तुह्मी हृदई।
पाहाता दीशे जीनेंद्र सही। पुन्ये जवळी येतसे।।३०।।
राजा ह्मने कुजोग्यासी। शब्द वकले (ओकले)त दुर्गंद रासी।।
तुह्मी आहात पारध वंसी। भेद तुमचा न कळे।।३१।।
जळो जळो तुमची तोंड। जळो जळो ते शास्त्र पाखांड।
जळो जळो ते भवानी रांड। भुत्त भोगी चांडाळी।।३२।।
नसो नसो ते कुरुषी वाक्ये। नसो नसो कुगुरु कान फुंके।
नसो नसो कुशास्त्र हारीख[२]। हे आवगती नेताती।।३३।।
पुरे पुरे तुमचा कुसंग। पुरे पुरे वस्त्रिचा भगवा रंग।
पुरे पुरे ते स्वप्न ढोंग। मीथ्या सार वदले पै।।३४।।
ते चुडेल तुमचे आले स्वप्नी। येथ का दील्ही पाटउनी।
ते हींसा कर्म करोनी कर्णी। कोठे सांगा रे लपली।।३५।।
ते कुदेवता आना रे वेगीण। तीन माघे फार घेतले प्रान।
ते जीव कोठ ठेवीले नेउन। आह्मी पुसु तीज लागी।।३६।।
तीला पाहु आह्मी या दृष्टीन। ते कैसे झाली रोहेरे आंगना।
की जातीची आहे माहारीन। की कळा आली तयेसी।।३७।।
तीला कैसी लागली रे भुक। ते मग बोलल आपले मुख।
जरी मागेल मांसाहारीक। वीष्टा चारू तीज लागी।।३८।।
चेर्म वाहान टुकडे गारी। ते साठवीलेती दारा बाहेर।
यान तीची पुजा करू भारी। पुर्न आसोसी[३] होइल।।३९।।

१.किळस. २. हर्ष, समाधान. ३. आशा, इच्छा.

तीला उभे करा महार दारी। तीला न्हाणउ मोरीच्या नीरी[1]।
तीला सींदी वस्त्र देउ धतुरी। वस्त्र पवीत्र होतील।।४०।।
तिचे पुढा भुते करू देवकर[2]। गर्दभ श्वानाचे कळप थोर।
त्याचे आंगी मार देउ फार। ते गाण गाती तयसी।।४१।।
साक्षांत आनु जोगीनी मांगीनी। तीसी पोटभर घालु आन्न।
तीची पुजा करू केर पुंज्यानं। पावन होईल की।।४२।।
माहाराची आनु पोर नर। ते घालु तीच्या पायावर।
त्याचे घरी द्रव्य यईल पुर। पवीत्र ते होतील की।।४३।।
आयुशा सार सरल्यावर। आखाडमासी मरतील ढोर।
त्यांचे वाचवील काये शरीर। देवी पावन खरी की।।४४।।
तुह्मी ह्मनता ते झोंबल आंगा। हे मुळीच भरले आहे रागा।
केल्या कर्मास्तव फुटती आंगा। ह्मनुन का देवी ह्मनावी।।४५।।
आन्नोदरी उमळती जंत। दुखे सर्व काळीज फाटत।
त्याने होउ पाहे जीवघात। ह्मनुन का देवी ह्मनावी।।४६।।
आती दुःखे पडे घायेबरा[3]। भे भे जाये देव कर घरा।
पुर्व पुण्ये गुन ये शरीरा। ह्मनुन का देवी मानावी।।४७।।
तुह्मी तीला ह्मनता मांस खान। आधीच सीकनीवे हे रुषीन।
त्याचे ऐका दृष्टांत वचेन। ज्ञानहीन जोग हो।।४८।।
आपुले मनीच नाही खान। त्याला काय करील भगवान।
तथापी बळे घालीता वदन। मनी कंटाळा येतसे।।४९।।
की स्त्री मदने जाली व्याकुळ। तीच्या पुरुषा आंगच गेल बळ।
नग्न होउन जाता जवळ। मनी कटाळा दोघाचे।।५०।।
की राजा उदंड आहे थोर। तस्करा[4] लावीला सेन[5] आहार।
बळेच ठेवीता जीबीवर। मनी कटाळा[6] येतसे।।५१।।

१. नालीचे पाणी. २. देवता. ३. घाबरा, भीती. ४. चोर. ५. शेण. ६. किळस.

मुळी आपुले मनी नाही जान[1]। दुसरा ह्मने धावा वेगीन।
न उठता बळेन चालउन। मनी कंटाळा येतसे।।५२।।
की बंधु आहेत पाच जन। चौघा मनी नीघावे वेगळे।
आवघ्यासी येक चालवी बळ। मनी कटाळा चौघाचे।।५३।।
की आंतरीची आहे पतीव्रता। कोण्ही राजा कार्यार्थी करी सत्ता।
तो आपुल आंग करी तृप्तता। सती स्त्रि मनी कंटाळा।।५४।।
जरी नीर्मळ होती ते भवानी। कुरुषी ते माघे गेले मरानी।
आता का आली ते तुमचे स्वप्नी। हे आर्थ सांगा जोगे हो।।५५।।
माघे रुषीन केली चावटी[2]। ते आता का पडले आहाटी[3]।
हे बोलु नव्हत तुह्मी होष्ट। स्वप्नी येता तयेसी।।५६।।
सर्व्यावर बळ चाले जान। परी खाण भोग मना आध्यान।
हे का तीन न दील्हे टाकुन। रुषी सरता त्या वेळी।।५७।।
जरी ते मनाची होती नीर्मळ। आता का जाली हिंसा कस्मळ।
का माघे खाया मांसे लोका। हे आर्थ सांगा जोगे हो।।५८।।
ज्या शास्त्री हींसा बोलली राहाटी[4]। ते शास्त्र मुळीच जाना खोट।
या आर्थी तुह्मी रुषी सगट। खोटे आहात चांडाळ।।५९।।
ऐसे तुह्मी आसता आसत्ये। वचेन रोखा करीता सत्ये।
याची ऐका दृष्टांत मत। पापीष्ठ हो दुष्टबुधी।।६०।।
पुर्वी तुह्मीच बोलले पाखांड। ह्मनोनी हींसा आली माझे तोंड।
तेव्हा मी होतो आज्ञान बंड। ते काये खरे जानावे।।६१।।
जरी आज्ञान दशेकडुन। आतीशये पाप घडले जान।
मग आलीया शाहानपन। खोट दुर त्यागीजो।।६२।।
की जैसी पुत्र आनी जननी। दोघेई पेले दारू पानी।
मग बोलले भोगार्थ वचेनी। ते कौरवई[5] ह्मनावे।।६३।।

१उल्हास, उत्साह. २. खोडी, चावटपणा. ३. हट्ट, आग्रह. ४. रीत, पद्धत, प्रथा.
५. कुवचन

की चालता तम शार्वरीसी[१]। दुर्गंध वस्तु लागली आंगासी।
ते प्रतक्षे देखता द्रष्टीसी। दुर त्यागी ती सज्ञान।।६४।।
की न कळता मातांग स्पर्शे। जालीयास ज्ञान आंगास।
पुन्हा जवळ घेती आचमनास। मन मळ त्यागीती।।६५।।
कोन्ही वैऱ्या करी शीरछेदन। तेथ खोटा बोलला वचेन।
त्यानच वाचवि त्याचा प्रान। तो काय पापी होइल।।६६।।
तुमचे मुख घेतला नाम। त्यात दीसुन आले पापकर्म।
मग म्यांही जोडीला दया धर्म। वचन रोखा कोठे रे।।६७।।
हे बोलले पापत्येक्त। त्रै दिन क्रमुन गेले सहज।
मग मग चींती  योजील येक काज। ते कैसे ऐका  हो।।६८।।
जेथ राजा ह्मने प्रधानासी। येथ करा रे होमकुंडासी।
त्यात टाका सर्व कुसन्यासासी। हे स्वर्ग मोक्षा जातील।।६९।।
हेच ह्मनती पशु जीव। मारल्या पावती स्वर्ग ठाव।
याहा आपन पशु लेखावे। टाका होमात सर्वहि।।७०।।
याहा पशु परीस यक गुण। अधीक आहे मुखी वचेन।
याहास स्वर्गीचे होता दर्शन। हे आसीर्वाद देतील।।७१।।
याहाचे आसीर्वाद कडोन। आह्मास पावल भगवान।
हेहि पावती उत्तमपन। होम करा लवकरी।।७२।।
उटले सर्व लघु सेवक। काष्ठभारे आनवीले अनेक।
जागा झाडीती नेट तवक[२]। राजमुखासी पाहाती।।७३।।
तेथ होती येक गार[३] थोर। त्यातील काढीला धुरळा केर।
तेथ सींपील गंध केशर। पुजा करीती कुंडाची।।७४।।
हे पाहाती सन्यासी नजेरी। भये सुटले सर्वांच आंतरी।
ह्मनती आयुशे तुटली दोरी। ह्मनोनी आलो ये ठाया।।७५।।

१. रात्रसमयी.   २. तेव्हा.   ३. खड्डा.

तेथ उठले सर्व भीकारी। राज्यासी वीनंती करीती करी।
ह्मनती तु तारक मुरारी[१]। पाव आह्मा ये समयी।।७६।।
आह्मी टाकीले मांस खान। आह्मी टाकीले हिंसा करण।
न वाचु पाखांड पुरान। हे ईमान घे राज्याश्री।।७७।।
तु तर सर्व जीवाचा कृपाळ। तु तर श्रेष्ठ भुपाचा भुपाळ।
आह्मा सर्वांचा का जालासी काळ। जीवदान दे राजेश्री।।७८।।
राज्या तुझी फार जाली कीर्त। आता काशा जोडी तु आपकीर्त।
चुकल युगीचा भगवंत। आह्मा तारी ये समई।।७९।।
भवानी नाही आली स्वप्नी। हे कैसे कळले तुझे मनी।
या लागी तु सर्वश्रेष्ठ गुनी। आमचे जीव तारावे।।८०।।
त्वा दया कउल[२] दील्हा धरेवर। आह्मासाठी का जाला कठोर।
वीघ्नातुण सोड गावाबाहीर। जीवदान आह्मासी।।८१।।
उगेच बैसलो होतो दारी। सहज येणे केले या नगरी।
वाट पाहात आसतील नारी। जाउ दे नीज ग्रामी।।८२।।
आज दीनकर जाले सप्त[३]। भीक्षा मागीत आला यथ।
उपवासी आसल सर्वि संतत। येउ दे दया मनासी।।८३।।
राज्या तु श्रावक धर्मि श्रेष्ठ। आह्मा वीशई का हो तु दुष्ट।
जीवदान दे आपुले होष्ट[४]। आमुची चींता नीवारी।।८४।।
तु सत्क्रीयेचा मुगुटमणी। काशा आवक्रीया घेतु करोनी।
आमचे सोडी जीवंत प्रानी। हे ऐकावे राजेश्री।।८५।।
तु सुक्षेम जीवाचा पाळक। आमचा का जालासी घातक।
तु नको पेटउ आग्नीमुख। हे तु सांगी सेवकासी।।८६।।
हे हींसा खोटी नाही पुरानी। मासार्थ आह्मी बोललो वदनी।
राज्या आह्मीच खोटे लक्षनी। तु होई शांत मनासी।।८७।।

१. श्रीकृष्ण, देव. २. कौल, शुभसंकेत. ३. सात दिवस. ४. ओठ (मुख).

आह्मी सर्व आहोत तरुन। कोण्हीच न झाले वृद्धपण।
मंदीरी पोर आहेत सान। करी करुना राजेश्री।।८८।।
माता पीता मेले लाहानपनी। वाचवीता तुच पीता जणी।
हे आमचा रड ऐक कानी। नको होउ नीर्दयी।।८९।।
राज्या मुळीच आह्मी भीकारी। पोटासाठी हींडतो द्यारोद्यारी ।
आह्मी लोकासी दीसो तो वैऱ्यापरी। मेल्याहुन मेलो हो पै।।९०।।
आह्मी मुखे न बोलु हींसा घात। आज टाकुन दील्हा मीथ्यापंथ।
वदनी बोलु देव देव आरीहंत। श्रावकधर्म करू हो।।९१।।
राज्या मनी न होता खोटा भाव। हे आंगी कापता देखले सर्व।
राज्या नेत्री आली आसु धारा। मनी आठवी मुनीसी।।९२।।
ह्मने याहाबदल त्या मुनीसी। मार दील्हा चवगुन[१] रासी।
परी त्यानी लावील धर्मासी। सद्गुरु तो नीश्चये।।९३।।
ह्मने म्या उगच केल सोंग। हे सर्वेकापु लागले आंग।
याहाचे मनी आहे खोटा रंग। दीसुन आता आला हो।।९४।।
तो राजा ह्मणे सेवक नरा। त्याहास काढा दुर्गा बाहीरा।
कोन्ही राज्या नका देउ स्थारा। हे होते तेथ जातील।।९५।।
येकासी ह्मनता ते हाज्जारा। उटले तया कचेरी दार।
कुसन्यासी पीटले बाहीर। पशुपरी पळताती।।९६।।
मुर्ध्नी[२] सींगवीण जटा चवर। भगवी लेले पसु आळंकार।
नसता पोळा[३] पळाले थार। जोगी गेल हींसापुरी।।९७।।
येथ तीसरा आध्या जाला पुरा। ऐकुन ठवीती मन मंदीरा।
त्यासी कुदेवता न लागे वारा। याची साक्ष घ्या त्वरीत।।९८।।
कोन्ही दुःखी पडले आंगाने। यासी आध्या करा हा श्रवण।
ऐका भावार्थेयेईल गुन। हे सत्य जाना श्रोते हो।।९९।।

१. चौपट. २. मस्तकावर. ३.बैलांच्या पूजेचा सण.

या ग्रंथी पहीले आध्यापासुन। युग्म ती जाली पावतो ह्मनन।
आकरा बीजाक्षर आहेत जान। ते हे पावती सर्वार्थी।।२००।।
आनीक मोहर सेवट वर। आकरा आहेत बीजाक्षेर।
ते शद्गुरुन लीहीली सुंदर। कवींद्रसेवक ह्मने।।१।।
ते बीज आक्षरे जान साधुसंत। की जाने माहा व्याकर्णी पंडीत।
संस्कृत श्रोते। या ईतरा न कळे पै।।२।।
की जाने आष्टांग ज्योती रुस्मी(षी)। की जाने आवधीज्ञानी रुषी।
की जानेती वरदीक पुरुषी। या ईतरा न कले पै।।३।।
सुमतीप्रकाश ज्ञानभास्कर। या उद्यात करा धर्मव्यापार।
याने पुण्ये नफा मीळे थोर। दुःख दरीद्र जातसे।।४।।
या नरदेही पावता जेन्म। करीता चुकले दयावर्म।
तेच प्रानी जाले आधम। दुःख भोगीती आपार।।५।।
न करावा तो आधर्म गुण। न घ्यावे ते कुदेव दर्शेन।
न ऐकावे पाखांड पुरान। सम्यक्त जाना श्रोते हो।।६।।
पाहा पाहा राजा पापत्यक्त। आसत्ये असता जाला सत्योक्त।
त्यान उपांग जानले सम्येक्त। धर्म पावला वीशेष।।।७।।
पुढील आध्याई तर्कपन। याचा प्रधान करील प्रश्न।
तो आर्थ ऐका श्रोते हो कान। मीथ्या संशे जातसे।।८।।
त्या जीवरक्षेक पर्वतावर्त। नीत्य राजा ऐकतो संस्कृत।
त्यात होउन गेला याचा आर्थ। पुन्हा औ(ऐ)कती सेवक।।९।।
ते फार कठीन आहे बोली। ह्मनोनी हे प्राकृत वाढ केली।
मार्गी सोप शब्द वृक्षे सावली। बहुत आहे श्रोते हो।।१०।।
या मार्गेन लागे संगती। येकलाच पुरान वाते युक्ती।
जरी मीळाले बहुत भक्ती। तया सुख होये प्राप्त।।११।।

कवींद्रसेवक होता मुका। तो शद्गुरुन केला बोलका।
तोच आर्थ दावी पध्धत श्लोका। नीमीत्य कळसासी।।१२।।
ईती श्रीसुमतीपुरान। श्रोतीयाचे आर्त[1] होती पुर्ण।
पाप्याचे होय पुन्यवान। सद्भाव मनी येतसे।।१३।।
सुमती स्त्री आंगाण पद्मीन[2]। श्रोता पाहीजे सुश्रुत मदन।
तोच जाने शब्दभोगार्थी खुण। पुन्हा आलंगी[3] चीत्तासी।।१४।।
जपंच मिथ्याती शेंड[4] नर। त्यासी कान भोगन उट सार।
सुमती नीजवीली आंगावर। न आवडे त्या मनासी।।१५।।
सुमती फळ सुरस मजा। कुभाव रोग्याला न पडे काजा।
बळच चारीता मुखरस जाता। तो कडु माने आंतरी।।१६।।
कडवट जाली त्याची चव। कडु नाही मगोज[5] शुभाव।
ते चावीता ता गेली पोटत धाव। त्याचा हारे तापत्रये।।१७।।
सुमती सार्थक सोन्याचे मुळ। श्रद्धा किमीया[6]आसावी जवळ।
पुद्गल माती होये उंच बळ। पुरुष आनीच रासी।।१८।।
सुमती सत्क्रीयेची जननी। वळचारी धर्मामृत वानी।
जीवा पोसी सुज्ञाण सदनी। खेळ दावी सुरीध्धीचे।।१९।।
तीसरा आध्या रत्नत्रये मुळ। जे मान्ये ईंद्रादीकासी सकळ।
कुदेवता भक्ताचे तोंड काळे। होये जाना आंतरी।।२२०।।
ईती सुमतीप्रकासे कथा या पंचमकाळी परमतखंडण पापत्यक्त
राजेवचने जयो न्नाम त्रीतीयोध्याये सुपुर्ण समाप्त।
वोवी संख्या २२०।।
मीती आशाड वंदे तेरस १३।।
साहेकाळी रवीवार ते दीव०

* * *

१. अर्थ, इच्छा. २. कमलासारखे शरीर असलेली सुंदर स्त्री. ३. आलिंगन देणे.
४. षंढ. ५. फळाचा गर. ६. रसायन, रामबाण औषध.

# सुमतिप्रकाश

## चतुर्थ अध्याय

श्री वीतरागाये नमां। श्री सरपतीये(सरस्वत्यै) नमः।
श्री आक्षये पंचनामाये (न)म।।

जो शेदु(रु)चा ह्मनवी गुरु। ज्याचे नाम भवसागर तारू।
तोच परमानंदाचा पुरु[1]। करु नमन तयासी।।१।।
तोच कवी त्यासी गुन देता। तोच आबळा पुरुषाचा दाता।
तोच जाला मोक्षस्त्रीचा भर्ता। करी आरती तया पदि।।२।।
जो बैसला असे मोक्षासणी। ज्याला त्रीलोक्ये दीसतें ध्याणी।
तोच रुचला कवी त्या मनी। करू वीणंती तयाची।।३।।
कथा ऐका सुमतीप्रकासे। श्रवण आर्थी सुमती प्रकाशे।
जीचा धाक लागला कुमतीस। अज्ञानतम नीरर्शे[2] पै।।४।।
राज्या मनी होता सम्यक्तबोध। त्यावर कुसन्यासी जाला वाद।
आदीक लागला शास्त्रार्थ छेद। चला ह्मने गीरीवर।।५।।
ऐसी निघता राजेवाणी। सर्वी रहित आली मिळोनी।।
भेरी नगाऱ्याची उठल ध्वणी। पताका उभारील्या पै।।६।।
तयार केले आस्व हाती। हात्या(र) घेती पैदे हाती।
चुंगावर चुंगा[3] धावत येती। उभे राहिले पुढारी[4]।।७।।
ज्यास खीळले मोत्ते (मोत्ये) पदरी। ते वस्त्र घातलि हस्तीवरी।
केलि उंच क्री(कि)नखापी[5] आवरी[6]। शृंगार नाना करीती।।८।।
जीन पीवळी जडली सरस। मखमली पडदे हावद्यास।
आश्वापदी घालि पंयेजनास[7]। सेवक सेवा सारीती।।९।।

१. पूर. २. निरसणे, दूर होणे. ३. समूह, समुदाय. ४.समोर. ५. जरतारी.
६. अंबारी. ७. पैंजण.

गजे गळा बांधल्या कांसे घंटा। आकोसा[1] लावील्या सुवर्ण मुढा[2]।
सेवक घेतले रुपेरी सोटा। मुखी कार्येबोलती।।१०।।
जेथ पंच रंगाची वस्त्रं बरवी। ते राज्या सहीत लेले नगरी।
कोन्ही आंतरी नाहि वैर परी। सज्जण रूप बोलती।।११।।
जरतारी वस्त्र बहुतांगी सगी। तैशच सुवर्ण शृंगार आंगी।
त्यात कींतू सेवक आभागी। परी वस्त्रहीन नाही।।१२।।
सुवर्ण वस्ता[3] नानापरी। जडीत दीशे कोंदन आंतरी।
त्या वस्ता लेल्यात नगरनारी। पुण्य परी दीसताती।।१३।।
माहामाहावस्त्र पाटणपुरी। तेथल वस्त्र घेती मोल घरी।
ते पाहाता णेत्र जाती चाचरी[4]। ते आळंकार लेलेती।।१४।।
ते पुण्ये उत्पत्ती लेले लेण। त्या सर्व्यांची दयेवंत मन।
त्याहा प्रसन्न देव श्री जीन। कोण वर्णी तयासी।।१५।।
खोटे पंचम काळा माझारी। त्यानी धर्म केला आंगीकार।
त्याणी कुदेव त्यागीला दुर। कोण वर्णी तयासी।।१६।।
ते नीत्ये पढती आरीहत भक्ती। ते न्याये नीती चालवीती युक्ती।
त्याही त्यागीली आभीमान शक्ती। कोण वर्णी तयासी।।१७।।
ते कर्माची करीती खंडना। चींती धरीला सम्येत राना।
ऐकती संस्कृत पुराना। कोण वर्णि तयासी।।१८।।
ते ह्मणवीती आरहत भक्ती। ते मानीती ग्रंथ तसंत।
ते ह्मणवीती सत्पुत्र पुत। कोण वर्णि तयासी।।१९।।
ते परजीवा न दुखवीती। आलीया भीक्षुका दान देती।
वडीलांची आज्ञा न मोडीती। मनी शाहणे यापरी।।२०।।
ऐसे याच वर्णन करीता। लाज वाटे कवीत्या(च्या) चीता।
मी युगुळ जोडोनी हस्ता। तया लोका वंदीतसे।।२१।।

१.आकाशी २.मूठ ३. अलंकार. ४. चकित होणे.

त्रैलोक देखीले ज्ञानचक्षुन। पाहाता नीवाले माझे मन।
मम नेत्री आले शृजीवन[1]। मी पुन्येहीन यास्तव।।२२।।
मी पुर्वीचा आहे पुण्येहिन। श्रीगुरुचे पाहाता चेरण।
चर्मनेत्री आले शाहानपन। वोवी चेरण लीहीतसे।।२३।।
हे नेत्र देवा आसो आक्षये। यानच द्रष्टी पडो तुझे पाये।
ज्यान माझी मनसा तृप्त होये। हे करी जीनराया।।२४।।
श्रोते हो ऐका त्या ज्ञानपुरी। लोक मीळाले होते राज्ये द्या(दा)री।
तेथ जालीया सर्वी तयारी। राजा उठे सभेतुण।।२५।।
राज्यासवे माहावीर। तेही उठुण आले बाहीर।
आपुल्या बैसले वाहनावर। योग्यायोग्य पाहोनी।।२६।।
राज्यासन होता हावद्यात। हास्ती दटावीला माहोत।
त्या माघ दळ चाले धावत। गेले नगराबाहीरी।।२७।।
कोन्हा हाती वीना टाळ। कोन्ही गाती आरती जयेमाळ।
मुखे ह्मनती वीतराग सकळ। मन वीछा पुरवीती।।२८।।
सोकासनी राजांगना। ईतर स्त्रिया आश्ववाहन।
गायेन आर्थ पाहाती नयनी। ह्रदइ होती संतोश।।२९।।
ज्यात कीर्त तीर्थंकराची। ज्यात कीर्त चेक्रवर्तीची।
ज्यात कीर्त कामदेवाची। ते गायेन गाताती।।३०।।
ज्यात कीर्ती कुळंकराची। ज्यात कीर्त ~~नारा ये~~ नारायेनाची।
ज्यात कीर्त याचे वैऱ्याची । ते ते गायेन गाताती।।३१।।
ज्यात कीर्त बळीभद्राची। ज्यात कीर्त आहे नारदाची।
ज्यात कीर्त आकरा रुद्राची। ते ते गायेन गाताती।।३२।।
ज्यात कीर्त तीर्थंकर पीत्याची। ज्यात कीर्त या देवजननीची।
हे गणी पदवी पुरुषाची। समजुन घ्या श्रोते हो।।३३।।

१. अश्रुजल.

या पुरुशा येवढ थोर कोन्ही। नाही या मध्यलोक आलें वणी।
हे खोटे काळी न दीसती नयेणी। सत्ये जाना श्रोते हो।।३४।।
ऐसीया पुरुशाचे सद्गुण। गात चालले ते सर्वेजन।
परी मनी नाही आहांकार जाण। ज्ञाननयेन पाहाती।।३५।।
सर्व वैभवाचे ताफे थोर। नाचती थै थै आस्फरा का(फा)र।
ते शब्द नीघती मनोहार। वैराग्य दुणे होतसे।।३६।।
कोन्ही गाती धुमाळी कडकडा। कोण्ही टोकीती मुदंगाच्या झोडा।
कोन्ही गाती पापत्येक्त पवाडा। मार्ग क्रमीती हारर्शान।।३७।।
मार्गी दल चाले धीर स्छिर। राजा चहुकडे ठेवी नजर।
ऐसी क्रमीली ते वाट थोर। पर्वत नयेनी देखीला।।३८।।
सर्वेहि केला जयेजयकार। श्री आरीहंत नामाचा गजेर।
जे ऐकता पापपक्षी थोर। उठोन जाती ये भये।।३९।।
तेथ मांशेत्यागी जे होते पक्षे। ते वृक्षी बैसोनी ऐकती दक्ष।
राजसैन्या पाहाती चींती पक्षे। आनंद मनी सर्वांच्या।।४०।।
मृग सशाचे कळप थोर। लांडग कोल्ही आनेक मोर।
या राज्याच पाहुनी लस्कर। आनंद मनी करीती।।४१।।
तेथ वनगउ आणी रोही[१]। चतुष्पद लये चरती पाही।
त्याचा वैर न करी कोण्हीही। आनंद मनी करीती।।४२।।
जे जीव होते मांस आहारी। ते पळुन गेले वनांतरी।
औ(ऐ)सा तो जीवरक्षक गीरी। पदोपदी चढताती।।४३।।
तेथ पाहे--याची पटांगण। तेथ चुनेगच्ची ओवऱ्या जाण।
तैसीच वृक्षे छाया गहन। सुख वाटे जाण।।४४।।
तेथ नीबर[३] नाही वाट। चोपडी[४] आयेन्यावाणी[५] सपाट।
लघु बाळक चालति नेट। सुख वाटे जाणाऱ्या।।४५।।

१. हरिण. ? २. बिना दाराच्या लहान खोल्या. ३. ओबडधोबड, खडतर.
४. स्निग्ध, मऊ. ५. आरशासारखी.

तेथ फुलबाग पीकलि सरी। सुगंध सुटला फार भारी।
त्यात उडविती बुक्का[१] आंबरी[२]। सुख वाटे जाणाऱ्या।।४६।।
ऐसीया पर्वत ठीकाणी। धर्मस्छापीत बैसले मुनी।
तेथ राज्यासहीत लोकानी। प्रणम्य केले तयासी।।४७।।
तेथ मुणी बैसले उंचासणी। लोक बैसले योग्यायोग्य स्थाणी।
राजा प्रधान बोले वचेनी। ह्मणे शास्त्रार्थ सांगावे।।४८।।
नीत्य नेम पुराण जाले पुरे। प्रधान बोले आधीकोतर।
ह्मणे जी ऐका तुह्मी मुनीश्वर। मी प्रुछ्या येक करीत।।४९।।
या राजेश्रीच्या उपदेशान। हींसा टाकीली समस्त लोकान।
परी त्या कुसन्यासाची मण। का नाही जाली नीर्मळ।।५०।।
जे आती होते कुश्चळपण[३]। ते दयामय जाले जीवन।
परी त्या कुसन्यासाची मन। का नाही जाली नीर्मळ।।५१।।
आमंगळ जात कसाबाण। खोटा व्यापार दिल्हा टाकुन।
परी त्या कुसन्यासाची मन। का नाहि जाली (नीर्मळ)।।५२।।
ऐसेच धनगर कलालाण[४]। दुष्ट कर्म सोडीले करन।
परी त्या कुसन्यासाची मन। का नाहि जाली नीर्मळ।।५३।।
आवगुणाचे जाले गुणवान। शुद्राहि धरीला धर्मध्यान।
परी त्या कुसन्यासाची मन। का नाहि जाली नीर्मळ ।।५४।।
पारध्याने सोडीले कुकर्म। ध्यान्ये पोट पोसी चालवी धर्म।
ऐसेच आनेक आवींद[५] नाम। नीर्मळ जाले सर्वही।।५५।।
याचा स्वामी तुम्ही सांगा आर्थ। माझे पुरवावे मनोरथ।
मम जीवी आला संशये पंथ। ते नीवारी सद्गुरु।।५६।।
प्रधानाचे जालीया उत्तर। उक्तं धर्मस्थापीत मुनीस्वेर।
ज्याची वचेन सत्यार्थ थोर। ते ऐका तुम्ही श्रोते हो।।५७।।

---

१. सुगंधी धूळ. २. आकाशात. ३. कल्मष, दुर्भावना.
४. दारूविक्या, दारूची भट्टी लावणारा. ५. हीन जातीचा.

मुणी म्हणती प्राधा(ना) गुणी। दाखवीतो शास्त्रार्थ नयेणी।
परी मी नाही आवधीज्ञानी। संशये कोण काढी पै।।५८।।
मुनी ह्मने प्रधान पुरुष। तव प्रश्न दावीतो शास्त्र आरशा।
हे शास्त्र ह्मणीजे केवळ भाषा। काढी संशय मनाचा।।५९।।
हे जीनशास्त्र ह्मनीजे सुर्ये। आज्ञान तम नीरशेन होये।
मग (दृ)ष्टी पडे सम्याक्त ठाये। संशेये जाये मनाचा।।६०।।
तु ह्मनतु सन्यासाची मन। का नाही नीर्मळ जाली जाण।
याची ऐक शास्त्रार्थ खुण। मी वदतो तुज लागी।।६१।।
हा आनंत परदेशी जीव। याच रवरव[१] नाही कोण्ही वैभव।
याचे माघे लागली पाप माव[२]। सुदेवासी न जानता।।६२।।
जीव आधीच जाला मोहो पीसा[३]। त्यावर कर्म घाली आवदशा।
हा वीषयेचर जाला मासा। सुदेवासी न जानता।।६३।।
जीव आधीच आजीवा पोटी। त्याला माया धरी मनगटी।
नेउण दाखवि दुखराहाटी[४]। सुदेवासी न जाणता।।६४।।
या जीवाचे सखे चवघेजण। त्यासी हा मुळीच चुकला जान।
ह्मणोनी कुगती करी भ्रमण। पाप जोडीतु।।६५।।
ते चवघे कोण कैसे उत्तम। त्याची वेगळाली ऐक नाम।
प्रथम देव श्री जीनोत्तम। हेच तारी जीवासी।।६६।।
दुजे सत्पात्री घडता दान। या जीवे होय पुण्येवान।
सेवटी करवी मोक्षे गमन। हेच तारी जीवासी।।६७।।
तीसरे दयामुळ धर्म जानी। तोची आचरावा धरोनी मनि।
तोच दाखवी मोक्षे कामीणी। हेच तारी जीवासी।।६८।।
चवथ जीनभाकीत[५] तप। हे करावे आपुले प्रताप।
मग दीसे केवळ स्वरूप। हेच तारी जीवासी।।६९।।

१. अतोनात. २. माया, खोटेपणा, कपट. ३. भूतबाधा ४. परंपरा. ५. भाषित, कथन केलेले.

हे कर्तुत्व होये सुख संगती। हे जीवा न जाउ दे आवगती।
हेच दाखवी पदार्थ सुगति। हे धने जोडी प्राधाण।।७०।।
हा जीव पडता दुःखसागरी। हे कर्तुत्व चवघ उतारी।
याते भेती आष्ट कर्म वैरी। हे थोर जोडी करावी।।७१।।
या चवघापरता जीवासी धणी। नाही कोण्ही त्रैलोक्ये भुवणी।
यातुन येकही न धरी मनी। तेच पापी ह्मनावे।।७२।।
प्रथम कर्तुत्वा ऐक भाव। आधी सत्ये वोळखावा देव।
जो पावला तीर्थंकर। देव याते ह्मणीजे।।७३।।
जो पंचकल्याणीक पुज्येमान। जेन्मताच ज्याला आवधीज्ञान।
ज्याला त्रैलोक्ये दीशे नयेन। देव याते म्हणीजे।।७४।।
ज्याचे तीन कल्याणीक समई। धावोनी येती स्वर्गेंद्र पाही।
पंचाश्चर्येकरीती पीत्यागृही। देव याते ह्मणीजे।।७५।।
शेष कल्याणीक होता दोन। सर्व स्वर्गवासी येती मीळुन।
भावभक्ती करीती पुजन। देव याते ह्मणीजे।।७६।।
कोण्ही करीती रत्नवृष्टीस। कोण्ही पाडीती केशर पाउस।
कोण्हि रीचवीती पुष्परास। पंचकल्याण समई।।७७।।
कोण्ही दुंदुभी करीती गर्जेना। जये जये शब्द बोलती नाना।
हे पंचाश्चर्याची गणीत जाणा। पंचकल्या(ण) समई।।७८।।
ज्याचे पीता मातेच्या चरणी। शेत ईंद्र करी नमणा।
जो ह्मणवीला त्रैलोक्य राणा। देव याते ह्मणीजे।।७९।।
जे संसारी जाले पुज्यमाण। त्याग केल्या पावले महीमाण।
जे प्रगट सांगे केवळज्ञान। देव याते ह्मणीजे।।८०।।
जे वीराजेमाण समोशरण। बैसले च्यार आगो-- सोडोन।
ज्याही सांगीतली आदेशा खुण। देव तयाते ह्मणीजे।।८१।।

ज्याण सांगितली आकळ[1] वस्तु। ज्याण त्रैलोक्या कथीले समस्तु।
ज्याकडे ईंद्र पाहति तटस्तु। पृछ्या आणेक करीती।।८२।।
ज्याने सांगीतले लोका(का)श। ज्यान कथीले आलोकाकाश।
ज्याने तृप्त केले त्रैलोकास। आस पुरवी जीवाची।।८३।।
गणीत सांगीतली चेंद्र सुर्याची। सुक्षम जीवाच्या कथील्या काया।
देव आसोणी णाही छाया। त्या पाया पुजी प्रधाणा।।८४।।
जो बारा सभेचा मुगुटमणी। ज्यान त्रीकाळ कथलि कथणी।
ज्याचे ध्याण करीती तरणी[2]। त्या पाये पुजी प्रधाणा।।८५।।
ज्याचे वैभव गणीत करीता वेडे जाले ईंद्रादीक चीता।
आंत नाही कळला साधु संता। त्या पाया पुजी प्रधाना।।८६।।
थोर हे चोवीस कामदेव। तेहि पुजीती तीर्थंकर देव।
तैसेच बारा चेक्रवर्ती सर्व। आरीहंतासी नमीती।।८७।।
तैसेच चवदा कुळकर। ह्मणती देव तीर्थंकर थोर।
त्याची स्तुती करीती जीव्हाक्षेर। आरीहंतासी नमीती।।८८।।
नव नारायेण प्रतीवीष्टण्योंद्र[3] । नव नारद नव बळीभद्र।
हे सर्वेस्तवीती देव तीर्थेंद्र। आरीहंतासी नमीती।।८९।।
आकरा शेंकर आणी वीद्याधर। देव जणणी पीतादी थोर।
हे सर्व मध्यलोकीचे भुधर[4]। आरीहंतासी नमीती।।९०।।
त्रैलोक्याचे शत ईंद्र सार। आसंख्ये केवळी मुनीश्वर।
हेहि ध्याणी ठेवीती तीर्थंकर। आरीहंतासी नमीती।।७१।।
ऐसी या देवाची प्रतीमा। धोंड्याची आथवा चीत्रोत्तमा।
हे तु मानीजे हृदयधामा। नमन यासी करावे।।९२।।
हा चीती न ह्मनावा दगड। येथच भाव धरावा दृढ।
यानच सांपडे स्वरूप पाड[5]। मानव वृक्षाखाले पै।।९३।।

१. अगम्य, न कळणारी. २. तरून जाण्यासाठी. ३. प्रतिनारायण (?) ४. राजा.
५. समान, सत्य.

जो तीर्थंकर आकार घडला। शेक्र[१] धोंडा न ह्मनती याला।
तेथ मानव तर्क न राहिला। हे पाहा ग्रंथांतरी।।९४।।
पाहा पाहा त्या चेतुर्थ काळी। समोशरणी आसता जीनेंद्र हेळी[२]।
शेक्र हिंडती जीन चैताळी। देवाकार पुजीती।।९५।।
त्याचे चीत्रा करीति नमस्कार। या जीन वचेना मानीती थोर।
मुखी घेती आरीहंत आक्षेर। सम्यक्त वर्म या नाव।।९६।।
पाहा त्या खरदुषन राज्याण। देवाकार केला उत्तमपण।
मग घेतले आहार जीवण। सम्यक्त व(ध)र्म या नाव।।९७।।
त्या आयोध्यापती रामचंद्रान। प्रतीमा केली आपुले हातान।
चीती ह्मने मुणीसुर(व्र)त जीन। सम्यक्त वर्म या नाव।।९८।।
पाहायाची स्त्रि सीतामातेन। प्रतीमा केली चेंद्रप्रभु जीन।
चेंदनसेष्टी  केले पुजेन। वनवासी आसता वेळ।।९९।।
ऐसा जो ह्मनवी तीर्थंकर। त्या पदी करावा नमस्कार।
यापरता आणीक देव थोर। णाहि जाणा त्रैलोकी।।१००।।
या देवाचे करावे पुजेन। ऐस्या देवाच धरावे ध्याण।
या देवाचे करीजे स्तवन। हेच संगती जीवाचे।।१।।
या देवाचे जाईजे तीर्थ। याचे चेरणी टेखिजे माथा।
या देवाच्या ऐकीजे कथा। हेच संगति जीवाचे।।२।।
या देवकार्यार्थी खर्ची धन। या देवाची पाळावी आण।
या देवा वाडवी महिमाण। हेच संगती जीवाचे।।३।।
या देवाचे दीसता चैताले। वीन्मुख न करावे डोळे।
कार्येसोडोनी दर्शेन घे बळे। हेच संगती जीवाचे।।४।।
या देवाची भावना भावी। याची प्रतीमा करावी।
हेच संगती जीवाचे।।५।।

१. इंद्र. २. सूर्य.

या देवद्या(दा)री घाली लोटांगण। याचे हृदई धरावे चरण।
या देवा न होई बेईमान। हेच संगती जीवाचे।।६।।
या देवाचा जेपावा जेप। हा देव जीवाचा मायेबाप।
यानेच पळे मोहनी झोप। हेच संगती जीवाचे।।७।।
या देव दर्शनी व्हावे जागृत। याची स्तोत्रे पढावी संस्कृत।
यानेच जीव होये पुन्येवंत। हे संगती जीवाचे।।८।।
जरी संकष्ट पडले थोर। तरी याचा न व्हावा विसर।
याची ह्मनावी बीजाक्षेर। हेच संगती जीवाचे।।९।।
या देवाची चैताले करावी। याची पुस्तक लेहुन द्यावि।
याची व्रत उद्यापन भावि। हेच संगती जीवाची।।१०।।
या देवाचे परमभक्त। ते आपण मानावे साधुसंत।
या नाव श्रावक घाली भुक्त। हेच संगती जीवाचे।।११।।
जे नर सम्यक्त जानती आंग। याची भक्ती करावी प्रीत संग।
दुर्बळाचा न करी माणभंग। हेच संगती जीवाचे।।१२।।
आसी आनेका प्रकार करी भक्त। जोडोनी द्यावी उपाव शक्त।
तेच जीवा दाखवी सुख तक्त[1]। हेच संगती जीवाचे।।१३।।
मुणीश्वर ह्मणती प्रधानासी। हे णाही घडल त्या कुजोग्यासी।
ह्मणे त्याची वासणा पिसी[2]। कुदेवासी भजति पै।।१४।।
ते चुकले सुदेव दर्शे(न)। ते चुकले सम्येक्त लक्षण।
ह्मणोनी त्याची जाली जाण। आधम मन येह लोकी।।१५।।
त्याणी तारक देवानी दीले। ते मारक देवा भक्त जाले।
खोटे शास्त्रार्थ पुर वाहवले। ह्मणोनी मांस आहारी।।१६।।
याज करीता ऐक प्रधाणा। मी सांगतो कुदेवाच्या खुणा।
ते परीक्षा पाहे ज्ञान नयेणा। आत्महित वोळखावे।।१७।।

१. सिंहासन. २. पिशाची.

न पुजावा तो भगांकार[१]। न पुजावा तो लींगाकार।
ज्याचे हाती दीशे शस्त्र थोर। देव त्या न ह्मणावे।।१८।।
येकासी तारी येकासी मारी। मुख ह्मणे मीच सीवपुरी।
मुख ह्मणे मिच लोका तारी। देव त्यासी न ह्मणावे। १९।।
कोण्ही ह्मणे मी उत्पन्न करीता। कोण्ही ह्मणे मीच संहारी आता।
कोण्ही ह्मणे मी रक्षेणीक दाता। देव त्यासी न ह्मणावे।।२०।।
हे देवाचे णाव पावले स्वर। परी ते पडले संसार थोर।
ते उतरूनी गेले पारे। (या संसा)र समुद्रे।। २१।।
कुदेव बोलले आथवा नाही। हे जानती केवळज्ञानी सही।
परी ते कुशास्त्रार्थ देती गाही[२]। या पंचम काळी जाण।।२२।।
देव नाम तारक हे खर। हेच बोली महापुराणोत्तर।
परी देव न सोडी मोक्षधरे। हेच सत्ये माणी प्रधाना।।२३।।
देव नाही शंख गदाधारी। देव न ह्मणावा तो मुरारी।
देव नाही स्त्रीआंग भोगधारी। हे सत्य माणी प्रधाना।।२४।।
त्या देव संसार केला खरा। परी संसारी ण राहिला पुरा।
तो सेवटा गेला मोक्षमंदीरा। सत्ये माणी प्रधाणा।।२५।।
न पुजाव्या मगा(जा)री[३]। न पुजी आयो ह्मसोबा परी।
हे कुदेव तजी जीवाचे वैरी। नवस घेती लागुणी।।२६।।
ऐसेच खंडोबा कुभवाणी। आपण न पाहावे या नयेणी।
न मांडाव्या मेल्या मानवीणी[४]। हे कुदैवत जाणीजे।।२७।।
न पुजावे वड पींपळ। न पुजावे मृतीका वारूळ।
न बांधावे कुदेउळ। हे सामोग्री पापाची।।२८।।
न मानावी माहार मेशाई[५]। न पुजावे पशु जीव गाई।
न पुजे वृंद वृक्षे तुळसीची। हे सामोग्री पापाची।।२९।।

१. योनिरूप. २. ग्वाही, भरवसा. ३. कबर. ४. पिशाचिनी. ४. महिषाई, मासाई

ऐसेची नृसिंह हनुमंत। होय नव्हे सुदेवाची मुर्त।
हे पंचमकाळी वीप्री(त) रीत। कुबुध्धी याते माने पै।।३०।।
न पुजावे माळा दगड मणी। देव न ह्मणावा आग्न पाणी।
हे न पुजावे श्वान काग कुगुणी। हे सामोग्री पापाची।।३१।।
आसंख्ये कुदेव आकार मुर्ती। ------ देव भगवंत।
हे रचणा केलि पाखांड मत। मुणी ह्मणे प्रधानासी।।३२।।
जेग ह्मणे हे देव लागती। कोण्ही ह्मणे हे बोन[१] मागती।
कोण्ही ह्मणे हे प्रचीत देती। याचे उत्तर ऐका पै।।३३।।
कोणी ह्मणती आंगा येतो। कोण्ही ह्मणे दर्शन देतो।
ह्मणती हा द्रव्यार्थ पावतो। याचे उत्तर ऐका पै।।३४।।
कुदेव मानुन घेतल्यावर। ह्मणति धनधान्ये आल घरी।
हाच बाळक वाचवीतो परी। याचे उत्तर ऐका पै।।३५।।
या जीवान देही स्थारा केला। याचे कर्तुत्व प्रधान जाला।
तो मान(व) ऐस नाव पावला। करी खळ कर्माचे।।३६।।
तोच खेळवी देहेभाण। तोच पंचेंद्रीया करी नयेन।
तोच करून दाखवी स्वप्न। मोहनी रूप त्या आंगी।।३७।।
या कर्तुत्वासारीखा दीवस। नीघतो सर्व जन लोकास।
पाप केल्या आंगी दुःख पीस। पुण्याकारी सुखी होती।।३८।।
दुःखी जीवा बुधी होये मळीन। त्यालाच दीसेती कुदेव स्वप्न।
तोच मिथ्या संशय घे बांधुन। कुदेवाकार पुजीती।।३९।।
मग तोच सांगे जगास मी। ह्मणे हाच आमचा कुळस्वामी।
परी याने जीव होये आधर्मि। हे दुर्बुध्धीसी कळेणा।।४०।।
मीथ्या दुःखे शरीर होये कष्टी। जीवा गळा प्रपंच घाली मीठी।
त्याचे मोहोनी कर्म खेळे दुष्टी। तो वेडा होये त्या वेळी।।४१।।

१. बळी, नैवेद्य.

याला देव लागला ह्मणती। तेच जाणावे पाखांड मती।
तेच मरोणी जाती दुर्गती। आणीक नेती दुजीया।।४२।।
आंगा कुदेव नाही लागत। कुदेव बिचारी गरीब भुत।
ते या पुरुशा देखोणी पळतात। भय माणीती आपार।।४३।।
परी या जेगास लागले पीष[1]। हेच दगडाची करीती झाड।
हेच झाडासी ह्म(न)ती दगड। माया भावे बाचळताती[2]।।४४।।
या शेरीरीच कर्म भुत होती। तेच या जीवा घेउन नाचती।
तेच यासी दुःखे कष्टी करीती। तेयाचि यास आकळा[3]।।४५।।
यास ह्मनती कुदेव लागले। यालाच ह्मणति आंगा आले।
कुबुध्धी मानीती कुदेवाले। परी देव नाही तेथी।।४६।।
स्वप्नी दीशे हिरवे पीवळे। लोका ह्मणे देव आले सकळे।
घर कुटंब माणीती बाळ। परी दे(व) नाही तेथे।।४७।।
पुर्व पुण्यास्तंव संतत जाण। पुर्व पुण्यास्तव सदनी धण।
कुदेव पावला ह्मनती जन। परी देव नाही तेथे।।४८।।
पावणार देव आहे नीराळा। तो दीसे केवळ ज्ञानी डोळा।
की प्रतक्षे दीसे चौथे काळी। त्या वेगळा देव नाही।।४९।।
ज्या देवा नाव सर्व तारक। ते मुळीच भुलले जग लोक।
त्याहासच लागला मांस शोक। ह्मणोनी सन्यासी भ्रष्ट।।५०।।
ऐसी हे परीक्षा जानुन। न घ्यावे ते कुदेव दर्शेन।
हे चुकले ते सर्व कर्ण। ह्मणोनी भ्रष्ट सन्यासी।।५१।।
त्याहा नाही सम्येक्त वीश्वास। त्याही मीथ्या केला आभीलास।
मांस खायाची धरली आस। ह्मणोनी भ्रष्ट सन्यासी।।५१।।
यासाठी आधी न व्हावे भ्रष्ट। तो कुदेव न पाहावा द्रीष्टी।
न पढावा तो कुशास्त्र पाठ। हिताहीत जानीजे।।५३।।

१. वेड, भूत.   २.वेडावून, गोंधळून जाणे.   ३. बांधणे. झपाटणे.

हीतकारी आरीहंत दर्शेन। हे दर्शेन जीवाचे पुण्ये नाण[१]।
हेच दाखवी सुख सदन। जीवासंगती या नाव।।५४।।
आष्टांग सम्येक्त हाच मार्ग। नीश्चये कर्तुत्व संगती संग।
हेच या जीवाचा फेडी पांग[२]। दाखवी संग सुखाचा।।५५।।
सम्येग्दर्शन हेच जीवा नयेन। हेच दाखवी श्री जीन चेरण।
हेच ह्मणीजे ज्ञानदर्पण। सुख महीमा दाखवी।।५६।।
दर्शेन वस्त्र जे पांघरले। ते पाप शीतकाळी न भेले।
तेच सुख गरमीत बैसले। श्रीजीनपद पाहाती।।५७।।
दर्शेन औषध घालता नयेणी। आज्ञान रोग जाये हारपोणी।
तो सुखी राहे वीवेक नयेनी। होये नीर्भये जन्माचा।।५८।।
दर्शेन जीवाचे उपाये पाये। नेउन दाखवीती सुख ठाये।
दर्शेन हेच कल्पवृक्ष होये। लावी सोये मोक्षाची।।५९।।
हे दर्शेन ज्याचे हृदयात। त्यासी न लागती कर्मभुत।
दर्शेन हेच पुण्ये संगत। दाखवी पंथ मोक्षाचा।।६०।।
दर्शेन ह्मनीजे माये। सुख पान्ह्यान पोसी काया।
वारंवार जीवाकडे पाहे। कर्मवेऱ्या ताडीत पै।।६१।।
दर्शेन ह्मनीजे सुखशय्या। यात जे जीवणी जले काया।
याचे स्वप्नी दीसे धर्मदया। आत्मस्वरूप वीराजे।।६२।।
दर्शेन जीवाची स्वर्ग पायेरी। दर्शेन चढवी मोक्षगीरी।
हे दर्शेन तारी परोपरी। लक्षे चौऱ्यासी जेन्मात।।६३।।
हे प्रथम कर्तुत्व नीरोपण। ते मुनीस्वर वदले वचेण।
ऐकती सर्वेनगरवासी जेन। संतोष होति हृदई।।६४।।
ते धर्मस्छापीत मुनीश्वर। प्रधानासी बोलले प्रश्नोत्तर।
त्याचा आर्थ म्हराष्ट लघुकार। कवींद्रशेवक वदे।।६५।।

१. ज्ञान. २. चिंता दूर करणे, मनोरथ पूर्ण करणे.

ते मुनीवाचा जेवी नभघन[१]। लोक चीती वधरा[२] घेती शोकुण[३]।
पुण्ह पाहाती मुणीवदन। उपदेश वर्षावास।।६६।।
पुढील आध्यायी सुपात्र कथण। स्वामी वदतील त्या पर्वती।
श्रोते हो तुह्मी बैसा त्याच पंथा। सारासार दीसे पै।।६७।।
त्या कथेमार्गी आसु द्या मण। तेथे हृदयाचे लावा काण।
होतील वचेण ते घ्या ऐकुण। करा सार्थक जीवाचे।।६८।।
सारा विळ[४] चला संसारपंथा। रात्र रीकामी ऐकावी कथा।
आनीक वैराग्य आसु द्या चीता। सार्थक जेन्म या नाव।।६९।।
सारे जेन्म पापल्या[५] नर देह। णीत्य पुजावे आरीहंत पाये।
या कर्तुत्व संसार सुखी राहे। हेची खेप[६] या जेन्मी।।७०।।
हे खेप जे करीताती जन। त्याला दुःखरूपी न होये पेण[७]।
यात सांपडे सुखरूपी केण[८]। हा जन्म नफा जाणीजे।।७१।।
हा नफा वसला ज्याचे घरी। त्याला कुदेवता न झोंबे वैरी।
त्याला सुख प्राप्त जेन्मांतरी। होये जाना येह ला( )की।।७२।।
यात नफा आहे आथवा नाहि। कर्तुत्व आचेरुनी पाहा गाहि[९]
आधीच नका पडु आपाई। उपाव रचा भक्तिचा।।७३।।
हे ज्याही भक्ती उपाव केले। तेच प्राणी स्वर्ग मोक्षा गेले।
बाकी जेन्मोजेन्मी सुख पावले। हे गाही पाहा पुराणी।।७४।।
पुराण पाहा आदी उत्तर। पुराण पाहा त्रैलोक्यसार।
पाहा कथाकोंस ग्रंथ थोर। मनी गाहि घ्या तयाची।।७५।।
ते ग्रंथ कथीले गणधर। त्यात आरीहंद्भक्ती केली थोर।
त्या शास्त्रासी माझा नमस्कार। पुन्हा पुन्हा घडो पै।।७६।।
मी मी हे जेंन्म मानव पन। ते ग्रंथ वाचीती आमरगंण।

१. आकाशातील मेघ. २. वृद्धी. ३.शोषून घेणे, स्वीकारणे. ४. वेळ. ५.पापाने माखणे.
६. येरझार, पाळी, फेरा. ७. पेण -गती, मुक्काम, टप्पा. ८. केण -विक्रीची वस्तू.
९. ग्वाही, साक्ष.

शेते ईंद्री करीती नमण। मीपण हे लबाडी।।७७।।
कवींद्रसेवक वाचा प्रकृत। श्रीगुरु बोलवी आपुले हात।
उघडुनी दाखवी कथा मते। तो ठेवी हात मस्तकी।।७८।।
याचा हातचे ज्ञान भोजेन। यानेच वाचल माझा प्राण।
माझे आयुष्ये हेच मी मी पण। हेहि जाईल श्रोते हो।।७९।।
मुखी आक्षेरी येते मी मी पण। परी मनी नाही आभीमाण।
या शेब्दा साक्षे आसो भगवान। चुकता दंड करील।।८०।।
सुमतीप्रकाशे जेवी मार्तंड। यात शब्दार्थ पडला उज्येड।
यान दीसे भक्ती फळ पाड। भावार्थ हाते घेईजे।।८१।।
हा ग्रंथ श्रोतीया कल्पवृक्षे। श्रवणार्थ तृप्त मनोपक्षे।
होतो दीसे भगवंत चेक्षे[१] । जो तारक या जीवाचा।।८२।।
सुमती शब्द पाक नीष्पत्ती। जे श्रोते ज्ञानमुखी भक्षीती।
त्यासी पुण्यायुष्य चढ कांती। जीव पवीत्र होतसे।।८३।।
सुमती श्रवणे सुटती कर्म। सुमती शब्द हे जीवाचा धाम।
सुमती कथा तीर्थंकर णाम। करी पावन श्रोतीया।।८४।।
सुमतीप्रकाशे पुर्णीमाचेंद्र। पाहा श्रोते हो ज्ञान हृदयांद्र[२]।
आर्थी दीशेनी कळं जीनेंद्र। भावीक होती संतोशे।।८५।।
सुमती फुले फुलला मळा। सम्येक्ती पुरुशाशी दीसे डोळा।
जो मीथ्यारोगी जाला आंधळा। त्याला न दीशे या जेन्मी।।८६।।
सुमतीप्रकास सुर्वन(वर्ण)माडी। धर्मवंत पाहातातति आवडी।
आली कुज्ञान झांपडी। त्याला दीसे आभाषे[३]।।८७।।
सुमतीप्रकाशे ज्ञान मीष्टान्न। हे शद्गुरून ठेवीले वाढुन।
ते सज्ञान जेवीती सांभाळुन। आज्ञान नाश करीती।।८८।।
सुमती शब्द सुगंध आबीर[४]। तो घातला मीथ्यामुड्द्यावर।

१. डोळ्यांनी. २. हृदयांतरी, मनामध्ये. ३. आभास. ४. एक सुगंधी चूर्ण.

त्यासी न कळे सुगंधप्रकार। तेवी श्रवन कुबुध्धी।।८९।।
सुमती आक्षेर सुमनमाळा। सुमती करान घालला गळा।
सुमतीचा करा तुह्मी डोळा। सोहळा पाहा सुखाचा।।९०।।
सुमती वस्ती आरीहंत चेरण। सुमती प्रसन्न करी त्यामणी।
हेच सुमती पोवो श्रोत्या जणी। हे वीनंती जीनराये।।९१।।
दुर दुर पळो हे कुमती। भडभडा सरो आज्ञान राती।
लवकर नीघो ते ज्ञानगभस्ती१। हे वीनंती जीनराया।।९२।।
येथे जाला चवथा प्रसंग। श्रोते मणी बैसो सम्यक्त रंग।
सुटो सुटो कुदेवता संग। हे वीनंती जीनराया।।९३।।
चेतर्थ आध्या जैसा चवथ चांद। हे भजंती ते ज(ग)द्गुरू पद।
याची कृपा ते कवीचा आल्हाद। वीस्तार वदा आर्थाचा।।९४।।
हे श्रवन टाळी च्यार करवाये। च्यार गती दुःख सरवी आपाये।
च्यार सुख संगती दावी सोये। त्यातील येक संपुर्ण।।९५।।
ईती श्री सुमतीप्रकाश कथा या पंचम काळी जीवरक्षेका।।
प्रवर्ती प्रधान पृछा।। मुणी वक्ता व्या सम्याग्दर्शेण।।
प्रथम जीवासंगती कुरू योगोन्नाम। चेर्तुथो आध्याये संपुर्ण समाप्त।
वोवीसंख्य येकशे ।।१९५।। पंच्यानव। शु(भं) भवतु।
* * *

# सुमतिप्रकाश

## पंचम अध्याय

उँ नमो सीधभ्ये। श्री सर्वज्ञये नमः।।

ॐ नमोजी सर्व वीद्याचे मुळ। बारा आंग चवदा पुर्व सकळ।
पंचे(म) प्रकर्ण सांगे भवावळा। तोच मुळी कवींद्राचा।।१।।
जो चौथे काळी दीसे नजेर। जो पंचम काळी आदृश्यकार।
ज्याचे नामे देवेंद्र पावे थोर। कार्य करी या जगाचे।।२।।
जयाचे नामे सर्व सेवक। होउले ईंद्रादीक।
त्याचे नामाची मारीता हाक। करीती पार जगासी।।३।।
तोच पावला आरीहंत नाम। त्याचे जानती गनधर वर्म।
तो होये पंच परमेष्ठी सम। केवळनयेन[१] तयासी।।४।।
यास ह्मणावे पंचे गुरू। हाच परब्रह्म आवतारू।
यासी आतीशये आसोक तरू। हाच गुरू जगाचा।।५।।
ऐसा जो देव त्रैलोक्याग्रमणी। तोच कवींद्रसेवकाचे ध्याणी।
त्याचे नाम चालवी हे कथा। सुमती नाम जयाचे।।६।।
हे ऐकता सुमतीप्रकासे। जीव लोखंडा हाच परीस।
हेच करवी पुण्य सोन्यास। श्रोते होति तया परी।।७।।
सुमतीप्रकाश सारोषध[२]। जे पापी रोग्याचे होती शुध्ध।
कुबुध्धीयासी प्राप्त बुध्ध। करा श्रवन श्रोते हो।।८।।
जो श्रोता ऐकुन श्रवणार्थ। चीती ठवोनी चाले सुपंथ।
तोच सुखार्थ पावतील तथा। हे पाहा ज्ञानलोचणी।।९।।

१. केवलज्ञानरूपी नेत्र. २. साररूपी, रामबाण औषध.

जरी जीनग्रंथ कराल नेत्र। तरीच दीसेल सीध्धांत सुत्र।
काये मीथ्यातासी आसोनी नेत्र। सुखसंगती न कळे।।१०।।
मीथ्याति ह्मनीजे कुशास्त्रधारी। मीथ्याती तोच कुदेव आदरी।
मीथ्याती तोच पाखांड करी। सुख संगती न कळे।।११।।
जो आरीहंत त्रैलोक्यपती। याच दर्शेन सुखसंगती।
हे मागील आध्याई जाली युक्ति। पुन्हा प्रधान बोले पै।।१२।।
प्रधान ह्मणे जी मुनीश्वर। जीवासंगती वदले च्यार।
शेष तीन सांगा प्रका(र)। हेच आर्जि[१] तव पाई।।१३।।
प्रधान ह्मने जी मुनिराया। यक संगती जडलो हृदया।
मोहरे४ कथा सांगा देवछ्याया। हेच आर्जी तव पाई।।१४।।
तुह्मी सर्व शास्त्रार्थ सावकार। आमुचे कर्णकुळा[२] रेघ[३] थोर।
यासी उपदेशद्रव्य द्या सार। हेच आर्जी तव पाई।।१५।।
तुह्मीच पुर्वी दयावीत्त दील्हे। त्यानच हींसा कर्तुत्व गेले।
मग सर्व जीव सुख पावले। हेच नफा तुमचा पै।।१६।।
आमचे राजश्रीचे नामकर्ण। सार्थक जाले तुमचे दर्शेण।
मग याही टाकीले आवगुण। हेच नफा तुमचा पै।।१७।।
आता जे तुह्मी सांगाल वचेन। तेच कर्तुत्व आचरू जान।
आह्मी न पाहु कुदेवता वदन। हेच णफा तुमचा पै।।१८।।
त्या प्रधानाची ऐकुन आर्ज। ते मुनी बोलले धर्मकाज।
ह्मणती सत्पात्र ऐक वोज[४]। दुज संगती जीवाचे।।१९।।
श्रेष्ठ सत्पात्र तीर्थंकर योग। यात ही लघु चेतुर्वीध संघ।
यातहि जे चार न येती आंग। सत्पात्र याते ह्मणावे।।२०।।
जे वैराग्य जानुनी घेती दीक्षा। आखंडीत वीद्या आणीती लक्षा।
ज्याही सोडीली प्रपंच आपेक्षा। सत्पात्र याते ह्मनावे।।२१।।

१. अर्ज, विनंती. २. कानरूपी ऋणको. ३. मर्यादा. ४. चांगुलपणा, शुद्धता, रीत, पद्धती.

**सोडोनी सुख राज्येवैभव। आर्ण(र्ज)वा[1] करवीती जीव।**
**परी आंतरी न घेती प्रस्ताव। सत्पात्र याते ह्मणावे।।२२।।**
**ज्याला द्रव्य दाराचा[2] वीटाळ। ज्याने सत्क्रीया केली जवळ।**
**ज्याचे नीत्य ध्याती जीन चेताळ[3]। सत्पात्र तया ह्मनावे।।२३।।**
**ज्याने वीषय खेळ सोडीला। ज्यान आरीहंत सखा केला।**
**ज्यान जीवतत्त्वी भाव लावीला। सत्पात्र याते ह्मनावे।।२४।।**
**जे आठरा दोषाचे मुळ क्षुधा। ज्यानी हेच मारूनी केली चेंदा[4]।**
**ज्याही सोडीला पाषांड सवदा[5]। सत्पात्र तया ह्मणावे।।२५।।**
**जे येक मासा चौपक्षा लागुन। कींचीत् करीती आहारपारण।**
**वैराग्यवनी वसवीती मन। सत्पात्र तयाते ह्मणावे।।२६।।**
**जे चोवीस परीग्रहे थोर। हे टाकुन दील्हे ज्याही दुर।**
**ज्याचे नीष्कळंक जाले आंतर। सत्पात्र याते ह्मणावे।।२७।।**
**ज्याचा जीनवचेनी वीस्वास। जो पावला क्षाईक सम्येक्तास।**
**ज्याचे माया मोहो तुटला पाश। सत्पात्र याते ह्मनावे।।२८।।**
**जे छे कायाचे करीती रक्षेन। जे कर्मा कोंबा टाकीती मोडुन।**
**ज्यासी लागले शुक्ल ध्यानी मरण। चेरण पुजी तयाचे।।२९।।**
**जे संसारपुरा उतरले। जे दयाचेळ[6] गीरी चढले।**
**तेच आक्षेये मरणी मेले। चेरण पुजी तयाचे।।३०।।**
**ज्याहि मन मेळवीले वीवेकी। केल्या कर्माची फेडीली बाकी।**
**आदृश्ये वस्तु आणीली तुकी[7]। ते चरण पुजी तयाचे।।३१।।**
**ज्याही जीवा जीव वोळखीले। ज्याही मुक्तीस्त्रीचे मोल केल।**
**ज्याचे शब्द धर्मोपदशे बोल। चेरण पुजी तयाचे।।३२।।**
**जे सांगती सर्व जगाकार। जे सांगती सारासार वीच्यार।**
**ज्याला भाशे देव तीर्थंकर। चेरन पुजी तयाचे।।३३।।**

१. विनवणी.  २. स्त्री, पत्नी.  ३. चैत्यालय, जिनमंदिर.  ४. चुरा, नाश.
५. सौदा, घेवदेवीचा व्यापार.  ६. दयारूपी अचल, पर्वत.  ७. समानतेसाठी.

**ज्यासी नाही ज्ञानाभीमाण। जे सांगती भवांतरी खुन।**
**ज्याचे वपु ये लोकी पावन। चेरण पुजी तयाचे।।३४।।**
**जो आज्ञानासी ज्ञान कळवी। जो शक्र कींकर समाण भावी।**
**याचे पदोपदी पावन उर्वी[१]। चेर्ण पुजी तयाचे।।३५।।**
**जो आपनासी ह्मने थोर। कुश्चीळाची[२] प्रीत करी आदर।**
**त्याचे फेडी जेन्म दरीद्राकार। चेरण पुजी तयाचे।।३६।।**
**जो गुरु सुमतीचा प्रकाशेक। ज्यान लावीला कुमतीस धाक।**
**जो त्रयोदश च्यारीत्राचा पा(ळ)क। चेरन पुजी तयाचे।।३७।।**
**ज्याचे दर्शेना येती स्वर्गेस्वर। ज्याचे दशे(र्शे)न घेती वीद्याधर।**
**ज्यासी मानीती मध्ये भुधर[३]। शद्गुरु नाम तयासी।।३८।।**
**जो कींचीत् घेता आहारदान। पंच्याश्चर्य वर्षती सदन।**
**पाह्या येती नगरवासी जन। शेद्गुरू नाम तयासी।।३९।।**
**जरी नरासी सर्प जाला डंख। ज्याचे दृष्टीन उतरे वीख।**
**ज्यासी आवधीज्ञान वसे मुख। शद्गुरू नाम तयासी।।४०।।**
**ज्याचे शरीरी प्राप्त रीध्धी सीद्धी। ते पावती जन लोक समंधी।**
**परी सषंये मी न भोगीती कधी। शद्गुरूनाम तयासी।।४१।।**
**ज्याचा गर्व तृष्णा गेली रजणी। ज्यासी ज्ञान उगवले तरनी[४]।**
**जयासी ह्मणती नीग्रंथ मुनी। शद्गुरू नाम तयासी।।४२।।**
**ज्याची उघडली द्रुष्टीची[५] द्रुष्टी। ज्याला ऐकु येते स्वर्गीची घंट।**
**ज्याला सेवटी प्राप्त मोक्षपद। नमन यासी करावे।।४३।।**
**जे आपण तरून गेले पार। येनाऱ्या सांगीतला उतार।**
**यासी ह्मणावा गुरु आवतार। नमन यासी करावे।।४४।।**
**जे शरीरी मेले जीवी वाचले। हेच मोक्षेस्त्रिचे भर्तार जाले।**
**तेथ नीजोनी पाहाती लोकाले। तम नाही जया द्रुष्टी।।४५।।**

१. पृथ्वी. २. दुराचरणी, मिथ्यात्वी, पाखंडी. ३.राजे. ४. सूर्य. ५. सम्यग्दर्शन.

जे पाहाता शरीरी वाया गेले। परी जीवी आनंत बळ झाले।
जे ज्ञानांमृत भोजेन जेवीले। नमन तयासी करावे।।४६।।
जे देयाचे ते देती सर्वासी। न देयाचे ते न देती सर्वासी।
सर्वा पाहाती तारक दृष्टीसी। दान यासी करावे।।४७।।
हे मुणी जे घेयाचे ते घेती। जे न माघायाचे ते न मागती।
वैऱ्या सज्जना आसीरवाद देती। दान यासी करावे।।४८।।
लाभ आ(अ)लाभाची ज्याला प्रीत। हे भक्त आ(अ)भक्त न काढी मात।
ऐस्या जे गुणाचे आसतील संत। दान यासी करावे।।४९।।
ऐसीया सद्गुणाचे जे मुणी। ते संतोषावे आहारदानी।
मन वचे काया सुद्ध करोनी। जोडी कर्तुत्व बीज पै।।५०।।
ऐसीया सत्पात्री दान घडे। कोटी पुजा केल्या फळ जोडे।
कर्मबंधाचे तुटती खोडे[१]। पुण्य संगती हेच की।।५१।।
ऐसीया जीवा नमन करीता। त्याला कोटि घडे जप स्तोत्रता।
जेन्मोजेण्मी दु:ख न करी सत्ता। जीव होये पुन्येवाण।।५२।।
ऐशा गुरुच्या पुजीता पादुका। तो शत जन्म होये पुण्यश्लोका।
सेवटी जाये मोक्षेसुख पाका। सुकृत जोड जानावी।।५३।।
ऐसीया केवळ मुणीचे नाव। हे नीत्य पढे जो त्रीकाळ भाव।
त्याचे संसारी न होय आपाव(य(। हे गाहि पुराणी।।५४।।
पाहाये त्या चार ग्रंथांतर। तेथ गुरुभक्ती कथीली थोर।
तो आर्थ लक्षे वीश्वा गुणाकार। येथे नाही श्रोते हो।।५५।।
आर्थ पाहा गणधर पुजेत। की पाहा गुरु जेमाळेत[२]।
की जाणती व्याकर्ण पंडीत। तो आणीकासी न कळे।।५६।।
की पाहा शृतस्कंध पुराणी। की ऐका श्रावकाचाराची वाणी।
की पाहा शांतीदेवाची कथनी। गुरुभक्तीने तरले।।५७।।

१. बंधने. २. जयमाला.

ऐसी गाहि सांगता उत्तर। या उघड कथा होईल वीस्तार।
आधीच मऱ्हाष्ट वाचा थोर। न शोभ या शास्त्रार्थ।।५८।।
ते मुनी ह्मणती प्रधानासी। आन्नदान घडता सत्पात्रासी।
जीवास पुण्याच्या रासी। आर्थ ऐकी सार।।५९।।
दान जेवी वटबीजाकार। कि नीघता बीज ईंदुची[१] कोर।
की मुंग्या करीती वारुळाकार। पुण्ये वीस्तारे यापरी।।६०।।
की कापुस आटणी[२] होये दोरा। ते वस्त्र वीनीती चेतुरा।
त्याण झाकले मानंव शेरीरा। पुण्य वीस्तारे यापरी।।६१।।
की धान्ये बीज पेरीता मणभर। सेतात वीस्तार दीसे फार।
की भुमीपोटी जीवन पाझर। पुण्य वीस्तारे यापरी।।६२।।
की उत्पत्तीचे पाहाता मुळ। स्त्री पुरूष दोघे रमती बाळ।
आनेक विस्तार होती बाळ। दान जीवासी यापरी।।६३।।
की वृक्षे नाम पाहाता यक। त्यासी फळ फुल येती आणेक।
की कवित्या[३] प्रसन्न गुरू भाक[४]। दान जीवासी यापरी।।६४।।
की रूपये मुदल शेतमाण[५]। त्यास वर्षा म(मे)ळवीती गुण।
की तृणाआंगी दुध उत्पन्न। दान जीवासी यापरी।।६५।।
तैसे दान करीता दीष थोड। सत्पात्री पेरे हेच पुण्य झाड।
यानेच जीव चाले झड सड। सुख मार्गी मोक्षेपुरा।।६६।।
दान जीवाचे रेसीम वस्त्र। आती सुंदरता यानेच गात्र।
हेच मोक्षेवावडचे[६] सुत्र। न सुटावया जीवासी।।६७।।
सत्पात्रदान जीवाचा राजा। हेच सुखी ठेवी शेरीर प्रजा।
हेच दावी भोगभुमीच्या सेजा[७]। सुख नींद्रा देतसे।।६८।।
हे दान जीवाची रत्नखानी। उत्तम जेन्म दाखवी करून।
यानेच होये केवळज्ञाण। जन्मदरीद्र जातषे।।६९।।

१. चंद्र. २. कातले असता. ३. कवितेसाठी. ४. भाषा, वाणी (आशीर्वाद).
५. शतमान. ६. मोक्षरूपी पतंग. ७. शय्या।

दान जीवाचे सुखसंगति। कर्मआंधळ्यास धरी हाती।
घेउन चाले सुगम पध्धती। सेवा करी जीवाची।।७०।।
या जीवाची दान संग स्त्रिया। सुख फुल्लर मर्दीचे काया।
रात्र जेन्मी नीजे जवळ ठाया। वीषेस माया लावी पै।।७१।।
दान जैसी माय बाप सार। जीव पुत्रासी घाली आळंकार।
लघु आज्ञा करी ज्ञान थोर। पुन्य संसार दाखवी।।७२।।
दान जीवाचे जैसे भोजन। तृप्त जाला वीवेक उत्पन्न।
वीवेका आंती श्री जीनदर्शेन। होये जीवासी श्रोते हो।।७३।।
दान जिवाची जैसी भुमीका[1]। येथे सुख वाफे पीकती पीका।
दान जीवाचा रुपये पैका। आमोल वस्तु मीळे पै।।७४।।
जे तापत्रये तापले प्राणी। दान औषध अमृत पाणी।
दान जीवा बैसवे उच्चासणी। पदवी जन्म दाखवी।।७५।।
हे दान जीवाचा धाण्ये ठेवा। कर्म दुक्काळी पोसी या जीवा।
दान सर्व जीवाचा वीसावा। करुण दावी जीवासी।।७६।।
हे दान वन गउ दुग्ध पान्हा। जीववछे[4] पीतो सैरा[5] त्या राणा।
सत्क्रीया मन वपु नीवे[6] जाणा। जीव सुखावे आपार।।७७।।
जीव परदेसी बहीरा मुका। दान दया धर्म पाजी उदका।
मग तोच होये शास्त्र बोलका। संगत याची करावी।।७८।।
जीव जाउ पाहे पाप वाटेन। दान पुण्य धरी यासी वोढुन।
या जीवासी करी स्वर्गपण। आसोक वन दाखवी।।७९।।
जीव मीथ्या कर्मेजाला पांगुळ। याला दान चढवी पुण्ये माळ।
आक्षेये दाखवी मोक्षे मंडळ। जेन्म मर्ण चुकवी।।८०।।
पाहा पाहा पुर्वी दाणपती। ते जीव णाही गेला आवगति।
ते सर्व गेले युगळ गति। स्वर्ग आथवा मोक्षासी।।८१।।

१. बंधने. २. जयमाला. ३. वावर, शेत. ४. जीवरूपी बछडा. ५. स्वैर. ६. शांत होणे.

हे गाही[१] पाहा आदीपुराणी। की शास्त्र ऐका उत्तर कर्णी।
कि पाहा ग्रंथ चौवीस ठाणी। दाता तरले आनंत।।८२।।
ते पुराण गणधर भासीत। प्रथम चक्री कानी जाले श्रुत।
ज्याला जानति सीध्धां(त)पंडीत। की जाणे आष्टा व्याकर्णी।८३।
कवींद्रशेवक मुळीच मुर्ख। सुमती कथलि मराष्ट मुख।
प्राकृत परी ऐका गुरुमुख। कथा कळली ग्रंथाची।।८४।।
त्या जीवरक्षक पर्वती यती। मुखे ह्मणती प्रधानाप्रती।
सत्पात्राची वदलो सत्कीर्ती। युग्म संगती जीवाचे।।८५।।
हे संगत नाही केली जोग्यान। ह्मणोनी आभक्षा पडले रान।
ह्मणोनी हिंडती वीशय वण। सुसंगती चुकले।।८६।।
हे तारक संगत सोडीली। मारक संगत आराधीली।
परी हेच मरण वीषवल्ली। मीथ्या ज्ञाना न कळे।।८७।।
मुनी ह्मणे प्रधान भुपती। आता कुपात्र ऐक आपकीर्ती।
ते बळच जीवा नरका नेती। पात्रापात्र जाणीजे।।८८।।
जे आधीच मुळी आज्ञान बंड। त्यावर खोट फार बोले तोंड।
जनासी दाख(वी) उघडी गांड। कुपात्र याते जाणीजे।।८९।।
कष्ट न होति ह्मनोनी घे दीक्षा। पर परसुखार्थ धरी आपेक्षा।
भक्ष आभक्ष न करी परीक्षा। कुपात्र याते जाणीजे।।९०।।
भगवी वस्त्र गळा माळा मणी। मणी भोग ईछा करी कामीनी।
चीत शुध्ध नाही ध्याणी पुजेणी। कुपात्र याते जाणीजे।।९१।।
वीष्णु वीष्णु बडबड करी। मुळ वीष्णु ठाउक नाही परी।
वींचु स्वर्प ढेकुण संहारी। कुपात्र याते जाणीजे।।९२।।
शेंकर शेंकर आठवी मनी। परी आदी शेंकर कोने स्थाणी।
न कळे त्याची प्रतीमा ध्यानी। भंग लींगासी पुजीती।।९३।।

१. ग्वाही, साक्ष, पुरावा.

मुखे ब्रंह्मा ब्रंह्मा करी धींगाणा। त्या आदी ब्रह्माच्या ण जाने गुना।
वन कंद मुळ करी भक्षणा। कुपात्र तया जानीजे।।९४।।
फु फु फु ह्मनोनी फुके काण। तो आर्थ न सांगे लोका काणी।
तो सर्व कपट मुगुटमणी। कुपात्र याते जानीजे।।९५।।
जो वीभुत लावी आंगावरी। जो आंतरी हींसा करी।
जो आंगी पोसी ढोरापरी। कुपात्र याते जाणीजे।।९६।।
भेक[१] धारोणी ह्मनवी सन्यासी। छेकाया जीव न आणी दृष्टीसी।
जो कर्तुत्व आचरे हिंसाराशी। कुपात्र याते जाणीजे।।९७।।
जो शास्त्राचे आर्थ अव्हेरी। जो कुशास्त्र आर्थ आंगीकारी।
हिंसीक देवा पुजा करी। कुपात्र याते जाणीजे।।९८।।
ज्यासी खोटे कर्तुत्व आवडे। कार्यार्थी मुर्ख मस्तक बोडे[२]।
सर्वदा आप पोटार्थी रडे। दया नाहि दुसऱ्याची।।९९।।
आप मुखे सांगे सर्व लोकासी। ह्मने देव पावतो आह्मासी।
तनुसी दुःख होता तोंड वासी। ते हा देव कौ जाला।।१००।।
ज्यासी आपसुखाची शुध्धी कळे। ज्याचे परहितार्थी गेले डोळे।
द्रव्यार्थी जन भोंदी भोळे। हे आपवीत्र ह्मणावे।।१।।
धन मेळउन पोसी स्त्रि बाळ। मेल्या गुरुची करे जेवनाळ।
दारी भीकारी करी कळकळ। गुरू संतोष जाला की।।२।।
जो काष्ट भार तापे पंचाग्न। जेन कर्ता आहेत पंचाग्न।
हे ठाउक नाहि ज्यासी म नग्न। हे कुरुषी जाणावे।।३।।
जो सीकला मुष्टी मारण मंत्र। ज्याला नाहीत जीनशास्त्र नेत्र।
जो आंतरी वागवी तृष्णा शेस्त्र। हे कुरुषि जाणावे।।४।।
ज्याला काळाकाळ णाहि ठाव। ठाउक णाही आरीहंत देव।
लोका खोटे वीद्याची दावी माव[३]। हे कुरुषी जानावे।।५।।

१. वेष. २. भादरणे, वपन करणे. ३. माया, कपट, खोटेपणा.

जे जळसमाधी घेती मरण। की कोण्ही आग्नीत देती प्रान।
त्यासी ह्मणती गुरुरूप पेण[1]। हे कुरुसी जानावे।।६।।
लोकासंगठ नगर वैखुंटा। देव नेउन टाकी याच्या वाटा।
ऐसे बोलती आपुले होठा। ते कुरुसी जानावे।।७।।
आमंगळ चेर्म केश वस्त्र। हे लोकासी ह्मनवीती पवीत्र।
जे वृक्ष पर्णा वदति पात्र। हे खोटा आर्थ जाणीजे।।८।।
जे प्रतीमा स्छापीती शेस्त्रधारी। त्रैलोकेंद्रास ह्मणती हा वैरी।
वैरी सजेन न जाने परी। यासी संगत नसावी।।९।।
या पुग्दुलासहित मोक्षगति। गेले ह्मणति पाखांड मती।
पतीवृतासी वदती आसते(ती)। याची संगत नसावी।।१०।।
ह्मणे पुण्यशीळ राज्यान। मृग वधले आपुले हाताणे।
देव स्त्रिसंग पुजती जाण। याची संगत नसावी।।११।।
ज्याला नाही सर्व सुक्ष्म ज्ञान। ते न जानती भवांतर खुण।
जो कथणी सांगे चर्म नयन। पुरान खोटे तयाचे।।१२।।
पुर्वी कोठे न जाले वर्तले। ते संस्कृत पुराणी कथले।
ते केवळज्ञानार्थी दीशे फोल। हेच कुगुरु ह्मणावे।।१३।।
ऐसी पंच मीथ्यात पुराणी। खोटी कथली आहे कथनी।
परी पंचम काळ महिमा गुणी। लोक माणती तयास।।१४।।
हे पंच आदी सर्व भेक[2] धारी। जे हिंसा करीती नाना परी।
जग पाहाती क्रुर नजेरी। हे शेदुरू नव्हेती।।१५।।
सभाग्ये वदनी ह्मणे हा भक्त। क्रोधे दरीद्रासी वदे आभक्त।
ऐसी उच नीच नींदा जो वक्तं। हे शदुरू नव्हेती।।१६।।
फार भीक्षा मीळे तेथ संतोष। जेथ न मीळे त्यास डोळे वासे[3]।
मनी धरी बहु काशा(षा)यास। हे सदुरू नव्हेती।।१७।।

१. मुक्काम, टप्पा, प्रयाण. २. वेष. ३. डोळे वटारणे, क्रोधित होणे.

येकासी दे श्राप मनछेंद। येकासी देतो सुआसीर्वाद।
जना सांगे बुध्ध आवबुध्धा। हे सद्गुरू नव्हेती।।१८।।
मीष्टान्ना भोजेनी होय तृप्त। कडवट भोजेनी आतृप्त।
वैऱ्यासी ह्मणे दुःख हो प्राप्त। हे शद्गुरू नव्हेती।।१९।।
नीत्य छेकाया करी हानन। ज्याला ठाउक णाही शुक्ल ध्याण।
सम्येक्त न धरी ज्याचे मण। हे सद्गुरू नव्हेती।।२०।।
हे जीव आजीव ज्यासी न कळे। सत्तावीस वीषई मन खेळे।
जो मांस खायासाठी सळसळे। हे सद्गुरू नव्हेती।।२१।।
ज्याचे पोटी वाढे पुत्र संतत। ज्याला स्त्रीभोगार्थी वाटे प्रीत।
ऐस आसता ह्मनवी जो संत। हे सद्गुरू नव्हेती।।२२।।
जो आडंबर वागवी थोर। हींसीक दयेचे न कळे घर।
जो भलत्याचे घरी घे आहार। हे सद्गुरू नव्हेती।।२३।।
जे जे बोलले पंच मीथ्यामती। ते ते जे प्राणी आंगकरीती।
तेच ह्मणावे कुपात्र उत्पत्ती। न नमावे तयासी।।२४।।
जीव काही पुर्व पुण्येकरून। मानव शेरीर होये उत्पन्न।
हेयाचे सोडोन जाणीवपण।। हींसा फार करीती।।२५।।
आधी आपण होये मोहो उन्मत्त। मग करी करवी पंचे मीथ्यात।
हे जीवामस्तकी वोझे पर्वत। न नमावे तयासी।।२६।।
ऐसा जो कोण्ही पाखांडी नर। त्यासी न मैत्री करावी फार।
त्यासी बोलावे दुरच्या दुर। न नमावे तयासी।।२७।।
यासाठी हाती आसावी मुद्रीका। त्यावर आदीश्वर नाम रेखा।
प्रतीमा धरोन आंतर मुखा। मग नमावे लोकासी।।२८।।
हे बहुत होते चतुर्थ काळी। नेम सीध्ध केला भुपति हेळी[१]।
तेच पावले सुख फुल्लवली। सम्याक्त बळी या नाव।।२९।।

१.हेलापूर्वकस, सहज.

**ऐसे मीथ्या कुपात्र वळखावे। त्यासी न धरावा वैरभाव।**
**त्यासी न करावा सखेत्वमेव। दुर त्यागी तयासी।।३०।।**
**त्यासी आसावे आंतर। त्याचा मानावा वीटाळ थोर।**
**त्यास भेउन पळावे दुर। कानी मंत्र न घेइजे।।३१।।**
**की-- जैसा येकट पुरुशे। सर्पसी देखोनी पळे दुर।**
**तैसा कुपात्राचा आंतरी स्पर्ष। जीवा न होउ द्यावा।।३२।।**
**कि ते जैसे मातांगाच घर। की तो जैसा वाघाचे आंतर।**
**की तो जाणावा पारधी थोर। वीटाळ माणी तयाचा।।३३।।**
**की जैसा आस्तीचा[१] गाडा रौडंरोड[२]। की तो जैसा मांसाचा पाहाड।**
**की तो आवक्रीया सउलमड। वीटाळ माणी तयाचा।।३४।।**
**की ते जाणावे जातीचे माहार। की ते ह्मणावे चांडाळ थोर।**
**की ते मन कस्मळ आवतार। वीटाळ मानी तयाचा।।३५।।**
**की ते पात्र रंधन[३] मडक। आवक्रीया श्वाने स्पर्शीले नीक।**
**ह्मणोनी दया धर्मवंत लोक। त्याग त्याचा करावा।।३६।।**
**की जैसे मार्जेर आंतरी थोर। चींतवन करी उंदीर फार।**
**तैसे त्या कुपात्राचे आंतर। पाप जोडी जोडीतु।।३७।।**
**की तक्षक[४] हिंडे कोकाड[५] स्थानी। कीटक भक्षण आठवी मनी।**
**तैसे पंच मीथ्यात कुगुणी। कर्म आपार जोडीतु।।३८।।**
**की चोर चींतवी आवसलान। की काग चींतवी मांस पेन।**
**की पाल चींती भक्षे उडान। कुपात्र जीव यापरी।।३९।।**
**की ते कुपात्र नरकाचे खडक। मार्गी चालता द्रुष्टी पडे देख।**
**परी आंतरी नाही याचे सुख। हे तैस जीवा जानीजे।।४०।।**
**हे जीवाचे नाही सुखसंगती। हे जीवासी नेती आवगती।**
**जीवासी करीती पंच मीथ्याती। स्थापीत याचे न होई।।४१।।**

१. अस्थी, हाडे. २. पुरेपूर, खचाखच भरलेला. ३. रांधण्याचे, शिजविण्याचे. ४. साप.
५. अडगळीचे.

की वृक्षात सींदी[१] झाडा वीटाळ। की स्वस्त्रीसी येता रजेश्वळ।
की स्वकन्या बाटली मस्ती सळ। संग त्याची त्यागीजे।।४२।।
की कुपात्र मानव आहेत खरे। परी त्याच्यापरते खर[२] बरे।
खर तृप्त होये तृन आहारे। ते आभक्षासी भक्षीती।।४३।।
कुपात्र जेवी मीष्टान्न खडे। कुपात्र जैश नरकीचे कीडे।
कुपात्रदाने जीव आंग खडे। संग त्यागी तयाची।।४४।।
की कुपात्र मुळ[३] पाउस। याचे वचे पुण्यरास नास।
हे जीवासी ला(वी)ती मायापास। कुसंग त्यागी सत्वर।।४५।।
यासी न खर्चाव द्रव्या सार। यासी न लावावा भाव थोर।
याचे न ऐकावे शास्त्र आक्षेर। भक्ति त्यागी तयाची।।४६।।
की आपुले त्यागीता मु(म)ळ मुत्र। पुन्हा पाहाता दीशे आपवीत्र।
तैसे फीरोणी पाहा ज्ञाननेत्र। पात्रापात्र वीचारा।।४७।।
मी नाही बोलत आपकार्यार्थी। मी वदतो सर्व लोका सुखार्थी।
वीवेक चारून चला पंथी। सुख संगती संभाळा।।४८।।
मि मुणी जालो पंचम काळी। माझे द्रष्टी न पडे जीन हेळी।
मी सांगतो शास्त्रार्थ नव्हाळी। आर्थ पाहा श्रोते हो।।४९।।
आसे ह्मनता सर्व लोक तेथ। उठोनी मुनीची आर्जि करीत।
वदती तुह्मीच आमचे संत। कथा मोहरे सांगावी।।५०।।
ऐसी पात्रापात्राची पारख। पाहावी जीन शास्त्रार्थ देख।
शास्त्र हेच भगवंत मुख। सत्ये माणी प्रधाना।।५१।।
हे जीनशास्त्र वीवेकाची नेत्र। वीवेक तेच भगवंत गोत्र।
यानेच दीशे सत्पात्र आपात्र। हे करी नेत्र प्रधाण।।५२।।
हे वीवेक नेत्र नाही जयापासी। त्याला धान्ये दीसे भुसरासी।
तो काळ्या पाशाणा ह्मणे हे ह्मैसी। परी दुध णाहि तेथे।।५३।।

१. शिंदीचे, नीरेचे झाड. २. गाढव. ३. मूळ नक्षत्रावरचा.

ज्याचे मनी नाहि वीवेक पक्षे। तो नींबासी ह्मणे हा कल्पवृक्षे।
कल्पवृक्षे न दीशे ह्याच्या चेक्षी। मीथ्यादीष्टी ह्मणोनी।।५४।।
जे कोण्ही आवीवेके पेले कैफ। त्याला जीनकथा न कळे माप।
ते मीथ्या पाण्यासी ह्मनती तुप। कुशास्त्री कैफी या णाव।।५५।।
ज्याचे वीवेक नाही नेत्रास। तो उडव्यास ह्मणे रत्नास।
रत्ना टाकोनी घे गारगोटीस। ठक पावे जन्मोजन्मी।।५६।।
जो वीवेक धरीता भुलला। तो जीताच भांबड भुत जाला।
तो सत्पात्र दर्शेण चुकला। कुपात्रसी पुजीतु।।५७।।
जो वीवेक न सांभाळी हृदई। त्यालाच कुपात्राची वाट गाहि।
परी जीव हीत चुकला सहि। हे बुध्धी आंधा न कळे।।५८।।
ज्यान वीवेक ण केला मैत्र। त्याला न दीसे सिध्धांत सुत्र।
त्यासी न कळे पात्रापात्र। तो कुपात्र जेण्म पावे पै।।५९।।
की तो नरदेही आसोणी ढोर। आवीवेक तो जातीचा माहार।
जे जे आंगीकार करीती नर। काया ह्मनावे तयासी।।६०।।
ज्यान कुपात्रासी दान केले। तेच कुजेन्म उत्पन्न जाले।
तेच आती दुःख उष्णे तापले। जीव फीरे परदेसी।।६१।।
जे जीव कुपात्री द्रव्य खर्चीती। तेच हिंडताती दुःखगती।
हेच ह्मणावी आज्ञानराती। जीवनी बुर्जेतयाचा।।६२।।
कुपात्रदान जेवी कोळसा। दुधे धुतल्या न होये खासा।
कुपात्रदान कुयोनी ठसा। मायाकरी होतसे।।६३।।
या कुदाने राक्षेस पोटी जेन्म। कुदाने मुखी ये कुदेव नाम।
कुदाने जीव होई आधम। फीरे चौऱ्यासी माझारी।।६४।।
कुदाने माता जीवाची वैरी। कुदाणे पीता सोडी वनांतरी।
कुदाने भांडती नानापरी। येकमेका येहलोकी।।६५।।

कुदाने माता मरे बाळपणी। कुदाने जीव पडे  दुःखाग्नी।
कुदाने संतोष न मीळे पाणी। कासावीस होतसे।।६६।।
कुदाने जीव होये भग्न। कुदाने वस्त्रेवीन दी(से) नग्न।
कुदाने कुश्चळपण। दुःख संगती जीवाचे।।६८।।
कुदाने जीवाची वैरी कुऱ्हाड। कुदाने तोडी सुखरूप झाड।
कुदाने जैसे तस्कर धाड। पुण्य लुटे जीवाचे।।६९।।
जीव आधीच आज्ञान पशु। कर्मकक्षी[१] गळला आंगसत्व।
कुदान चीखली करी आरडाव। कोण काढी तयासी।।७०।।
जीव पक्षी जाला मोहनी पीस। मीथ्यामार्गी पडे कुदान फासा।
मग जीव कष्टी होये फारसा। कोन काढी तयासी।।७१।।
हे जीव जन्ममार्गी मुशाफर। कुदान व्याघ्र भेटता सामोर।
मग त्या मायावनी रडे थोर। कोण सोडवी तयासी।।७२।।
यासाठी हो प्रधान भुपती। स्वार न व्हावे आज्ञान राति।
न करावे मीथ्यात संगती। धर्म सोये जानावी।।७३।।
यासाठी न करावा आवीवेक। हाच पंच मीथ्याताचा लेपांक।
हा जीवासी देता कर्म झोक। करी की फीक्क दुःखे रंगी।।७४।।
आवीवेक नाचे पाचा दळी। हा वाढला फार पंचम काळी।
हे लोका दंडीतो पित्तांग बळी। याला झोकावे दुरस(?)।।७५।।
मीथ्या दुःख वर्णनु करीता। कष्टी होये कवीची रसोत्पता (?)।
हेच वदले गणधर ताता। पाहा आर्थ पुराणी।।७६।।
पुराण पाहा जीवाभीगंमी। की आर्थ पाहा परमागमी।
तेथे पापाची फार आहे उर्मी। होये गरमी दुःखाची।।७७।।
तो आर्थ जानती पंडीत गुणी। की जानती महा आष्ट व्याकर्णी।
ते दुःख दीशे केवळनयेणी[२]। हे आज्ञानासी न कळे।।७८।।

१.कर्मरूपी अरण्य.  २. केवलज्ञानरूपी नेत्रांना.

**आज्ञान आहे कवींद्रसेवक। आज्ञान नाही मुणीश्वर मुख।**
**मुनी वदती संस्कृत भाक। राजा प्रधान ऐके पै।।७९।।**
**ऐसी मुनी मुख आर्थ धुमाळी। होता संतोषले ते लोक मेळी।**
**ह्मनती धन्य जी शास्त्र हेळी। आज्ञान गेले आथाक।।८०।।**
**मुणी वदे प्रजापती सेवक। सत्पात्र पाहे आर्थ वीवेक।**
**हे बीज जीवाचे संगती सुख। येथे जाल प्रधाणा।।८१।।**
**कवींद्रसेवक ह्मने श्रोत्यासी। तुह्मीहि बैसा पर्वतासी।**
**मोहरे संगती जोडा युग्मासी। चवघ तारक जीवाचे।।८२।।**
**हा आध्या येथे जाला पाचवा। श्रवणार्थ जाये कर्म पाचवा।**
**जीवास प्राप्त होये पुण्ये ठेवा। भावे ऐका श्रोते हो।।८३।।**
**हा आध्या जेवी पाचवे ज्ञान[१]। या न दिसे पाचवी गती जान।**
**ऐकता उत्पन्न वीवेक नयेन। श्रोते होती पवीत्र।।८४।।**
**सुमती शब्द जैसे अंब्र फळ। ते श्रवण हाती घ्या श्रोते बळे।**
**आर्थ रस वदा मुख कमळ। करा तृप्त सर्वासी।।८५।।**
**सुमतिप्रकाशे सुमती रत्न। हाता आलीया तृप्त मन।**
**मग सुख द्रव्यासी काय उणे। हे जोडुन घ्या श्रोते हो।।८६।।**
**सुमतीप्रकाशे सुमती दीप। या शेब्दार्थ दीसे सुखस्वरूप।**
**यासी भीती पाप तस्कर कोप। करा श्रवन नीत्यशा।।८७।।**
**सुमति कथा रुपये मोहोर। श्रोता पारखी आसावा बर।**
**मीथ्या शेब्द तांब जाणे आंतरा। सम्येक्त नयनी तो येक।।८८।।**
**जो जाने वीचार देवा देख। जो जाने सदुरु नीग्रंथ सर्व।**
**जो जाने परमताच लाघव। सम्येक्त चेक्षु ते यक।।८९।।**
**जो जाने सुमती शेब्दाकार। जो टाकुन दे कुशास्त्र आसार।**
**जो जाणे या कवीचे आंतर। सम्येक्त नेत्री तो येक।।९०।।**

१. केवलज्ञान.

सुमतीप्रकासे जेवी भास्कर। यात शेब्द उज्योड जाला थोर।
पंच मीथ्यात वोळखा तस्कर। स्व(स्प)र्षु नका तयासी।।९१।।
पुढल आध्याई नीरोपण। धर्मसंगती कथाकथन।
ते ऐकता फुटे पाप पाषाण। चीत्त लावा येथ पै।।९२।।
सुमती शब्द मोत्ते पोवळे। सम्येक्त पारख आसावी डोळा।
तोच ठेवी हृदये कमळे। रूप पावे स्वर्गीचे।।९३।।
हे मीथ्यामर्कटा वाटे फोल। त्याला न कळे याचे मोल।
त्याला न कळे समुद्र खोल। तो खोटे वण हींडे पै।।९४।।
ईती सुमती शब्द प्रभंजेन१। कुमती भुस जाये उडोन।
दया रास करी नीर्मळपण। श्रोते वीछा यासी पै।।१९५।।

।। ईती सुमतीप्रकाशे कथा।।

या पंचम काळी जीवरक्षेक शीखरी प्रधान पृछाप्रती गदीतं सत्पात्र परीक्षा दानयुग्म संगती कुरू। पंचमोध्याये संपुर्ण समाप्त। वोवी संख्या ।।१९५।। येकषे प( ं )चा.।।छ।।छ।।छ।।

* * *

# सुमतिप्रकाश

## षष्ठ अध्याय

। ॐ नमो सीधभ्ये। श्री वीतरागाये नमः।

नमो ज्याचे नाम सर्व प्राणी। पोहचले स्वर्ग मोक्षाचे पेणी[१]।
ज्याचे नामे सुख त्रीभुवनी। आद्यापि चाले आक्षेय।।१।।
जे पंचम काळी आकळ[२]। आसोनी पावे या जगा बळ।
परी जग बोलताती नीर्फळ। कुदेव नाम घेती पै।।२।।
मीथ्या जन मानीती वैऱ्यापरी। देव त्यासी पाहे सज्जेन परी।
सुदेव प्रतीमा सोडुनी दुरी। कुदेवासी पुजीती।।३।।
जेगा लागले खोट काळी पिस। परी देव न सोडी ईमानास।
आरीहंत नाम पावे जगास। हे मीथ्यातासी न कळे।।४।।
ज्याची आक्षय पंच कल्याणीक। होताती वीदेह क्षे(त्रे) देख।
तेथ आखंड दीसे त्याच मुख। नमन माझ त्या देशी।।५।।
तीर्थंकर नामच सर्व ठाई। घेउन ह्मणती हे देव नाही।
तेच आंधळे जाले मीथ्या देही। हे काळ पीस लागले।।६।।
ऐसा तो देव जीनेंद्र योगी। त्याला कवी धरी हृदये भांगी।
हे कथा सुमती वसे त्या आंगी। तोच सीद्धी नेतसे।।७।।
सुमतीप्रकाशे सुप्रभात। श्रोते हो ऐका कर्णमुखात।
मग सुख होये जेन्मो जन्मात। पुण्ये आपार (द्या पै)।।८।।
सद्गुरु वचने दुकान केला। कवींद्रसेवक बैसे मांडुन।
श्रोते हो सवदा घ्या भावद्रव्यान। तोटा न होये या जेन्मी।।९।।
हे न होये तोट्याती रकम। श्रवण हा जन्म नफा उदीम।
यानेच पुर्वी पावले वीश्राम। श्रीणीकादी आसंख्या।।१०।।

१. टप्पा, मजल, मुक्कामाचे स्थान. २. अकल्य, अगम्य.

श्रवणे होये तीर्थंकर गोत्र। श्रवणे होय तीर्थ पवीत्र।
श्रवणे चुकती दुःख येत्र। व्हावे सावध श्रोते हो।।११।।
सावध आसावे जीनभजनी। जागा व्हावे आज्ञान रजनी।
सावध करी जीवा समाधानी। हे धरा मनी श्रोते हो।।१२।।
जीव रक्षेक माथा योगेश्वर। प्रधान बोले तयास उत्तर।
ह्मणी सांगा कोनता धर्म थोर। कोठे आहे तो संगती।।१३।।
तो कोठ राहतो कवणे घरी। तो कैसा पाहावा या नजेरी।
तो जीवासी तारी कवणे परी। हा आर्थ सांगा सद्गुरू।।१४।।
पुर्वी कोन केला को प्रसन्न। त्याचा स्वरूप कोण्या गुणे।
तो नीघाला कोणाचे मुखीऊन। हे सांगा जी सद्गुरू।।१५।।
धर्म नाही ते ठीकान कोन। आधर्म मी वळखावा कैस्या गुने।
धर्म नाहि ते देव गुरू स्थान। सांगा वीर्वन[१] याचे पै।।१६।।
हे ऐकोनी पापत्येक्त राजा। मग खदखदा हासला पाहुन प्रजा।
ह्मणे धर्मफळ जाले देस काजा। वृथा प्रश्न करीतु।।१७।।
सर्व ह्मनती व्हये व्हये खरे। प्रत्यक्ष लोक सुखी जाले फार।
या दशे वर्शात सुंदराकार। देश दीसु लागला।।१८।।
जधी राजेश्री हे आले या वनी। जधी भेटले येथ हे मुणी।
जधी[२] हारण सोडीले या वनी। तधी[३]च धर्म देखील।।१९।।
जीवहिंसा मना करा ह्मनुन। हे वचने ऐकीले राजेश्रीन।
जधी ज्ञानपुरा आले परतुन। तधीच धर्म देखीला।।२०।।
दुसरा दीन नीघालेवरी। बोलाउ पाटवीले घरोघरी।
जधी लोक मीळाले कचेरी। तधीच धर्म देखीला।।२१।।
ते कुसन्यासी मनी भ्याले सर्व। जधी प्राथःकाळी पळुन गेले।
परी राज्याश्री काहि न बोले। तधीच धर्म देखीला।।२२।।

१ विवरण. २. जेव्हा. ३. तेव्हा.

यक हजार सप्त आधीक। कागद लीहीले आर्थ श्लोक।
जधी दया पाळा वदले मुख। तधीच धर्म देखीला।।२३।।
पत्रे आंगीकार केलि देशात। जे होते कुबुधी ते जाले संत।
जधी हींसा गेली अथाकांत[१]। तधीच धर्म देखीला।।२४।।
हींसीकाची जाली काळी तोंड। कुदेवता पळाल्या बारखंड।
जधी कुशास्त्र हारपल सेंड[२]। तधीच धर्म देखीला।।२५।।
लघु खेडी याची जाली पाटन। मीथ्या कंटक तुटले वन।
जधी दया बाग लागले जान। तधीच धर्म देखीला।।२६।।
येथील वनाम(धी) भयानक। येथ रात्री येती नर बाळक।
जधी गीरी जाला जीवरक्षक। तधीच धर्म देखीला।।२७।।
पाहाता या माळव देशा वनी। कोठ दुःखी नाही प्राणी।
तधी जीनशास्त्र ऐकील काणी। तधीच धर्म देखीला।।२८।।
सर्वरहित बोली जाल्यावर। प्रधान बोले मुख आक्षेर।
ह्मणे हे पाहीले म्या नजेर। परी मी इछी शास्त्रार्थ।।२९।।
श्रवण राजेश्री ती नीत्य। परी मी कधी नाही येत येथ।
माझी मणसा[३] होउ द्या तृप्त। करी आर्जव राज्यासी।।३०।।
सर्व ह्मणती बहुत बर। राजा ह्मणे आह्मी ऐकु सादर।
वीनती मुनीची थोर। सांगा आर्थ धर्माचा।।३१।।
मुनी वदे नृपसेवका। पुर्वी धर्म पाळीला पुण्यसीलोका[४]।
धर्म नीघाला तीर्थंकर मुखा। ऐक कथा तयाची।।३२।।
दशलक्षेण आदी करून। धर्म सांगती मुनी वचेन।
प्रधान करीता जाला श्रवण। लोकासहीत राजेश्री।।३३।।
जो धर्म मानीती कुळकर। जो धर्म सांगीतला तीर्थंकर।
तो घाला प्रधान कानावर। लोक ऐकती राजेश्री।।३४।।

१. ज्याचा तळ सापडत नाही अशा अंताला. २.एक प्रकारचे कडू फळ. ३. मनीषा, मनोरथ.
४. पुण्यश्लोक, ज्याची कीर्ती पवित्र आहे असा.

जो धर्म केला चक्रवर्तीन। जो धर्म औ(ऐ)कीला नारायेण।
जो ऐकीला नव प्रतीहारीन। औ(ऐ)के प्रधान राजेश्री।।३५।।
जो धर्म केला कामदेवाने। जो ऐकीला नारद रुद्रान।
जो केला देव मातृ पीत्यान। ते ते श्रवण करीती।।३६।।
जो धर्म मानति ईंद्रादीक। ज्या धर्मेजन्म जाले पुण्यश्लोका।
ज्याचा उद्योत पडला त्रैलोका। ते ते श्रवण करीती।।३७।।
जो केला चेतुर्थ काळी मुनीन। जो त्या काळी पाळीला श्रावकाण।
ज्या धर्मेनवनीधी उत्पन्न। ते ते श्रवण करीताती।।३८।।
जाहा महापुरान संधी। धर्म कथीला होता मुनी बुध्धी।
तो प्रगटार्थ सांगती शुध्धी। राजा प्रधान ऐके पै।।३९।।
जो होउन गेले आतीत काळी। जो धर्म जाला वर्तमान वेळी।
जो होनारा अन्या गतकाळी। मुनी वदे प्रधाना।।४०।।
ऐसी जे श्रावक धर्माची रीती। ज्या पुराणी होति केवळमंत।
त्याचे पद समास सर्वेआर्थ। मुनी वदे प्रधानासी।।४१।।
ज्यात वाग्देवी मुख जोडाक्षरे। ज्यात सर्व पुरान आर्थ थोर।
ज्यात वरदाईक साराक्षर। ते ते मुनी बोले पै।।४२।।
उत्तम क्षेमादी ब्रह्मचेर्या। धर्म सागीतला धर्मश्चार्ये।
ह्मणती हा धर्म केवळसुर्ये। जोडी संगती प्रधाना।।४३।।
प्रधान ह्मने जी मम धणी। प्रश्न करीतो येक वचेणी।
या धर्माचे मुळ कोन कथा। मज सांगीजे वीवळ[1]।।४४।।
या धर्माचे मुळ ह्मणीजे दया। दया तेच होये हो सत्क्रीया।
दया तेच सर्व जीवाची छ्याया। हेज(च) बीज धर्माच।।४५।।
धर्म मुळ आरीहंत। धर्ममुळ सद्गुनी ग्रंथ। धर्ममुळ
जीन शास्त्रार्थ। हेच बीज धर्माच।।४६।।

१ विवरण करून.

धर्ममुळ च्यार संग दर्शन। धर्ममुळ सम्यक्त उत्पन्न।
धर्ममुळ दया आसावी मणी। हेच बीज धर्माच।।४७।।
दयेन सर्व भरावे मन। दयेन सर्व भरावे हृदये।
दया सुगंध आंगी चर्चेन। संसारी वागावे।।४८।।
दया असावी सर्व मुख्यात। दयेचेच करावे होठ दंत।
दया आसावी सर्व आंगात। मग संसारी वागावे।।४९।।
दया वस्त्र ल्यावे आळंकार। दया तुरंगावर व्हावे स्वार।
दया जव(ळ) करावे णगर। मग संसारी वागावे।।५०।।
सर्व दयाचे करावे मंदीर। दया द्रव्याचा करी व्यापार।
सर्व सत्क्रीयेचे करी स्त्रिपोर[१]। मग संसारी वागा।।५१।।
जीन धर्म करावा सोयेरा। नेमव्रत भाव आणावा घरा।
यासी सम्येक्त करी उपच्यारा। मग संसारी वागावे।।५२।।
दया करी छेकाया जीवावरी। दया करी आती दुर्बळावरी।
याने जानी परक्षुधा आंतरी। हेच रूप धर्माचे।।५३।।
सर्व दया सावरोन आंतरी। भाव धरावा जीन पुजेवरी।
या भावे श्री सद्गुरु नमस्कारी। हेच रूप धर्माचे।।५४।।
दया आनुन करी संघार्चण। दयेणे पाळावे सम्यक्त गुण।
याने जाली जीव आजीवपण। हेच रूप धर्माचे।।५५।।
दुःखीयाची करावी सुखी काया। हींसीकासी सांगावी सर्व दया।
दोषीक वस्तु वर्जी आवक्रीया। हेच रूप धर्माचे।।५६।।
आपल्या सारीखा दुसरा जीव। दया आणुनि वोळखी सद्भाव।
चीती न धरी पंच मिथ्या देव। हेच रूप धर्माचे।।५७।।
नेमीकासी द्रव्य आर्पी फार। कर्जासाठी कष्टी न करी थोर।
बे उदम्यासी[२] लावी व्यापार। दया ह्मणीजे या नाव।।५८।।

१. बायकापोरे, परिवार. २. व्यापारधंदा नसलेले, बेकार.

न कळता  कपटी लोकाण। साधु वर आनल दुशेन[१]।
जो त्या साधुसी कळी(री)  पाळन। दया ह्मणीजे या नाव।।५९।।
की कोण्ही सतीस घालीता आळ। त्या दुःखे जो होये कळकळ।
थोरपन तीचा करी सांभाळ। दया ह्मणीजे या नाव।।६०।।
जो कोण्ही पुर्व पापे करून। संसारी पडला दरीद्रपण।
त्यासी आपुले हाते करवी दान। दया ह्मणीजे या नाव।।६१।।
की सेवके सदनी केली चोरी। तो कोण्हे (ए)क दीनी धरीला करी।
त्यासी न मारीता सोडी बाहेरी। दया ह्मणीजे या नाव।।६२।।
जो परदुःखासाठी रडे मनी। क्षुधार्तासी तृप्त करी भोजेनी।
जो परदेशा तृशाथ्या (षार्ता) पाजी पानी। दया ह्मनीजे या नाव।।६३।।
जो आंगी आसोन श्रेष्ठपना। दुर्बळाचा आत्यंत करी मान।
त्यासी कार्यार्थी होये प्रसवण[२]। दया ह्मनीजे या नाव।।६४।।
कोण्ही व्रत घेउन टाकु पाहे। यासी द्रव्य देउनी लावी सोये।
जो धर्मकामि हाजर होये। दया ह्मनीजे या नाव।।६५।।
जो सर्व लक्षे चौऱ्यासी योनीसी। दुःख न होये ऐसे ईछी मनासी।
ज्याचे हिंसा न ये कधी स्वप्नासी। दया ह्मनीजे या नाव ।।६६।।
जो परायाची नींदा न करी। आपुलि नींदा ऐके कानावरी।
जो मनी न धरी वैर परी। हे दया वसे त्या आंगी।।६७।।
जो द्रव्य खर्ची कोटीवत् नाना। आसंख्ये पुण्य करी आर्चेना।
जो मुख न काढि थोरपना। हे दया वसे त्या आंगी।।६८।।
ज्याला स्वप्नी दीसे देवपुजा। ज्याला स्वप्नी दिसे धर्मराजा।
ज्याला स्वप्नी दीसे सद्गुरुराजा। हे दया वसे त्या आंगी।।६९।।
जो दयेसाठी हाजारो येत्न। करोणी रक्षी जीवाचे तन।
जो दुःखासी दे आभये दान। पुण्य धनी तो येक।।७०।।

१ दूषण, ठपका.   २. उत्पत्ती.

की जैसे सुर्याआंगी ते(ज) फार। की वृक्षी दीसे पाला आपार।
की समुद्री पानी आथाक थोर। यापरी दया जोडीजे।।७१।।
की जैसी पृथवी आसंख्यात। ईंद्रादीका न कळे गनीत।
ऐसी दया आसावी हृदयात। हेच मुळ धर्माचे।।७२।।
की भुमीकंदि आनंत जीव। याची गनीत[१] जाने जीनदेव।
तैसी दया धरी हृदये धाव। हे मुळ धर्माचे।।७३।।
की जैसी समोशरनी जीनेंद्र। ते देखो संतोष होती ईंद्र।
तैसी दया हृदयात आसावी। हेच मुळ धर्माचे।।७४।।
जैसा पाउस भीजवी भुमीस। की सत्पात्र[२] तृप्त करी दात्यास।
तैस दयेत भीजवी मनास। हेच मुळ धर्माचे।।७५।।
ऐसीया सर्व दयेकरून। येका जीवाचे केले रक्षेण।
त्याला सुवर्णगीरी तुल्य दान। जोडे जाणा येह लोकी।।७६।।
ऐसी दया करीता जीवावर। त्याला उद्यापण घडे आपार।
त्याण सुखद्रव्य जोडी थोर। पार नाही पुन्यासी।।७७।।
कींचीत् दयेचे ईतुके पुण्य। जो सर्व दया पाळे प्रतीदीन।
तो आंतरी स्वर्गीच पेण[३]। करून जाये मोक्षासी।।७८।।
हे दया ऐसे शब्द आक्षर। जो मुखे उच्चारी येक वार।
तो रोज न्हाला सीध्धक्षेत्री सार। वपु पवीत्र होतसे।।७९।।
जो आनंत दयेचा पाळक। त्याचे स्वर्गेंद्र होती सेवक।
ज्याचे दर्शणी हरे शोक भुक। पावन जेन्म दयाचा।।८०।।
दया शेब्द हे ऐकता कानी। त्यान शत देखीले मुनी नयेणी।
त्या दीनी लाभ होये मनो पुर्ण। हींसा दुर जातसे।।८१।।
दयावंताची करीता चाकरी। तो मोहरे[४] न पडे पापपुरी।
त्याची केल्या कर्माची तुट दोरी। तो पुण्य गावा जातसे।।८२।।

१. गणना, संख्या. २. उत्तम पात्र३. टप्पा, मुक्काम. ४. पुढे, समोर.

दयावंत पुरूशा जाता शरण। त्याचे पळती दुःख हिंसा गुण।
त्यासी भगवंत होये प्रसन्न। हेच ठीकान धर्माचे।।८३।।
दया सत्य धर्म वृक्षाचे मुळ। दया धान्य धर्माच बी सकळ।
दया धर्मवस्तीचे देउळ। दया धर्मासी वाढवी।।८४।।
दया माये[१] धर्माची कोमळ। दया पोटी नाही पापमळ।
दया धर्मबाळा वाढवी बाळ। खेळ दावी सुखाचे।।८५।।
दया वस्ती धर्माचा संदुक। त्यात वसे रत्नत्रये कनक।
दया संगती चाले वीवेक। देया खेळवी धर्मासी।।८६।।
दया स्वधर्म वृक्षाचे पानी। दया सत्क्रीयेची करी लावणी[२]।
दया भेटवी सध्धर्म धनी। दया ऐका श्रोते हो।।८७।।
दया दुध वीवेक वीर्जण। नीवृती रवी करी घुसळण।
धर्म नवनीत काढे मन। हे सर्व खेळ दयेचे।।८८।।
दया कामधेनु धर्म वच्छ। ईच्या कासे[३] वाढे सरस।
हा बैसोनी ने पुण्यतीर्थास। जीव सुखी याच्यावरी।।८९।।
दया शब्द पाहाता दीसे दोन। परी हे त्रैलोका करी टेंगण[४]।
धर्म रक्षे पोसी वीशाळपन। जीवा बसवी त्या खाले।। ९०।।
ऐसे दयेसहीत धर्म सर्व। जोडुनी घ्यावा आपले जीव।
हाच तीसरा संगती बांधव। करी सुखी जीवासी।।९१।।
या कायामंडळी जीव येकला। धर्म संगत होता चढे मोला।
हा यासी करी परमात्म तोला। सुख कचेरी वसवी।।९२।।
हा धर्म जीवाचा सहोदर। दुःख समुद्रातुन काढी वर।
हा नीजवी सुख पलंगावर। बैसे राखन उशासी।।९३।।
धर्म जीवाचे सुख माहेर। नीवृती बोळवण करी सार।
संग सामोग्री दे वीवेक थोर। आदर दावी मोक्षाचा।।९४।।

१ माता. २. लागवड. ३. आचळ, स्तन, आश्रय. ३. आधार.

जीव पीडला कर्म दरीद्रान। धर्म त्यासी दावी दया ठेवन।
मग क्रीया द्रव्ये करी दुकान। सुख सवाई मेळवी।।९५।।
जीव धर्माचे घरी सोयेरा। धर्म सुख सोहळा दावी बरा।
याचे कर्म गरमीस घाली वारा। करी सावध मनासी।।९६।।
जीव पाव्हणा धर्म करी वस्त्र। लोकासी सांगी याचे कुळ गोत्र।
सुसंग चाले बोलवीत तत्र। मोक्षे सुख दाखवी।।९७।।
जीव आहे पशु जेन्मआज्ञान। धनी करी याचे रक्षेन।
यासी सुख चारा घाली जीवन। बांधी खुटा क्रीयेचे।।९८।।
जीव चंद्रा आडवा कर्म बळी। हे आज्ञान राहो दावी काजळी।
यासी धर्मध्यान करी उजळी। पुर्ण दावी परमात्मा।।९९।।
धर्म जीवाचा मोठा उपकारी। तो नसति वस्तु पोहचवी घरी।
जीवासी न मरू दे क्षुधाभरी। मेल्या संगती जीवाचा।।१००।।
धर्म जीवाच चुनगंची घर। पापाग्नी भयास पळवी दुर।
जीवासी दाखवी नीजाक्षेर। पुर्ण करी नीजरूप।।१।।
जीवा काळव्याघ्र भक्षु पाहे। जीवासवे चाले धर्मसीव्हे।
धर्म जीवासी करी नीर्भय। दावी सोये मोक्षाची।।२।।
जीव परदेशी फीरे योनी। हींडता याला जाळी कर्म आग्नी।
त्याला धर्म लावी औषध पाणी। करी नीर्मळ जीवासि।।३।।
धर्माण सुखी कायापुरी। धर्म दावी स्वर्ग मोक्षे पारोरी[1]।
धर्म होय जीवासी साहंकारी[2]। जोडी धर्म प्रधाना।।४।।
धर्म जीवाचा आत्यंत सखा। जीव आज्ञाणा घास घाली मुखा।
वृध्धपनी सेवा करी सुखा। दावि सुख शास्त्राचे।।५।।
धर्म जीवाचे नेत्र विशाळ। याने दीशे त्रैलोक्ये भुमंडळ।
हा आकळ वस्तुसी दावी बळ। आत्मसुखी बुडवी।।६।।

१. आठवण, स्मरण. २. सहकारी.

धर्माचे उड्डाण फार थोर। पलक्षात[१] दावी स्वर्गमंदिर।
सेवेसी लावी देवांगना सार। सुखरूपात नीजवी।।७।।
धर्मबीज उतावळा भारी। पलक्षात ईंद्र जेन्म शेरीरी।
त्याच वेळी आवधीज्ञान करी। धर्म उंची सर्वस्व।।८।।
धर्म कारागीर मोठा गुणी। स्वर्गि रत्नमय दावी अवणी।
तैसीच रचना समोशेरनी। करून ठेवी जीवासी।।९।।
धर्मायेवढा कोण्ही दान दाता। जीवासी नाही याया पृथवी तुता२।
धर्माचे आंगी आनंत सत्ता। तोडी गुंता कर्माचा।।१०।।
धर्म जीवाच बरकत[३] केण[४]। धर्म जीवाचे आक्षेय नयेन।
धर्म जीवाचे आक्षेये काण। कच्ची उपमा या नाही।।११।।
धर्म करी आवघड कार्य। धर्म जीवाचा उजेड सुर्य।
धर्म नवनीधी रत्न भोये[५]। कच्ची उपमा या नाही।।१२।।
धर्म वसवी शीवपुरी भाग। धर्म चाले तीर्थंकर संग।
धर्म जीवाचा आक्षे रंग। कच्ची उपमा या नाही।।१३।।
धर्म जीवाचे कल्पतरू झाड। धर्म शास्त्रार्थाच चंदन खोड।
धर्म भुकेल्याचे आन्न पाड। करी तृप्त जीवासी।।१४।।
धर्माचे शाखा पल्लव महीमा। कवी त्यासी न कळे त्याची सीमा।
त्याचा आर्थ संपुर्ण उपमा। तो जाने येक केवळी।।१५।।
मुणी ह्मणे हो प्रधान राया। धर्म नाही घडला जोगी काया।
ह्मणोनी मांसाची लागली माया। मागती खाया राज्यासी।।१६।।
ते धर्माच चुकले वींदान[६]। ते पुर्वी चुकले दया कारण।
ह्मणोनी जाली भ्रमीस्त(ष्ट) मन। कृष्ण लेशा या नाव।।१७।।
त्याहास डसला मीथ्या तक्षेक। मन आंगा माया चढले वीख[७]।
ते नरक आयुष्ये जाले भक्षेक। कृष्ण लेशा या नाव।।१८।।

१. प्रत्यक्ष. २. ३. समृद्धी. ४. व्यापाराचा माल. ५. भूमी, जमीन.
६. निग्रह, लक्षण. ७. विष.

आनंतानंतबंधी कषाये सर्व। हे त्याही जोडीले आपुले जीव।
त्याही धरली कुसंगाची माव[१]। ह्मणोनी चीत्त आव्हाटे।।१९।।
त्याही हींसा केली आती फार। ते आधीच चुकले हिताक्षेर।
ते सर्व मीथ्यादृष्टी जाले फार। कोन आवरी तयासी।।२०।।
ते चरती वीषये राणात। ते चालले कुधर्माचे पंथ।
ते न ऐकति धर्म न्याये नीत। कोन आवरी तयासी।।२१।।
जो शद्गुरू वचना न मानी। बळेच पीतो मद्यपान पानी।
मग तो लोळे बीदडा[३] आवनी[४]। कोन आवरी तयासी।।२२।।
ज्यासी आंग नाही रत्नपारख। उदीम करू जाये देखादेखी।
तो मोते[५] ह्मनोनी घे फुके फीके। पैका बुडवी सर्वस्व।।२३।।
की वस्त्रे जुनि जाली जर्जर। कोण करी त्याचा नवा आकार।
तैसी त्याहाची पापी अंतर। केवी शुध्ध होतील।।२४।।
ते वीवक परीक्षा जाले हीन। ते कुशास्त्रासी ह्मनती हे रत्न।
ते धर्मबाजारी वीकता केन[६]। मोल न ये तयासी।।२५।।
जैसे कोळशा आंगी काळेपन। की चांभार दारी दुर्गंधी घान।
तैसे कुधर्मेपाप उत्पन्न। तो त्यागावा सर्वस्व।।२५।।
की आग्न भक्षेन करी सर्वासी। दया न करी दुर्बळ पुरूशाशी।
तैसा कुधर्म जाळे जगासी। लावी काजळ चीतासी।।२६।। की भुत जेन्मा
आंगी नाही पुण्ये। की स्वान वीष्टेत पडले दाने।
तैसे हिंसा आंगी सद्गुण उने। कुधर्म मुळ तयाचा।।२७।।
यासाठी न करावा कुधर्म। आधीच न चुकावे जीननाम।
नच लावावे कुशास्त्र उगम। धर्म वसवी मनात।।२९।।
कुधर्म उदीम तोट्याचे केन। कुधर्म जीवा दावी नरकपेन।
कुधर्म जीवाचा दुसमान[७]। करी खुन सत्क्रीयाचा।।३०।।

---

१. माया, कपट. २. आडवाटेला जाणे, भरकटणे. ३.खडबडीत. ४. पृथ्वी, भूमी.
५. मोती. ६. व्यापाराचा माल. ७. दुश्मन, शत्रू.

कुधर्म जीवाची सर्पिन माये। जन्मता दुःख करी त्याची काये।
कुधर्म उत्पन्न कुजेन्म होये। हे नाही सोये सुखाची।।३१।।
कुधर्म जीवाच खड्ग आसार[१]। हे न घ्यावे मारून आंगावर।
हे आसंख्ये जिवहिंसाचे घर। न करी पार दुःखात।।३२।।
कुधर्म जीव वृक्षाचा कोप। जेन्म संसारी न ये सुखझोप।
कुधर्म जीवाचा वैरी  बाप। हे दुःख रोप जीवाचे।।३३।।
कुधर्म पंचे मीथ्याताच मुळ। याचे पोटी जाली दोन बाळ।
कुमती आवीवेक हे युगळ। करीती खेळ दुःखाचा।।३४।।
कुधर्म जुंजात[२] जे मेले नर। तेच कुजेन्म जाले आवतार।
तेथे दुःख भोगीती नाही पार। तो जाने यक केवळी।।३५।।
कुधर्म जीवाची आग्नशय्या। आनंत जेन्मी दुःखी करी काया।
आसंख्यात मोहो वीखाची माया। नाही छाया सुखाची।।३६।।
हे कुधर्म कुबुध्धीच आळे[३]। यात आज्ञान लता पेरीता बळे।
त्यासी वाढवी चींता कष्ट जेळ। उपडी तोडी जीवासी।।३७।।
हा कुधर्म वाहाटुळ[५] पवन। सुखदिव्याची करी माळवन[६]।
जीवासी तम करी झाकी नयेन। कुगुण स्वप्न दाखवी।।३८।।
कुधर्म जीवाची आती उष्णता। सुबुध्धीसी करपवी दुःखा तुत्ता।
पंचमकाळी फार करी सत्ता। जाळी सळवी जीवासी।।३९।।
कुधर्म जीवासी करी शठ। नेउन दावी परदारवाट।
मग दयाधर्मासी होय तुट। दाखवि पेट नरकाचि।।४०।।
जो ऐशा कुधर्माची धरे गोडी। त्याचे पाई पडे आविद्या बेडी।
त्या दुःखे तो आत्यांत तरपडी[७]। हे परदेशे जीवासी।।४१।।
मुनी सुख कल्पवृक्षे फळ। आर्थ लोंबले घोश सकळ।
प्रधान लोक हृदयकमळ। पाहाती घेती विशष।।४२।।

१. असार, अहितकारक. २. झुंज, युद्ध. ३. झाडाभोवती पाण्यासाठी केलेले खोलगट कोंडाळे.
५. वावटळ, सोसाट्याचा वारा. ६. मालविणे, विझविणे. ७. तडफडणे.

पुढे मनशा तृप्त होयासाटी। सर्वेहि बैसले पर्वत नेटी[१]।
उघडोनी हृदये कर्णदृष्टी। मुनी पाहति भावार्थ।।४३।।
व्रती वदती धर्मव्याख्यान। संपुर्ण जाले संगती तिन।
पुढील आध्याई तप सद्गुन। ऐका प्रधान राजेश्री।।४४।।
नीते[२] श्रवनीक[३] श्रोते सर्व। तुह्मी ही आसु द्या पर्वती भाव।
होईल आर्थ ते करा साठवण।।४५।।
हा साहावा आध्या शडद्रव्यसार। हा आर्थ उमजे तो ज्ञानी णर।
तेच ह्मनावा श्रावक आंतर। करा आर्थ श्रोते हो।।४६।।
साहावा आध्या जैसे छेकाये जीव। ते मुनीश्वर पाळीती सर्व।
तैसा तुह्मी अक्षेरी धरा भाव। लघु दीर्घ जानीजे।।४७।।
साव्हा आध्या जेवि साव्ही लेशा। ते जीवासी घाली देव वंसा।
तैसा आर्थ श्रवणीक पुरुषा। करी नीर्मळ भावार्थ।।४८।।
साहावा आध्या तीसरा संगती। संपुर्ण जाला यथच युक्ती।
हे ऐकता पुण्ये पर्व जुटती। कर्म खुटती केली[४] पै।।४९।।
सुमती आर्थ आहे आंमृतवाणी। रोगी होतील बळकट प्राणी।
सुमती शेब्द सुमती काहणि। ऐका पवित्र श्रोते हो।।५०।।
सुमति आर्थ जेवि तीर्थस्नान। ऐकता कर्ममळ होय धुणी।
मीथ्यातासी होती सम्येक्त नयेन। होती कान सुशास्त्रार्थी।।५१।।
सुमती शब्द स्वर्गेंद्रासी[५] प्रीये। सुमति आर्थ भोगभुमी आर्ये।
सुमती शब्द भगवंत पाये। पाहा द्रुष्टिने श्रोते हो। ।।५२।।
सुमति शब्द वसे स्वर्गघरी। सुमती नाही मीथ्यामंदीरी।
सुमति वस्ती वीजयार्ध गीरी। पाहा नजेरी शास्त्राच्या।।५३।।
की सुमती आहे वीदेह क्षेत्री। तेथ आक्षय वसे मुनी नेत्री।
यथे आसे आरीहंत भक्त। आंत्री[६] पाहाने त्रीज्ञानाच्या।।५४।।

१. निकट. २. नित्य. ३. श्रवण करणारे. ४. नष्ट करणे. ५. दासी. ६. अंतरी, मनामध्ये.

येथे चतुर्थ काळी ईचा पुर। नीतळ[१] दिसे सर्वाचे नजेर।
आताहि कींचीत् लोकाचे आंतर। थोडी आहे श्रोते हो।।५५।।
जे मीथ्या कवीसी जाली प्रसन्न। तेन व्होये सुमतीचे लक्षेण।
ते ह्मनाव कुमतीचे कुगुन। पाहा केवळ द्रष्टीसी।।५६।।
कुमती कुआवधीची कन्या। हे जीवासी ने कुगती आरन्या।
तेथ घाली कपट वीवरी प्राण्या। मारी दुःखवी जीवासी।।५७।।
कुमती वसे पंच मीथ्यादळि। कुमती हींसा पाखांड जळि।
कुमती कुशास्त्राची करी गोडी। गर्भ आधासी दाखवी।।५८।।
कुमती जीवाचे दुःख हिवार[२]। आंगा चढता पुण्य जाय सार।
न करू दे सुखरूप आहार। मोहनी स्वप्न दावी पै।।५९।।
कुमती आवीवेकाची भगीनी। कुमती मीथ्या मळ्या घाली पानी।
कुमती आवदशेची ठेवणी। करी लावनी पापाची।।६०।।
कुमती फार गेली वीस्तार। हा पंचमकाळ तीचा सोयेरा।
तीसी मुळ[३] लाउन आणी घरा। करी चुरा जीवासी।।६१।।
कुमती पंच मीथ्याताची देवी। कुमती त्याहासीच सखी व्हावी।
कुमती त्याहासीच नरक दावी। हे न कळे पाप्यासी।।६२।।
सुमती या पाचाची कन्या होये। कुमती पाचाची ह्मणावी माये।
कुमती कुशास्त्राची सोये। दुःखी करी जीवासी।।६३।।
कुमती कुवासनेचे वेल। कुमती कुबुध्धीच बाव्हल[४]।
कुमति कुशास्त्राचा वाटे खोल[५]। मोल पावलि या काळी।।६४।।
कुमती सर्वेआंगे भ्रष्ट जाना। हे पंच मीथ्याताची आंगना।
हे पाचासी भोगी तृप्त मना। नाथ नाही ईयेसी। ६५।।
कुमती वैद्यासी दावी सोये। कुमती कुदेवतापासी राहे।
कुमती जीवाचे मोडके पाये। करी दुःखी जीवासी।।६६।।

१. स्वच्छ. २. हिम, थंडीचा कडाका.३. लग्न झालेल्या मुलीस आणविण्यासाठी पाठविलेला दूत.
४. बाहुले, खेळणे. ५.गूढ, गुह्य, गुपित.

कुमती उचलि लावा भोंडुन[१]। कुमती सर्पीन दुर द्या सोडुन।
कुमती जातीची माहारीन। नका आतळु[२] तीसी।।६७।।

जो श्रोता सुमती धरी मनी। त्याच्या कुमतीचा होये भनाना[३]।
ते सुमतीस भीते लक्षगुना। सम्येक्त चेक्षु करा हो।।६८।।

पुढील आध्यायी तप व्याख्यान। प्रधान लोकाहि लावीले मन।
कवींद्रसेवक बोले आज्ञान। सद्गुण ऐका श्रोते हो।।६९।।

सुमती वीधु[४] पीयुष्य[५] धारा। सुमती जन्म औशध लता पेरा[६]।
शोकुन[७] घेती मन आंगावर। सुध्यान पत्र[८] उगवली।।७०।।

सुमती स्त्रि होता गर्भधर। मनकुचात[९] दयाचीक भर।
प्रवसता(प्रसवता) सुखसंगती पौर। पान्हा पाजी खटकाया।।१७१।।

ईती सुमतीप्रकाशे कथायां पंचम काळी जीवरक्षेकाद्री।।
प्रधान पृछा यतीउचें ते दया सहीत त्रीतीये धर्मसंगती। कुरु
षष्टमोध्याये संपुर्णमस्तु।
वोवीसंख्या १७१।। सुभ भवतू। मीती माहाव[१०] सुधे ४।। रोज
मंगळवार।। छ ।।छ ।।छ ।।छ ।।छ ।।छ

* * *

१. भ्रमित करणे. २. स्पश करणे, आलिंगणे. ३. भणभणणे. ४. चंद्र. ५. अमृत.
६. पेरणी. ७. शोषून घेणे. ८. पाने. ९. मनरूपी स्तन. १०. माघ.

# सुमतिप्रकाश

## सप्तम अध्याय

ॐ न्नमो सीध्धभ्ये।। ।।श्री तीर्थंकर देवाये नमः।
नमो श्री पुज्यमान देवाये। ज्याचे नामे त्रैलोकी वीसावा।
जो दुसऱ्याचा न करी हेवा। सुमार्ग दावी जेगासी।।१।।
जे यक शेत आठ लक्षण। जे दीप्पे(प्ये)मान न वसे वेंजन।
हे ज्याच शोभती आंगी गहन। नमन तया देवासी।।२।।
ज्याचे गुणनाम आनंतानंत। ज्याला नाम आक्षये आरीहंत।
ज्याचे सहश्राष्ट नाम गातात। पंच कल्यानीके वेळी।।३।।
ज्याचे पद अंगुष्ठ न रवीकीर्णं। कोट्येवत् उगवले दिसती भान[१]।
ज्याच पाहोणी सर्व महीमान। ईंद्रादीक थंक्कीत।।४।।
ज्याला पाह्यासाठी सहस्त्र आक्षे। मुखेंद्र[२] करी आपुले आपक्ष[३]।
तेव्हा होय सर्वानंदाचा भक्षे। तो पाहे सांगी जेगासी।।५।।
जो तीर्थक्षत्राचा पती। त्याचे चरनी कवी करी आर्ती।
तोच सुमतीचा गुणपती। कथा चालवी सीध्धीसी।।६।।
कवींद्रसेवक बाळपण। सेद्गुरू माय सीकवी बोलन।
द्रीष्टीसी बांधी सुमती खेळन। आक्षरे पुष्प हालवी।।७।।
तोच शास्त्रार्थ दाखवी खेळ। तोच धुतो आज्ञान काजळ।
त्याची कृपा ते शीश्याच बळ। संशये सळ[४] जातसे।।८।।
सुमती कथा कुबेर सदन। श्रोत्यास शेब्दार्थ दावी गहन।
ऐकता घरी वाढे धन कन। आपाये तोडी होतसे।।९।।

१. सूर्य. २. मुख्य सौधर्म इंद्र. ३. अपेक्षा. ४. शल्य, सल, बोचणी.

सुमतीप्रकाश  हीतार्थ ठेवी। परी श्रोत्यास सुनेत्र व्हावी।
तो सुख जेन्म पाडे ठावी। कुचक्षु ते पाशाण।।१०।।
हे शेब्द पंचे मीथ्या पाशानी। आधीच न भेदती हृदयासी।
त्याला सुमती चव कळे कैसी। तो जेन्म आकार व्यर्थ।।११।।
तो मानवी आसोनी यकंद्रिये। त्याला नाही चेळन[१] शास्त्र सोये।
त्याला न दिशेती  आरीहंत पाये। तो दुःख भोगी जेन्मासी।।१२।।
यासाठी न व्हाव मीथ्या पाशान। न ऐकावे ते कुशास्त्र श्रवण।
न घ्यावा कुमंत्र कान फुंकुन। सुमती आर्थ पाहीजे।।१३।।
श्रोते हो जीनधर्म पंचेंद्रीये। होता दीसतील तीर्थंकर पाये।
या आर्थी पुण्यग्राम[२] लागे सोये। पाहा आर्थ चीतासी।।१४।।
श्रोते चीताचा करा ताजवा[३]। सुदेव मनी मोजावा।
धर्म कुधर्म तोलुन पाहावा। गुन उणा न घेईजे।।१५।।
ताजवा धरावा वीवेक करी। तेथे लावी जिनशास्त्र नजेर।
जो ज्ञान तोळ्यासी उनाभर। तो टाकावा सर्वच।।१६।।
जो सद्गुनाचा पुरा तोल। ज्यात जीवकार्येआधमोल।
जे केवळज्ञानार्थ रत्नफल। तो सवदा[४] घ्या श्रोते हो।।१७।।
या उदमासी नाही तोटा कारा। याने फीटेल कर्म्म रून[५] थोर।
या नफ्यान भरे जीवाचे घर। आनंद पुरा दीसे पै।।१८।।
याने फार जाले भाग्येवान। हे फाराची मनसा करी पुर्ण।
परीक्षा सारीखे आनीक रत्न। नाही जाना जीवाची।।१९।।
पारखे आसावि सम्येक्त तेज। तेव्हाच सीजे[६] जीवाचे काज।
मग दया उदकी चीत भीजे। स्वधर्म वाढे जीवाचा।।२०।।
कथा ऐका जीवरक्षक ठाई। प्रधान कर जोडी मुणी पाई।
ह्मने जी तु धर्मोपदेश आई। तप संगती सांगाव।।२१।।

१. चलन, हालचाल.  २. पुण्याचा साठा.   ३.तराजू.  ४. सौदा, माल. ५. ऋण, कर्ज.
६. सिद्ध होणे, पूर्ण होणे.

स्वामी सांगा तपाच लक्षेन। ते कैसे पाळावे कवण्या गुण।
ते जीवासी काये करी उत्पन्न। संगती दावा आह्मासी।।२२।।
तो चवथा संगती होयासाठी। तुह्मी धुंडा पुराण धर पोटी।
शेब्दार्थ त्याला दाखवा द्रुष्टी। श्रवनी धरू तयासी।।२३।।
चाऱ्ही संगती करा येक ठाई। संतोशे उपजे जिव देही।
आह्मी पडलो मीथ्या आपाई[1]। हा उपाव उपदेशी।।२४।।
तुह्मी आमचे मायेबाप मुनी। संगती चउकडा[2] घाला काणी।
मग आह्मी जाउ श्रावकजेनी। हे भुशेण तुमचे पै।।२५।।
तीन संगती ह्रदये मंदीरी। वाट पाहाती तपाची नजेरी।
ते भेटवा आह्मा सज्जेन परी। नेउ त्याहा नीज ग्रामी।।२६।।
मुनी वदती प्रधान बाळा। तव शेब्दाचा येते कळवळा।
मी सांगतो तयाचा सोहळा। चीत ठेवी नीज चीती।।२७।।
तु पुरान आर्थी लावी चीत। मीथ्या संशये न ठेवी मनात।
हे संशये श्रवण करी घात। दुर सोडी तयासी।।२८।।
मीथ्या संदेह श्रोत्याचे मनी। खोटी भाशे जीनशास्त्र कथनी।
तो मुळिच आंधळा ज्ञाननयेनी। कैसा दीसे जिनसूर्ये।।२९।।
की आज्ञान बाळ खेळेती आंग। चुना सेलोटी[3] करीती ढीग।
त्यात येक बोले संदेह संग। उजळ दोन्ही दीसताती।।३०।।
की शाई आसी नीळ जीवन। भरून ठेवीता वाट्या दोन।
तेथ संशये पुरूशे लावी नयेन। तो नीळ ह्मने दोहीसी।।३१।।
की रूपया पोटी तांब्र सार। वर्तेकींचीतु दीशे रुप नजर।
तो संशये पुरुशे ह्मणे आंतर। हे तांब कैसे ह्मनावे।।३२।।
की आती वीशईक पापी प्राणी। कार्यार्थी भोग करी नीच योनी।
मग कींचीत् प्रस्तावा माने मनी। संदेह वस्तु या नावे।।३३।।

१. अपाय, संकट. २. पुरुषांचे एक कर्णभूषण, चार मोत्यांचा समूह. ३. निवडक.

याजकरीता संशय संगती। जवळी नसावा तो मदमती[१]।
जवळ करी सम्येक्त पध्धती। तो श्रोता पावे शास्त्रार्थ।।३४।।
प्रधाना मनी नाही संदेह। परी मुनी बोलती सर्वी सोये।
जैसा पीता पुत्रा दावी उपाये। उदिम करवी हीतार्थी।।३५।।
द्या(द्वा)दशे भेदाचा मुगुट मुनी। जे तप पाळील केवळ मुणी।

(यापुढे पत्र क्र. ४ ची डावी बाजू पूर्णपणे फाटली असून फाटलेला अंशही उपलब्ध नाही. त्यामुळे ओवी क्र. ३६ ते ७४ (पूर्वार्ध) उपलब्ध नाहीत.)

वीस्मृर्ती राती लोळे आंगावर। पुण्ये वीषष वाढवी।।७४।।
सुतप जीवाचा पुत्र मेळा। पीत्यासी दावी पुण्ये सोहळा।
तापत्रई सेवा करीती बळा। सुख केळासी चारीती।।७५।।
सुतप जीवाचे मातुळघर[२]। सुख फुले वेणी घाली थोर।
ज्ञान धण आंदण दे ते सार। णीज मंदीरा पाठवी।।७६।।
सुतप जीवाचा हस्ती हवदा[३]। उत्तम जीवा चढवी पदा।
सत्क्रीया सैन्य दावी संपदा। सुखमंदीरा नेतसे।।७७।।
सुतप जीवाचा दाता भोळा। जीवासी दान दे स्वर्ग राउळा[५]।
सेवटी दावी मोक्षे सोहळा। सुतप करा सर्वस्व।।७८।।
सुतप सोनार फार चेतुर। देह नग[६] वज[७] घडीतो बरा।
मोल सम्येक्त मागे पदरा। दीर्घ आयुष्य देतसे।।७९।।
सुतप जीवाचा आमृत वैद्य। जीव कर्म रोग्यासी चारी सद्य[८]।
जीवासी सीकवी सुशास्त्र गद्य। दुःख पध्धत उडवी।।८०।।
सुतप संगती जीवाचा पुरा। उचलोणी नेतो भोग भुधरा[९]।
दशांग कल्पवृक्ष दावी बरा। भोगवी तृप्ती जीवासी।।८१।।

१. मस्तवाल. २. मामाचा गाव, आजोळ. ३. हत्तीवरील हौदा, अंबारी. ५. राजकुल, राजमंदिर.
६. अलंकार. ७. व्यवस्थित राखणे. ८. त्वरित, ताबडतोब. ९. पर्वत.

सुतप सुगरण या जीवासी। सत्क्रीया भक्षेवी आन्नरासी।
जीव मणसा[1] नीववी तृप्तीसी। सद्गुण ससी[2] वाढवी।।८२।।
सुतप जीवाची सुईण[3] सखी। तेल आयुष्य मर्दि[4] डोसकी[5]।
दुःख आंग रगडी करी सुखी। ममता दावी मोक्षाची।।८३।।
सुतप जीवी कारागीर मोटा। सदट[6] रची देह परकोटा[7]।
नीर्मळ करी भव जेन्मवाटा। दावी दारवंटा[8] मोक्षाचा।।८४।।
सुतप जीवाचा लोहार थोर। मणलोखंड[9] तावी[10] घडी सार।
करून दाखवी पुण्यप्रकाल। माघी सार भावार्थ।।८५।।
सुतप जीवाचा शील्पीक[11] पुरूशे। मनुकाष्ठ[12] खनीतासी सरस।
तनुचौपट[13] बसवि जीवास। दाखवी खास रत्नाची।।८६।।
सुतप जीवाचा पान्हीरो[14] नर। ज्ञानकुपी जीवन काठीवर।
हृदय रांजणी काठीवर। तृशा हरी जीवाची।।८७।।
सुतप जीवाचे श्रावक बाळ। जीवदया सांभाळी वेळोवेळ।
जाणे सुक्ष्म जीवाचे पुद्गल। रक्षन करी जीवाचे।।८८।।
हा जीव कर्म डाक(ग) लागी जाला। सुतपाग्नी जाळी हिन मळाला।
जीवास चढवी उंच मोलाला। जीवच शीव करी पै।।८९।।
तप सुवर्ण रत्नाहुन उंची। सुतप जीव आमराची[15] शची[16]।
कल्पतरू पुष्प लेववी गच्ची। जीव आंगासी नीववी।।९०।।
ऐसे सुतप आचेरण करी। सम्येक्त भाव धरा आंतरी।
हे जीवाची उपाव पायेरी। चढवी गीरी मोक्षाचा।।९१।।
मुणी वदे हो सेवक पती। संपुर्ण जाले चार संगती।

१. इच्छा. २. शशी, चंद्र. ३. बाळंतपण करणारी स्त्री. ४. मर्दन करणे, चोळणे.
५. (बो.) डोके, मस्तक. ६. गच्च, बळकट, मजबूत. ७. तट, किल्ल्याभोवतालची भिंत.
८. उंबरठा. ९. मनरूपी लोखंड. १०. रसरशीत तापविणे. ११. शिल्पकार.
१२. मनरूपी लाकूड १३. सोंगट्याच्या खेळातला घरे आखलेला पट.
१४. पाणक्या, पाणी वाहणारा. १५. देव (इंद्र). १६. इंद्राणी.

हे जोडोणी घ्यावे उपाव मति। करा संगती जीवाचे।।९२।।
हे सुतप न आचरले जोगी। ह्मणोनी जाले मांसा संगी।
न मीळता कष्टी होये आभागी। जन्म हीतासी चुकले।।९३।।
त्या जीवाही पुर्वी न केले पुण्य। न माणील सत्ये जीनदर्शेन।
त्यासी न घडले सत्पात्र दान। ह्मणोणी ते मीथ्याती।।९४।।
त्याही न केला पुर्वी दयाधर्म। ह्मणोनी ते जोडीती आवकर्म।
ह्मनोनी उद्योत ज्ञान श्रम। जाले तया चीतासी।।९५।।
ह्मणोनी जाले कठोर आंतरी। ह्मणोनी न दये तीचे घरी।
ह्मणोनी हींसा वसे त्या नजरी। न खाता पाप जोडीती।।९६।।
राज्योपदेश धरीला जेगाने। परी न धरी त्या जोग्याचे मन।
ह्मणोनी खोटे ते लक्ष कुगुण। न कर्ता पाप जोडीती।।९७।।
ते सर्व चुकले जीवाचे हित। ते मोहर[१] होतील जेन्मभुत।
त्यासी मीथ्या आज्ञान आला उत[२]। कोन सावरी तयासी।।९८।।
या देशात दया धर्माचे फळ। प्रतक्षे लोक पावले सकळ।
आती सुखाचे भोगीती सोहळे। हे न पडे त्याचे दृष्टी।।९९।।
या पंचम काळीचे आंतरी। धर्मपीकाची पीकली सरी।
हे न दीसे त्या पाप्याचे नजरी। कोण तारी तयासी।।१००।।
ते सर्व कुतपाचे जाले भोक्त ते कुशास्त्राचे ह्मणवीती वक्त।
ते सर्व स्वार जाले मीथ्या नक्त[३]। उज्येड केवि दीसे पै।।१।।
जे कुतप भजणी बैसले। तेच कुजेन्म मरणी मेले।
ते जीत्ताच जान सडले। कुतप वैरी जीवाचे।।२।।
आता ऐका कुतपाचे लक्षेण। जे पंच मीथ्याती करी जाण।
ते आचरता नफा जाय पुंण्य। करी उने जीवासी।।३।।
जे आंग ह्मनवीती सन्यासी। वृक्ष तोडोणी बांधी यहासी ।

१. पुढे. २. उकळी, कढ, माज. ३. रात्र

कंदर्पण करी भक्षणासी। हेच कुतप जाणीजे।।४।।
        ह्मणति बैसला आनुष्ठाणी। पंच कुंड पेटवीती आग्नी।
        आभक्ष खाये पे[१] आशुद्ध पाणी। कुतप याते बोलीजे।।५।।
छेकाये सत्वाचा न कळे भाव। मोवाकी[२] ज्याची तोडी फुल सर्व।
लोका ह्मणे पुजीला आह्मी देव। हेच माव[३] पापाची।।६।।
        चीत्ती नाही उपवास करण। मेहेमी[४] साठी बळकावी मन।
        रात्री स्वप्नी करी आन्न पारण। हेच कुतप बोलीजे।।७।।
उपवास करी येकादसी। नक्त जाल्या भक्ती रत्नाळासी।
त्या कंदात आसंख्ये जीवरासी। हे मीथ्यातासी न कळे।।८।।
        उपवास भावी पुर्ण मन। रात्री घाली नगर प्रदक्षण।
        परी  हींसेच्या न कळती खुणा। कुगुन तप हेच की।।९।।
उपवास करी सारा वीळ[५]। नीसी जाल्या भक्षी लाह्या केळ।
ते मणी सिध्ध हे ज्यासी न कळे। कुतप हे जानीजे।।१०।।
        वणी खातो वणफळ आजान। वेळोवेळ न कळे प्रमाण।
        स्त्री देखोन भ्रष्टवी मण। हे कुतप वळखावे।।११।।
जयासी नाही ध्यानास न ठाव। खोटी करीती पद्मासन माव।
वाया दवडीती आंग सर्व। कुतप खुन हेच की।।१२।।
        जो आपण ह्मनवी महापुरुशे। श्वान मार्जार जवळ पोशे।
        आपण कींचीत् करी उपास। कुतप ह्मणीजे या नाव।।१३।।
ह्मणे आज आह्मा हारी दीन। तडाग वापीकात करी स्नान।
त्यात आसंख्ये जीव मेले जाण। हे गुन ज्यासी न कळे।।१४।।
        गुनहीनाचे तप नीर्फळ। कुदेवी आराधी आंगबळ।
        जेगासी ह्मणे करा होमशाळा। उपास फार करी पै।।१५।।
आपण बैसे कुदेवीचे घटी। तो हींसीक वरता बोलावी मठी।

---

१. पितो. २. केळी, माड वगैरेंचा कोंब  ३. माया, मिथ्यामत. ४. मूत्ररोग (विषयोपभोग).
५. वेळ, काळ.  ६. (कुंड)

ह्मणे हे घाला होम संपुष्टीं६। कुतप याते ह्मणावे।।१६।।

मास पक्षाचे उपवास करी। भोग तृष्णा वाढवी आंतरी।
कुशास्त्र आर्थमुखी उच्चरी। कुतप हे जाणीजे।।१७।।

कुगुरू उपदेशी लावी मण। कुतप देह वीसर्जेण।
आज्ञान वदे मला आनुष्ठान। सुतप तेथे उडाले।।१८।।

करवाळवी[1] धरोनी वरी। सर्व आंग पोसी महीषापरी।
द्रव्ये देता पदर पसरी। सुतप तेथे उडाले।।१९।।

बाह्येचा टाकी सर्व परीग्रहे। आंतरी नग्न करी देहे।
सुंदर स्त्रि देखता चीत जाये। सुतप तेथे उडाले।।२०।।

उपवास करी कष्टी सायासी। दया न जाने पर जीवासी।
भजे नीत्य पंच मीथ्यातासी। कुतप तेथे उडाले।।२१।।

कुतप आचरता वाटे सोप। परी हेच जीवाचे काळ रूप।
हेच पडे पापाग्नीवर तुप। दुःख भडका पेटवी।।२२।।

कुतप बि(ज) पंच मीथ्याती पेरी। कुबुध्ध भुमीस उगवे सरी।
खोटा काळ मोणी[2] वर्षेणीरी। कुशास्त्र रोप वाढवी।।२३।।

कुतप पीकले रूईचे वृक्षे। जे जीव मीथ्यांध करीती भक्षे।
ते सुखमुखी सडतील पक्षे। होतील दुःखी शेरीरी।।२४।।

कुतप रस ज्या आंगी चढवीले। तेच आनंत जेन्मी दुःखी जाले।
ते कुयोणी कोंभ उगवले। पाप उष्मे करपती।।२५।।

कुतप जीवाचे कंटक वण। जेन्म आन्हवाणी होता गमण।
तेथ जीव होताती हयेराण[3]। कुकर्म काटे मोडती।।२६।।

कुतप वनी वाढल वीस्तार। कपट बाभळ हीरव फार।
तेथ हींसीक जीव वीस्तार थोर। देती मार दुःखाचे।।२७।।

कुतप मार्गी खडक गडदा[4]। जेन्म चालता आपटे सदा।

१. थोपटणे.२. ?३. हैराण, त्रस्त. ४. खड्डा.

भोगवी परदेश दुःख आपदा। कुतप वैरी जीवाचे।।२८।।
कुतप जीवाचे दुःख धुर। आंगा येता पडी भुमीवर।
जन्म वीदृप होये आसार[१]। करी कष्टी जीवासी।।२९।।
कुतप जीवाच भोगपाणी। पोटी पेता वेडा होये पाणी।
त्याला न सुचे हीत कार्येमणी। कुबुद्ध वीद्या चीवडी[२]।।३०।।
कुतप संगती जीवाचा वैरी। नेउन सोडी दुःख डोंगरी।
तेथ मारी तोडी करवी फेरी। झाडी टाकी जीवासी।।३१।।
कुतप सर्व दुःखाच वीवर[३]। जीवासी पाडी आज्ञान आधार।
आंगा डसवी वीष वीखार। सुजेन्मासी भुलवी।।।३२।।
कुतप कुभुसाची सांठवण। जीव भुकेल्यान निघती दाने।
कुतप जीवासी करी अमाण्ये। पुण्यमहिमा उडवी।।३३।।
कुतप समुद्र क्षार नीर। जीव तान्हेल्यासी दुःख करी।
हे जीवासी कडु आन्न चारी। मारी उपवासी जेन्मात।।३४।।
जीव आधीच पुण्ये भोंडा[४]। कुतप कांडीत बसे कोंडा।
तेथ न दीसे तांदुळ तोंडा। मग मणासी प्रस्तावे[५]।।३५।।
कुतप चीखली जे बुडाले। तेच नरकीचे पोषण जाले।
तेच आति दुःखांग भरले। नीर्मळ कैसे होती पै।।३६।।
कुतप बीबव्याचे तेल रंग। तवर पडताच सुजे आंग।
कुतप न फेडी जीवाचा पांग[६]। करी सोंग कुरूपी।।३७।।
कुतप आवक्रीया डोहात। जे प्राणी न्हाउन आले वर्त[७]।
तेच पापरोगी जाले भुत। वाट पुण्याची पाहाती।।३८।।
कुतप जीवाचा नीर्दय नर। नेउन दावी पंच मीथ्याध(घ)र।
पाचाचे भक्षवी आन्न आघोर। करी भ्रष्ट जीवासी।।३९।।
हे कुतप न ऐकावे काणी। कुतप न आचेरावी करणी।

१.असार, निरर्थक. २.विचका करणे. ३. बीळ. ४. ज्वारी, बाजरी वगैरे धान्यांचे फोलपट, निरर्थक. ५. पश्चात्ताप करणे. ६. चिंता दूर करणे, कृतार्थ करणे. ७. वरती

कुतप टाकावे मनातुनी। सुतप धरा जीवासी।।४०।।
संपूर्ण जाले सुख संगती। संपुर्ण जाले दुःख संगती।
मनास येईल ते धरा चीती। मुनी वदे प्रधाणासी।।४१।।
च्यार सुसंगती भावी ह्रदई। च्यार कुसंगति सोडुन देई।
ऐसी ज्याला कळे परीक्षा सोई। तोच सम्येक्ती जाणावा।।४२।।
च्यार सुखसंगती होयासाठी। याची युक्त सांगतो मी होठी।
ते प्रधान राया धरावी पोटी। लावा भाव तेथ पै।।४३।।
उत्तम श्रावक आणी श्रावीका। उत्तम येती आणी आर्जीका।
द्रव्य खर्चावे याहाचे सुखा। सुकृत जोड हेच की।।४४।।
जे शास्त्रार्थ आहेत च्यार दान। ते चव टाई[१] करावी आर्पण।
च्यार संघ पुन्ये रत्नाची खाण। सुकृत जोड हेच की।।४५।।
संघ जैसे दशांग कल्पतरू[२]। संघ माणावे समाण गुरू।
संघ जीवाचा थोर आधारू। सुकृत जोड हेच की।।४६।।
याहासी करावे आहारदान। याहासी चारावे औषध गुण।
याहाचे करावे आभये मन। दुकान हेच पुण्याचे।।४७।।
याहासी सीकवी शास्त्र सीध्धांत। हे च्यार दान जाना श्रोते मत्त।
हे भावार्थ दावी चव संघात। पुण्य सामोग्री हेच की।।४८।।
या ठाई वसुदेव दर्शेन। या ठाई वसती सत्पात्र गुण।
हे जानती दया धर्म लक्षेण। सदुन वस्ती हेच की।।४९।।
हे सुतप आचेरती आंग। हे सोडीती च्यार वैरी संग।
हे जीवास देती सम्येक्त रंग। आभंग पुन्ये हेच की।।५०।।
याहाचा करावा आदर माण। याहाचे वंदावे तीर्थ चरण।
यास ठाउक सुशास्त्र खुण। ठीकाण हेच पुण्याचे।।५१।।
याहाचे शरीर आती पवित्र। हे कस्मळासी करीती श्रुध्येंत्र[३]।

१. चार स्थानी. २. दहा प्रकारचे कल्पवृक्ष. ३.शुद्ध करणे.

हे चौ सुखसंग त्याचे सुत्र। हे पुण्यशत जाणीजे।।५२।।
याहासी करावा सज्जेनपणा। याहासी खर्ची कोट्येवत् धणा।
हे जीवासी वाटी सुख आन्ना। पुण्य महीमा हेच की।।५३।।
यासाठी वृत उद्यापन वेळी। च्यार संघ मेळवावे जवळी।
याहासी दान द्यावे करांजुळी। प्रकार च्यार जाणीजे।।५४।।
चेतुर्थ प्रकार चवघ जन। तृप्त करावी सर्वाची मण।
हेच पुण्यसंगतीचे ण्हान। संग चाले जीवाचे।।५५।।
जो चेतूर्थ दानी द्रव्य खर्चे। खर्चेपरी हेच मोहर वाचे।
हेच तारक संगती जीवाचे। भाव कर्तुत्व हे जाणी।।५६।।
येथ द्रव्ये न ह्मणावे गेले। हे चवगुण करी मुदलाले।
सत्पात्र दान सबळ फार पीकले। न करी तोटा धण्यासी।।५७।।
च्यार दान हेच पुण्ये वरुशे। परी पापी जीवा हेच आदृश्ये।
हेच संगती तारक जीवास। वळख धरी प्रधाना।।५८।।
हेच जीवासी चारी सुखान्न। हे भवसागरी नेती पोहुन।
हेच उगवताती पुन्य दीन। कर्ती उज्येड जीवासी।।५९।।
हे उद्योत जीवाचे आंगी नेत्र। ह्यो उज्येड दावी सम्येक्त सुत्र।
हे उज्यड दावी लोकाची नेत्र। हे चवघ जैसे सुर्ये।।६०।।
हे पुन्ये संगा आंगी नाही नीशी[१]। हे पदोपदी दावी रत्नरासी।
पुन्य जेन्मले तीर्थंकर वंसी। पुन्हा तारी जीव देही।।६१।।
हे प्रधान राये धिर्यसागरा। हे पुन्ये संगती धरी आंतरी।
यासी घेउनी जाई ज्ञानपुरा। नजेर तक्ती टेयी (ठेवी) पै।।६२।।
पुराण ठेवीले आवरून। हे संपुर्ण जाले च्यार दीन।
आध्या पुरा सातवा गहन। ग्राम जेनी ऐकीला पै।।६३।।
मुनी मुख भेरी आर्थ गर्जेना। वाजउ जाला सर्वाचे काना।

१.सीमा.

सुख संगति समस्ताचे मना। जडले जाना आक्षेये।।६४।।
मग सर्वेही केला नमस्कार। सर्वही करीती स्तुती सार।
सर्वेधरीती चेर्णादर[1]। नगरा जाउ बोलती।।६५।।
ह्मणती कृपानीधी मुनीराये। च्यार रोज क्रमीले याचं ठाया।
धर्मामृत प्यालो कर्ण काया। जाली छाया सुखाची।।६६।।
नीत्ते येत जाउ ऐसे वचेन। बोलति राज्यासहीत जेन।
सर्वही सोडीले ते ठीकाण। बाहीर दारा आले पै।।६७।।
गरगर उतरले तो गीरी। आले तळवट[2] वणांतरी।
सर्व स्वार जाले वहनावरी। सेवक पुढे धावती।।६८।।
नगारा वाजवीती खनखना। टाळ झांजा वाजा झेनझेना।
तैस्याच भेरीच्या होता गर्जेणा। सैन्या चाले थीरकतु।।६९।।
टणान् टणान् वाजति घंटा। धडधडाधड चालेती वाट।
गायेनकळा कळा बोभोट[3]। सैन्य चाले सरर्कत।।७०।।
वहनाआंगी घुंगरू पयेंजण। फडफड फडकति नीशान।
वैर न दावीती नयेन। सैन्ये चाली थीर्कत।।७१।।
भडभड आले गावखरा[4]। झरझर सीरले ज्ञानपुरा।
दनदन गेले राजे द्या(दा)रा। स्ववस्ती पोहचले।।७२।।
येथ प्रसंग जाला सातवा। मोहर आध्या आठवा।
त्यात सुठल कपटाचा गोवा[5]। होये वीसावा जीवासी।।७३।।
पुढील आध्याई हा प्रधान। राज्यासी सांगील मनची खुण।
सोडुण देईल राव हारण। नीर्मळ मन करील।।७४।।
ते कुजोगी करतील कपट। वीप्र भांडाया धाडीतील धीट।
ते जातील ज्ञानपुरा नीट। होईल वाद राज्यासी।।७५।।
पुढील आध्याई ह्या दोन कथा। सद्गुरू नेईल सेवट पंथा।
मीथ्या शब्दाचा होईल उलथा[6]। ते कथा ऐका श्रोते हो।।७६।।

---

१. चरणी आदर. २. तळाशी पायथ्याशी असलेले. ३. कोलाहल. ४. गावाची सीमा.
५. गुंता, घोटाळा. ६. उलटा होणे. पराजय होणे.

हा आध्या जेवी सातवे तत्त्व। हा साधु जेण मना लागे ममत्व।
तुटे खोट्या करणीचा संगत्व। सत्त्वच करील आक्षेये।।७७।।
कवींद्रसेवक आज्ञानी मणी। त्याला न कळे सुमतीची कथणी।
सद्गुरू दाविती आर्थ नयेनी। कवीत्व ठेव होतसे।।७८।।
जैसा कोण्ही पुरूशे पक्षीयासी। शेब्दाक्षर सिकवी सायासी।
तैसा मम सद्गुरू प्राकृतासी। आर्थ वदवी वीशेष।।७९।।
तो शब्द पक्षाचा की मनुशाचा। हा अर्थ पाहा श्रोते हो साचा।
तैसी हे कथा सद्गुरू वाचा। सेवक पक्षा लाभली।।८०।।
सुमती आर्थ औषध गुण। हे कुवासण उडवी दुःखण।
श्रोत्यासी करी समाधी पुर्ण। सीकवी गुण आपुले।।८१।।
सुमती गुण नाहीत वाईट। हे गुण आज्ञान जीवाचे पेट[१]।
हे गुन दावीती सुपुण्य वाट। संकष्ट वारी जीवाचे।।८२।।
श्रोते हो चला सुमतीमार्गाण। सुमती करवी सुदेव दर्शेण।
सुमती काडी सर्वेआवगुण। करी शाहाने जीवासी।।८३।।
सुमती श्रोत्याची परम सखी। श्रवण वीशेये वाढवि सेकी[२]।
जीवासी भुलवी ने मोक्षेसुखि। आक्षये स्त्रीसी चुंबवी।।८४।।
सुमती भोगी जे रमती नर। ते बीण धुतल्या शौश्च आंतर।
तो पावन करी पराचे पर। आप तरे हे चोज[३] नाही।।१८५।। छ।।
ईती श्री सुमतीप्रकासे कथा। या पंचम काळी सत्व आचेळ माथा।
प्रधान पृछा तपस्वी वक्षे सुतपाचेरण।। चेतुर्येसंगती कुरा। सप्तमोध्याये
संपुर्ण समाप्त।
कवीटू श्रोता आज्ञान। सके।।१८५।।
छ।।छ।।छ।।छ।।छ।।छ।।

१.पेठ, बाजार. २. सिंचन. ३. आश्चर्य.

# सुमतिप्रकाश

## अष्टम अध्याय

। ॐ नमो सीध्धभ्ये।। श्री गणधर धणीये[१] नम।।
जो पांडुक शीळेसी न्हाणार। ईंद्र घाली पंच सिंधु नीर।
ते पुन्हा वंदीती मस्तकावर। नमन घडो यासी पै।।१।।
ज्या संग बाळपणी ईंद्रादीक। खेळ खेळती होउन बाळक।
जो भोगी स्वर्गवासि वस्त्र सुक[२]। दीसो चेरण तयाचे।।२।।
ज्याचे आन्नासारीखे आन्नबीज। त्रैलोक्यात नाही जाना सहज।
जो भोगी पंच कल्यानीक शज[३]। युग्म उपमा कैसी।।३।।
ज्याचे आंगी बळ आसंख्यात। परी कार्येन करावी (वि)परीत।
सर्व जीवासी दावी धर्मनीती। सेवा घडो तयाची।।४।।
पाहाता दीसे चेतुर्थ काळ। कल्पवृक्षाचे भागी परीमळ।
जीवासी तारी आतीशये बळ। प्रसन्न होये सर्वासी।।५।।
ऐसा जो देव तीर्थंकर धणी। त्याला वीछीतो मी मनीच्या मनी।
तोच सुचवी कवीत्व जो उणी। सद्गुरु ध्याणी तोच की।।६।।
श्रोते हो ऐका कथा सुमती। प्रधाणे जोडीले सुख संगती।
फीरोनी आले नीज नगराप्रती। रात्र वीषयार्थी क्रमली।।७।।
युगुळ उगवला सुदीन। प्रधान नीर्मळ केले स्नान।
करू गेला चैताळ्याचे दर्शेण। करी स्तवन देवाचे।।८।।
नीश्चये नीश्चये ह्मणे हे देव। तव चर्णी वसो मम भाव।
म्या सोडीली जी कपटाची धामाव[४]। सत्य देव तुच की।।९।।

१. धनी, स्वामी. २. सुख. ३. शेज, शय्या. ४. अति उत्कट इच्छा.

जय जय जय श्री जीनपती। धन्ये धन्ये तु आलक्षे ज्योति।
तव दर्शेन उपजे सुमति। श्रेष्ठासी श्रेष्ठ सर्व तु।।१०।।
तु चेंद्र सुर्येसी उज्येड कर्ता। तु त्रैलोक्यीचा आक्षये दाता।
तुझी चाले आतीशय सत्ता। न कर्ता बाज्या[१] होतसे।।११।।
तव नामे पळताती वीघ्न। तव नामे फुटे कर्म पाषान।
तव नामे नवनिधी उत्पन्न। होये सुख जीवासी।।१२।।
तव नामे आष्ट मा(हा) सीध्धी होती। तव नामे ईंद्रादीक गाताती।
तव नामे तारक या जगति। होसी वीसावा जीवासी।।१३।।
तव नामे तरले आसंख्यात। मोहरे हि तरनार बहुत।
ऐसे बोलती गणधर मत। आहे आर्थ पुराणि।।१४।।
तव नाम तारी जळत्या वणी। तव नामे पडे कल्पीत पाणी।
तव नामे सर्व सीध्धीच मणी। पावसी जणी सर्वासी।।१५।।
हे चरणस्तोये[२] मस्तकी ठसो। हे चीन्मये रूप हृदई वसो।
हे मम वासना कुदेवी नसो। हेच देई जीनराया।।१६।।
सुटो कुदेव भाव उच्चार। जुटो तुव्ह नाम मुखी थोर।
घडो आष्ट वीधी पुजा सार। हेच देई जीनराया।।१७।।
नको नको पंच मीथ्याश्रवण। आसो आसो नीत्ये जीन कीर्तण।
पळो पळो लोक कुवासना कुगुण। हेच देई जीनराया।।१८।।
सेवा घडो सत्पात्र चवघाची। मीथ्या न वाटो फार उंची।
क्षाईक सम्येक्त बैसो गच्ची। करी कृपा जीनराय।।१९।।
हे मुखगत जाली गद्य परी। या वेगळे श्लोकबध्ध उश्चारी।
जे गीर्वाण काव्ये आर्थ भारी। करी स्तवन प्रधान।।२०।।
जीनग्रही आरीहंत वंदोणी। प्रधान गेला भोजेन सदणी।
तो जेवीला मीष्टान्न समाधाणी। शौच्च[३] जाला देह्यासी।।२१।।

१. बोभाटा, गवगवा. २. चरणोदक, तीर्थ. ३. शुद्धी, पवित्रता.

बाहीर येता वस्त्र सेवक। पान गंगेरी (?) भक्षीली मुखे।
सर्व साहीत्य घेतले सुख। चला ह्मने कचेरीत।।२२।।
संग लघु सेवक परीवार। तैसेच सज्जन पाटील थोर।
बोलत गेले कचेरी दार। श्रीमंत तक्ती देखीला।।२३।।
पापत्यक्त राजा उंचासणि। बैसला होता कचेरी स्थानी।
तेथ आधी होते लोक गुणी। सभा आत्यंत दाटली।।२४।।
तेथे सर्वीही जुहारला राजा। पाहुनि बैसले योग्य वोजा।
ते यकट दिसती जैशा प्रजा। राज्येसोभा लखलखीत।।२५।।
की तारांगणात जैसा चेंद्र। की आमर सभेत मुख्येंद्र।
की दळात गजे दीउ च्चद्र (?)। राजा शोभे तयापरी।।२६।।
परवतात थोर मेरुगीरी। लोकात शोभे जंबुदीपापरी।
की वृक्षात कल्पवृक्षे द्वारी। हा राजा शोभे तैसा पै।।२७।।
की कापडात रेसिमी घडी। कीस्त्रीनाशकी जडावटी कडी।(?)
की देउळी कळस परवडी। शोभा दीसे दुर्लभ।।२८।।
की सप्त धातुत उंची सोण। की राज्यात चेक्रवर्ती जाण।
की बारा मासात गुढ्याचा सण[१]। सोभा दीशे जनलोकी।।२९।।
पापत्येक्त आंग रत्नाकार। त्यावर ल्याले रत्नशृंगार।
दयामुद्रीका हालवीता कर। हींसा माशे[२] उडाला।।३०।।
सर्वांग चोपडे कींचीत् केशे। कपाळ पट्टी रूंद सरस।
युग्म कर्ण लाजवीती आयेन्यास। नीत्य ऐके जीनवाणी।।३१।।
कुरूंद[३] डोळे काळे बुबळ। नाशीक सुंदर दिशे वीशाळ।
भुजा डौल शुध्ध तारी बळ। जीवरक्षा करीतसे।।३२।।
गळा ईंद्राचा जैसा चउर[४]। न्याये साठवी नाभी उदर।
पोवळी स्तभ कंबराकार (?)। पुन्ये वेळी जेन्मलासे।।३३।।

१. चैत्र मास. २. ? ३. (लालसर). ४. (चवऱ्या)

की रूप चोवीस कामदेवाचा। तैसे आंग दीसे याच शौच्चे।
पंचम काळी धर्म पाळी उंच। करवी नीच मिथ्यात।।३४।।
अतीशये पुन्ये पुरुशाची कळा। कविसि न दीसे चर्म डोळा।
त्याचा आर्थ वर्णन सोहळा। आवधीज्ञानी जाणति।।३५।।
वरते आसो समर्थाची बुध्धी। मी श्लोक पाहुन कथीतो शुद्ध।
पंडीत कळार्थ वज्ञ(च)नबध्ध। हाच मी वदे श्रोत्यासी।।३६।।
ज्या आती वीशेइक नगर णारी। राज्यासी पाहताच त्वा आंतरी।
सर्वांग वाद्य मदन लहरी। पीशाश्च होती मणासी।।३७।।
तो राजा न लागे भामीनी हाती। त्या मणीचा मणीच प्रस्तावति।
उत्तम क्रीयेसी भ्रष्ट होताति। न कर्ता हे पाप जोड।।३८।।
परी तो राजा नाही शीळभ्रष्ट। याचे आंतरी येक पल गाट।
स्वस्त्रीसी मन होये जागवट[१]। सर्व रामा[२] मातेपरी।।३९।।
हा न पाहे कामभार कामिणी। हा वैराग्य ईछा वागवी मणी।
हा नीत्य राहे दया धर्म ध्याणी। करी खंड कर्माचा।।४०।।
ऐसा राजा दयावंत स्वरूप। प्रधान बैसला त्याच समीप।
बोलुनी घाला आंतर रोप। तैसे ऐका सर्व श्रोते हो।।४१।।
प्रधान ह्मणे श्रेष्ठ राजेश्री। मी मोठा कपट आहे मनीश्री।
तो आर्थ मी वदतो कचेरी श्री। चीत लावा सर्वही।।४२।।
तुह्मी थोर जीव सावद(ध) मणी। की तू धर्म साक्षा होता वणी।
लावीले सर्व जेग दया ध्याणी। सत्क्रीया बीज पेरीले।।४३।।
परी मीच होतो आसावध। आंतरी न होतो जालो शुद्ध।
म्या योजीली होती येक बुध्ध। ते ऐका राज्येश्री।।४४।।
म्या चोरून सेवकाच हाती। रावे[३] हारण आणिवलेति।
ते ठेवीले सर्व आंधार गुप्ती। मांसा भक्षु ह्मणोणी।।४५।।

१. जागरूक. २. स्त्रिया. ३. पोपट.

ते कुसन्यासी आले मांसासाठी। ते खोटे फार बोलले गोष्टी।
त्यासी न केले तुह्मी दंड कष्टी। ह्मनोणी मी नीर्भय।।४६।।
ते जीव म्या ठेवीले बंदीखाणी। त्यास मारावे ऐसे होते मनी।
घरी रामा बाळ बोले वचेणी। हींसा नका करू हो।।४७।।
ते ह्मनती हे कळता राज्यासी। जीवची मारील हो तुह्मासी।
लुटुनी नेईल द्रव्यासी। दासी आह्मास करील।।४८।।
परीवारे वर्जीले मजलागी। परी आंतर जाले मांसरंगी।
म्या योजीले जावे अरण्य भागी। आभक्षे खाव येकदा।।४९।।
तथापी ते कर्म कोन्ही देखीले। त्यासी आह्मी योजीला होता बोल।
की बाबा हे वाघान खादल। शब्द नाही आह्माकडे।।५०।।
ऐसे हे करू केले जेगासी। त्या दीणी तुह्मी नेले मुनीपासी।
म्या कपट भावे पुसीले त्याहासी। नाव करूनी जोग्याचे।।५१।।
परी जोग्यापरीस मीच पापी। बुडालो पंच मीथ्याकुपी[1]।
तुमची संगत तारकरूपी। सुखसंगती मीळाले।।५२।।
मी ऐकत होतो बैसले ठाई। की जीनशास्त्र तारक सही।
ते आता चीतास आली गाहि। सत्य सहि आरीहंत।।५३।।
तुमचे गमण तारक नाव। हींसा सींधुत मम तारीला जीव।
तुह्मी भेटवीला क्षाईक भाव। पुण्य छाव[2] तुच की।।५४।।
मी पडलो होतो हींसा अग्नित। तुह्मी त्वरा काढीले केले शांत।
दाखवीले मुणी धर्मस्थापीत। हींसा गेली मनाची।।५५।।
मी आज्ञान मेंढी हींसा लांडगा। आला होता जवळ लाग वेगा।
सी--गमने पावला भंगा। दया देही वाचलो।।५६।।
मी संसार मळ्यात कासी फळ। तो हींसा कोल्हा खाया आला बळ।
स्त्व(स्व) गमण पुरुशे येता वेळ। हिंसा भ्याली मणात।।५७।।

१. मिथ्यात्वरूपी विहीर. २. छाया, सावली.

मी तन खोपडी जीव आज्ञान। हिंसा वैरी लावीला होता आग्न।
तेथ स्त्वं गमन[१] आले धाउन। सत्क्रीया बाळ वाचली।।५८।।
सर्व पापाश्रवाचि सैन्यसरी[२]। वेढली होती माझी कायापुरी।
तेथ धावले स्वंपुण्य कैवारी। दया ठान बैसवीले।।५९।।
मी पुन्येवीन होता भंग। वर पडता हींसा डुकळांग[३]।
मी बाट[४] होतो मांसान्न संग। गमन गेही पोसीले।।६०।।
प्रधान उत्तर जालीयावरी। पापत्यक्त बोले आप वैखरी।
ह्मणे स्थीर होये प्रहारभरी। मम वचेन ऐकावे।।६१।।
राजा वदे हो श्रेष्ठ सेवका। गुप्त कर्म कर्तुत्व ऐका श्लोका।
कींचीत् केल्या प्रगटार्थ लोका। होती जाणा उद्योत।।६२।।
तुह्मी ण तु[५] कर्माची संपादणी। केली आसती म्या आपुले वचेनी।
परी पाप न झाके लोक नयणी। ऐका दृष्टांत सर्वस्व।।६३।।
जैसा गो हागलवान[६] पसारी। दुर्गंध उटवे वीष्टेचे परी।
ते पाहाता न दीसे नजेरी। हे पाप तैसे जाणीजे।।६४।।
की कांदे भक्षीता गुप्त सदणी। की खाती येके आपुले दुकाणी।
की उदरी पडता दारु पाणी। न सांगता दीसे जगी।।६५।।
की तमात सीरे तस्कर घरी। कोन्ही जागे होता दड[७] आंतरी।
तो बैसले ठाई उस्वासे परी। न सांगता दीसे खोटा।।६६।।
की ललना होता वीटाळसी। ते घर त्या गुण बैसे दुरसी।
तीला कांत पुसता लाज मनासी। पाप दीसे तयापरी।।६७।।
की स्वान मार्जर खाये चोरुन। घरधणी येता पळे भयाण।
की कोन्ही क्रोधे फीरवीता नयेन। हे न बोलता कळे पै।।६८।।
की आंधारी बैसता येकवट[८]। त्यात यकाचि दुर्गंध सुटे।
की रोग्याचा सुके मुखवट। पाप भाष तयापरी।।६९।।

१.? २. लोंढा, आवेग. ४. डुलकी, पेंग. ४. बाटलेला, भ्रष्ट. ५. नाहीतर.
६. गाय हागल्याप्रमाणे. ७. लपणे. ८. एकत्र.

की आश्रु पुसले दीसती डोळा। की धावोणी आला दीसे आबळा।
की येकमेका वैरी जाणे सळा। पाप कळे तैसे पै।।७०।।
की त्याची कळा जाणे कवी। कि लेखक जाने आक्षर गवी[१]।
की गाणार जाणे राग आळी[२]। तैसे धुर्ति जाणे पाप।।७१।।
की सुगरण जाणे आन्नकळा। की वैद्य जाणे रसायेण डोळा।
की सराफ पारखी तांबे गोळा। तैसा पाप जाणे धुर्ती।।७२।।
की पंडीत पंडीत येक होता। ऱ्हस्व दीर्घ करीती तुल्येता।
की कुळकर्णी करी सर्व गणीता। तैस धुर्ती पाप जाणे।।७३।।
पापकर्ता ह्मणे मी येकला। परी काळ सर्वेठायी बैसला।
कर्तुत्व करी मोजणीला। सांगे कळवी जगासी।।७४।।
काळ जीवासी दीसे आकळ। परी जेगात व्यापला सकळ।
तो सुर्येउगवी माळवी[३] बळ। काळकळा कोण जाणे।।७५।।
तो जीवा पुण्य करी उघड। तो पापि जीवाचे सडवी मड।
काळ जीवाची करी झाडखोड। कर्तुत्व पाड दाखवि।।७६।।
काळ सर्व जीवाचे णयेणी उभा। काळ जीवाचे मुखी मनसुबा।
ऐसे सा काळ आहेत आरभे। या क्षेत्रात फिरताती।।७७।।
काळासी ठाउक णाहि ते राण। रीकामे न दिसे कोट ठीकाण।
काळ जीवाचे माथा चाले जाण। काळ वसे सर्वेठाई।।७८।।
भीउनी काये होते या राज्याला। आरंभावे मुख्ये काळाला।
सावडावे[४] मुख्ये पुण्य जोडीला। दया वसवी मनात।।७९।।
हे ऐकोनी राजेश्रीचे वचेन। गहिवरले प्रधानाचे मन।
ह्मणे धन्ये जी तुह्मी पुन्येवाण। धर्म बरा सांगीता।।८०।।
उठोणी आर्जी करी राज्याश्री। प्रस्तावा केला स्वहृदयासी।
दुःखे डोळ्यासी आणीले आश्रुसी। पुरे पुरे खोटा संग।।८१।।

१. गोवणे, गुंफणे. २. आळवणे. ३. मावळणे. ४. गोळा करणे.

सेवक पाठवीले मंदिरी। राव मृग आनवीले कचेरी।
सर्वेजन पाहताती नजरी। राजा बोले जनलोकी।।८२।।
ह्मणे जा जा रे नीर्मळ वणी। नेउन सोडा सर्व प्राणी।
येकासी बोलेता दोनसे मुणी। गेले जान वनासी। ८३।।
तेथे सोडुनी आले कचेरीत। मुखी आरीहंत नाम बोलत।
वीदि(त) केला सर्व वृत्तांत। प्रीत वाटे येकमेका।।८४।।
आता कथा ऐका कुसन्यासाची। पुन्हा चींता लागलि मांसाची।
सर्व बोलताति वचवची। ते ऐका तुह्मी श्रोते हो।।८५।।
त्यासी आमृततुल्ये मीळे आन्न। चीती आठवी मांस खाण।
श्राप देताती राज्यालागुन। मरो नसो ह्मणताती।।८६।।
जैसे कागपक्षी आपुले मनी। ह्मनती ढोरास फार हो हाणी।
तैसे ते कुसन्यासी सर्व जणी। श्राप देति राज्यासी।।८७।।
जैसी पतीवृतेसी भ्रष्ट नारी। पाहुन सीव्या देती आंतरी।
की जैसी पुर्ण (इं)दुचि शार्वरी। न आवडे चोरा मनी।।८८।।
की वाघ वसे नीर्मळ वनी। चीत्ती आठवि पशुची हाणी।
कि मद्येपि ईछी दारू पाणी। सोये नाहि क्रियेची।।८९।।
की श्वान सुजलीया सर्व आंगी। आबळ[१] होता पडे धरा भागी।
मनी ईछि वीषये भोग संगी। शीळ गुन न आठवी।।९०।।
जैसी ललना ज्यार कर्मी[२]। तीला न चढे सत्क्रीयेची गर्मी।
ते नीत्य चाले आधर्मी। दया केवी वसे पै।।९१।।
की तस्कर सुटता बंदीतुन। तो पुन्हा चोरी करी कुगुन।
की आती विषईकाचे मन। लाज नाही तयासी।।९२।।
की जैसे कोण्ही बार्गळ[३] ढोर[४]। चोरीसाठी होये लंघडाकार५।
ते पुन्हा खाउ जाय वावर। लाज नाही तयासी।।९३।।

१.अबल, शक्तिहीन. २. व्यभिचार. ३.स्वैर, निर्बंध, माजलेले. ४. जनावर. ५. लंगडे.

की कोण्ही वनीता पोट पाडुन[१]। पुन्हा आचरे कर्म तेच पण।
आणीक जातीत वागे छेंन् छेंन[२]। लाज नाही तीयेची।।९४।।
की कोण्ही करीता कसब चोरी। ते दुसऱ्याच्या पडता नजरी।
तो फजीत पावे भरले बाजारी। पुन्हा सोडी कुगुनी।।९५।।
की कोन्ही आती लबाड पुरुशे। चाहडी करीता खाये तोंडास।
तो पुन्हा न सोडी स्वभावास। फजीत पावे जनात।।९६।।
की गज मस्तीन झाड मोडे। नीबर लागता दात मोडे।
तो खोटा पुन्हा स्वभाव न सोडे। भोंडा[३] दीसे जन लोकि।।९७।।
की बंधु वाटा घेती बरोबर। पुर्व करंटा धन जाये सार।
तो पुन्हा बंधुचा धरी पदर। मुखी उडवी काळोंकी।।९८।।
की आधीच खोटा करी भांडण। न्यायेसभेत पडे आपटुन।
तो पुन्हा युद्धराव ह्मणे। लोक हासतात तयासी।।९९।।
हे ईतुके जैसे नीलाजरे। तैसी त्या कुसन्यासाची आंतर।
दया उगवलि देशात सारे। हे मांस खाउ ह्मनती।।१००।।
हींसापुरीत सर्व कुसन्यासी। करीत बैसले मनसोब्यासी[४]।
ह्मनती क्षये आना राज्यासी। मग मांसासी सापडे।।१।।
ह्मनती पाहवा वरीष्ट राजा। आपन जावे फीऱ्याद[५] काजा।
ज्ञानपुरीच्या सर्व प्रजा। लुटाव्या धन मालेसी।।२।।
राज्यासहीत सर्व सेवक। आणीक श्रेष्ठ नगरीचे लोक।
धरूनी बुडवावे उदकि। ठाने बैवी[६] पराचे।।३।।
ऐसेच माळव देशात। हे लोक करावे परांकित[७]।
मग उडे जीनधर्माचे मत्त। होईल मात[८] आपली।।४।।
कोण्ही ह्मनती या पंचेमकाळि। या सारीखा राजा नाही बळी।
तथापी फीरता भुमंडळी। कोन मानी आह्मासी।।५।।

१. गर्भपात करून घेणे. २. स्वैरपणे, स्वच्छंद. ३. कुरूप, पाखंडी, ढोंगी.
४. मनोरथ. ५. फिर्याद, तक्रार. ६. ? ७. पराधीन. ८. विजय.

कोण्ही ह्मनती हे गोष्ट खरी। आपन जातीचे भीकारी।
आह्मा द्रव्य पुष्कळ नाही पदरी। राजा येईल कैसेनी।।६।।
ह्मनती हे पंचम काळी गती। आतासी लागली याची नवती[१]।
यामुळे राजा नाही मीथ्यामती। धर्म आरती उजळली।।७।।
पहेले फीरलो देशाटण। राजा देखीला स्वधर्मी गहन।
आता कासीया व्हावे हायेरान[२]। बैसा आपुले घरोघरी।।८।।
कीतेक वदती हे वाक्य खरे। ह्मनोनी आलो ज्ञाननगरा।
पापत्येक्त होता मिथ्या आंतर। तो वाढवी आपनासी।।९।।
आहो यक वेळा जालो फजीत। राजा दयाळ सोडीले जीवंत।
आता न जावे त्याचे वाटे। हे आह्मासी दिशे पै।।१०।।
हे झाले लघु शीश्याचे उत्तर। महंत बाबा बोलला आक्षर।
ह्मणे पाहावा मिथ्या पाठक थोर। तो भांडल थोर।।११।।
आपन जाउन राजे सभे। पाठक तेथे राहतील उभे।
ते वदतील कुशास्त्रार्थ गाभे[३]। राजा वस्ये होईल।।१२।।
ह्मणोन गेले ते कासीपुरा। भीक्षा मागीतलि सर्व नगरा।
स्थारा घेतला कुंभार घरा। भांगपाला चीवडीती।।१३।।
कुजोगी पुसती कुंभारासी। दादा वीप्र आळी कोनीकडीसी।
त्यातही कुशास्त्र कोन पुरुशी। याचा नीवाडा सांगीजे।।१४।।
तो कुल्लाळ[४] ह्मणे हो जोगी। येथ ब्राह्मन सुशास्त्र संगी।
येथ नाही वीप्रीतार्थ भोगी। जीनकीर्तन गातातिं।।१५।।
कुंभार स्त्री वदे हे भर्तार। जधी हा आला खोटा काळ।
पुरा तधीच नीघाला कुशास्त्रकार। वीप्रीतार्थ आहेती।।१६।।
हे पंचम काळ नीघता वेळि। कुरूषी जाले आज्ञानबळी।
त्यांनी कुशास्त्र रचली काजळी। ते पाठक आहेती।।१७।।

१.नवती (आगमनाची चाहूल). २. हैराण, त्रस्त. ३. गर्भामध्ये, अंतरंगामध्ये. ४. कुंभार.

द्वीज आर्ध आहेत पुर्वधर्मी। आर्धेआहेत हे काळ आधर्मी।
त्याची दाखवीते मि आर्थ उर्मी। कुशास्त्रार्थ आहेती।।१८।।
त्याचा आर्थ ऐका पति जी खुण। दिसे शास्त्र आत पाखांड गुण।
राजा येकच खोटी कथणी। वीप्रमत हेच की।।१९।।
ह्मनति रूसी मंत्राचे पांडव। हानुमंत जेन्मला वाऱ्यासवे।
देवास लावीती कर्मभाव। वीप्रमत हेच की।।२०।।
मदन पडता भुमीवर। ह्मनती जेन्मले मानवी सार।
पुंन्येशीळ ह्मने मांस आहार। वीप्रमत हेच की।।२१।।
पाहता शेब्द आक्षर यकची। कागद शाइ श्लोक ऐसेचि।
त्यात बोली नाहि यक साचि। मीथ्या पाठक या नाव।।२२।।
ज्यास न कळे पदव्या कीती। ज्याला न कळे छेकाळ गणती।
ज्याला न कळे तिर्थींकर ज्याति। मीथ्या पाठक या नाव।।२३।।
या काळास ह्मनती कलयुग। पृथ्वीस वदति नवखंड भाग।
सुर्येह्मनति येक चीह्नभंग। मीथ्या पाठक या नाव।।२४।।
ज्याचे आष्टांग ज्योतीष्यात फेर। ज्याला न कळे सुपच्यांग घर।
ज्याला वाढवणे कुदेव थोर। शेब्द नीवाड हाच कि।।२५।।
हे कुंभारनीची जाली बोली। कुसन्यासाची अंतर नीवाली।
ह्मनति बाइ दावि तेच गल्ली। नाव सांगि तयाचे।।२६।।
तुझा भर्तार दिसे भोळा प्रानी। तुच आंतरची मोठी शाहाणी।
आह्मास नेई ब्राह्मन जनी। नाव सांगी तयाचे।।२७।।
कार्येसोडुन चाल तेथवर। दाखवि सर्व वीप्राची घर।
तु परतोनी ये आपुले घर। नाव सांगे तयाचे।।२८।।
कुंभारस्त्री वदे कुजोगीया। नाव ठाउक नाही मम काया।
त्याहाच दाखवीते वरती ठाया। चला उठा सर्वजनी।।२९।।

वीप्रगल्ली तरी काम टेकडी। तेथे ब्राह्मन सर्व परवडी[1]।
बैसोनी खेळत होते चौकडी[2]। जोगी तेथे पोव्हचले।।३०।।
जोगी वदती ब्रह्मगोसाई। आमची फीऱ्याद ऐका सही।
तुमचा कुळधर्म आह्मा ग्रहि नष्ट राज्याने मोडीला।।३१।।
पापत्यक्त नाम ह्मनती जया। राहे वस्ती ज्ञानपुरी ठाया।
तो व्यर्थ सळितो आमुची काया। मांस खाया न मीळेची।।३२।।
सेळी मेंढ वीकरा[3] केला मना[4]। हरिणी न धरू दे व्यर्थ राणा।
पंच मीथ्याताची करी हेळना[5]। नींदी फार भवानीसी।।३३।।
न धरू देतो श्वान सशासी। न पाळु दे मार्ज(ा)र मुंगसासी।
मारू देत नाही ढेंकुन घुसी। तो मस्ति फार आला पै।।३४।।
तो न करू दे आंडज[6] पींजरे। भोयाची[7] जाळी तोडली सारे।
न धरू दे वान्नर बांदर। दया वाढवी देशात।।३५।।
यामुळे मांस न दीसे कोठ। त्यान दया लावीली बळकट।
आह्मासी लागलि चटपट। जीव जाउ पाहताती।।३६।।
आह्मी पुर्वीचे रुषीचे बीज। त्याची चु(तु)ह्मास आसु द्या लाज।
आह्मी सांगीतो ते करा काज। जा सभेत राजेश्रीच्या।।३७।।
जाउन सांगा रुषीवाक्य थोर। तुमची गाही पडल साचार[8]।
मोकळीक करा मांश आहार। शास्त्र तुमचे चालु द्या।।३८।।
तो शक्तीचे न करू दे होम। कुदेवाचे न घेउ दे नाम।
तो चालवी जीनधर्म उत्तम। हे तुह्मास भावे की।।३९।।
आपले पंचाचे मुळ येक। आपन देव पुजावे आनेक।
आपुन कुधर्माचे बाळक। चला भांडा तयासी।।४०।।
आज केली आमची ऐसी दशा। तो तुमचीहि करील दुर्दशा।
मग हे रुषीची कुशास्त्र भाशा। कोन पुसे यासी पै।।४१।।

१.दुर्दशा. २. चौपट, सारीपाट. ३. विक्री. ४. बंदी घालणे. ५. अवमान.
६. पक्षी. ७. पारधी. ८. सत्य.

**ऐसे समजुन उठा वेगीन। तुमचेही राहीले महीमान।**
**हा आर्थ पाहा आपुले मन। द्यावी नजर आह्मासी।।४२।।**
**त्या जमावातील येक पाठक। बोलु नीघाला उत्तर भाक[१]।**
**ह्मने हे सर्व वीप्र बळक[२]। व्हावे सादर या आर्थी।।४२।।**
**त्यातील द्रिज चवघे जन। ह्मनती हे सर्वी खोटी वचन।**
**तो देश पाहिला आह्मी जान। नृपति आहे धर्मीष्ट।।४३।।**
**तो राजा साधुचा भक्त बाळक। आती दुर्बळ जीवाचा जनक।**
**त्याची रहित फार भोगी सुख। आह्मी द्रुष्टीन देखिलि।।४४।।**
**त्या देशात वर्शेहोतो च्यार। आह्मी फीरलो सर्वी नगर।**
**तो न्याये धर्म नीत चाले थोर। कोन वर्जी तयासी।।४५।।**
**त्या देशात घरोघर कामीनी। जात्यावर गाति राज कथणी।**
**तेथ दुःख न ऐकील या कर्णी। सुख आपार देखीले।।४७।।**
**तो नीत्य रवी नीघालेवरी। लक्षवत् द्रव्य दान वाटे करी।**
**तो कोण्हास न पाहे वैऱ्यापरी। हे द्रीष्टीन देखीला।।४८।।**
**त्याचे सद्गुन महीमापुर्ण। वर्णिता सीनल[३] कविवचेन।**
**ज्याचे मुखी सरस्वती आपन। बैसलि आहे येथेष्ट।।४९।।**
**आह्मी गेलो होतो त्याचे कचेरी। तो प्रत्यक्षे पाहिला या नजेरी।**
**त्या देशात नाहि फार भीकारी। सुख भोगीती स्वर्गिचे।।५०।।**
**आंगी आसोनी शाहानपन। व्य--चा न करी आपमाण।**
**परस्त्री भावे जननी मन। रीकामे पोसी आसंखे।।५१।।**
**तो दया पाळि हे सत्य आक्षर। ऐसाच आसावा हो राज्येधर।**
**तेव्हा तरे राहे तीचा संसार। पुण्यशीळ हाच कि।।५२।।**
**ज्या देशी दयावंत नाही राजा। ते वस्ती जानावी वसान(ड)[४] वोजा[५]।**
**ते रहित जैसी राक्षेस प्रजा। न आन्न घ्यावे त्या देशी।।५३।।**

---

१. भाषित, वचन. २. बल (समूह). ३. थकले. ४. ओसाड. ५. सत्य, वस्तुतः.

दयावंताचे मुष्ट भर दाने। नीर्दयाचे न घ्यावे द्रव्य रत्न।
दयावंताचे फुकट दर्शन। पावन करी जीवासी।।५४।।
तुह्मी ह्मनता चला भांडाया। भांडावे पापवंत राजीया।
दंडावी हिंसीक जीवाची काया। ऐसे आहे ग्रंथांतरी।।५५।।
तुमची उघडि न दिसती हाड। वस्त्र न दिसता सर्वेधड।
मांसाची कासीया धरलि चाड। हे वदा कुज्योगे हो।।५६।।
तुमचि नगरीही आह्मी पाहिली। तुह्मी सुखवस्ती न घर केलि।
कि तुह्मास पटि[१] फार घेतलि। हे वदा रे कुजोगे हो।।५७।।
तो सावकारास घेतो पटी। गरीबास जन्मची दील्ही सुटि।
तो तुह्मास कैसा करीतो कष्टी। हे वदा रे कुजोगे हो।।५८।।
तुमचे घरात धान्याचा पुर। तुह्मी द्रव्य ठेवीले भुमी गार[२]।
हे सांगीत होते सर्व नगर। गाहि[३] पाहा स्वहृदई।।५९।।
आमृक(त) आसता विख डोहळा[४]। का रे ईछीता हृदये कमळ।
का रे नींदीता नृप दयाळ। हे पापीष्ट कुबुध्धी हो।।६०।।
ते जोगी ह्मनती सर्व खर। पर आह्मी रुषीचे आवतार।
आह्मास पाहिजे मांस आहारे। हे दाद द्यावी वीप्र हो।।६१।।
जोगी ह्मनती तुह्मी ब्राह्मन। त्याची थोरीलि न वर्णीवी जान।
यान उडे रूषीचे महीमान। पाहा आर्थ धुर्ताई।।६२।।
आधीच आपुली शास्त्र खोटी। ऐस न बोलावे तुह्मी खोटी।
मग तुह्माला कोन पुसे श्रुष्टी। व्हाल कष्टी मोहरे पै।।६३।।
ऐस ऐकीले मुख्य पाठकान। तो वदला सोडी हे ठीकान।
चला सर्वही करू गमन। पाहु ज्ञानपुरासी।।६४।।
तो वदे जयाचे भक्ष तयास। द्यावा ऐसा आर्थ बोलला व्यास।
यास्तव पाठक लाजे चीतास। सर्वेउठले ते वेळि।।६५।।

१.पट्टी. वर्गणी, कर. २. खड्डा. ३. ग्वाही, साक्ष. ४. इच्छा.

शास्त्र घेतले शक्ती माहात्म। वदत चालले राम राम।
परी ठाउक नाही देव नाम। ज्याचे नामे राम जाला।।६६।।
जोग्यासहित गेले ज्ञानपुरा। जोगी उभे राहिले गांवखरा[1]।
ब्राह्मन गेले कचेरी दारा। आसीर्वादासि बोलति।।६७।।
पापत्येक्त कचेरी सर्वि थाट। पुरान होत होत जीनपाठ।
तेथ विप्र बैसले मौन्ये धट[2]। सुशास्त्र पुरा जाल पै।।६८।।
ब्राह्मन वदति हे राजिंद्रा। किंचित् आमचे ऐका शास्त्रेंद्र।
याने पळवीती पात(क) भद्र। पुरान सोडु पाहताती।।६९।।
राजा ह्मने जी भटगोसाई। तुह्मी नगर माघीतले की नाहि।
वीप्र वदती सर्व नाहि नाहि। नका सोडु शास्त्रासी।।७०।।
राजा जवळ बोलावी भांडारी। ह्मने सोन द्रव्ये काढा बाहिर।
आनीक वस्त्र आनी कोरी परी। करी दान याहासी पै।।७१।।
कुबीरदत्त आनी प्रधान। धुंडु गेले ते राजसदन।
घेउन आले वस्त्र धन कन। केले तृप्त वीप्रासी।।७२।।
मुष्टी भरुनी रुपये मोहरा। तेथ दिल्हे येकयेकाचे करा।
वीप्र पदर पसरती धरा। वस्त्र घेती तैसेची।।७३।।
तैसेच रायेभोग तांदुळ। वोपीले[3] सर्वाचे करकमळ।
लोक पाहाति नेत्रकमळ। होता सेवक बैसति पै।।७४।।
सर्वेवीप्र बोलती श्रये (श्रेय) शब्द। ह्मनति राज्या धन्य तुझी बुध्ध।
मोहरेहि कार्येकरीसी सिध्ध। वचेन ऐका राज्याश्री।।७५।।
वीप्र वदति पापत्यक्त राया। आह्मी ज्या नीमीत्ये आलो कार्या।
ते तु आमचे करी लोकसुर्या। मन संतोश होतिल।।७६।।
द्रव्ये दानाचि नव्हति आगत[4]। न मागता तुह्मी केले दत्त।
ऐसीच पुढे ऐका यक मात। रुषी करा संतोशे।।७७।।

१. गावाची सीमा. २. धीट. ३. अर्पण करणे. ४. अगत्य, आदर.

तुह्मी देशात हिंसा केली मना। हे कार्येआमचेहि आले ध्याना।
परी कींचीत् ऐका पुढे वचेणा। व्हावे उदार चीतासी।।७८।।
आह्मी नाही सोडीत पुरान। कींचीत ऐका मुख वचेण।
जे आर्थ रूषी बोलले गहन। शास्त्र राहाठी चालु द्या।।७९।।
तुमचे जे गुरू कान फुंके। त्यासी पडला मांसाचा सोक।
हे मोकळीक द्या आपुले मुख। पुन्ये लागल तुह्मासी।।८०।।
ते मांसावीन होती कासावीस। त्याहाची करा तुह्मी आस।
यासाठी आर्जुदा[1] लागले पीष[2]। हे काढ चींता तयाची।।८१।।
ते रूषीच आहेत वंसाकार[3]। तुह्मावर तळतळति फार।
यान होइल आनहित थोर। नका सळु तयासी।।८२।।
राज्ये पुर्वी रूषीचे श्रापाने। बहुत मेले श्रेष्ठ सगुन।
यास्तव राखि आपुला प्रान। मांस चारी तयासी।।८३।।
मुळ शोधावे सर्व यातीच। रूषीस न ह्मनावे कुळ नीच।
त्याहाचे वचन मानावे साच। त्याहाची आस पुर्वावी।।८४।।
राज सत्ता करावी सर्वावर। रूषीच न दुखवावे आंतर।
त्यासी चारावा मांस आहार। ऐसे आहे पुरानी।।८५।।
ते जगी ह्मनवीती सन्यासी। पुन्हा भोगीती राजस्त्रियासी।
फीरूनी करीती संसारासी। ऐसे आहे पुरानी।।८६।।
त्याला ज्या दीनी न मीळे मांसाला। त्या दीवसी भक्षीती भुमी कंदाला।
आथवा खाताती सचेत पाला। ऐसे आहे पुराणि।।८७।।
त्याची न करावी नींदा आपन। त्यासी लेखावे कृष्ण भगवान।
त्याचे न काढावे होम दुशेन। हे चालु दे जनलोकि।।८८।।
हा आर्थ धरावा ज्या काणी। त्या जोग्याची करावी समाधाणि।
ते वस्त्या गावी पत्र दे लिखोन। दुःख जाईल तयाचे।।८९।।

१. उत्सुक. २. पिसे, वेड. ३.बांबूसारखे.

तयासाठि आह्मी आलो जी येथ। आता प्रसन्न होई चीत्तात।
तु नको धाडु रीकाम पंथ। कींचीत् कागद देई पै।।९०।।
तुवा लक्षेवत[1] वाटले धन। या आर्थी नको करू लघु मन।
त्या जोग्यासी देई मांस दाणी[2]। करी आज्ञा लेद्यासी[3]।।९१।।
मात्र दोन बोट कागदासाठी। राज्या तु होउ नको फार कष्टी।
तु ह्मनविसी लोक जगजेठी[4]। बोलीजे तु आपमुखाने।।९२।।
हे ऐसी णीघता वीप्र वाणी। क्रोध आला त्या राज्याचे मनी।
तो सर्वी साठवी वीवेक ध्यानी। करी वीचार बुध्धीचा।।९३।।
श्रोते हो व्हावे सावध चीता। ऐका राज्याची वीवेक मत।
जेने जीवा हारे मीथ्यात। पुण्य पंथ लागे पै।।९४।।
राजा वदे हो ब्राह्मण जेन। तुह्मी कोटी जालेती प्रसन्न।
सांगा सर्व यातीचे कुळ गुन। हे ऐका मम वीछा।।९५।।
तुह्मी बोला सर्व कुळाचार। कासीया केले ब्राह्मसार।
केवी करावा तुह्मा नमस्कार। हे सांगा जी मम कर्णी।।९६।।
तुह्मा दान केल्याचे फळ काये। याचा वदा जी नीवाड[5] सोये।
कुदान सुदान कोनत होये। हाच सांगा जी वीस्तार।।९७।।
ब्राह्मन ह्मनती रूषी गोत्री जे। त्याहाचे आमचे येकच बीज।
आह्मास नाही सुदानाची काज। मांस आहारी ते होते।।९८।।
जैसे जयाचे ईछे जि मन। तैसे घालावे तयासी खान।
येवढे कळते आह्मा लागुन। तुह्मीच खोटे राज्याश्री।।९९।।
तुह्मी सुदान वाढविले फार। दुःखे रडति सन्यासी आंतर।
तुमचे सार्थक बुडाले थोर। मोहरे बोला राजेश्री।।२००।।
राजा ह्मने हे शास्त्र लबाड। मुख्य बोलता जेन्म नीच पाड।
तुमची उत्तम कुळीची हाड। पाहा जीन शास्त्रासी।।१।।

१. लक्षावधी. २. दानामध्ये. ३. देणेघेणे. ४. जगश्रेष्ठी, जगामध्ये श्रेष्ठ. ५. निवाडा, निर्णय.

राजा सांगे भरतेश्वराची खुन। ऐसे तुह्मी उत्तम ब्राह्मन।
दाटोनी[1] का र जाता आडरान। दीसता वीख का घेत्ता र।।२।।
जनासी सांगावे जीनशास्त्र। ह्मनोनी स्छापीले उत्तम पात्र।
दादु नका रे पढता कुसुत्र। पापी करीता जीवासी।।३।।
रुषी नव्हेत तुमचे काहि। वृथा बोलता माये बाप सहि।
जे दाविता कुशास्त्र गाहि। का रे होता दुसऱ्याचे।।४।।
वेद पाहा तीर्थंकराचे। ज्योतीशांग पाहा केवळ वाचे।
पंच्यांग पाहा सुज्ञान पंचे। हे जानती गनधर।।६।।
तुह्मी वदता मुळ वीनायेक। नाम सत्ये परी दुसरे मुख।
हे लावीले कुरूषीन देख। पाहा कवळ वेदात।।७।।
तुह्मी ह्मनता जे मुख्ये देंवेंद्र। तो आमचा आकरावा रुद्र।
ऐसे आंतर केले कुरूषींद्र। हे शास्त्र का र पढता।।८।।
राम नाम ह्मनता आक्षेये। तो आठवा बळीभद्र होये।
त्यासी वदता येकच स्त्रिये। कुरुषी वाक्य हेच की।।९।।
देवासी ह्मनता आहे गुरू। गुरूसी लावीता संसारू।
येरासी सांगीता आवीचारु। हे आह्मी न ऐकु पै।।१०।।
वपुसी दीसता नीर्मळपन। गंध माळा आलेती लेउन।
आंतरी आहात हिंसीक खुन। भेत ना हा कर्मासी।।११।।
टाकोनी जैन शास्त्राचा भेद। कुरूसी वाक्यासी केले छंद।
आज्ञानासी घालीता पापबंद। तुह्मी उत्तम कैसे पै।।१२।।
आह्मी दान देतो पुर्वीचे भाव। तुह्मी मुखे घेता कुरूषी नाव।
ठाउक नाहि आदीनाथ गाव। जेथ चाले वर्णाच्यार।।१३।।
ऐसा शास्त्रार्थ वदता बोध। आंतरीचा उसळला क्रोध।
ह्मने करीवी येक भये बुध्ध। तरीच ठीक होतील।।१४।।

१. दाटीवाटीने, गर्दी करून.

पापत्यक्त बोलला सभेत। ऐका सर्वेजन देउन चीत।
न करा याचे योजीले बुधीत। कींचीत् सोंग दावी पै।।१५।।
जवळ बोलावी सेवक णारा। ह्मने जा जा रे माहाराडा घरा।
त्याचे हाती आणावा मांसाकार। दान करा याहासी पै।।१६।।
हे नेउन देतिल जोग्यासी। तृप्त होतील याहाचे रूषी।
मग दान घडल आह्मासी। ऐसा राजा बोलला।।१७।।
सेवक वदति जी जी बर। मेल्या ढोराची घेउ द्या खबर।
दुजा वदे आताच नेले बाहीर। चेरनी धाउ पाहाती।।१८।।
त्या आवेस्वरी उठले वीप्र। आर्जवितातिि भुमी आधीप[१]।
वदती नका भ्रष्टउ हे रूप। आह्मीच खोटे जानीजे।।१९।।
ते मांस घालसी पदरात। आह्मास घेने येईल प्रयेश्चीत।
औ(ऐ)सा नको करू राज्यो घात। होये शांत चीतासी।।२०।।
जरी शुध्ध होउ कासी स्नान। तरी आव्हरतील ब्राह्मन।
णको बाटउ आमची वसन। हे लज्या राखीजे।।२१।।
आह्मी नव्हता आले भांडाया। सहज पाहेलि तुझी दया।
जळो त्या जोग्याची आंतर काया। शेरम आमचा राखावा।।२२।।
तुवा जैसे केले द्रव्य दाण। तैसे राज्या सोडी नीर्मळ पन।
आह्मी जे बोललो शास्त्र गुन। ते सर्व पाखांड पै।।२३।।
जे कुरूसीन कथीले माहात्म। आजपासुन न घेउ ते नाम।
आह्मी पढत जाउ पुर्वागम। नीत्य पुजु तीर्थराये।।२४।।
पुरे पुरे ते कुरूषी वाके। सहज बोलता गुंतलो मुख।
जळो शेक्ती माहात्म पुस्तक। दुर झोकिले त्यावेळि।।२५।।
जळो ते कुरूषीची राहाटी। शब्द बोलता जीव होये कष्टी।
ऐसे बोलती सर्व वीप्र होष्टी। ढोंग दावी राज्यासी।।२६।।

१. राजा.

की जैसा कोण्ही पुरुशे पाखांडी। मन खोट करी ईमान तोंडी।
की आंतर भ्रष्ट बोडे[१] सेंडी। ह्मने मी जालो सन्यासी।।२७।।
की पराची वस्तु घेतो चोरून। धनी जवळी येता दे टाकुन।
तो बावळा होये पाहे नयेन। तैसे गुन दावीती।।२८।।
की परस्त्रीसी भोगीता वेळ। कोण्ही धरायास जाती सुबळ।
तो तेव्हा लपवी मुखकमळ। होये लीन चरनासी।।२९।।
की कोण्ही कुपुत्र कुगुन वैरी। धन आसता मायेबाप आहेरि[२]।
त्याला वोढोनी नेता राज्येदारी। तो करी आर्जी सर्वासी।।३०।।
की सासु सुन भांडता जोड्यान। पुत्र स्त्री बोले आवलक्षेन।
तीचा पुरूष बडवीता धरून। ते ळोळण घे भुमीसी।।३१।।
की पैक्यासाठी बैसवीता कुळ। त्यासी देन नाही आंतरबळ।
तो धन्यासी दावी दीन वजुळ[३]। पाया पडे भावार्थ।।३२।।
की कुंजेर चालता वाटेन। सोंड फिरवि करी आवगुन।
त्यासी आंकोशे[४] मारीता दोन। तो कापे सर्वांगासी।।३३।।
की राजा नागवी येक्या खोट्यासी। सर्व कापती आंतर आंगासी।
की सीव्हे गर्जेनी भेती गजेरासी। वीप्र भेटती तया परी।।३४।।
की येक मरे भुत देखुन। राजे भेती आपुलाली मन।
की झाड हाले आती प्रभंजेन। वीप्र तैसे भेताती।।३५।।
ऐसे सर्व वीप्र होउन मनी। मुख बोलती कीवलवानी।
आंतरी कपट लक्षे गुणी। वर भार्वार्थ दावीती।।३६।।
ह्मनती नका धाडु सेवक। आह्मी तुमचे धर्मबाळक।
जाउ द्या आह्माला उजळ मुख। न्यात[५] कळंक उडवी।।३७।।
राज्या तुझी ऐकीली फार कीर्त। जैस दाता आहे भगवंत।
दानार्थी उजळ तुव्ह चीत्त। चेक्रवर्तीसारीखा।।३८।।

१. हजामत करणे, भादरणे. २. अव्हेरणे, उपेक्षा करणे. ३. ? ४. अकुश, टोचणी.
५. ज्ञाती.

लोकासी न सांगु हींसीक होम। सांगीत जाउ दया उत्तम।
प्रकाशे करु आरीहंत नाम। करी सुटका या वेळी।।३९।।
आधीच राज्याचे आंतरी दया। त्यावर परसुखी करी काया।
लोकासी दावी वर्म सत्क्रीया। तो केवी भ्रष्ट करील।।४०।।
जो आंगी पाळी सौश्च[१] लक्षेण। तो कैसा भ्रष्टवील ब्राह्मन।
परी त्याहाचे त्याहास वचेन। नीवाडा दावी सभेत।।४१।।
जो सेवकाची न मोडी झोप। तो कैसा दुखवील मनरोप[२]।
त्याहाचे मुख वचे आप। पाप्या ह्मने खद नासि।।४२।।
ऐसा पापत्यक्त विवेक मन। सर्वेसोडा ह्मने रे ब्राह्मन।
सेवक येकांग होति जान। मार्ग देति जायासी।।४३।।
जैसे उंदीर आधी डालावे[३]। मग त्याचे झाकने काढावे।
ते जैसे पळति सर सर धावे। तैसे ब्राह्मन गेले पै।।४४।।
जैसा उघडीता ढोर खोडंग[४]। खडखड वाजे पृथवी भाग।
तैसे वीप्र पळु लागले आंग। नगरजन पाहातात।।४५।।
की जैसे दाण्याआंगचे कीडे। सुपी घेताची पसर पडे।
की गाडा चालता धडधडे। तैसे बोलति रस्त्यान।।४६।।
ब्रांह्मन गेले नगराबाहिर। ते जोग्यासी सांगति खबर।
हा पुढील आध्याई प्रकार। ऐका सर्व श्रोते हो।।४७।।
तेथोनी जातील ते गावासी। शास्त्रार्थ पाहातिल हृदयासि।
भांडन होइल यकेमेकासी। तैसे ऐका श्रोते हो।।४८।।
हा आठवा आध्या जाला संपुर्ण। ऐकता होतिल सम्येक्त नयेण।
भाव धरीता पावे श्रीजीन। हे पाहा गाही श्रोते हो।।४९।।
हा आध्या जैसी आठ भुमीका। हे साक्ष पाहा सीध्धांत श्लोका।
की सांगीतले जीन पाठक मुखा। ध्यान तेथ लावीजे।।५०।।

१. शौच, शुद्धी. २. मनरूपी रोपटे. ३. बांबूच्या टोपलीत घालणे. ४. खोडा, लोढणे.

हे सुमति आठ मदरहीत। हे श्रोत्यासी पाजे धर्मामृत।
सुमति पारखता रकमत। करी संभाळ जेन्मासी।।५१।।
सुमति श्रवण उंच वस्त्र। जीवासी सुख दे मन गात्र।
नेउन दावी जीनागम सुत्र। करी पवीत्र मीथ्याती।।५२।।
जे जीव सुमती ध्यानी स्मरती। तेच वीदेह क्षेत्री जाताति।
ते शाश्वत भोगभुमि पाहाति। करा आश्रम ईचा पै।।५३।।
हे सुमती शेब्दार्थ देवांगना। श्रोते ईंद्र पाहा आपुले नयेना।
हे आक्षर कल्पतरू रचना। मनसा पुर्वी जीवाची।।५४।।
हे नव्हे हो मनुशाची कळा। सुमति शब्द सद्गुरूचा डोळा।
हा कवींद्रसेवक आसता भोळा। दावि सोहोळा तोच की।।५५।।
।। ईती श्री सुमतीप्रकासे प्रधान आंत्रक पटका सुटका भवेत्।।
पापत्येक्त भुपतिणा द्रीजमुख वीप्रमत्त खंडन।।
कुर्यात् आठमोध्याये।। संपुर्ण।। समाप्त।।
वोवीसंख्या दोनसे पंचावन २५५।।
।।छ।।छ।।छ।।छ।।छ।।छ।।छ।।

* * *

नमस्कार।। याचा आर्थ।।
न ह्य।। नकारं ज्ञान संप्राक्ता।। मह्य०।। मकारो महतो धणी।।
स ह्य।। सत्त कु भेजयत जैन।। र ह्य। र मुक्ती तो रमापति।।
याचा आर्थ आहे नमस्कार।।छ।।छ।।
जुगादी वृषभदेवो हारणी सर्व संकटी। रक्षतो सर्व जीवानाम। तस्मा। जुहार मुस्वते।

।।छ।।छ।।छ।।छ।।छ।।छ।।छ।।छ।।

* * *

# सुमतिप्रकाश

## नवम अध्याय

।। ॐ न्मो सीध्धभे।।  श्री त्रीलोक्यामणीये नमः।।

जो देहि आसोनी नीर्वीकार। आयुश्ये भोगी न घे आहार।
ज्याचे सर्वदा तृप्त आंतर। ईंद्र चालती समीप।।१।।
जो आतीशये लक्ष्मीचा भोगी। तो होये फीरोनी तीचा त्यागी।
तोच पुन्हा आक्षेये लक्ष्मी संगी। सुख भोगी आपार।।२।।
ज्याने चळीत सुख त्यागीले। आचेळ सुख जवळ केले।
ज्याला आसंख्ये ज्ञान उजडल। जन दिसे कररेखा[१]।।३।।
कोण्हासी न सीकवी भाव कर्म। सर्व जगात पेरीला सध्धर्म।
ऐसीया तीर्थंकराचे नाम। पावन होये कार्यार्थी।।४।।
त्याचे नाम पावे येव्हड सत्ये। जीवासी न भोगवी वीपत्ये।
आंगासी झोंबे हे आसत्ये। पाहा आदिपुराणी।।५।।
हा जीवाचा मायेबाप। तो कैसा करील काळकोप।
तो केवी दुःखवील देहरोप। पाहा गाहि या आर्थी।।६।।
ज्याचे नाम वासव[२] धरी मनी। ज्याचे नाम घे सुआवधीज्ञानी।
हेच नाम कमविता त्याचे ध्याणी। तेच दावी सुमतीस।।७।।
हे कथा शेब्दार्थ मोते पवळी। श्रोते पाहाने सम्यक्त डोळि।
व्हाल संतोष हृदये कमळी। मीथ्यात चिंता जातसे।।८।।
बरे मि बोलतो उंचाई। यात सुख जोत[३] आहे क नाहि।
हे धुंडोन पाहा ज्ञानगेही। नसता दुर त्यागीजे।।९।।
नका देउ कष्टार्जीत द्रवे। देईजे मात्र भावार्थ सर्व।
मग कथा रत्न हाती धरावे। जडाव जोडा हृदई।।१०।।

१. हातावरील रेषेप्रमाणे स्पष्ट.  २. इंद्र.  ३. ज्योती

जे सुमति आळंकार लेति। ते श्रोते पुण्ये पदी बैसते।
तेच मीथ्या वेड्यामागुन दावीती। मी शेब्द दास त्याचा पै।।११।।
सद्गुरू दावी आक्षरे आंतरी। ते कृपा कागदावर पसरी।
कवींद्रसेवक मीपना धरी। श्रोते लाजवा त्यासी पै।।१२।।
मी मानवी आहे आधम गुन। वारोवार येतो मुखी मीपन।
आता ऐका सद्गुरू वचेन। जो तृप्त करी श्रोत्यासी।।१३।।
त्या ज्ञानपुरीच्या पाव कोसी। दबुन बैसले सन्यासी।
वाट पाहाति वीप्र मार्गासी। न बोलती यकमेका।।१४।।
जैसे महात्त मणीशी माझार। जागे राहाती सर्व तस्कर।
सर्व मनुष्ये नीजलीयावर। घातक पाहाताती।।१५।।
की मुंगसासी पाहोनी भुजंग। दुर पळती कोकाडसंग[१]।
तैसे कुसन्यासी सर्व आंगे। भेताति पापत्यक्ताला।।१६।।
की जैसे पाउस वांकडीत[२]। ढोर माना करीती खालत।
की वैद्या मोहर[३] दबती भुत। ऐसे सन्यासी जाले पै।।१७।।
की सुवर्णाक्षी[४] येत मंदिरी। सामट[५] धरती सर्व उंदीर।
की आवचींदासी[६] भीताती पोर। येकांतवासि राहारति। १८।।
जैसे दिवस नीघाल्या ढेकुन। आंधारात बैसताति दबुन।
की व्याघ्रापुढे जैसे श्वान। होती लाहान सर्व पै।।१९।।
की पोहनार जळी उडी टाके। त्यातच दबती सर्व लोक।
की चीखलात जीरे[७] उदक। तैसे वनी तीष्टताती।।२०।।
की राजसैन्य चालता रस्त्यान। गेल घ्रानल पविवदन[८]।
की वैरी औ(ऐ)कीता काणी जान। आंतरी भेति ज्यापरी।।२१।।

---

१. पिलावळीसह. २. पावसाची झड, सततचा पाऊस. ३. समोर.
४. सोन्यासारखे चमकदार डोळे असलेली. ५. गुपचिळी.
६. अचानक आलेलाा, अपरिचित. भूतप्रेत (?) ७. जिरणे, मुरणे, सामावणे.
८. गरुड, डास.

की वींचु दबे जैसा पाल देखुन। तो सर्वांग पसरे भुमिस।
की परस्त्रीसी भोगीता पुरुशे। भय मानी दुजीयाचे।।२२।।
की जैसी युग्म दळ भांडता। बर शेस्त्रे बहुत चमकता।
तेथ भेकाड[1] पडे भुमीवर्ता। चोपुन राहे तैसाची।।२३।।
की जैसी कोण्ही सासुरवासी। लपुन बैसे पर सदनासी।
हात लावीता लाजुळ झाडासी। चोपुन जाति सर्वथा।।२४।।
की जैसा कोण्ही अन्याई प्रानी। त्याला बैसवीता राजसदनी।
तो हळहळि मनीच्या मनी। कुजोगी तैसे करीती।।२५।।
परी राज्याचे नीर्मळ मन आंतर। आधीच कळलि होती खबर।
की जोगी बैसलेत वनांतर। वीप्र येथे आले पै।।२६।।
ते कुसन्यासीच खोट गुण। त्याहाची त्याहास दिसती स्वप्न।
ऐसे होउन भयाभीत मन। वृक्षाखाले तिष्ठति।।२७।।
की जैसे मुक्या पुरुशाचे कळप। न बोलति आपुल्यात आप।
कि काष्ठ बाव्हल्याचे स्वरूप। वाचा नाही तयासी।।२८।।
ऐसीया कुज्योगी बैसले ठाई। ब्राह्मन पोहचले त्याच पाई।
विप्र वदती काये जाले नाहि। जा आपुले गावासी।।२९।।
जे कचेरीची जाली मात[2]। ते सर्वी घातली जोग्याचे काणी।
ज्योगि पुसति हे वस्त्र कोठुनी। कोरी सर्वी दीसताती।।३०।।
वीप्र वदती आह्मा वस्त्रार्पण। केलि हो त्या पापत्यक्त राज्यानं।
परी ते न सांगति द्रव्य रत्न। चोरी करीती जोग्यासी।।३१।।
की जैसा कोण्ही आटोडीया[3] वाणी। लाभ न सांगे दुसऱ्याचे काणी।
की आंतरीची खोटी करणी। झाकीती जन लोकी।।३२।।
की युगुळ बंधु वाटन चाले। त्यात येक घे चोरुन खायाले।
त्यासी पुसे हे पैसे काय झाले। तो खोटा बोले त्यावेळि।।३३।।

१. भित्रा.   २. वार्ता.   ३. दलाल, आडत्या.

की भोंदु भोंदुसी होता भेट। त्या दोघाचे न बने यक साठ।
तैसे हे दान द्रव्याची गाठ। लपवीती त्यावेळि।।३४।।
की आंधारात खाता चोरून। त्यासी बोलावीता धरी मौन्ये।
की आंधळ चाफले[१] हाताने। तैसे हे बोलति पै।।३५।।
की कोण्ही कपटी कारागीर। न सीकवी कुशळता चाकरासी।
की क्रीपनाचे जेवीता घरी। हात आखडी चीतात।।३६।।
की पापीष्ट हाकिमासी देखोनी। लोक सुवर्ण न दावीती नयेणी।
जैसा तस्कर भेटता वनि। आवेज[२] लपवितीति।।३७।।
की ह्मैस आहे आती दुधास। दोहता न पडु देति नेत्रास।
की कुनबी सांगी जाली रास। मुखे खोटे बोलती।।३८।।
की घरची द्रव्याची गनना। न कळु देति दुज्याचे काना।
की कुवैद्य न सांगी केल्या खुना। झाकु पाहाति लोकात।।३९।।
की जैसा धूर्त ज्ञानी सेवल। काये करी येक दावी आनेक।
की सोंगी लावीता कागद मुख। ते साच नाहि ज्यापरी।।४०।।
ऐसे हे सर्व वीप्र लक्षेन। चोरून बोलले दिसत दाण।
परी न वदति द्रव्याची खुण। गमन करू पाहति।।४१।।
हे सर्व कळले जोग्या मणि। न च पातणे[३] दावि नऐणि[४]।
परी न बोलती मुख चचेणी[५]। जातो ह्मनति गावास।।४२।।
जमाव उठले युग्म जन। शब्दाशब्दी करीती मन।
वदति दया राहु द्या जाण। चाल केली मार्गासी।।४३।।
जोगी पोहचले हींसापुरी। सर्व बाळ देखीली नजरी।
धन कन सुखे नांदति। चींता आंतरी मांसाची।।४४।।
ईकडे सर्व ब्राह्मन जेनी। स्थीर स्थीर चालती मार्गान।
ते वसान[६] खेडी थोर पाटन। माघ टाकीती भास्करी[७]।।४५।।

१. चाचपणे. २. ऐवज, धन. ३. येउन पोचणे. ४. डोळ्यांनी.
५. चिवचिवाट, निरर्थक बडबड. ६. ओसाड. ७. दिवसाढवळ्या.

माळव देशातिल आनंद। पाहात चालले मनछेंद[1]।
कोठे न दिशे दुःखाचे पद। चीती नवल करी।।४६।।
या देसी ईतुके सुख प्रबळ। न वाढावे हो या खोटे काळ।
परंतु राजा आती दयाळ। ह्मनोनी सर्व सीद्दी।।४७।।
कीतेक वदति सत्ये वाचा। जेव्हा हाच राजा होता हिंसिक।
तेव्हा हा देश कैंचा। फार दिवस जाले यासी पै।।४८।।
माघे ही पाहिला याच नजेरी। हे वस्ती नव्हति ऐसीपरी।
आता मार्ग वाहति फार भारी। दया धर्म फळला पै।।४९।।
जधापासाव दया धर्मास। राज्याने लावीले या लोकास।
तधीपासाव जाले ऐसा देश। ब्राह्मन सर्व बोलति।।५०।।
आणिक करीती तर्क वीचार। कुरूषी स्छापीत कुधर्माकार।
हा जीनधर्म तारक फार। ब्राह्मन सर्व बोलति।।५१।।
जधी लागला हा पंचम काळ। तधीच कुरूसी जाले प्रबळ।
पाखांड रचीले कुवीद्या बळ। ब्राह्मन सर्व बो(लति)।।५२।।
हींसा नाहि कोठ पुर्वपंथी। रूषीन कथीलि आपुले मति।
परी हे कुशास्त्र दुःख देताति। वीप्र बोलति मार्गान।।५३।।
कोण्ही वदती वीवेक नजेर। रुषी नाहि जाले आवतार।
हे कवीत्व केले आज्ञानी नर। पाहाता आर्थ चीतासी।।५४।।
कोण्हेक वदति हे सत्य मात। मांस आहारीन स्थापीला पंथ।
त्यासी आज्ञान पाहुन टकत। हे सत्य भाषे आह्मासी।।५५।।
कोण्ही ह्मनती हे ऐसे नाही। याची मी येक सांगतो गाहि।
हे खोट काळ वाढले सहि। जगात चालु लागले।।५६।।
ह्मनति है ऐसी नव्ह हे गोष्ट। कुरूषि आह्मी देखिले झुट।
वीक्राळ रूप कुतप सगट। वनी होते आजवरी।।५७।।

१. मनसोक्त.

त्याहाचे जवळ आमचे पीता। शास्त्रंग पढ आपार।
तेच पुस्तक आहेत आता। चला पाहा नजरेसी।।५८।।
दुजा ह्मन जी आधर्माचा रोखा। के कवी मान्ये हो पंचाईत लोका।
तैसे कुरूषीचे ते आर्थ मुखा। जीवा कैसे तारती।।५९।।
त्यातिल येक वदे जी चतुर। ह्मने जी हे वचन सत्याक्षर।
याचा मी बोलते दृष्टांताकार। ऐका तुह्मी सर्वजेणी।।६०।।
की घरी केल्या रुपये मोहरा। तो मोडु नेत्याती सत्य बाजारा।
पारखी त्यासी न धरी करा। तोटा ह्मने त्यासी पै।।६१।।
जे आंग घडती कर कमळ। तेचहिन तांब गहिर साळ।
ते आंतर सज्ञाना दिसे डोळे। तो आर्थ सुधा नयेची।।६२।।
किईनकर[१] जैसा सनगासी[२]। तुटके दोरे जोडी सांदनासी[३]।
दुकानदार जाने आंतरासी[४]। मोल उनावे[५] तयाचे।।६३।।
की गंधकाचा कापुरू। जोत लावीता उघडाकार।
की रंगीत वस्त्राचे आंतर। जीर्न कोरे न झाके।।६४।।
की कासार घरी भांड तगटी[६]। पारखी जाने त्याची कसोटी।
की तृणपाल्याचा रंग पोटी। पक्का नाही ज्यापरी।।६५।।
जैसे राईंद्राचे[७] राजसोंग। ते पाहाता दिसे फीक्का रंग।
की परदारणिचे नेत्र आंग। पारखी जाने आंतरी।।६६।।
की रात्र जालीया आंधारात। पतीमीषे सारे सदनात।
ज्ञानी भामा जाने त्याचे मात। दुर त्यागी तयासी।।६७।।
की भानामतिची करणी फळ। प्रत्यक्षे दिशे जन डोळा।
ते बाजारी विकता लोकमेळा। नाही कोण्ही देखीले।।६८।।
की यक पैशासाठी गारोडी। तमाशा करी लोक चाव्हडी।
रुपये दावि गुन परवडी[८]। ते जगी केंवी चालतिल।।६९।।

१. किनगार, कोष्टी. २. लुगडे, साडी. ३. जोडणी. ४. अंतरंग, रहस्य.
५. कमी करणे. ६. धातूचा पत्रा. ७. बहुरूपी. ८. सुकाळ, चातुर्य, आनंद.

की आंतरभ्रष्टाचे आनुष्ठान। आसत्ये वाटे शक्राचे मन।
की मैंदाचे[१] रडति लक्षेन। सत्ये कैसे मानावे।।७०।।
ऐसे जे कुरुषीण आग[२] केल। आपकार्यार्थी पुस्तक लिहील।
ते कैसे सुशास्त्रार्थ मिळल। ह्मणोणीच जालो खोटे।।७१।।
आक्षेर सर्वी बाराखड्यान। परी शास्त्र आसावे सद्गुण।
सार शेब्द ते सरस्वती जान। मुखी वसे केवळिच्या।।७२।।
ऐसे केवळज्ञानी विन शास्त्र। त्यासी स्वर्गी वदति खोट सुत्र।
ते आंगीकार करीता या आंत्र[३]। दुःख दुणे होतसे।।७३।।
शास्त्र रोख्यासी आरीहंत गाही। ज्या पुराणात लीहीलि नाहि।
ते सर्वी खोटी जानावि पाही। चला सर्व मौन्ये पै।।७४।।
मुख्य बोलता राज्येसभेत। आपन सर्व पावलो फजीत।
ते आचेरता काये होये गत। पुन्हा वदता नीर्लज्या।।७५।।
हे चेतुराची उतर ऐकोनी। क्रोध आला मुख्ये पाठकामनी।
तो वदे चला नगरालागुनी। शास्त्र खोटी कैसी रे।।७६।।
ऐसे सर्वेवीवक वीचारा। करीत पावल कासीपुरा।
गावात गेले आपुल्या घरा। रामा द्रुष्टि देखिल्या।।७७।।
सर्वाचि जालि स्नान भोजेण। पाठक पाठवि बोलावन।
आज्ञा करी शास्त्र या घेउन। वीप्र जाति घरोघरी।।७८।।
ग्रंथ घेतले व्यास भाकीत। कोण्ही घेतले वाल्मीक मत।
गेले मुख्य पाठकाचे येथ। जमाव जाला वीप्राचा।।७९।।
सोडोणी वाचीती आध्या श्लोकास। तैसेच पाहाती पद समास।
त्यात सांभाळिति कथाचोरास। स्तब्ध राहाती आंतरी।।८०।।
त्यातिल मुख्ये पाठक उच्चारी। ह्मणे का जी कोणती गोष्ट खरी।
मार्गी बोलत होते नानापरी। याचे उत्तर बोलीजे।।८१।।

१.बुद्धिमंद, जड, आळशी, ढोंगी. २. कलागत लावणे. ३. अंतरी, मनामध्ये.

कोण्ही ह्मणति वाटचा विचार। तोच जि आर्थ यात दिसे थोर।
आता किं बोलावे आधीकोत्तर। वारंवार यकचि।।८२।।
कोण्ही वदे पाहता रूषी येक। कथान्याका हो दिसती आनेक।
वीपरीतार्थ आहेत फार श्लोक। हे वाचा कवनाची।।८३।।
अहो सती आणि पंचभर्तारी। का हो कथीली आहे ग्रंथांत(री)।
प्रत्यक्ष दीसे लबाडी की परी। संशये येतो चित्तासी।।८४।।
आग्नीकुंडात मनुष्ये काये। जेन्मले ह्मणोनि दीसते सोये।
ते मंत्र आता का जाले आपाये। संशये य(े)तो चीत्तासी।।८५।।
आहो आश्वयज्ञ आदी करोनी। फार आहे पराक्रम कथनि।
कर्ण नीघाला दिसतो --। संशय येतो चीतासी।।८६।।
ग्रंथ कथिले बईल भर। ते मंत्र काण लिहिले सार।
आळस केला रुषिने थोर। संशय येतो चीतासी।।८७।।
देव ह्मणताती नारायेण। आणीक आटाचे[१] नाही कथन।
ते का न दिसले रूषीच्या नयेन। संशय येतो चीतासी।।८८।।
कोट वदले यक केशव। कोट वदले सर्व देव।
ऐसा कां कथीला आहे भाव। मुख्ये नाव ते कैसे पै।।८९।।
युग सांगीतलि च्यार भारी। खट[२] काळ न दिसले नजरी।
युगायुश्ये काळ पासांगावरी। उडोनि जाये सर्वथा।।९०।।
ज्योतीश्य पंच्यांग केवळ वाक्य। गनत प्रतीमात केला झोक।
ऐसे का कथीले रुषीन मुख। वीपरीत भाशे यापरी।।९१।।
आहो ऋषीवाक्य मान्य जगी। ते का भ्रष्टले कुआंगसंगी।
पुन्हा वदति सन्यासी योगी। नवल चीता येतशे।।९२।।
आहो रुषी ह्मणजे भीक्षुक। जेवील्या हात स्त्रियाचे बाळक।
काहो भोगील्या राजस्त्रिया शुक। नवल चीत्ता येतसे।।९३।।

१. आठजणांचे. २.दुष्ट, खट्याळ.

वीधवेन न करावा पाट। रुषीवीर्येवाढवीली पोट।
जाली ह्मनति कश्यप श्रुष्टी। नवल चीत्ती येतसे।।९४।।
राजकन्येच पतीवृतापन। कैसे राहिल हो ऐशा गुन।
या आर्थी खोट दिस पुरान। वीप्र वदति पाठका।।९५।।
परपुरुषासी करीता मोहुर्त। हा जीव होतो पापवंत।
ह्मनवोणी वीधवा ठेवावे चीत। सती ह्मनीजे या नाव।।९६।।
पांडवासारीखे सत्यवचनी। का हो भोगीतील येकच योनी।
माहा पातकी न करी हकरनी[1]। पुरान खोट या आर्थी।।९७।।
चेर्म आस्तीची प्रत्यक्ष काया। आंग्नि खात होती द्रौपदी जाया।
ते का हो राहिली नाही आक्षया। गाहि देया शास्त्राची।।९८।।
आहो सत्य वदले चेरंजीव। राज्यान आडवीले मांसभावे।
तेथ का हो न आले सर्व। गाही देया शास्त्राची।।९९।।
नारद दत्तात्रयाचे नाव। घेता फेरी येते ह्मनता घाम।
त्याच नाम घेउन सर्व ग्राम। नीत्ये मागति गोसाई।।१००।।
ह्यु नरा येउन होतो कष्टी। हे बोला जी मुख्य पाठक होटी।
तो देहधारी राहे कोण्या श्रृष्टी। हे दाखवी आह्मासी।।१।।
ऐसीच सर्व व्यासाची पुरान। उघड करो दावि बाह्मन।
ह्मने आसंख्ये संशय वचन। हे दिसते हो आह्मासी।।२।।
यात मुख्य देव वैकुंठवासी। जाउन येतो ह्मणती जन्मासी।
हे का हो जी ऐसी बोली पीसी। शास्त्र न शोभे या आर्थी।।३।।
ऐसी नीघता यकाची वाणी। पाठक जळाला मनच्या मनी।
सीव्या देउ पाहे शीस्यालागुनी। तो बोल दुजा उत्तरा।।४।।
जो वाल्मीक पुरान आर्थ पाठी। तो ह्मने ऐका किंचीत् माझे होठी।
तुह्मी नका होउ आंतरी कष्टी। सुमति ध्यानी राहिजे।।५।।

१. हाकारणे, पुकारणे.

आहो जी ऐका पाटक स्वामी। द्वीगुण संदेह आंतरगामी।
माझे उत्पन्न जाला बोलतो मी। तुह्मी स्थीर व्हा वीवेकी।।६।।
आहो रामचंद्र आपला देव। आयोध्या ह्मनताति त्याचा गाव।
आधी जेन्मला आदीनाथराव। ह का हो नाहि पुराणी।।७।।
रामासारीके बळिभद्र सात। माघे होउन गेले बळवंत।
ते का हो नाहित या पुरानी। हे तुट केवि जालि पै।।८।।
आठवा नारायेन लक्षुमन। त्याने वधिला प्रतिनारायेन।
हे का वाल्ह्या न बोलला कथन। तुट[1] कैसेणी केलि पै।।९।।
रामा रामासी आठ हाज्जार। नारायेन आर्ध चक्री थोर।
आसंख्य द्वीप समुद्र सार। का न दीसले रूषीसी।।१०।।
द्वीपद्वीपांतराचे चेंद्र सुर्ये। विदेह आदी देशाश्वत भोये।
हे वाल्मीकास न दिसली सोये। ते ज्ञान सत्ये कैसे पै।।११।।
रावणासी वदले दश शीर। ठाउक नाही नवा रत्नाचा हार।
येकच मुख नव्हाचे अंतर। दिसत होते जगासी।।१२।।
त्यास देह न वदति राक्षेस। तो तर विद्याधराचा वंस।
वीजयार्ध गीरी सा(?)क्षये रास। उत्तम का यथ नाहि।।१३।।
आगाध करावि पुण्येरासि। तेव्हा जीव पावे पदविसी।
तो आठवा प्रती केशव पुरुशी। हे का नाहि हो येथ पै।।१४।।
रुद्रास ह्मनति आदि महेश। त्याचा का न वाढला हो वंशे।
कींचीत् जाला तो खोटा दिसे भाषे। ऐस का आहे पुराणी।।१५।।
महेंद्र राजाची कन्या आंजनी। ते आंधळी नव्हती हो नयेनी।
ते आत्यंत रेखक चीत्र गुनी। होति वीद्याधरी पै।।१६।।
प्रल्हादाचा पुत्र पवनंजयो। तो तर पंचेंद्रिय होता देह्यो।
त्यास ह्मनति यकेंद्रीये वायो। हे ज्ञान औ(ऐ)से केवी पै।।१७।।

१. चूक, उणीव.

देवासि ह्मनति जिव संव्हारी। तरी काळ कोनते कार्यकारी।
हे ऐसी बोलि बचबचपरी। खरी कैसी मानावि।।१८।।
देव ह्मनीजे त्रैलोक्यज्ञानी। गणेश शीर न दिसले नयणी।
गजमुख लावीले जोडोणी। हा अर्थ दीसे आभाष।।१९।।
गीरीजा स्त्रीचे आंगावर माति। कीती हो लोथो[1] बसलि होती।
ह्मन त्याचा धड लागन पति। हा आर्थ दिसे आभाष।।२०।।
कन्या भोगीली ब्रह्मदेवान। हे कैसे हो आवगुन लक्षन।
पुन्हा त्यासी वदति भगवान। हा आर्थ दिसे आभाष।।२१।।
राम तर आठवा बळदेव। तो नीत्य पुजी तीर्थंकरराव।
तो जीनधर्म पाळी मनभाव। हे का नाहि कथीले पै।।२२।।
रामपुराणी लक्षवत् चुकी। कोटोनी दावी ब्राह्मन मुखी।
ह्मणे हे साक्ष न्यावे कोन लोकी। आप चीतासी लाजवी।।२३।।
मुळी खोटे वाटे आपुले मन। हे कैसे हो मान्ये सम्येक्त जन।
वीर्येआश्वाचे गर्द्धववदना। उत्तम केवी घेति पै।।२४।।
ऐसे वदता त्या पाठकासी। द्वैगुन क्रोध आला आंगासी।
काडु पाहे आवलक्षेनासी। तीजा थांबवी त्याला पै।।२५।।
तीसरा वदे जी पाठकासी। तुह्मी क्रोध नका करू हृदई।
वीवेक आर्थाची पाहा गाही। मग स्वामीत्व दावीजे।।२६।।
सहज भाजी घेता कवड्यान। मनुश्य धुंडति च्यार ठिकाण।
हा शास्त्र तर आहे थोर केण[2]। तारक पेन[3] जीवासी।।२७।।
याहाचे त्रैगुणीन मम मनी। कुशास्त्र दिसे बयान कथनी।
ते मी कींचीत् वदतो ऐका काणी। हेच गाहि येह लोकी।।२८।।
यातच निघे नगर वैकुंठा। नेउन देव सोडी याच वाटा।
तेथ ढोरा वासराचे पोट। काय चारा घाली।।२९।।

१. मातीचा, मळाचा थर. २. विक्री करण्याचा माल. ३. प्रवासातील मजल, टप्पा.

तेथी मळमुत्राच ठिवा(का)न। कोण झाडीते हो शौच्चपण।
पुन्हा जीवासी का देति लोटुन। तो ऐ समर्थ का होये।।३०।।
मध्ये लोकी हरीचेंद्र राज्यान। आथीर स्वप्नी केले राज्यदान।
तो सत्य वचेन न सोडी जान। देव आसत्ये का हो।।३१।।
देवनाम सर्व्याच साह्येकारी। तो का कौरव मारविल परी।
पूर्वकृत जीवासी तारी मारी। जोड फळ का सोडीली।।३२।।
आहो जोच देव तोच सेवक। भक्तीसाठी होतो ह्मनति देव।
तो काये जाला जी चाकर (क)ल्पक। हे कैस शोभे सुआर्थी।३३।
दरीद्रासी द्रव्य येता घरी। तो कष्ट कार्येन करी।
तो सेवक राबवि मंदीरी। यापेक्षा देव नीच कि।।३४।।
पंचकल्यानीक आतीशये। जाग करी शत ईं(द्र)राये।
ऐसी देवाचे आंगी सत्ता होये। हे का रुषि न वदले।।३५।।
ज्याचे आतीशये समोशरणी। कुबेर करी येउन करी नीर्माण।
तेथ ईंद्र होती सेवकपण। हे नाम का नाही ग्रंथी।।३६।।
तीर्थंकर देव मुगुटमणी। तोच सर्व जीवास सुख धणी।
हे का न दिषले रुषीच्या नयेणी। का चुकले हो या आर्थी।३७।
जो त्रीशुद्धार्थ आहे आंतरी। तो सुदेव नाम घेताच परी।
त्याची ईंद्र करीती चाकरी। हे का नाही जी शास्त्री पै।।३८।।
वपु आस्ती चर्म केशाती होये। यात वीष्ट मुत्र भरला आहे।
भक्त गेले ह्मनता याचे देहे। पावले नीज धामासी।।३९।।
तरी कृष्ण जीन का हो शेरीर। ठेउन गेले याच भुमीवर।
कुंभारापरीस गाढव थोर। णाही कोटे मान्य पै।।४०।।
तुह्मी ह्मनाल पराक्रमासाठी। रुषी देव करीती  हे राहाटि।
करून दावावे उत्तम द्रुष्टी। देव लिळा त्या नाव।।४१।।

आहो देव आनी परदारी। का हो दंडावे सींदळासी[१]।
मग केवि पुरुशोत्तम हारी। जीवीत्व सार येकची।।४२।।
यात आत्मा परमात्मा लेशासी। कैसा वोळखावा हो या दृष्टीसी।
की बाजार भरला पीशा[२] पुरुशी। तो विकरा[३] कोन करी पै।४३।
हे मन आज्ञानी ह्मणोनी शास्त्र। जोडोनी ठेवावे सुबुध्ध सुत्र।
जीव कर्म्मकळंकि भ्रष्ट पात्र। उजळे ऐसे पाहिजे।।४४।।
यात पदार्थ नाहि हो नीवाड[४]। वीकु ह्मनताती उंच वस्तु पाड[५]।
ऐसे घेईल तो जानावा मुढ। हे दीशे मम वीवेकी।।४५।।
तो मुख्य पाठक आपुले नयेण। लाल करोनि क्रोध मण।
धरुनि आपटु पाहे पुराण। तो चौथा बोलला त्या वेळि।।४६।।
वदे जी तुह्मी बैसा गादीवर। टोपि घातलि त्याचे सीरावर।
समाधान करी बोले उत्तर। ऐका सर्व श्रोते जणी।।४७।।
हे तुह्मी नाही केल घरी शास्त्र। रुषीन कथुन ठेवले सुत्र।
तेहि पाहाता वीवेक आंत्र। क्रोध मात्र न करावा।।४८।।
पाहाता सत्य दीसे जी यक। शास्त्र आसावे जीवाच तारक।
खोट्या कथा आणी दुःखदायेक। कुगुण भाशे या आर्थी।।४९।।
हे मन मदोन्मत्त गज्याकार। शास्त्र आंकुश करावा नीबर[६]।
तेव्हा सुधा चाले मार्ग संसार। हा पाहा आर्थ वीवेकी।।५०।।
जे औषध देहेसी देत दुख। ते काशा[७] पीवावे आपुले मुख।
ज्या शास्त्री नाही परभव सुख। ते कैस तारी जीवासी।।५१।।
भयासाठी धरावि संगत। तेच मार्गी करू पाहे घात।
की आन्न सांडले आमंगळात। ते त्यागावे की नाही।।५२।।
आहो शास्त्र आणी पापवाट। का हो रचील रुषीने दुष्ट।
ह्मणवी हात नाही मनगट। काये करावे तयासी।।५३।।

१. व्यभिचारी. २. पिसाट, वखवखलेले. ३. विक्री. ४. निवडक, शेलकी.
५. दर्जेदार, उत्तम. ६. कठोर. ७.कशासाठी.

की केशर चीखली कालवी। की आमृत वीख यकची केले।
की तेलि आर्ध निर मेळवीले। ते मोल केवी पावे पै।।५४।।
की जळाले मोते सांडला रंग। कि पारा सुटला आरशाचे आंग।
कि उतमासी घडता कुसंग। कुशास्त्र दिसे यापरी।।५५।।
जेनात पडले काहि आंतर। तर शास्त्री पाहावा त्याचा नीर।
मुळी शास्त्रीच दिसे आवीचार। हे कैसे माने लोकिकी।।५६।।
की राजा आणी आंग तस्कर। त्यासी कशा ह्मनावे राज्यधर।
पोहणाऱ्या न सापडे उतार। संगत त्याची त्यागीजे।।५७।।
साखरेचे आंगी कडुपण। नाहि ऐकीले कधी या काणी।
परी शास्त्र आणी खोटी कथनी। प्रत्यक्षे नेत्रा दीसति।।५८।।
चेर्म नेत्री दीसे जाला आकार। की पारखी जाणे रत्न जोहर[1]।
ऐसे माझे वीवेक आंतर। कुरुषी भाक दीसे पै।।५९।।
की आडाणी हातचा धान्य पेरा। कि बहु सुत गथा गोव दोरा।
की कागदि चुकलीया आक्षेरा। वीवेक ध्यानी दीषे पै।।६०।।
की वैद्य नाडीहुन जाणी रोग। की आंधारी कळे दुज्याच आंग।
कि हिजडिया नराच स्त्री सोंग। न्याहळिता न झाके पै।।६१।।
की हीशोब चुके कागदावर। पुन्हा सांभाळावा की न आंतर।
की पाणी खारे गोड यकंकार। होता पारख पाहावी।।६२।।
की गोलांगुलो[2] कर्तुत्व ज्या लागी। त्याच त्यालाच सोभे सर्वाआंगी।
परी ते नींदनीक स्वर्गभागी। शाहाण केवी शीके पै।।६३।।
की वृशभ आंगाचा बरवा साज। चांगला ह्मनुन लेक्षीती राज।
तैसे शास्त्र आणि नीच काज। का हो केले जी रुषीने।।६४।।
की आपुल वात्रीष्ट[2] आपणासी। सुगंध वाटे जीव मनासी।
तेच वास जाता पर नाकासी। आंतरा दुःख होये पै।।६५।।

१. जवाहर, रत्न.   २. मलमूत्र.

ऐसे रुषी वाक्य आनी बेरंग। पाहता दीसे जी वीवेक संग।
तुह्मी का हो भरता वृथा राग। आह्मा सर्वावरी पै।।६६।।
हे कुरुषी भाकीत ग्रंथ परी। हे पुर्वी नव्हते हो लोकांतरी।
दीसति पंचम काळी न जरी। नवेच जाले उत्पन्न।।६७।।
ते हो तिघ बोलले तर र्कपन। ते कैसी खोटी ह्मनावी वचन।
मुळी तुह्मासीच आकलेल जान। वाचा श्री केवळिची।।६८।।
आद्यापी जीन सदनी कीर्तन। नीत्ये होते हो श्रावक वचेण।
आपुले पक्षाते फार पुरान। उद्योत आहे पुर्वीचा।।६९।।
आहो मुख्य देव माहावीर। ते आतासे गेले मोक्षमंदीर।
यासी वर्षेजालि येक हज्जार। आधीक पन्नास जाणीजे।।७०।।
त्याहाचे माघ[१] पंच श्रुत गुरू[२]। त्यानी शास्त्र केली जग आधारू।
त्यात कथा आहे जीवासी तारू। सर्वि पदवि पुरुशाच्या।।७१।।
ऐसा चवथ्याचा शब्दकार। नीघता पाठक मौन्य आंतर।
धरोनी बैसला गादिवर थीर। करी वीचार चीतासी।।७२।।
मनी न सुचे वीच्यार काही। धुंडाळि आंतर ज्ञान ग(ा)हि।
आता यासी काये वदावी गाहि। पाठक मौन्ये बैसला।।७३।।
की जैसे खेळता कष्टी पोर। होउन नीजे धरणीवर।
की जैसा रनी हारता सुर। बैसे यक ठाई पै।।७४।।
की मजल पुरल्या आश्व जैसे। गडबडा लोळे धरणी।
की म्हातारपणी थके पुरुश जैसे। कळा नाही वदनासी।।७५।।
की युगुळ जणी भांडन होता। येक फीरोनी जाये घरा परत।
ज्यासी आपेश ये लोका तुता। तो बैसे चींता वदनी।।७६।।
की उदम्याचे आटे[३] भांडवल। की समाचार येस[४] खेम(प)ले[५]।
की जुवार्थी द्रव्य हरवीले। तो चींता करी मनासी।।७७।।

१. मागे, नंतर. २. श्रुतकेवली. ३. संपणे. ४. यश, कीर्ती. ५. खपणे, संपणे, अडकणे

की राज्यदारी करीता दंडन। तो खाले पाहोनी घरा ये जान।
की भुतासी होता क्रीये दर्शेन। त्याचा उपाव राहिला।।७८।।
        की कवीस भेटे पींगळमती[१]। तो पुसे गुन आक्षर पध्धति।
        तेव्हा आज्ञान कवीला जे चींती। पाहे बावळा त्या वेळि।।७९।।
की वनात पळे हारण। चौकडी[२] भुले आपुले मन।
की कापले ऋन जाये हारपोन। चींता करी मोळकी।।८०।।
        ऐसे मुख्य पाठक चींतातुर। होउन बोले सर्वासी उतर।
        वदे तुह्मी वीप्र लघु थील्लर। हा वीचार मि वदतो।।८१।।
यासी कुशास्त्र न ह्मनावे मुख। हाच या पंचम काळा चाले पंक।
हे मोहरे विस्तारल या लोका। ह्मनोनी मान्य करावा।।८२।।
        याकाचा पहिला प्रहर। यास्तव सुशास्त्र उद्योत फार।
        आपण तर रुषी बीजाकार। हे ऐसे बोलिजे।।८३।।
आपुली मोहरे हारीकीर्तन। फार वाढतिल जगात जान।
तैसेच गोंद कुशास्त्र सणं। होये मान्ये यासी पै।।८४।।
        चवघ वीप्र वदति मुख्या पाठकासी। याने कैसे तरे हो जीवरासि।
        कुधर्म दिसे सर्व वीष वंसी। आमृत केवी लाभे पै।।८५।।
आहो चालता सुधे वाटने। कर्म व्याघ्र पाहताती दुरून।
हा आधीच जाता वसान[३] वन। ते कोन भक्षीती पै।।८६।।
        आहो घरी आसता धन कन। का हो वीछावे भीकारपन।
        वृथा का व्हावे आवलक्षन। हे नीती कैसे पै।।८७।।
आहो वाचता वाचावे सुशास्त्र। जोडता जोडावे सत्क्रीया सुत्र।
मोहोरे होनार जीवाचे येंत्र। ते हो कैशापरी पै।।८८।।
        आहो ध्याता ध्यावे आरीहंत। कर्ता करावा स्वधर्म उद्योत।
        मोहोर होनार बळीवंत। ते साक्ष आसे देवासी।।८९।।

१. छंदशास्त्र जाणणारा. २. हुंदडताना. ३. निर्जन, ओसाड.

आहो पदोपदी खोटी वचण। आह्मी न बोलु आपले मुखान।
होनाराचे बळ पाहु गहन। येवढ कळे आह्मासी।।९०।।
यासाठी पढु तीर्थंकर उक्त। आह्मी होउ जी हे कुशास्त्रत्यक्त।
वान्नेरासी झाडच भाशे तक्त। तो राजा केवी ईथे जी।।९१।।
की मळीयावर बैसे सोकारी[१]। ह्मने मी चढलो उंच पायेरी।
तो कैसा रुजु उत्तमाचे घरी। व्यर्थ वैखरी कायेसी।।९२।।
की नजर चुकोनी रुपाया। खोटा लाधे आपुल हस्तया।
तो पुन्हा आणी से पन्नास देया। ते दिसता कैसे चालति।।९३।।
की जैसे सोनामुखीचे मोलाला। तो देउ पाहे यर झाडपाला।
की पीसा धाडला करू कार्याला। तैसाच कैसे माजे।।९४।।
कि ताक आणी दुध शुभ्र वर्ण। मुखी घेतल्या केले त्याचा गुण।
की बाळपनी काया हींडे नग्न। दीसा पुरल्या[२] लाजीजे।।९५।।
की मार्गी चालता चुके वाटन। की सोन आटणी मुस फुटे।
की मातोश्रीसी सीवीयता होठ। पुन्हा सावध होइजे।।९६।।
की दारीका[३] चुके गाता गळा। की घेता परार्थ यगळा।
की भुल पड वृत तीथी बळा। पुन्हा त्यासी सावरीजे।।९७।।
की ग्रंथ लिहुन ठेवीला सारा। तो पाहावा ऱ्हस्व दीर्घ आंतरा।
तथापी ठेवीता तसाची थारा। तो मुर्ख पुरा जानीजे।।९८।।
की वैरी जीव घेया जपला। सज्जन येउन सांगे कानाला।
वर कर्तुत्व आले देखण्याला। मग तो ठाव सांडीजे।।९९।।
ऐसे राजमुखे कळले मुळ। आता न करू दे आंतर भोळ[४]।
न पाहु कुशास्त्र आर्थ पाजळ। हे सत्य मानी पाठका।।२००।।
ऐसे बोलुन चवघे ब्राह्मन। तेथ उठले कुशास्त्र टाकुन।
त्यासंगे आणीक पंधरा जन। आले आपुले ठायासी।।१।।

१. छोकरी, मुलगी. २. काळ उलटल्यावर. ३. कन्या. ४. वेडेपणा, भोळसटपणा.

येकोनीस बै(स)ले येकांति। वीचार करीती नाना पध्धती।
केवळ वाक्ये पढावे बोलति। जावे माळव देशासी।।२।।
परीवारासहित गमनेसि। पोहचले पापत्यक्त ठायासी।
उंच घर मागितलि वस्तिसी। सुख सायासि नांदति ।।३।।
आपार पढले जैनागम। दान घेताती श्रावक धाम।
मुखी घेती आरीहंत नाम। पुन्ये जोडी केली पै।।४।।
कवींद्रसेवक ह्मने श्रोतीया। कुशास्त्र न करी संग्रहे ठाया।
ते वाचता पापी होये जीव्हया। कुगतीसी भ्रमवी।।५।।
याचा दृष्टांत ऐका परी। मोजनी करा विवेकांतरी।
मग चीतास येईल ते करी। कोन तारी त्या पाषाना।।६।।
की घरी पोसीली मार्जेर बाळ। की बोरी वृक्षावर जाता बळ।
की कर्ड भुस घेता कमळी। दुःखवीती पर काया।।७।।
सज्जन ह्मनुन वींचु आदरी। घेउनी जलाशयावरी।
की कुदेवताचा नवस परी। दुःख देती जीवासी।।८।।
की जैसे सेर पेरीता आंगनी। की सवत नव्हे सखी भगणी।
की खाऱ्या आडात भरले पाणी। संतोष नाहि जीवासी।।९।।
की वस्त्राचे बोट बोट टुकडे। घरात भरले थोर गांठोडे।
की रुई वृक्षाचे फळ पाड। मन तृप्त करीती।।१०।।
की व्याघ्र सर्प पाळिता सदनी। त्याचा भक्ष्ये खर्च लाभे पुराणी।
की घरची स्त्रि परदार गुणी। हे धर्महानी जीवाची।।११।।
की वैरी करुन घेता सोयेरा। कींचीत् सुख दे पुन्हा क्रोधांतरा।
तो करू पाहे जीवघात शीरा। कुशास्त्र ऐसे जानीजे।।१२।।
की सेती न घेती सरांटे[४] प--त्री। की घरी भीगोरी उत्पन्न जाली।
की मोडक्या सदनाची सावुली। द्वीगुन दुःख जीवासी।।१३।।

१. छंदशास्त्र जाणणारा. २. हुंदडताना. ३. निर्जन, ओसाड. ४. जाड काटा.

की आती डीवरा[१] घेता वृषभ। की दारी नीघता पींपळ कोंभ।
की न दीसे आग्नी राहाता उभा। मोहोर दुःख होतसे।।१४।।
की आती तीखट खाता वदनी। की आवडी ठेवी वीलासिनी।
की आधी पीता सुख भांग पानी[२]। माघुन दुःख होतसे।।१५।।
दारूचा खेळ। की पाह्या जाता व्याघ्र युध्ध सळ[३]।
हे माघ फीरताच आंग पोळे। कुशास्त्र ठेवा यापरी।।१६।।
की फालगुन प्रतिपदा दीवसी। दगड माती खेळति हावसी ।
परी दुःख होये आंगासी। कुशास्त्र जो फाया[४] परी।।१७।।
कुशास्त्र संग्रहे जैस वारा। सज्ञान दिप माळवि थोर।
जीवासी ने पापमार्गावर। सत्ता दाखवी आपुलि।।१८।।
कुशास्त्र जीवाचा पापी हाकम[५]। न नांदु दे रहित सुख समाधान।
नीत्य भोगवी दुख आश्रम। पुन्ये द्रव्य नेतसे।।१९।।
कुशास्त्र जीवाची खोटी करनी। नका धरू हाती आपुले मनी।
नका लेहुन देउ धर्म दानी। पाहा तीर्थ वीवेकि।।२०।।
सांगुन ऐके तोच वेडा। त्याच पाई पडला कर्म खोडा।
तो हिनत्व जन्म होये लंगडा। प्रस्तावा दुःख भोगी पै।।२१।।
येथे आध्या जाला नवा संपुर्न। सुशास्त्र कुशास्त्र घ्यावे वोळखुन।
पाहा गाही माहा पुरान। आर्थ वजनी जोडीजे।।२२।।
हे पुर्वाश्चार्याचे वचेणीसि। उना मात्र प्राकृत बोलीसी।
खोट नाहि आरीहंत नामासी। मुखी घेताच पवीत्र।।२३।।
सुमति ऐसी त्रये आक्षर। हे जाना श्रीशद्गुरुच उत्तर।
हेच प्रसन्नता जाली थोर। करी वीस्तार आर्थाचा।।२४।।
कवीता जैसा येकेंद्रीये वीण। सद्गुरु कृपा तार वाजे जाण।
तोच नांद श्रोतीयाचे काना। करी संतोष सर्वासी।।२५।।

१. उपद्रवी होणे. २. नशापाणी. ३. शल्य, छळ, त्रास, पीडा. ४. कापसाचा बोळा.
५. स्वामी, धनी, मालक.

पुढील आध्याई जोगी कथण। जाउन घेतिल म्लेंछे दर्शन।
तेथ होईल त्याचा आपमान। मग शांत राहतिल।।२६।।
सुमती कथा सुमतीसन। श्रवनी श्रोत्याच तृप्त मन।
सुमती आर्थ भगवान जीन। पाहाने त्रीमुखी वाचा।।२७।।
सुमती साखरेचा पखरंडा१। सद्भावीक मुंगी या लागे तोंडा।
जो पंच मीथ्यात खर२ गाढा। त्याला न कळे सेवण।।२८।।
सुमती पदी जे होती लीन। ते लघु परी उंच धीर्यपन।
तेच वीवेकी राजहांसी मन। सुशास्त्र मुक्ताफळ भक्षीती।।२९।।
नव सर्ग आर्थ पाडा३ सरला। पंच मत श्रुन्याकार कळला।
वीप्रा सुपंचांग बोध लागला। त्रये आसंख्ये जानती।।२३०।।
।। ईती श्री सुमतिप्रकासे कथायां पंचेम काळी कासीपुरा ।।
मध्ये वीप्रमंडळि येकमेकात ।। शास्त्रार्थ कंदन भवेत्।।
जीण धर्म आंगीकार करणे शुभं भवतु नवमो ध्याये संपुर्ण समाप्त।।
वोविसंख्या ।।२३०।। दोनसे तिस।।
।। छ।। शुभं भवतू।। छ।।छ।।छ।।छ।।छ।।

# सुमतिप्रकाश

## दशम अध्याय

। ॐ नमो सी सीध्यभ्ये।। श्री शेतमहेंद्रपतिमान्येय नमा।।

ॐ नमो सर्वसाक्षेचा देखना। जेनी आसोनी रूप नीरंजना।
नाम पावला तीर्थंकर राणा। शतेंद्राचा ईश्वर ।।१।।
ज्याचे तीन छेत्र मस्तकावर। मुख्येंद्र धरीती आपुले करी।
ज्याचे दर्शेनी वैरभाव दुरी। होये तीर्थेच मुर्खाचा।।२।।
ज्याचे पृष्ठ भामंडळ पाहोनी। सुर्य चंद्रादि लाजति मणि।
त्यात दिसे तीन भव कथनी। सर्व जग लोकाची।।३।।
मानस्तंभ गळवी आहंकारी। ऐकुण सद्गुण दावी आपार।
साडेबारा कोडी वाद्ये गजर। न कर्ता जेथ होताति।।४।।
ज्याचे वैभवास गुण जोडणी। फीक्की दीसे सर्व स्वर्ग आवनी।
शाश्वत भाग भुवीद्या धरणी। उपमा देता दिनावे।।५।।
ऐसा प्रतक्षे दिसे जगसाक्षे। तो आधार आसनी आंतरीक्षे।
तोच तृप्त करी मणोपक्ष। सर्वत्र जेगी जीवाचा।।६।।
ज्याचे वस्ती सरस्वती ह्रदई। ज्याचे गनधर पडती पाई।
जो दयाधर्मास करी सवाई। आक्षेय नाम केवळी।।७।।
ऐसीया चेरणी मम मस्तक। लागो वदे कवींद्रसेवक।
हे वीश्व जगाचे आक्षेय सुख। शक्र सांगति सर्वासी।।८।।
श्रोते त्या गावी आळस णसे झोप । चित्ती धरा सुमतिस्वरूप।
हे दाखवि परमात्मस्वरूप। जीवीत्वासी उजळी।।९।।
सुमति उपजे सद्गुरू करि। सुमति नव्हे कवीता परी।
आर्थ पाहा विवेक न जरी। हा वीभाग मि वदतो।।१०।।

**की जैसा वाघ्या(द्या)आणी सासतो नाद। वाजवील्याविण न नीघे छेंद[१]।**
**की वीवेका सीवाये णाही बुध्धा। सद्गुरू करी या परी।।११।।**
**की जैसा वन्ही वसे काष्ठाआंगि। जोत वस्ती तेल तुप संगी।**
**की सुर्येनीघता आंधार भंगी। सद्गुरू करी यापरी।।१२।।**
**की काव्ये आर्थ कटीन आक्षर। त्यावर फिरे व्यार्णिन[२] नजर।**
**कि मेघपटळ आलिया सार। घटका वाद्ये कळवी।।१३।।**
**ऐसा सद्गुरू करी कवीता। होय सज्ञान हृदया तुत[३]।**
**तोच श्रवनार्थ ऐका आता। कर्ण उघडा आंतरी।।१४।।**
**माघ होउन गेले आध्ये नव। कथा ऐका हिंसापुरी गाव।**
**सर्वेजोगी बैसले यक टाव[४]। माव[५] करीती।।१५।।**
**वदती याचे देसी म्लेंछे राजा। आहे परि न भक्षि मांश काजा।**
**चला पाहु तेथील नगर प्रजा। बुध्धी सीकउ तयासी।।१६।।**
**तो आत्यंत होये मांसभोगि। आता जाला की नाही दया संगि।**
**की चोरून आचेरे हिंसा आंगी। हे कवतुक पाहिजे।।१७।।**
**त्याचा आपुला आंतरभेद। येक होता येईल त्याला क्रोध।**
**मग पापत्यक्तासी करू युध। हारी आणु तयासी।।१८।।**
**कोणही वदति तो याचा आंकीत। तो आपुल्यासी न मेळवी चीत।**
**तोहि जाला आहे दयावंत। हे वार्ता ऐकीलि जणी।।१९।।**
**कोणही वदति युगुळ[६] वेळि। आपण आपेसी जालो बळि।**
**आता पुन्हा का करावी कळी[७]। दुष्ट दिसे मजलागी।।२०।।**
**त्यात होता येक वीवेकि नर। तो वदे याचे ऐका हो उत्तर।**
**तो नीचा न थोराची बरोबर। न करावी सर्वथा।।२१।।**
**की सींह्वावर जाता श्वानमेळा। तो कैसा भेहो हृदयकमळा।**

१. (संगीत). २. विवरणात्मक, सूक्ष्म, चौकस. ३. (तुर्त -तुरंत, ताबडतोब).
४. स्थानी. ५. चर्चा, खलबत. ६. दोन्ही वेळी. ७. चुगली, खोडी.

की व्याघ्र बैसले सन्येपाळा[१]। तो मृगा केवि भीती पै।।२२।।
की लघु क्षीतीपती[२] रायानी। नाहि जींकीली सा खंड आवनी।
की जैसे माकोडीयाचे[३] उड्डाणी। मंदर[४] केवी दीशे पै।।२३।।
की स्वर्गवासि भूवन ठाया। कैसि जाये हो मानवी काया।
की वीद्याधराची कन्या जाया। नीच पुरुशा केवि लाभे।।२४।।
शाश्वत कल्पतरूचा आहार। कैसा लाभे नीच किंकर करा।
की व्याघ्रीच दुध काडीता नरा। नाही देखील या नयेणी।।२५।।
की फार काग उडाला आकासी। तो न पोहचे सुर्येवीमानासी।
की गारगोट्या झळके सिरासी। ते रत्नमोला न पावे।।२६।।
की आती उष्ण तापले नीर। तो जाळु न शेके तृनमंदीर।
की वर्शावकाळी फुटे पाझर। ते पुढे होये आदृश्ये।।२७।।
की जीवंत चालनार सर्पासी। काये करतील पींपलीका रासी[५]।
की सरड पाडु पाहे हास्तीसी। हे योगे कैसे होईल पै।।२८।।
दुरुन दिसती उंडगन गोळे[६] । ते तोडु न करू पाहता माळ।
परी कैसी लाघे करकमळ। वदणी बळ दावीती।।२९।।
की समुद्र उदकाचा जोख[७]। करू पाहाती मर्कट लोक।
की तळहाताने चंद्र झाके। ऐसे न देखीले नयेणी।।३०।।
की पक्षे बैसती उंचासणी। ते न ये श्रष्ठाचे तुलणी।
की आंतर खोटियाचे मनी। सुदेव न पावे पै।।३१।।
जरी थोर जाला चेक्रावर्ति। त्याला न साधे ऐरावत क्षीती।
की दीवसा लावीता काकड[८] जोति। ते मिरवनीसी न शोभा।।३२।।

१. निकट, जवळ. २. पृथ्वीचे स्वामी. ३. क्षुद्र कीटक. ४. मेरू पर्वत.
५. मुंग्यांचा समूह. ६. तारकांचे, काजव्यांचे समूह. ७. जोखणे, तोलू पाहणे. ८. मशाल.

**की घनझडीत[1] पक्षीयासी। किडे धान्ये न मिळेती खायासी।**
**ते नीधीस[2] गेले मोते[3] पाह्यासी। जळी बुडता भेति पै।।३३।।**
**की काष्टशस्त्र आहे तिक्षन। वृक्षासी तोडी न वदे मन।**
**की सतीस भोगील पुरुशे स्वप्न। स्त्री पापी केवी होईल।।३४।।**
**की बांदर[4] पाहे बैसतासन[5] । ते ह्मने ऐस लाल नाही कोन।**
**तैसी तुमची सर्व्याची मन। मज दीसति यावेळि।।३५।।**
**सेवकाहाति वश्ये राज्यासी। करू वदता आपुले मनासि।**
**हा आर्थ पाहा दृषत[6] ध्यानासी। केला यत्न वृथा जाये।।३६।।**
**ऐसे नीघता यकाच वचन। त्यावर सर्वेधांवले क्रोधान।**
**त्याला वदती तु आवलक्षण। आपशेकुन बोलसी।।३७।।**
**की आवधीज्ञान उपदेशे। न लाधे आती पापि पुरुशास।**
**की भंगी[7] वेसनी आवडीस। तुछ भासे हीतकार्ये।।३८।।**
**की येक पडे दारु पिउण। दुसरा जाये पैसे घेउण।**
**तो त्यासी वदे फुल काढ जान। दीसता नरकि पड पाहे।।३९।।**
**की ज्याला आती वीषयाचा छेंद। त्याला खोटा दीसे वैराग्य भेद।**
**की येकेंद्र्यासी चर्चीला सुगंध। तो बीनकारणी होतसे।।४०।।**
**की तस्कर बैसले वाटन। पाहुन आला तो वर्जि न जान।**
**जो ऐकोणी पुढे करी गमन। आवेज हारी पावे पै।।४१।।**
**की वैद्य दावी वावडि[8] वस्तु। रोगी ऐकु न घे हृदयस्तु।**
**तो पुन्हा भक्षी होउन मस्तु[9]। सुज धावे सर्व आ(आं)गी।।४२।।**
**की बर जालिया वपु खांडुक[10] । ते आवरिता खाजवी आर्भक[11]।**
**की ढोर सरे आंग घास सुख। वीवेक नाही तयासी।।४३।।**

१. ढगातून कोसळणाऱ्या पावसाच्या धारा. २. समुद्र. ३. मोती. ४. वानर. ५. ढुंगण.
६. दगड, खडक. ७. भांग पिणारा, नशेबाज. ८. अपथ्य. ९. मस्तवाल, माजोरी.
१०. गळू, बेंड. ११. बालक.

की पिता सांगे हीत उद्दिम[१]। तो पुत्र न ऐकि होय आधम।
की दावेदार[२] मोडे कोले[३] धाम। आपकीर्त जोडि आपार।।४४।।
की हानीता श्वान न टाके आस्ती[५]। की बुध्ध न लाध[६] आलीया मस्ती।।
की वज्रमीथ्याता[७] सम्येक्त गति। सागु न दिसे आकळ[८]।।४५।।
की चीरा[९] फुटला दोण भागी। त्याला कोण दीसवी येकांगी।
की चेंदनाचे यर[१०] वृक्षेस(सं)गी। सुगंध न होय प्राप्ती।।४६।।
जे फळ आंतरी कडु नीरस। त्याला काये करी साखररस।
की मनास लागल लागल मांस पीस। कोण काटी (ढी) तयाचे।।४७।।
जो उपदेश वदला मुख। त्यासी दुर्दशार्थ केले दुःख।
सर्व्याच मनोदय हिंसीक। काग पक्षी ज्या परी।।४८।।
ऐसे ते सर्व कुबुध जोगी। देशा उरा चालिले।।४९।।
गेले तया आवींद पाटना। देखीला म्लेंछ क्षु(ल्ल)क राना।
सर्व बैसले कचेरी आंगना। गुप्त वीचार बोलती।।५०।।
वदती तुह्मी सोडुन कुळकर्म। का हो पाळीता जीवदया धर्म।
परी हाच तुमचा आधर्म। न तराल संसारी।।५१।।
तो राजा वदे कुजोगीयासी। जधी दया आली उदयासी।
तधी पासाव[११] देस सुखासी। पावले सर्व लोक।।५२।।
आह्मी जेव्हा होतो हिंसा आंतरी। तेव्हा दुःखार्थ भोगीला संसारी।
ऐकताच पापत्यक्त वैखरि[१२]। प्रत्यक्षे सुख पावलो।।५३।।
गळित होड आदि हे रोग। आसंख्ये दुःख पळाले आंग।
आता कासीया व्हावे हींसा संग। उदीम चाल द्वीगुण।।५४।।
सांक्षात सुखी आहो संसारी। या पक्षे काय दावीसी न जरी।

---

१. व्यापारउदीम. २. शत्रू. ३. कर्जफेडीसाठी. ४. घर. ५. अस्थी, हाड. ६. प्राप्त होणे.
७. अत्यंत मिथ्यात्वी. ८. आकलन, ज्ञान. ९. घडविलेला चौकोनी दगड.
१०. वेगळा, अन्य. ११. तेव्हापासून. १२. वाणी, कथन.

कां बोलिले रे हिंसा उतरी। आत्यांत म्लेंछ क्रोधावे।।५५।।
आरे आमृत भक्षीलीया पोटी। जीव का होईल आत्यंत कष्टी।
की सज्जनाची घेतलीया भेटी। दुःख केवी पावीजे।।५६।।
की बैसलीया चवर डोली[१]। कोनाची रे काया दुःखवली।
की कल्पतरुच्या सुख साउलि। क्षुधार्थी कैसा राहे पै।।५७।।
की राज्यपद आनी भीकारी। नाही ऐकीलीया कानावरी।
की कुबेराचे द्रव्येमंदीरी। तुट कैसी होये पै।।५८।।
की पुर्नीमा चंद्राचे रात्रीण। कोनाचे शरीर पोळले मन।
की घृत पचल[२] भक्षी त्या आन्न। ते देहसी सुख देति।।५९।।
की जालिया सुर्येकीर्ण उदये। कोनास न दिसे चालती सोये।
की घरी द्रव्य नफा दुना होये। कोन टाकी तयासी।।६०।।
की कामधेनु आपुले पदान। चालता आलि कार्यार्थी साधन।
तीला कोण्ही लावी जे पीटुन। तो आभाग्यी संसारी।।६१।।
की सहज जाता वनांतरी। द्रुष्टी पडले सत्पात्र जरी।
त्यासी जो न मानीता आव्हेरी। तो पावी पुरा जानीजे।।६२।।
की पितंग[३] ताडण करी पोरास। त्याला वीद्या सीकवि बहुवस।
जे आधम सीव्या देती पीतास। कुबुध्धी ते जानावे।।६३।।
की सदा पोसीतो आन्न आहारी। येक दीसे बोले कठोर तरी।
त्याचा क्रोध ण मानावा आंतरी। मानीता पाप लागे पै।।६४।।
की धतुर[४] वृक्षाचे जवळ। आपस्त्या(ख्या)[५] नीघाली सोनकेळ।
जो तोडुन टाकी कर कंबळ। तो बुध्धीहीन जानावा।।६५।।
की देव दील्हे सभाग्यपण। नीत्य सीजे[६] शडरस पक्कान्न।
ऐसे आसता जो खाय कदान्न। तो पुन्यहीन जानावा।।६६।।
की जालीया जेन्म भोगभुवनी। तो का वीछील हे काळ आवनी[७]।

१. चवऱ्यांनी युक्त पालखी. २. तुपात शिजविलेले. ३. पिता. ४. धोत्रा. ५. आपोआप.
६. शिजणे. ७. मर्त्यलोक.

की स्वर्गेंद्रपती आनी आज्ञानी। हे नाही ऐकीले ग्रंथी।।६७।।

की सोधीव[१] सोन्याचा आळंकार। वरता[२] करून लेता आंगावर।

ते का कुरूप दिसे जनांतर। बोलता चीत लाजवि।।६८।।

की न पेरीता औषध वल्ली। ते सदनामध्ये उगवली।

की राजमस्तकी छेत्र सावुली। ते नसावी की ईछीती।।६९।।

की धामी लक्ष्मी आत्यंत भारी। बाळक जेन्मती बहुता परी।

ते नसावी का वाटति आंतरी। ज्यासी वाटे तो आभागी।।७०।।

की रूप्याद्र(द्रि)वासी[३] वीद्याधर। तो मैत्री आपनासी लावी फार।

त्याचा का करावा हो आव्हेर[४]। करीता होय आज्ञाणी।।७१।।

की प्रसन्न होउनी कन्याधन। मंदीरी आणील आदर माण।

तो करोनी घ्या वदतो लग्न। का त्यागीजे तयासी।।७२।।

ज्या औषध सुखी झाली काया। ते गुण का न वर्णावे मुखया।

की मन शौच्याचे[५] लागता पाया। तो पापी केंवी होईल।।७३।।

की पतीव्रताचे संगति(ण)। तीर्थवासी करीता गमण।

ते का सीकवील आवगुण। मग ते सती कहीची[६] ।।७४।।

की जेन्म आसोनी णीच न्यातीत। तो मुख सदा पाळी सत्य वृत।

की वदनी बोलता आरीहंत। तो पापी कैसा होईल।।७५।।

आरे ऐसी जीवदया पाळीता। का पातक होईल जीव माथा।

का रे खांडीता[७] मम धणी पंथा। कुजोगे हो दुष्ट बुध्धी।।७६।।

आरे मि जातीचा म्लेंछ जाण। परी राजआज्ञा पाळी प्रमान।

का रे खंडीता हृदयलक्षेण। करा हींसा बोलता।।७७।।

मी जातीचा हो आवींद नीच। हिंसा धुउन मन केले शौच्य।

तुम्हा आंतरी पापमळ गच्च। बैसला आहे आद्यापी।।७८।।

येक वेळा तुह्मी आपमाण। पावलेत राजसभा सदन।

---

१. शुद्ध, बावनकशी. २. नग, अलंकार. ३. रजताद्री-विजयार्ध पर्वतावर राहणारे.
४. इनकार. ५. शुद्ध वस्तू. ६. कैची, कसली. ७. भंग करणे.

तैसेच खोटे जाले बाह्मण। तुमचे कारयासाटी पै।।७९।।
तैस सीकउ ह्मणता येथ। परी मी ताडीन काष्ट हस्ते।
की करीन भोंड[१] शरीरास। जाल आले थोटे[२] गावासी।।८०।।
म्लेंछ वदे आपुले आंतरी। शीक्षा करावी याहचे शरीरा।
तरीच येतील टीकाण्यावरी। हे लोकासि टकवीती।।८१।।
म्लेंछ बोलावीला चंडकर्म्मा। त्यासी वदे पदाति[३] आणि धामा[४]।
जोग्याची करा आप्रतीष्ठा सीमा। मीरवा चहु बाजारा।।८२।।
तो ह्मनोनी उटला तेथोनी। पदाति बोलावी आकरासे गुणी।
त्यासी वदे आना खरालागुणी[५]। करा स्वार याहासी पै।।८३।।
सर्वी आनवीली सातसे खर। मिशा मुंडल्या जोग्याची शीर।
मग बैसवीले गाडवावर। माघे पोर लाविले।।८४।।
पुढे माघ टीमटीम्या गर्जणा। मंत्र जपती पाडवा फालगुणा[६]।
कोण्ही आपटीती खडकासनं। पुन्हा बैसवीती वरी।।८५।।
ते नगरवासि जन स्त्रि बाळक। तैसेच म्लेंछाचे लघुशेवक।
द्रुष्टीन पाहताती कौतुक। सेण गोळे हाणीती।।८६।।
ऐसे नगरित येक प्रहर। फिरवीले रस्ते चहु बाजार।
लेववीले दुर्दशा आळंकार। गावाबाहीर पिटीले।।८७।।
खर आणीले फीरुन ग्रामा। नेउन दिधली ज्याची त्यास धामा।
सर्व भृत्ये लागले राज्येकामा। दया महीमा वाढली।।८८।।
ईकडे जोगी सरीता पाळि[७]। सर्व करीती शौच्य आंघोळि।
वस्त्र झाडीती मृतीका मळि। दुःख माणीति आंतरी।।८९।।
वदति पुरे पुरे ते मांस। बोलता दुःख होतसे आंगास।
आजपासुणि न आनु मुखास। नेम घेतला आंतरी।।९०।।
की जैस आती तस्कर ढोर। त्याची मोडलिया पद कंबर।
ते प्रस्तावे[८] आपुले आंतरी। दुःखी पड भुमीसी।।९१।।

१. अपाय. २. क्षुद्र, हीन. ३. पायदळ. ४. घरी. ५. गाढवास.
६. फाल्गुनातील सण, शिमगा. बोंबाबोंब, शिव्या. ७. किनाऱ्यावर. ८. पश्चात्ताप करणे.

की ज्याची चाल आति वचवांगी[१]। तो आटकळुन पडतो आंगी।
की वैरीयाचे पडता प्रसंगी। दुःख उपजे आंतरी।।९२।।

की वीषयार्थ्याचे पोटी कामाग्न। ते(पे)टता त्याला स्त्रि दीसे नग्न।
भोग न मीळता पडे स्वप्न। पाप जोडी आपार।।९३।।

की गज भटके हस्तिनीसाटी। ते न दीसता आंतरी होय कष्टी।
की कीरक[२] कोरीता शुक्ल काष्टी। होति दुःखी आंगाणी।।९४।।

की ढोरामागे लागता श्वान। की कोण्ही बीनकारणी हींडे वन।
की मुखी नीघता आवलक्षन। दंड पावति आंतरी।।९५।।

की जो आती फार बोले लबाडी। तो येकदा दंड पावे चाहटी[३]।
की केले कर्म पडता उघडी। आप कीर्त होये लौकिकी।।९६।।

की जो आघोरि फार खाये आन्न। न सांभाळि मर्यादा कंक्रपन[४]।
की जीव आहे पुर्व पुण्ये हीण। दुःख उमटे तयासी।।९७।।

की जो सदा खेळ करे आग्नी। तो येकदा जळे तउ[५] लागोणी।
की सवतीचे माहेर सदणी। सुख कहीचे जीवासी।।९८।।

की कळपातुन चुकता सेळी। ते आंग गर्व जाये व्याघ्र जाळि।
की पापी जीव पडे भुत मेळि। सुख कैचे त्या लागी।।९९।।

की कोडे[७] रचले दुसऱ्यावर। ते फिरूण पडे त्याच त्यावर।
की तोट्याच केन घेता थोर। लाभ कैसा पावीजे।।१००।।

की व्याळ[९]मुखाची घेता गरळ। करीन वदे आमृत रसाळ।
की ईंद्रासी युध्ये खेळता बळे। योग्ये कैसे होय पै।।१।।

की जैसे आती खोडील पोर। तो जाय खात्याचे[१०] दुकानावर।
तापले लोखंड उचली कर। आंग पोळत णाचि[११]।।२।।

---

१. वेडीवाकडी. २. पोपट. ३. चावट, चाहटळ. ४. ? ५. ताव, ताप, झळ.
६. कह्यात, ताब्यात, प्रभावाखाली. ७. कपट. ८. व्यापाराची वस्तू, माल.
९. सर्प. १०. लोहार. ११. नाचू लागतो.

की राज्याला घालीता मारेकरी। ते गुह्ये[१] जाये त्याचे कानावरी।
तो धरोनी त्यासी दंड करी। मग प्रस्तावे मनात।।३।।
की आवडीने बीबव्याचे तेल। ते सारविता सर्व आंगाल।
की सैन्य जुंजता जाये पाह्याला। गोळि लाग आंगासी।।४।।
की सदनाचे क्षुल्लक दार। तेथ लउन जा-यैता थोर।
हिसका बैसे मस्तकावर। मग प्रस्तावे मनासी।।५।।
की सिंह व्याकुळला झोपण। त्याला आरी[१] हालवी सोंडीन।
की मस्तीन जाता कुमार्गान। तो सुखी कैसा होईल जाण।।६।।
की वीषतरू लावीला दारी। त्याला फळ ईछी आमृत कैरी।
की आगाध पेरीले नदितीरी। ते रूपा कैस येईल।।७।।
की आर्क[२] तापवी आती आवनी। कोण्ही थुंकु पाहे त्याच वदनी।
की सतिस नींदीता वचेणी। स्वर्गेंद्र हास्ये होइल पै।।८।।
की आष्टम नंदेश्वराची धरा[३]। न दिसे वीजयार्धवासी नरा।
की केवळ ज्याचे आंतर। पार न कळे शक्रासी[४]।।९।।
की वद गो आनी नरपती। ते समसमाण केवी दीसती।
तैसी हींसा आणी दया ज्याति। तुळणे[५] कैसी येईल।।१०।।
ऐसे जाले ते सर्व कुजोगी। कष्ट मानीती हृदयभागी।
नसावे वदती कपट आंगी। पुर्त[६] ठकासी पावलो।।११।।
आता हिंसा न करी उपाव। आंतरी वागउ शुद्ध भाव।
सत्ये दाहि(वि) पापत्यक्त राव। आह्मी मानु या जगी।।१२।।
पापत्येक्त राजा सत्येवादि। दोन वेळा लज्या राखीली संदी[७]।
हा सेवक त्याचा आहे कुबुद्धी। नीचत्व केल आह्मासी।।१३।।
ऐ(सा) प्रस्तावा करुन जोगी। उठले सर्व सरीता भागी।
चला वदति समंध[८] संगी। आले आपुले ग्रामासी।।१४।।

१. शत्रू -हत्ती. २. सूर्य. ३. नंदीश्वर द्वीपाची भूमी. ४. इंद्र. ५. समानता.
६. पुरते, संपूर्णपणे. ७. संधी. ८. भूतप्रेत.

जोगी हींसापुरी हींसातीत। सर्व परीवार संगी नांदत।
परी येक केल पाखांड मत। ते ऐका पुढे श्रोते हो।।१५।।
केल्या कृष्णजी राधेच्या मुर्ती। नवकवीत्व जोडती आर्ति।
वीठल वीठल ऐसे गाती। प्रेम दावीती जगासी।।१६।।
तेथ कुवीद्येची प्रचीत फार। दावीती शुद्र आनामिका घर।
दुःखी पाडोनी उठवीती पोर। वीठल नाम घेताति।।१७।।
शुद्र आनामीके केले शीष्ये। नव आभंग जोडीती पदास।
शीश्याते वदति व्हा हारीदास। मोहनी वीद्या दाविती।।१८।।
जोग्यातील जे महंत बावा। तो झेंडु पुष्पाच्या करी खडावा।
पुजन वीपरीत काढी मावा[१]। दया भाव न जाणता।।१९।।
कोण्ही सुज्ञ सांगती जोग्यात। नसती चाल नका स्थापु पंथ।
ते वदती हे नव्हे हींसा घात। क्रुपा कळे आह्मासी।।२०।।
नीचास सीकवीती व्यासवानी। घरी वाटुन पीति मोहोपानी[२]।
ते यकांत मंत्र फुकीती कानी। कुमार्गासी वाढवीती।।२१।।
ऐसीया तीन महिन्यावर। हे मात गेलि राज्ये कानावर।
त्या ज्ञानपुरी सेवक नर। सांगती पापत्यक्तासी।।२२।।
धरणीभुजा[३] वदे शस्त्रजीसी[४]। ते का पुन्हा करीती हिंसेसी।
हे पाडा टीकाणी गुनराशि। सीक्षा करू तयाला।।२३।।
शास्त्रजी[५] वदती हे भुधर[६]। ते नाही करीत हिंसाकार।
परी वीपरीत मुर्ती केल्या थोर। मुर्ख जना दावीती।।२४।।
पापत्यक्त बुध्धीचा सीरोमणि। ह्मणे हिंसा संभाळा मात्र करणी।
मग काही तरी करोत जनी। नाम सोडा तयाचे।।२५।।
की पोरी खेळती खापरदेव[७]। तेथे श्रेष्ठ का लावीले भाव।
कुजन ग्रामवस्तीचे टाव[८]। स्वर्गेंद्र कैसे येतील।।२६।।

१. माया, मोहिनी. २.. मोहाचे पाणी, दारू. ३. राजा. ४. सेनापती. ५. पुरोहित.
६. राजा. ७, मातीच्या मूर्ती, बाहुल्या. ८. ठिकाणी.

जो ईक्षुरसतुल्ये पीतो जळ। तो का क्षार तो येईल बळ।
की चीलटाचे[१] डसल्या सळ[२]। मंदीर कोन सोडी पै।।२७।।
ज्याण सख्यत्व केले श्रीमंतासी। तो का शर्ण जाईल कींकरासी।
की आस्तीत[३] संचल्या जळासी। राजहंस न पेती पै।।२८।।
की फुटक्या कवडीयाच्या माळा। कुदेवता भक्त लेताति गळा।
जो नीत्य भोगी सुवर्णसोहळा। तो न स्पर्शी कवडीसी।।२९।।
आक्रुती मो(दे) देववंदनेसी। गीर्वाण हींडती मध्ये भुपृष्टी।
ते का वस्तील ये लोक श्रुष्टी। भु श्रुध्ध नाही त्यासी पै।।३०।।
की चेक्रवर्ति स्त्रि भोगी पद्मीण[४]। त्यान कुश्चेळ[५] स्त्री देखीली नग्न।
तो न वीछी आपुले काम मन। जोगीप्रती मायापरी।।३१।।
की श्रेष्टासणी चालला परन्या[६]। पीवळी[७] देखीली मातांग कन्या।
तो काये लावील तीसी लग्ना। जोगी कर्तुत्व या परी।।३२।।
की धनवंत कुंभाराचे घरी। मीरवण[८] काढीली खरावरी[९]।
ते उतम पुरुशाचे आंतरी। आसोभनीक[१०] दीशे पै।।३३।।म
जो उतरला जलधीचा पुर। त्याला तुछ्ये दीसे नदीचे नीर।
जो वीवेक पारखी रत्न सार। तो खोटा पैसा न घे पै।।३४।।
जो आंतर शुध्ध ब्रह्मच्यारी। च्यारू[११] चळवायास आली नारी।
तो तयासी लेखे मातेपरी। वीवेक ध्यानी राहे पै।।३५।।
ऐसा जो आंतर दृढ सम्येक्ती। तो का पुजील कुजोगी पध्धति।
त्यासी आमान्ये कुदेव मुर्ती। तो सुदेवासी न जाने पै।।३६।।
या आर्थी नका छेळु तयासी। राजा वदला सभेत भृत्यासी।
सर्व वदती जी जी वीनंतीसी। तुमची वाचा मान्ये पै।।३७।।
ह्मने नीत्ये चला नेमगीरीस। केवळ उक्त औ(ऐ)कु पुराणास।
केली तयारीसे वर पुरुशे। सैन्य पुढा आनील।।३८।।

१. क्षुद्र कीटक. २. शल्य, पीडा. ३. ? ४. पद्मिनी, अति सुंदर स्त्री. ५. कुलटा. ६. विवाह करण्यासाठी. ७. गोरी. ८. मिरवणूक. ९. गाढवावर. १०. बेढब, बेंगरूळ. ११. सुंदर.

राजा बैसला मतंगावरी[१] । संग चालले सैन्ये लहरी।
गमन केले जीवतारी गीरी। वाद्ये गर्जना होतसे।।३९।।
जैसे ग्रहाधीष संग देवता। उद्योत करी मध्ये लोकातुत।
की नीधी जळ[२] वायो हुसळता। शोभा दीसे जनलोकी।।४०।।
की कलाभ्र[३] संग ताराम(ग)न। नीबीड दिसति स्थीरपन।
की वनस्पतीस खुळता[४] पर्ण। शोभा दीसे आपार।।४१।।
की स्वर्गवासी आप्सरा सहीत। पुजु जाती नंदेश्वर चैत्ये।
की उतर दीकुपती[५] मंदीरात। कमला शोभे ज्यापरी।।४२।।
की तीर्थंकर वीवाह होता। आमर स्थीरती आकाशेपंथा।
की चेक्रवर्तीच्या सभेतुता। दाटी होये भुभुजा[६] ।।४३।।
कि जीनागारी जीनकीर्तण। होता सभा दाटे थोरपण।
की मेरूच्या भोवताले वन। शोभा वदती शक्र पै।।४४।।
की चतुर्दश वाद्याचे पाट। आखंड वाहति भडभडाट।
तैसे या राजाचे वीर सघट। मार्गी चालती येकांगी।।४५।।
की पादपा[७] उगवे फुलसरी[८]। की लग्नी सजे नवरानवरी।
की भोगभुमीच्या सर्व मंदीरी। लेण[९] लेती समसमा।।४६।।
की जीनेंद्रेस मातृपीत्या पुढा। मुखेंद्र[१०] नाचती गायेन गाती।
कि वृक्षे लोंबले सुरस पाडा। ते जनमनी आनंद।।४७।।
की जैसे गजामस्तकी सींदुर। कि रत्नहार हृदयावर।
तैसे शैन्ये शोभे धरावर। लखलखीत दीसतु।।४८।।
की आसंख्ये आहे वस्त्रिच्या मेळा। कुकूम दीसे लावीले भाळा।
कि धणात[११] झळके चेंपाकळा। लोक नयेनासी दीपवी।।४९।।
ऐसे सैन्य शोभे राज्याआंगी। तुंबळ चालले आरण्यसंगी।
आडवाटत भेटले कुजोगी। नृपति दृष्ट लावी पै।।५०।।

---

१. हत्तीवर. २. समुद्र. ३. चंद्रपूर्ण आकाश. ४. सळसळताना. ५. कुबेर. ६. राजा.
७. वृक्षावर. ८. फुलांचे ताटवे. ९. अलंकार. १०. मुख्य इंद्र. ११. ?

हींसापुरीहुन आकस्मात। कुजोगी चालले भीक्षा मागत।
सहज गाट पडली वनात। मनी सर्वेभेले पै।।५१।।
जैसा चोर भीतो पाहुन सावुली। आंग टाकी आंधार गली।
की कोप लागता सुके वली। रंग जाये तयाचा।।५२।।
की कोण्ही आसोनी दासीपुत्र। दुर देसी सांगी उतम गोत्र।
त्याचा भेद्या मीळता वदे मंत्र। भये सुटे त्या आंतरी।।५३।।
की ज्या गावी जाल खरारोहण[1] । त्या गावाचा भेटता सज्जेन।
खोटा दुऱ्हुनच झाकी वदन। लज्या माने आंतरी।।५४।।
की येक बसे वेश्याच घरी। तेथ दुजा जाता आटके दारी।
की प्रतीष्टा गेली श्रेष्ट शेरीरी। जगी फीक्का दीसे पै।।५५।।
की येकदा घेता उसण केन[2]। तो पुन्हा न दे त्याचे नउन।
की खोटे कार्यार्थी जाता कान। वस्त्र सावरी मस्तकी।।५६।।
की ईधवेचे वाढता पोट। तीला राज्येदारी नेता धीट।
की मन कपटी बोलता होट। शेब्द चावळे[3] ज्यापरी।।५७।।
की जो सर्वांग पाटी वीद्या पुढे। तो क्षुल्लक ज्ञानी माघ दड ।
की उचल्या पाहे चहुकडे। गमन ईछी मनासी।।५८।।
जैसी परदारी करमणी[4]। ते भीडे परपुरुशा लागोनी।
ते तीसऱ्याने देखता नयेणी। माघे सरती दोघेही।।५९।।
की कोल्ही नीजती झाडाखाले। तो सींह्ये सहज वाटन चाले।
की गरुड येता दडपे सर्पाले। ते वृथा मनी भेती पै।।६०।।
ऐसेच ते सर्व कुसन्यासी। उभेच भेले आपुले मनासी।
बैसु पाहती झाडपोटासी[5]। वीचार मनी करीती।६१।।
वदती आज वीघ्न आले काया। दुष्ट दीसे आमुच्या डोळिया।
आता कईची[6] भेट पुत्र स्त्रिया। पुर्ववत् चींता करीती।।६२।।

१. गाढवावरची वरात, धिंड. २. विक्रयवस्तू. ३. अडखळणे. ४. कर्मिणी, दुराचारिणी.
५. झाडाच्या मागे, ढोलीत. ६. कसली.

ह्मनति मुर्ति केल्या पाखांड। ते ऐकील आसेल कोन्ह्या तोंड।
आधीच तो पारखी नीवाड[१]। गती कैसी होईल।।६३।।
ते ऐसे ह्मणोनी बैसले तळी। पापत्यक्त हस्तीऊन न्याहाळी।
भृत्यासी वदे बोलवा जवळि। शैन्य स्थीरावे त्या टाई।।६४।।
पदाती गेले धावत चेर्णी। राज आज्ञा सांगती जोग्या काणी।
जोगी उठले सर्व धरेहुनी। आले नृपती जवळ।।६५।।
राजा वदे महंत बावा। कोणे गेले होतेत गावा।
आता कोठ केला देह विसावा। कीं क्रुत्यासी करीता।।६६।।
तुह्मी मुर्ती केल्या ह्मनती वीपरीता। नुतन कवीत्वकळा जोडीता।
ऐसी ऐकीली आह्मी वार्ता। हे सत्य कींवा खोटी पै।।६७।।
ऐसीच कराल हींसा हाती। जरी आली मम कानावर्ति।
मग करीन आवकळा गती। जीव देह्यासी मुकाल।।६८।।
लज्या तर नाही तुमचे मणी। खरी बैसवील मम म्लेंछानी।
पुन्हा दावीता या जगी वदनी। सत् कीर्त घ्रान हीन हो।।६९।।
जे लज्येवीण मनुश्यपण। ते चर्मपदाचा[२] टुकडा जाण।
की ते आपवीत्र श्वान वदन। कोन नीर्मळ करी पै।।७०।।
की ईष्टा[३] नेउन धुतली जळी। की उकरंड्याची[४] काढीता मळी।
की ग्रामखंदक मध्य पाळी। शुध्ध नाही जाणीजे।।७१।।
की आस्ती[५] केशे जाळीता आग्नी। ते शुध्धता न पावती गुणी।
की काग पक्षीयाचे मनी। वीष्टा वसे सर्वदा।।७२।।
की नींबाआंगच कडुपण। ते नीरी धुतल्या न जाये जान।
की मार्जेर केले तीर्थस्नान। हींसा वशे आंतरी।।७३।।
की खडकी पेरीता गहु धान्ये। ते न उगवती थोरपन्ये।
की ताडवृक्षाची छाया गहन। आसोनी नाही लौकीकी।।७४।।

१. चिकित्सक, खरोखर. २. पायतानाच्या लायकीचे. ३. विष्टा. ४. उकिरडा.
५. अस्थी, हाडे.

की खर्च करोनी केलि वीहीर। चुनेगच्ची केल्या पायऱ्या थोर।
त्यात णाही जीत तोयेपाझर। ते आसोनी नाही जणी।।७५।।
की वृक्षात उद्भवे सींदी झाड। की कडु फळाचा पीकला पाड।
की मीथ्या गुरूच ज्ञान गोड। हे नींदनीक लोकीकी।।७६।।
की शुकर[1] पोसील मीष्टान्न। की जे वीष्टा सावडी[2] आंगन।
की आनामीकाचे वस्ते सदन। पवीत्र कोण करी पै।।७७।।
की येर[3] नदीचे सीपले मुख। त्यावर पडे स्वातीचा उदक।
त्यांत न जेन्मती मोत[4] झाक[5]। तो वृथा जेन्म जानावा।।७८।।
की आनुष्टान करी वनांतरी। चीत वणवी वीशेय संसारी।
ते केवळ कर्तुत्व नीर्फळ परी। होवोनीया जातसे।।७९।।
की भुमी गुण येक जळ क्षार। बाकी सर्व सींधुच गोड नीर।
ऐस मानवीत तुह्मा आंतर। दीसुन आले प्रत्यक्ष।।८०।।
ऐसीच तुमची सर्व्यांची मन। धर्मोपदेश न लाधे जाण।
येका आर्थी बरा काळा पाशाण। तो कामा येता भींतीसी।।८१।।
ऐसे णीघता नरेंद्रोत्तर। जोगी थांबवीती क्षेनभर।
ह्मनती औ(ऐ)का कर्तुत्व आक्षेर। मग क्रोधासी येईजे।।८२।।
आहो तुह्मी जे बोललात वाणी। ते सर्वी नव्हे खोटी काहणी।
परी कींचीत् ऐका आह्मा वदणी। पृछ्या वीचार वदतो।।८३।।
जे वीठल रुक्मीणीच्या मुर्ती। ते पोराहि खेळ केला जगती।
तेच ख्याल टपा गाण गाती। सहज आपुले घरी।।८४।।
राज्या आह्मी ज्या राहतो नगरीस। तेथ आपार शाहणे स्त्री पुरुशे।
ते न करू देति पाखांडास। तव आज्ञेन चालती।।८५।।
तव सत्ता चाले माळव देशी। आह्मीही टाकीली हींसा रासी।
पाळीतो उत्तम दया धर्मासी। हे खबर घ्या लौकीकी।।८६।।

१. डुक्कर. २. सारवणे. ३. वेगळ्या. ४. मोती. ५. झळाळी, तेज.

जोगी वदती जी भुमीराया। आमचे गमन तव टाया।
आह्मी क्षुधार्थी आहो पोटीया। धान्ये दान देईजे।।८७।।
यास्तव आलो जी आडमार्गी। तु सदा सर्वाचा दान संगी।
प्रस्तुत तृप्त करी आह्मालागी। हीन वदनी बोलती।।८८।।
तव ध्यान गीरीसम आचेळ। तव हृदई दया फार जळ।
स्त्वं सर्वोत्तम श्रेष्ट भुपाळ। मुखी कीर्ती वानीती।।८९।।
नृप कीर्तीचा नाही भुकेला। नीत्ये जोडी परोपकाराला।
वस्त्र धान्ये देतो दुर्बळाला। त्याआर्थी हे मोजीजे।।९०।।
मनात वदे दान च्यार। परी पोटार्थ्यी द्यावे आन्न थोर।
जीव ह्मणोनी करावा आदर। पशुवत् मीथ्या पोसीजे।।९१।।
जैसी ग्रामात मार्जेर श्वान। ते आलीया दारी घालावे आन्न।
तेथ न व्हावे वीन्मुख पन। होता दया ही नावे।।९२।।
कि सदनी पशु सत्व फार। त्यासी तृण घालावे पोटभर।
की आनामीक आलीया दार। आन्न त्याते देईजे।।९३।।
की वीशयार्थाचा मोडला पाये। ते औशधी नीट करावी काये।
तो सुखी जालीया त्याचे हृदये। आसो कवण्यापरी पै।।९४।।
की चोर पडला बंदीखानी। त्याला पीडा होये क्षुधाआग्नी।
तयासी चारावे आन्नपाणी। न देता पाप लागे पै।।९५।।
की येक पत्नी राजमंदीरी। दासी वसती बहुता परी।
ते पाप न झोंबे नृप शरीरी। तैसे हे दत्त[१] जाणीजे।।९६।।
कि धान्ये सांडले आंगणात। ते हिंसीक पक्षी बैसती खात।
त्यासी न उडवावे या हात। पीटीता पापी होईजे।।९७।।
की आती तप्त उष्णकाल माझी। गर्धव[२] आली आपुले छ्यायासी[३]।
त्यासी बैसवावे सावराली। पीटीता दया जाईल।।९८।।

१. दान. २. गाढव. ३. आश्रयास.

की व्याघ्र सोडील मांश खान। तो हींडु लागला ग्राम सदन।
ते न पीटावा दयावंत मण। हानीता आधर्म होये।।९९।।
ऐसा राजा समजला मनी। जवळ बोलावी तराळ[1] गुनी।
ह्मने जोगी न्या ग्रामालागोनी। धान्ये वस्त्र देईजे।।२००।।
ऐसा बोलो पापत्येक्त राये। जाता जाला जीवरक्षक टाये।
चीती धरी धर्मस्थापीत पाये। मुखी वदे आरीहंत।।१।।
आज्ञांकीत गेला ज्ञानपुरा। कुजोगी नेले भंडारघरा।
सातशे वस्त्र वोपीली करा। धान्ये दील्हे तैसेची।।२।।
हे आश्चर्येकरीती नगर जेन। आज्ञांकीत सांगी जाले कथण।
कुजोगे ही हर्शेकेले गमण। गेले संसार टायासी।।३।।
येथे आध्या जाला दाहवा पुरा। कुजोगी उपाव न चाले धरा।
दया धर्म वाढला देशांतरा। सर्वा (आ)नंद जाला पै।।४।।
श्रोते हो ऐका आंतर सज्जेण। या राज्याचे आती कोमळ मन।
कींतू ऐका भल्याची लक्षण। जागा होईजे वीवेकी।।५।।
सज्जण आंतर कल्पपादप[2]। येरास नीववी आंतर रूप।
की तो जैसा भगवंतस्वरूप। दरीद्र त्यागी जीवाच।।६।।
सज्जन आंतर दशांग मन। त्याला जरी क्रोध जाळील आग्न।
तो सर्व्यासी देतो सुगंधपण। मान यावे देवधारी।।७।।
सज्जन आंतर नवनीत। कडक तावीता होय घृत।
जीव आंगासी चढवी जोत[3]। तृप्त करी सर्वासी।।८।।
की जैसी पुष्प सडवीता तीळी। की नीश्चये पुरुशासी देता सुळी।
की चेंदन काष्ट धसणी[4] जळी। सेख[5] सुगंध दावीती।।९।।
जैसी कर्दळीफळ गोडपण। त्या आंतरी नाही कींचीत् कण।
की महा वहंती नदी जीवन। संतोषवी दुसऱ्यासी।।१०।।

१. मांग, वधिक. २. कल्पवृक्ष. ३. तेज, कांती. ४. घुसविले असता.
५. उरले असता, शिंपडले असता.

की सुरस शाखील दळे पाड। की बीबव्या आंतरी बीज गोड।
की सुगंध पुष्पी खुलल झाड। परोपकारी जाणीजे।।११।।
की मृतीका कांचन माति। की सुर्येचंद्र आंगची ज्योती।
की णीधीस[1] मुक्ताफळ जेन्मती। ते सुख देती परासी।।१२।।
की ज्या पर्वतात पोटी जीवन। की नारेळात कोमळपण।
की गउ दुग्धाचा पान्हा गहन। हे नीववीती जीवासी।।१३।।
की कापुस बोंड दीसे लाहान। ते सर्व जीवकायाच झाकण।
की यथाख्यात नीग्रंथाच[2] मन। षटु तनुसी पाळीतु।।१४।।
की सर्व समुद्रात पंच थोर। ते जळ पडे देव आंगावर।
की भुभुजात[3] चक्रवर्ती सार। पावन वपु[4] जेगात।।१५।।
की बावन्नकस कनक आंगी। ते हाता न चलवे दोन भागी।
की तीर्थंकर जन्मले प्रसंगी। सुख उपजे जनात।।१६।।
की रेसम आंगी मृदुपण। वपुसी सुख दे शोभायमान।
की पुण्ये माहेरी करीता पेण[5]। दुःख आपार जातसे।।१७।।
की जायेफळ पत्री लवंग। त्याच रगडुण टाकील आंग।
की चांदी तावीता आग्नीसंग। तेन हीनावे आंतरी।।१८।।
की स्वर्गी संपुष्ट सीळा योनीत। नाही मळमुत्र न होये उत्पण।
की तेथील धरणीचा पथ। शुध्ध नीर्मळ ज्यापरी।।१९।।
की दधी घुसळता आंगणी। ते न माणी कष्ट परी दे लोनी।
नफा करी द्रीगुन ताक पाणी। सज्जेन मन या परी।।२०।।
ऐसे पापत्यक्तच आंतरी। तो न चालवी वैऱ्यासी वैरी।
जीवासी सुखदान दे उदार। मानी सज्जेन सर्वासी।।२१।।
आता पुढे आर्थ सेवट संधी। आकरावा आध्या शब्दांमृत नीधी।
श्रोत्यासी उपजवी दयासीध्धी। सुख पेण्यासी नेइल।।२२।।

१. समुद्र. २. संपूर्ण चारित्राचे पालन करणारा मुनी. ३. राजा ४. शरीर.
५. मुक्काम, निवास.

दाव्हा आध्या जैसी दसलक्षण। घडले पातक होये खंडण।
पारख दावी सुमतीरत्न। सम्येक्त भाव उपजे।।२३।।
सुमती कथा पुन्ये आगर[१]। यात शब्दार्थ भरा केन सार।
हे नफा देते सुजन्म फार। दुःख दरीद्र फेडि पै।।२४।।
सुमती शेब्द समुद्र खोल। जो श्रोता वीवेकी बुडी मारील।
त्याच्या सुखरत्न लाभे हाताले। मोल जन्मासी होतसे।।२५।।
सुमती शेब्द मंगळ सुत्र। नीवृती गळा बांधा पवीत्र।
ईला प्रणुन घ्या होईल पुत्र। वीवेक नाम जयाचे।।२६।।
सुमती कंटी पदक माळा। वैरागे कर घ्या घाला गळा।
तो श्रोता शोभे पुराणमंडळा। आक्षये लेने जीवाचे।।२७।।
।। ईती श्री सुमतीप्रकासे कथा या पंचम काळी। म्लेंछे पाटन ग्रा(मा)मध्ये।।
हींसार्थ वचेन प्रयोगे कुजोगी आपमान भवेत्।
प्रस्तावा दुःखेन हींसापुरीत प्रवेशो न्नाम दशेमो ध्याये संपुर्ण समाप्त।।
वोवीसंख्या ।।२२७।। छ।। शुभं भवतु।।छ।।

* * *

१.खाण, घर.

# सुमतिप्रकाश

## एकादश अध्याय

ॐ न्नमो सीद्धभ्यो।।

श्री वीतरागाये नमः। श्री आनंताये  नमः।। श्री सरस्वतीये नमः।। श्री माहावीर तीर्थकराये नमः।।

जये जयो जी महंति स्वामीनाथा। तुमचे पदि मम माथा।
सींव्ह लांछेन भगवंता। वीरनाथा माहावीर।।१।।
जये जयाजी वर्धमानस्वामी। चेरनी शेरन मी।
दिनोध्धारण आभीधान तुह्मी। माते पदि तारावे।।२।।
भगवंता जीनाग्र मणि। भगवंता तु त्रैलोके धनी।
भगवंता तु मीत्रातरनि। चींद्रुप खानी भगवंता।।३।।
भगवंता तु श्रुष्टी पाळक। भगवंता तु त्रैलोक्या आर्क[1]।
तु सज्ञान वीवेक। सुध्ध कनककांत वर्न।।४।।
गौतमादि गनधर ग्यारा। समोशरनि वीद्वांशे परीकरा[2]।
देदिप्येमान कोटी दिवाकरा। माहावीर जीणराया।।५।।
राकांककिर्ती प्रभाद्भुत। शीतळ शांती ज्ञानकांत।
वीद्र्यारी(?) दर्पजीत। गुरु तात मुनीराया।।६।।
जीनकथा मानसरोवर। माते का गाते नलगे प्रकार।
श्रोते तुह्मी राजहांस सुंदर। मुक्ता आहार करीतसे।।७।।
मी गउकासेचा घागरा[3]। शेमी आसोनी न जाने क्षीरा।
सज्ञान पुरुशे दोहोनि[4] धारा। पान पयोधारा[5] शेवीती।।८।।

१. सूर्य.   २. समूह.   ३. गायीच्या कासेला लागलेले गोचीड.
४. धार काढून.  ५. दुधाच्या धारा.

कि बाळहाक[१] घन गर्जेनी। परीशता[२] मयोर[३] नाचे वनि।
जवळि बदक आशे दुर्गुनी। कीडे भक्षेनी हारुशे।।९।।
की माधव[४] तोये उतरता। च्यातक तृप्त होये प्रासीता।
जवळती नर हारळ भक्षीता। गुनाची वार्ता न लगे।।१०।।
की राकांक[५] आगमनि शशीकांत। द्रवत आसे तेज त्वरीत।
जवळ आसे पाशान आद्भुत। सोमकांत न ये सरी[६]।।११।।
की चेंडाशें[७] देखता चेक्रवाको। ध्यान लावी हृदया हारीखे।
त्या जवळी गृध[८] पक्षे। प्रेत ध्याने सुखे करीतसे।।१२।।
तेवी मी ग्रंथाजवळी व्येर्थ। आसोनिया न कळे त्याचा आर्थ।
तुह्मी श्रोते सुज्ञानी पंडीत। श्रवण ग्रंथ करीतसे।।१३।।
ग्रंथकथा प्रेमांमृत। सेवीता गमण आमर पंथ।
दिव्यांशी धीपाळीता[९] पंथ। हाटककांत[१०] शेरीरा।।१४।।
आसो ग्रंथ महिमाण। माघील आध्याई नीरोपन।
मलीछे[११] ग्रामात जोग्याचा आपमान। खंडन जाहाला।।१५।।
पापत्येक्त राजा गीरी जाउण। गुरूरायाचे चेरण सेउण।
प्रधानासहित जान। गुरूरायासी वीनवीती।।१६।।
आह्मा सांगावी देव गुरु खुण। त्याचे लक्षण कैसे जान।
आनी नमोकार मंत्र पुर्न। सांगा मुनीनाथा।।१७।।
तव तो धर्मस्थापीत मुनि। बोधीता जाहाला पापत्ये(क्त) रायालागोनी।
श्रोते ऐकती भाव धरोनि। हे पवीत्र कथा।।१८।।
मग मुनी ह्मने राया कारण। शूध्ये क्षेत्री बीज पेरोन।
शुध्ये फळ येतिल जान। उतंम गती आहारे करोन।।१९।।

१. एका जातीचे ढग. २. ऐकणे. ३. मयूर, मोर. ४. वैशाख. ५. पौर्णिमेचा चंद्र.
६. समानता. ७. सूर्य. ८. गिधाड. ९. प्रज्वलित करणे. १०. सोन्यासारखी कांती असलेले.
११. म्लेच्छांच्या.

मग मुनी भुपतीसी ह्मने। जरी सुपात्री दान करने।
हाची जानीजे पुन्ये। ह्मनोनि पात्र वळखीजे।।२०।।
तव राजा ह्मने मुनीप्रती। वीनंती करीतसे गुरूमूर्ति।
येक भासतसे माझे चींती। मुखे दान ते कवन।।२१।।
तव मुनि ह्मने पापत्ये(त्त) रायासी। माझे वचेण परीयेसी।
दान सांगतसे तुजपासी। मुखे[1] दान ऐक।।२२।।
मुखे दान ते आहारदान। दुसरे दान ते शास्त्रदान।
तीसरे दान ते आभयदान। चवथे औशेधदान भुपति।।२३।।
या आहारदाने करोनी। रत्नवृष्टी जीवालागोनि।
ऐसे ऐकीजे आहारदानी। ऐक पापत्यो(त्त) राया।।२४।।
आता ऐक शास्त्रदान। बोध कीजे जीवाकारन।
आत्मा मुक्ती जाये शास्त्रदान। ऐसे शास्त्र उत्तम।।२५।।
तीसरे दान आवशेद। तुह्मी ऐका याचा भेद।
आवशेदे आत्मा होये सुद्ध। पुन्येप्राप्ती जीवाकारन।।२६।।
चौथे दान आभयेदान। रक्षेन करावे जीवाकारन।
सर्व भुती दया पालन। दया पाळीजे भुपति।।२७।।
ऐसे जानीजे च्यार दान। दया तोची धर्म जान।
हे आसे सीद्धांति खुन। वेद न जाने दयाप्रति।।२८।।
तव राजा ह्मने तुह्मी निर्मळ। मज केले दोशावेगळे।
आता चहु दानाची फळ। कळो आले स्वामीया।।२९।।
मग मुनि सांगे रायाप्रति। ऐका पात्र कुपात्राची स्थीती।
ऐकावी येक चीती। तुह्मी बैसोनिया नीर्मळ।।३०।।
माघे सांगीतले सुपात्र। तुह्मी ऐकिले सर्वत्र।
मन जाले की नाहि पवीत्र। सांगावे मज प्रति।।३१।।

१. मुख्य.

मग ह्मने स्वामी मी सुपात्र ऐकिले। मन नसे कोटे नशे गुंतले।
आता सांगीजे वहिले। पुढील प्रसंग तुह्मी।।३२।।
मग मुनि ह्मने रायाप्रति। ऐक कुपात्राची कुगति।
तेने कुफळे प्राप्त होती। ऐसी स्थीती कुपात्राची।।३३।।
आता कुपात्र ऐकीजे राया। कुपात्राचे न जाईजे टाया[1]।
जोडीले पुन्ये जाईल वाया। स्व(स्प)र्शेन कीजे कुपात्राचा।।३४।।
आता कुपात्र ह्मनजे कवण। सा(सां)गतसे तुह्माकारन।
तुह्मी ऐकीजे चीत देवाण। राज्ये आनी प्रधान।।३५।।
राया कुपात्र ह्मनेजे मिथ्यामती पाची जेण। त्याचे सांगतसे गुन।
तुह्मी ऐकावे सर्व जेन। कुपात्र ह्मनजे मीथ्यामती।।३६।।
आता ऐका कुपात्राचे गुन। यक दुर्बळ होता बाह्मंन।
आवतन सांगीतले भटाकारन। श्रावन मास ह्मनोनीया।।३७।।
मग भट आला भोजनासी। द्रुर्बळे पुजा केलि मनुभावेसी।
दक्षेना तीन रूके[2] दिधले त्यासी। त्या भटाकारन[3]।।३८।।
पैसा दक्षना न दिधला ह्मनोन। कोप चढला भटालागोन।
आवतन[4] दिधले मजकारन। पैसा दिधला पापीया।।३९।।
ऐसा आसे जो ब्रांह्मन। तो येक कुपात्र जान।
ऐसा मनी नीछेय आनोण। तो जानावा येक कुपात्र।।४०।।
ऐसे बोलोनी वचन। मग राजा ह्मने मुनीकारन।
येक कुपात्र सांगीतले मजलागोन। सांगा आनीक कुपात्र।।४१।।
ऐका आता सीवमार्गाची[6] स्थीती। पुढे आलि सीवरात्री।
ह्मनोनी ऐ(औ)तण दिधले जंगमात। भोजनाकारन।।४२।।
तव जेंगम आवतन घेतले। मग त्याने सीवभक्ताचे प्रेत देखीले।
मग त्याचे मन चेंचळ जाले। दक्षेना घेवावया प्रेताची।।४३।।

१. ठिकाणास. २. पै, एक आण्याचा बारावा भाग. ३. भटास, ब्राह्मणास. ४. आमंत्रण.
६. शैव पंथ.

**तव बाह्यासी[१] आले सीवभक्त। बोलावीता जाला जेंगमाते।**
**मग जेंगमीन ह्मने तयाते। कटिन कर्कशे वचेनि।।४४।।**
**तव त्यासी जेंगमीन ह्मंने। माझे वचेन ऐकने।**
**परी क्रुध येईल तुह्मा लागोन। ह्मंनोनी बोलता न ये।।४५।।**
**मग काये ह्मंने सीवभक्ताला। तुझा येईल आधेला[२]।**
**ह्मनोनि ईतकिया कामाला। काये येईल पै रे।।४६।।**
**ऐसा आसे जो जेंगम। त्यासी न कळे आगम।**
**त्याचे दाने काये धर्म। भक्ताकारन।।४७।।**
**मग लिंग नाही ह्मनवोन। सीवभक्त थोर गहन।**
**त्याचे गेले पारन। लींगावाचोनी देखा।।४८।।**
**ऐसे जानावे कुपात्र। राया दान किजे पाहुनि सुपात्र।**
**सुपात्र फळ होय पवीत्र। जीवाकारन पै।।४९।।**
**आता औ(ऐ)का कवळीक[३] दरुशेन। कवळीक कानफाटा जान।**
**कपट वीध्यां साधी पापे करोन। तो कानफाटा।।५०।।**
**मग त्या कवळीक आवेस्वरी। उत्तम लोकी धर्म सोडीला जरी।**
**जोगनी मांगीची पत्र भरी घरी। पापे बळे करोनि।।५१।।**
**राया हे कवळीक पापी मीथ्यामते। रायाची न द्यावे वचनाते।**
**धर्म आधर्म वळखी जे येक चीते। आपुले मनामाजी।।५२।।**
**चौथा जानीजे मल्ले वौंसी[४]। घात करी पसु जीवासी।**
**हींशेचे पाप न आनी मनासी। तो द्रुजैन मल्लीचे।।५३।।**
**पाचवा मीथ्यामती बोध जान। तया कैचे आत्मशरीराची खुण।**
**ह्मने आह्मा नसे पाप पुन्ये जान। ऐसा बकवा[५] करी तो कुपात्र।।५४।।**
**ऐसेया पाच मीथ्यामताचे गुन। म्या सांगीतले तुह्मा लागुन।**
**संग करो नये मीथ्यामता जाण। राया दान करो नये कुपात्री।।५५।।**

१. बोलावण्यासाठी. २. अर्धा पैसा. ३. कौलिक, शाक्त. ४. मलयवंशी.
५. निरर्थक बळबड.

आता या पाचामाजी सुपात्र। ते ऐकावे हो सुपात्र।
ज्याची किर्त वर्नीती जेगत्र। आता ते ऐकावे।।५६।।
ब्रह्म जाने तो ब्राह्मंन। सर्वा भुती दया पुर्न।
आनी थोडीयामाजी समाधाण। तो ब्राह्मन सुपात्र।।५७।।
आता ऐकीजे जंगम। ज्यासी कळे आगमा आगम।
हा जानीजे जेंगम धर्म। नीरासे पुर्शे।।५८।।
यासी ह्मनावे सुपात्र। तो जेंगम पुन्ये पवीत्र।
ऐकतो जेंगम सुपात्र। त्यासी पात्र बोलिजे।।५९।।
आता ऐकीजे कानफाटा जोगी। जो मछींद्र गोरख योगी।
ज्यालंधर आंगी सींगी। गोपीचंद सीध जाहाले।।६०।।
ऐसीया पात्र ह्मनावे। आपुल्या ध्यानासी आनावे।
ऐसे पात्र वळखावे। यासी सुपात्र बोलिजे।।६१।।
ऐकीजे मले वौंसी सुपात्र। येक भक्ती तो जानावा पवीत्र।
दयापाळक सर्वत्र। यासी सुपात्र बोलीजे।।६२।।
मले वौंसी सीध जाले। ते आगम लोकासी गेले।
होवोनी भीस्त[1] पावले त्यासी सुपात्र बोलीजे।।६३।।
आता ऐका बोधे सुपात्र। सुधे मार्गी बोधी जेगत्र।
आप तरे दुजीया तरवी सर्वत्र। यासी सुपात्र बोलिजे।।६४।।
ऐसे राजा प्रतक्ष ऐकोनि। ह्मने धन्ये धन्ये जीनसासन मुनि।
संसार तारावया लागोनि। तुह्मि समर्थ थोरू।।६५।।
या चहु दानाचीया फळे। त्रीवीध पात्र नीर्मळे।
मग मुनी सांगे केवळ। सीध्धांत वानी।।६६।।
तव मुनी ह्मने रायाप्रती। काये आसे तुझीया चीती।
ते सांगावे मज निगोती[2]। संशेय रहित पै गा।।६७।।

१. भरोसा, बहिश्त -स्वर्ग. २. नीट, विवरणपूर्वक.

मग राजा ह्मने गुरूप्रति। पात्रापात्राची फीटली भ्रांती।
येक आसे माझीया चीती। ते नीरोपीजे क्रुपाघना।।६८।।
मग मुनी ह्मने रायाकारन। आता जेगन्ये[१] पात्राचे गुन।
वर्नावया काये कारन। कुपात्र सांगीतले पाहिजे।।६९।।
हे सांगीतले काये ह्मनोन। भ्रंष्ट होतील श्रावकनंदन।
धर्म बुडेल त्या स्पर्शेकरोन। श्रावकाचा पै।।७०।।
ह्मनोनी तुह्मासी हे नीरोपीले। चीत करावे आपुले।
कुडकपट[२] टाकिजे लटके बाहुले। तुह्म पापत्ये(क्त) राया।।७१।।
तव राजा ह्मने स्वामीया। हा संसार जातो व्यर्थ राया।
ह्मनोनी आलो चेरन पाहावया। मज केलि ज्ञानदृष्टी।।७२।।
या ज्ञानदृष्टी कारन। चौऱ्ह्यासी व्यर्थ फीरलो जान।
ज्ञान लाधले नाहि मज लागोन। स्वामी गुरूराया।।७३।।
मग राये प्रनीपात करोनी। चेरनी मस्तक टेवोनि।
तव मस्तक धरीले उचलोनि। दिधले आलिंगन रायासी।।७४।।
मग मुनीराज प्रसंन्न जाला। गुरू मुळ मंत्रासी सांगीतला।
आता नवकार मंत्र ऐेक वहिला[३]। ज्या नामे मोक्षे होये।।७५।।
मग मुनी ह्मने रायाप्रति। ऐका नवकाराची फळश्रुती।
यक चीत बैसावे भक्ती। त्रीविध[४] सहित।७६।।
तव राजा ह्मने स्वामीया। कैसा नवकार मंत्र आसे गुरूराया।
मज प्राप्त किजे तारावया। भवसागरी पै।।७६।।
७६ क्रमांक दोनदा पडला आहे.
ऐसी वीणंति ऐकोनी। तव हुसळलि दिव्ये ध्वनी।
मग नवकार राया लागोनी। सांगते जाले परीयेसा।।७७।।

१. जघन्य. २. कूटकपट. ३. आधी. ४. मन-वचन-काय.

**प्रथं नमो आरीहंतानं। दुजे नमो सीध्धानं।**
**तीजे नमो आयरीयानं। चेतोर्थ नमो उवझायानं।**
**पंचेमो नमो लोये सव्वसाहोनं।।७८।।**
**यवंवीधी पंच नवकार। ऐसा मंत्र साच्यार।**
**नवकार पुन्ये पवीत्र थोर। मोक्षे होय जीवासी।।७९।।**
**मंत्र जानावा तुंह्मी। लक्षे लावीजे परब्रंह्मी।**
**तुंह्मा क्रुपा करील मोक्षगामी। नीरंजेन स्वरूप।।८०।।**
**ऐसे आर्थ जेप करीजे। नमो ऱ्यारंतान ह्मनीजे।**
**त्या आरहंतासी नमस्कार कीजे। तो आरहंत देव कैसा।।८१।।**
**जो आटरा दोशारहित। काय वर्नु त्या गुनाते।**
**सांडोनीया (आ)श्यापाशाते। ऐसा आरहंत जानीजे।।८२।।**
**ज्या देवासी त्रुस्ना नाही। क्षुधा नाही सवाद नाही।**
**म्हनो जेन्म मरना रहीत तोहि। ऐसा जानीजे आरहंतु।।८३।।**
**ज्या देवासी आहांकारू नाहि। ज्या देवासी माया नाहि।**
**ज्या देवासी वीशाद नाहि। तया आरहंत बोलिजे।।८४।।**
**ज्या देवासी रूधत्व[१] नाहि। ज्या देवासी ताऱ्हन्ये[२] नाहि।**
**ज्या देवासी बाळत्व नाहि। तयासी आरहंत बोलिजे।।८५।।**
**ज्या देवासी रोग नाहि। ज्या देवासी व्याधी नाहि।**
**ज्या देवाचे आंगी घाम नाहि। रोगारहित पाहि ह्मनोनी आरोगे बोलीजे।।८६।।**
**ज्या देवासी आवडते नाहि। ज्या देवासी नावडते नाहि।**
**ज्या देवासी भये परी नाहि। ह्मनोनी देव दान्नंव वलंगती[३]।।८७।।**
**ज्या देवासी आळस नीद्रा नाहि। ज्या देवासी स्त्री परीग्रहे नाहि।**
**ज्या देवाचे हाती आयोध्य[४] नाहि। देवाचे हाति नशे जपमाळ।।८८।।**

१. वृद्धत्व. २. तारुण्य.

ज्या देवा काया नाही माया नाही। प्रपंचे आज्ञान नशे काहि।
ज्या देवा नशे सुख-दुःख पाहि। ह्मनोनी त्रीलोक्ये पुजीती।।८९।।
संयोग नाहि वीयोग नाहि। आनी वींद्रयेव्यापारु नाहि।
ज्या देवा वीकारू नाहि। वीकल्प नाही आशा पाशा।।९०।।
वीछा नाहि वीश्रांत नाही। वीयोग वीस्मयो नाही।
मीत्रु नाहि शेत्रु नाहि। नाही पापपुन्ये पै गा।।९१।।
आर्थ(र्त)ध्यान नाही रूद्र ध्यान नाहि। शुक्ल ध्यान तया नाहि।
धर्मध्यान वशे पाहि। लंबु नाहि नीरालंबु आशे पाहि। नीरंजेन वंतु।।९२।।
वायुप्रकासे केवळज्ञान। छेताळीस गुन वीराजमाण।
ते छेत्तीस गुन कवन। ऐक राया पयोगा।।९३।।
आता गुण ऐकावे चीत देवोन। तुज मी सांगतसे जान।
हे नवकार म(मं)त्राचे फळ ऐ)कन। राजा भुपती पै गा।।९३।।
९३ हा ओवीक्रमांक दोनदा पडला आहे.
ज्याचे आंगी परी खेद नाही। सहज शरीर नीर्मळता पाहि।
आंगीचे श्रोनीत[1] क्षीरवर्न पाहि। वर्ज(ज्र)नाभाचे स्वस्थान शरीर ।९४।
आती स्वरूपता शेरीर। सहजसुंदर स्वभाग्ये नीरंतर।
सुगंध परिमळ नीघता परस्वर। आष्टोत्तरशे(त) लक्षन।।९५।।
नवरस व्यंजेन वीराजेमान। महद आक्रुर[2] बळ पराक्रर्म जान।
महद आक्रुर वानी आमृतासमान। नीधान सर्व गुनाचे।।९६।।
जे स्थानी आरहंत स्वरूप आशे। तेथ आष्ट दिशा योगे नशे।
दिशा नशे योग्ये कैचे आशे। तेथे चाऱ्ही द्रुभीक्ष कैचे।।९७।।
पाच सहस्त्र देव आंतराळी चाले। चालते जीवासी पाळते जाले।
कवळा आहारू वर्ज केले। पावले वीराजेमान समोशरनि।।९८।।

१. रक्त. २. क्रूरतारहित.

**९९ क्रमांक नाही.**

देव चेतुरमुख आती सुख। सकळ वीद्या संपुर्न देख।
सकळ वीछा वर्जीत उन्मुख। लोचेन उन्मेख[१] वर्जीतु।।१००।।
तेथे आवकाळी मयभुमीका। सुगंध वायो वाजे देखा।
नखे केश वृधत्व नाहि देखा। आर्धमात्रुका[२] स्वभाशे पै गा।।१।।
तृन कीटक जीव वर्जीत। मेघ गंधोदक वरशेत।
चेरनातळी कमळवन शोभत। फुले फळे पलव वीराजेमाण।।२।।
सर्व ध्यान सफलता जाण। गगनी नीर्मळता परीपुर्न।
ऐसे तेथीले महिमान। ऐक राया पै गा।।३।।
धर्मचक्र पुढे चाले सुमनी। यक योजन प्रमाने ध्वणी।
वानी आनु हात गर्जनी। आसण च्यार आंगोळे१ आंत्राळ२।।४।।
ऐसे सर्व देव शेवा करीती। आशोक वृक्ष मस्तकि रूळति।
सुर नर पुष्पवृष्टी करीती। गर्जेती दिव्ये ध्वनी।।५।।
तीन पद्मासनावरी सींव्हासण। साडे बारा कोटी वाद्ये वाजति जान।
ऐका भामंडळाचे प्रमान। देव दुंदुभी गर्जेना करीती।।६।।
मेघडंबर मस्तकी धरति। ऐसे आनंदे शेवा करीति।
सर्व देव मीळोनीया यकभक्ती। वंदीती आरहंतासी।।७।।
ऐशे आनंत दर्शन आनंत ज्ञान। आनंत वीर्येआनंत सौख्य जान।
येवंगुन छेताळीस वीराजेमान। ऐसीयाते आरहंत ह्मनीजे।।८।।
त्या आरहंतासी नमस्कार माझा। ईतक्या गुने आरहंत भजा।
पद यक नवकाराचे जाले बीजा। ऐक पापत्योत(त्यक्त) राया।९।
आता दुसरे मंत्राचे पद ऐकण। नमो सींध्धान जानन्ये।
आनंत सीध्धा नमस्कार परीपुर्न। तो सीध्ध कैसा ऐकने तुह्मी।।१०।।
त्या सीध्धा काया नाही माया नाही। छाया नाही वर्न नाही।

१. अंगुले. २. अंतराळी, अधांतरी.

गंध णाही छेद ना(हि) भेद नाहि। नाहि रूपरेखा पै गा।।११।।
आकारू नाहि नीराकारू नाही। लक्षन नाहि वीलक्षेण नाहि।
ध्यान नाहि ध्यायन नाहि। नाहि माया ममत्व।।१२।।
जेन्म नाहि आक्षर नाहि। आमरू आक्षेई ताहि।
आव्यांगतु पाहि व्यापार णाहि। आभेद भेदु आव्याबाधु।।१३।।
स्थुळ सुक्ष्म ज्ञानमये आनंतमय। सहजस्वरूप भावे
आता पाहाता स्वये(यं)भु होये। परमात्मा सुन्ये स्वरूप।।१४।।
सर्वांग तु सर्वभरीत। ऐसीया आनंत गुनाचा गुनवंत।
त्या आन्नंत सीध्धासी स्मरतु। नमस्कारु माझा।।१५।।
येवं दुसरे पद सीध्धान। त्या सीध्धासी नमस्कारु जान।
मग ऐसे पापत्योक्त राया ऐकोन। धन्ये धन्ये ह्मने स्वामीया।।१६।।
आता तीसरे पद आ(य)रीयानं ह्मनजे। त्या आ(य)रीयासी नमस्कारू कीजे।
ते आयरीया कैसा जानीजे। तो वीराजमान छेतिस गुन।।१७।।
ते छेतीस गुन कैसे। ऐका बारा भेद तपाचे सुरस।
आनसन तप वीशस। दुसरे उपवास शक्तीन(नु)सार कीजे।।१८।।
तीसरे तप आमोदर्ये[३]। अर्ध आहार उटे वस्तु। संख्या प्रतिज्ञा मरीयादा करी नमस्तु। वस्तुप्रमान्ये करी रसत्यागस्तु। चौथे तप त्याग त्तव पचेरस शक्तीनुसार कीजे।।१९।।
येकांतवासी हे तप आसे। तेथ कवनाचा स्व(स्प)र्शेणसे।
वनांतरी वास आसे। ऐशा गुनवंतासी आयरीया ह्मनिजे।।१२०।।
साहावे काया कष्ट वीनय तप करी। पंच रस ध्याये न करी।
कायास्वर्ग (कायोत्सर्ग) नीत्य नेमस्त करी। ध्यान करी सदा।।२१।।
येवं भेद तप बारा प्रकारी। ऐसा आयरीया जानिजे सारी।
तो छेतिस गुनाचा आधारी। त्यासी आच्यारीया ह्मनावे।।२२।।

१. रक्त. २. क्रूरतारहित. ३. अवमौदर्य.

साहावे कायाकष्ट वीनय तप करी। पंचरस ध्याये न करी।
कायास्वर्ग (कायोत्सर्ग) नीत्य नेमस्त करी। ध्यान करी सदा।२३।
आता साहा भेद तपाचे जाले। आता साहा भेद पुढे पाहिजे ऐकीले।
मण स्थीर करावे आपुले। आगा पापत्य(क्त) राया।।२३।।
आता शेडाआवश्यक प्रकार सांगेन। राया ऐकीजे चीत देवोण।
मनाचा संदेह टाळोण। औ(ऐ)क बारा भेद राया।।२४।।
प्रथम सामाईक करी। सदा समता वंदना करी।
आनी त्रीकाळ ध्यान धरी। सदा शास्त्र पटण करी देववंदना।।१२५।।
नीत्ये नेमस्त प्रतिकर्मन करी। कायास्वर्ग मुद्रा धरी।
सदा धर्मधा(ध्या)ण शुक्लध्यान करी। य(ए)वं शडाआवशेक जानावे।।२६।।
आनीक पंचाआचारू पाळी। ते पंचाचारू कैशेनी मळी।
प्रथम दरूशेनाच्यारू सांभाळी। आष्टांग सम्यक्तदर्शण पै गा।२७।।
ज्ञानाच्यारीत्र त्रयोदशे चालवि योग्ये। ज्ञानाच्यारू पाळी आष्टांग।
ज्ञानाच्यारू स्वजेळ संगा। च्यारीत्र प्रतिपाळक।।२८।।
तपसा च्यारीत्र नीपुन्येता। वीर्याचारू सर्व कार्येसाधीता।
साधावया पराक्रर्म करीता। एवं पंच्या(चा)रु जानावा।।२९।।
आनीक दशेलाक्षनिक धर्म पाळी। ते दशेलाक्षेनीक कैसे निर्मळी।
ते सांगन आता स्वजेळी। ऐका पापत्यो (क्त) राया।।१३०।।
पहेले उंतम लक्षन पाळीजे। मण मार्दव कोमळ किजे।
कुडकपट[१] प्रपंचे न करीजे। वंदिजे सत्ते वानि।।३१।।
तीजे सौचे धर्म पाळीजे। चौथे तप धर्म आचेरीजे।
सर्व त्याग पाचवे आचरीजे। तप धर्म गुन आचेरी पै।।३२।।
साहावे तप त्याग करीजे। वींद्रयसंयम प्राणसंयमु पाळीजे।
शरीरादिका ममत्व सोडीजे। नववीधी ब्रह्मचर्य आचरीजे।।३३।।

---

१. कूटकपट.

शरीरादिका ममत्व सोडीजे। यंव दशलक्षणीक पाळीजे।।
मनवांछीत फळ पावीजे। हे धर्माचे फळ ऐकीजे।
पापत्यो(त्त) राया पै गा।।३४।।
आता गुप्ती त्रीवीधी जान। ते ऐकीजे कवन कवन।
प्रथम मनगुप्ती जान। पहिले मन आकळीजे[१]।।३५।।
दुजे परमतत्वी लावीजे मण। वचेन गुप्ती पाळीजे सगुन।
मौन्ये गोवीजे आपुले मण। ऐसी कायागुप्ती पाळीजे।।३६।।
काया ध्यान मुद्रा राखीजे। येवं छेतिस गुन पाळीजे।
ऐसा आयरीय प्रमार्थी[२] पुरता ह्मनीजे। ऐक तीसरे पद।।३७।।
३८ क्रमांकाची ओवी नाही.
आपन क्रीया आचेरे। आनी पुढील्याते आचरवी सत्वरे।
ऐसा जो आचार्या धर धर। त्या आच्यारया नमस्कारू माझा।।३९।।
येवं आच्यार्येजानावा। आता चौथ पद उपाध्या ऐकावा।
ऐसा नीश्च(य) मनि धरावा। तुंह्मी पापत्यो(त्त) राया।।१४०।।
आता उपाध्या जानीजे। त्या उपाध्यासी नमस्कारु किजे।
देईत्व ममत्व सोडीजे। ऐकीजे उपाध्या।।४१।।
जो चौदा रंस्व( पुर्व ?) जाने। आक्रा आंग त्रिसष्टी पुराने।
चौदा वीध्धा माहा व्याकर्न। पंचे माहाकावे पै गा।।४२।।
आनीक जाने त्रीवीध बंध। आगम सीधांत सहित सर्व सीद्ये ।
संगीत भारत पींग(ल)[३] संवकृत[४] नीबंध।
पराक्रुत तर्ख(र्क)ज्ञान सर्वध पंचेम वेग जाने।।४३।।
छेपन भाशा सकळ शास्त्रे आध्यात्म। समयेगंम्ये वीराजे गुण उत्तम।
आपन पढे आनी पुढीलाते पढवी सुगम।
ऐशा गुनाचा उपाध्यासी नमस्कारू माझा।।४४

१. समजून घेणे, आवरणे. २. परमार्थी. ३. वृत्त, छंद. ४. संस्कृत.

पाचवे पद सर्वथा साधु ते आता। नमस्कारू माझा त्या साधुसंता।
ते साधु तुंह्मा सांगेन आता। सर्व साधु कैशे।।४५।।
जे समता जेनामाजी माहासंतू। जो आटावीस गुन मानु वीराजमानवंत।
ते आटावीस गुन कवन जयेवंत। आसती जाना पै गा।।४६।।
प्रथम मुळगुन वृत माहा थोर कैसी। पहिले आहिंसावृत पाळीती ऐसी।
ऐसी सर्व जीवावरी दया करीती भावेसी।
स्थुळ सुक्षम मात्र राखे जेगमा।।४७।।
दुजे सत्य माहावृत पाळीती। सर्वथा तस्करपन[1] न करीती।
आदिक कवनाचे न घेति। चौथे ब्रंह्मचेर्येवृत पाळीती।।४८।।
सर्व स्त्रीया मातेसमाण मानिती। ऐसे सदा आसत्याचे नसे चीती।
आनी सर्व भुती भावभक्ती। आसत्ये कारण।।४९।।
पाचवे आकींचेन वृत पाळीती। सर्वथा ममत्व सांडीती।
साहावे वी(ई)र्यासमिती पाळीती। पाउले टेवीती द्रुष्टी पाहुनि।१५०।।
सातवे भाशासमेति वृत पाळीती। भाशा वीचारोनी बोलति।
आटवे वेशना समति वृत पाळीती। घेति शुध आहार।।५१।।
पुजा प्रतिष्टापन वृत पाळीती। आंगीचे मळमुत्र नीर्जीव भुमीसी सांडीती।
पंचे वींद्रयाचा नीरोध करीती। पंचेवींद्रये ते कैसे।।५२।।
स्पर्शेण वींद्रय शरीर आट। वीसये वींद्रव जीतो श(शे)ष्ट।
रसना वींद्रये जीभ आसे जेष्ट। त्यासी वर्जी माहाकष्टे पंचे रस।।५३।।
घ्राण वींद्रये नासीक दोन। सुगंध शुध्य भावे न घेती जान।
चेक्षु वींद्रये ह्मनजे लोचन। याने सुधे पाहाति।।५४।।
पंचे वर्न ते पंच भाव त्यागीती। श्रवन वींद्रये कर्न ह्मनवीती।
सत्ये आसत्ये श्रवन न ऐकती। पाचवे वींद्रये दमति ऐक राया।।५५।।
सदा सर्वदा लोच करीती। सामाईक त्रीकाळ जपति।
आत्मध्यानी सदा आसति। करति स्तुती स्तवण।।५६।।

१. चोरी.

आनीक देववंदना करीती। प्रतिकर्मना पढीक मने आचेरती।
कायास्वर्ग (कायोत्सर्ग) करीती तपबळे करोनिया।।५७।।
आनीक ध्यान ध्यायेन करीती। पंचे वस्त्र ते त्त(त्य)जीती।
औ(ऐ)से नीराश्रये राहाति। ऐक राया पै गा।।५८।।
आता पाच वस्त्र कवन कवण। तुंह्मी औ(ऐ)कीजे चीत देवोनी।
पंच वस्त्र गर्भ ऐकण। यासी ह्यात मार्गी।।५९।।
कौंसज बोंडज वल्कजे। आनीक चेर्मज रोमजे।
ऐसे पंच वस्त्रे ऐकिजे। याचा त्याग करीतो मुनि।।१६०।।
ऐसे त्यागुन करीती दीगांबर रूप राहाति।
स्नानाची वीछा णसे तयाप्रति। दातवन न करीती ते मुनि।।६१।।
आनी भुमिका सण करीती। येकभुक्ती आन्न उदक घेती।
ऐसे आटावीस मुळगुन न पाळीती। आभीलास टाळोनि संसारीचा।।६२।।
संकल्प वीकल्प तजीले। पंचे वींद्रयाचे नम(दमन) केले।
सुख दुःख समता भाव धरीले। त्यासी साधु ह्मनावे।।६३।।
शेत्रु मित्रु मानि सारीखा। लाभालाभ समताभाव देखा।
नींदा स्तुती समतुले सुखा। संजोग वीजोग समभावे।।६४।।
शांत दांत समते वींद्रये। ऐसे साधु जेने ते होये।
त्या साधुजेनासी नमस्कार माहा पाहे। ऐकावे तुह्मी पै गा।।६५।।
येवं पंच पदाचा णमोकार जाना। नमो आरहंतानं ह्मना।
नमो सीध्धानं ध्यानासी आणा। हे दोन पद आसती।।६६।।
नमो उवझ्या(या)नं नीधान। नमो लोहे सव्वसाधन।
ऐसे पंच गुन सगुण। ऐक राया पै गा।।६७।।
हा मंत्र जेपता काये फळ होये। याचा ऐकावा नीर्नये।
हा मंत्र जेपता मोक्ष होये। होये पातकापासोनी दुरी।।६८।।

हाडा गते माहा पातका जाति। संसारसागरीचा पारु पावीजेती।
सकळ आरीष्ट नासति। या मंत्रे जाति सकळ व्याधी।।६९।।
कष्टादीके रोग भंगति। भगंदारादिके जाति।
सर्व दोषे नासति। न राहाति भुत पीशाचे।।१७०।।
डाकीनी शाकीनी शैन्ये शक्ती। या मंत्रे तस्कराचे उपद्रव न होती।
वैरी दुष्ट प्रतिकरीती। या पाचा पदाचे फळ।।७१।।
या मंत्रे सर्प नीर्वीश होती। या मंत्रे भुजेंगाचे हार होती।
व्याघ्रा सींहाचा उपद्रव हारति। हा नवकार मंत्र पढलिया।।७२।।
मंत्र आनंत गुनाचा निधान। या मंत्रे स्वर्गीचे राज्ये होये पावन।
आनी तेथे सुख भागण। स्वर्गी वींद्रय लोकीचे।।७३।।
ऐसा हा नवकार मंत्र जाहाला। राया तुंह्मी मंत्र जे जपिला।
स्वर्गी राज्ये होईल तुह्माला। नवंकार मंत्र जेपता।।७४।।
मुनी ह्मने राज्याप्रति। ऐका पुढीले भवीषे गति।
आपवीत्र जेण्म उपती[1]। आपुले वीछा करू लागले।।७५।।
कुगुरू कुदेव भोळावीले। मुढ लोक बहु वाहोवले।
आपुले वीछा करू लागले। नाना शस्त्रे पै।।७६।।
आपुन जाले सप्त वेशनि। उन्नं(न्म)तपने करीती कथनी।
ते भोगीती नरक योवनि। नानापरीच्या।।७७।।
जे नीर्मळा लावीती कलंक। आनी सत्ये पुरुशा देति देख।
तया कविश्वराचे मुख। पडे रवरवी पै।।७८।।
ऐसे जानोनि निश्चयो करावा। जीनवर वानि धरावा।
सर्व मीथ्यामार्ग टाळावा। खोटा ह्मनोनि पै।।७९।।
जीवासी सम्यक्तावाचोनि। न कळे खोटी टेवनि।
आहे कुमार्गाची उभवनि। न कळे जीवासी।।१८०।।

१. उत्पत्ती.

ह्मनोनी भजावे सत्ये मार्गी। जीवासी जान सुख होवो वेगी।
मग आनुक्रमे मोक्षालागी। पावतिल देखा।।८१।।
ऐसे उभयता आईकोनि। वैराग्ये जाले पापत्ये(त्त) मनी।
आनी प्रधान सर्व जेनि। ऐकोनीया।।८२।।
मग उभे राहिले सकळ। कर जोडोनीया नीर्मळ।
नमोस्तु केला सरसा उजेळ। संजेंम द्यावा आढळ। स्वामीनाथा।।८३।।
स्वामी आह्मा देईजो संजेम। उपदेश कीजे त्रे(श्रे)योगम।
जयाने पावीजे मुक्ती टाम। आसा देईजो।।८४।।
स्वामी संसार देखीला कुडा[1]। आता न होवे धडफडा।
तरी  हा जीव मोक्षाचा हुंडा। गुरूप्रसादे।।८५।।
आहो जीवा पुडा न संसारू। ह्मनोनि मस्तकी टेवा करू।
आह्मा भेटला क्रुपासागरू।  तारा स्त्वे पै।।८६।।
आगा स्वामी त्रीभुवन तारका। संजेमु देई मुक्तीनायेका।
तारी तारी गा आह्मा सेवका। भवसागरी।।८७।।
मग बोलले धर्मस्थापीत मुनीश्वर। क्रृपानिधी स्वामी दातार।
आमृतवानी मनोहार। पापत्यो(त्त) रायासी।।८८।।
भले भले वीचारीले तुह्मी। मुनी ह्मने दिक्षा घ्या तुह्मी।
संजेम भारू दिधल आह्मी। वेगी घेईजो जी।।८९।।
तुमची मति आहे नीर्मळ। वेगी उभे राहिले सकळ।
आहो दिक्षा घेईजो आढळ। परत्र लागी।।१९०।।
राजे सोडीले तृनासमाण। मोह कर्म जीतीला जान।
सोडीला सीनगार जान। रति सोडीली।।९१।।
मग लोच केला पंचमुष्टी। नीग्रंथ दिक्षा घेतलि श्रष्टी।
दिगांबर जाले सम्यत् दृष्टी। राजा आनी प्रधान।।९२।।

१. वाकडा, कपटपूर्ण.

राजा प्रधाण गुनवंत। आनीक मुनीश्वर जयवंत।
तप करीती आवघे महंत। क्रमानुसार।।९३।।
आवघे चालले वीव्हारासी। सम्यत्त् ज्ञान आभ्यासासी।
चारीत्र पाळीति जपतपासी। ध्यानेसहित।।९४।।
परीस(ह) साहाति बाविस। वीहार करति देशे वीदेशे।
भव्ये जीवा देति उपदेशे। धर्मप्रकारे।।९५।।
मग पाहा मुनीस्वर। चढले शेत्रंजेये डोंगर।
ते कायाश्वर्गी राहिले धीर। आत्मध्यानी पै गा।।९६।।
शेत्रंजये गीरी सीध्धक्षेत्र। तेथ पाहा आले पवीत्र।
ध्याने राहिले नीश्चळ गात्र। करोनी देखा पै।।९७।।
मग कैसे धरीले ध्यान। आढळपने मेरू समान।
गंभीरपने समुद्र जान। ऐसे राहिले।।९८।।
तप तेज जाना दिनकरु। दयामृते जाना शसीकरू।
आहे क्षमागुने मनोहारू। मेदनिसमान।।९९।।
नीर्मळपने जैसे गंगोदक। संगरहित पवण यक।
नीसं(ग) कर्मेजैसा बाळर्क[1]। राहिले क्षम।।२००।।
ध्याने करोनि जैसे आनळ[2]। कल्पवृक्ष जैसे देति फळ।
उदारपने समुळ। सर्वांग गुने।।१।।
ईत्यादिक कथील्या उपमा। ज्यां ज्या देखील्या नयनी सीमा।
परी उपमा रहित आह्मा। दिसतु आहे।।२।।
शीळ संजेम गुन आगळे। मुनी तप करीति उज्जेळ।
ऐसे आत्मध्यानी नीर्मळ। राहिले देखा।।३।।
ते मुनीनाथ जाले उदास। शुभ आशुभ कर्माचा केला नास।
क्षपक श्रेनि केला प्रकास। क्षपीते जाले।।४।।

१. बालसूर्य. २. अग्नी.

तेहि कर्म क्षपीले ध्यानी। आश्रव जाळीले मन रूंधोनी।
तड बंध मोडीले शुक्ल ध्यानी। होवोनी दृढ।।५।।
ते केवळ गुनवंत। सीध जाले जेयवंत।
ते स्वामी आट गुण महत। पद पावले।।६।।
ते आष्ट कर्मावेगळे सीध्ध। उपमारहित लाधले बोध।
तेथे आनंत बळाचे निबंध। भोगीती देखा।।७।।
कवींद्रशेवक ह्मने श्रोतीयासी। आता पंचेम कालाची गत कैसी।
तुह्मी श्रावकजेन मानसी। सावद राहावे।।८।।
पंचेम काली आज्ञानी जीव। बहुत धरतील मीथ्यात भाव।
ते प्रगट करतिल कुदेव। आपुले मनवीछेनी।।९।।
आज्ञानी बापुडे मतीहिन। ते न जानती जीनशासण।
ह्मनोनि करीतील भ्रमण। लक्ष चौरासी।।१०।।
कुगुरु कुदेव पाहिले लोक। ते न जानति धर्म वीवेक।
सत्यमार्गाचा करीती द्वेष। पापरूपी पै।।११।।
ह्या धर्मकथा फेरवोनि। पापकथेची केलि मांडणि।
वीपरीत शास्त्राची रचनी। केलि उन्मते रुषीने।।१२।।
मीथ्यात्व भजति जीवासी। उध्धार न घडे तयासी।
सेवटी जाति नर्कासी। आवभजेन[१] करीता।।१३।।
ऐसे जानोनि नीश्चये करा। सुदेव सुशास्त्री भाव धरा।
सुधर्म सुमार्ग आचेरा। पावाल सुख।।१४।।
जीनशासनी धरीजे भाव। नीग्रंथाची करीजे शेवा।
तरी पावीजे शीवपुरीचा[२] टाव। धर्मफळे पै गा।।१५।।
हे कथा जालि पापत्ये(त्त) राज्याची। आमृतवानी सुमतीप्रकासाची।
जे ऐकति मनवीछीत तयाची। होये उधार तत्वता।।१६।।

१. विपरीत भक्ती. २. मोक्ष, मुक्ती.

**कथा सुमती ऐकता। क्षालन होये पापासी त्वरीता।**
**कवींद्रसेवक ह्मने आता। तारीता जो आह्मा।।१७।।**
**सुमतीकथेच्या सेवटी। पुरानी पडली होती मीटी[१]।**
**पुर्न केलि भाशा मऱ्हाटी। पुन्येसागरे।।१८।।**
**प्रथमो आध्याई जो पापत्ये(क्त) राजा। जीवरक्षकी धर्मथापीत मुनीराजा।**
**या पंचेमकाली धर्मकाजा। राज्यासी धर्म उपदेसीला।।१९।।**
**दुसरीया आध्या जान। दयाधर्माचे पत्र लीहिले जान।**
**सर्व देश धर्माष्ट[२] झाला जान। कथा द्रु(दु)तीया आध्याची।२२०।**
**तीसरीया आध्या वचन रोखा। ते माघु येतिल कुजोगी मुखा।**
**खोटा पडता आंतर धाका। लागला तयासी भारी।।२१।।**
**चौर्थथ[३] आध्या श्रवने टाळी चार कखाये[४]। चार गति दुःख सरती आपाये।**
**चार सुखसंगति दावी सोये। त्यातील येक संपुर्न।।२२।।**
**पंचेमो आध्याई नीरोपन। सुपात्र पात्र सांगीतले जान।**
**राजा प्रधान ऐकती दोघेजन। धर्मस्थापीत सांगे।।२३।।**
**शेष्टम आध्याई जान। सुधर्माचे कुधर्माचे लक्षण।**
**ऐसे त्यासी सांगुन। पवीत्र केले।।२४।।**
**सप्तमो आध्या आध्याची। सुतपाचे कुतपाचे तैसेची।**
**करून दिली मनाची। ऐका श्रोते हो।।२५।।**
**आष्टमो आध्याई जोगी जान। हींडत गेले मंछ(म्लेंछ)खंडा जा(न)।**
**तेथ आयनान मग गेले कासी पुरा जान। रुषसी सांगती गरान[५]।।२६।।**
**ब्राह्मन गेल ज्ञानपुरा। बकवाक करीती मुख उतरा।**
**राज्याने आपमान केला खरा। मग जाहाले केविलवानी।।२७।।**
**नवमो आध्याई ब्राह्मन गेले कासीपुरासी। शास्त्रात पाहतील हृदयासी।**
**भांडन होईल येकमेकासी। ते ऐका श्रोते हो।।२८।।**

१. मिटून, बंद होऊन. २. धर्मिष्ठ, धर्मवंत. ३. चतुर्थ. ४. कषाय. ५. गाऱ्हाणे, तक्रार.

दशेमो आध्या कुजोगी आपमान।मग घरी गेल्या प्रतीमा राधाकृष्णाच्या जान।
राज्याचे कुजोग्याचे दर्शेन जान। त्यासी द्रव्ये देउन गीरीसी गेला।।२९।।
आक्रावा आध्या शेब्दामृत नीधी। श्रोत्यासी उपजवी दया सीध्धी।
सुख पेन्यासी[१] नेईल।।२३०।।
हे सुमतीकथा पंचेम काली। संमत सोळाशे पंचेवीस साली।
कवींद्रशेवक श्रोत्याचे चेरणतळी। लीन जाला आसे।।३१।।
सुमतीकथा काननात ओवी वृक्ष। त्याला आर्थफळ आसली दक्ष।
तर श्रोते येतील भाव पक्ष। का न मुखी चाखतील।।३२।।
त्यातच नसला सुरस सेब्द रस। ते पुन्हा न येतील त्या टायास।
जरी जीव्हा लागल गोड ग्रास। धाव घेती आपआप।।३३।।
ज्ञाननेत्रावर सुमती जोत। श्रोत्यास आसावी श्रवनपथ।
तेव्हाच दिसे जीनसुर्येदिप। कुज्ञान रोगी दिपति।।३४।।
सुमती सत्क्रीयाची जननी। बळ चारी धर्मामृत वानि।
जीवा पोसी सुज्ञान सदनी। खेळ दावी सुरीधीचे[२]।।३५।।
सुमती वस्ती आरहंत चेरन। सुमती प्रसन्न करी मनी।
हेच सुमती पावो श्रोत्या जनी। हे वीनती जीनराया।।३६।।
सुमतीप्रकासे जेवी भास्कर। तया शेब्द उजोड जाला थोर।
पंचे मीथ्यात वोळखा तस्कर। स्पर्शु नका तयासी।।३७।।
सुमती वीधु[३] पीयुष्य[४] धारा। श्रोते जेन्म औषध लता पेरा।
शोकुण[५] घेति मन आंगावर। सुध्यान पत्र उगवलि।।३८।।
श्रोते हो चला सुमतिमार्गाण। सुमती करवी सुदेव दर्शेण।
सुमती काडी सर्वेआवगुन। करी शाहाने जीवासी।।३९।।
हे सुमति शेब्दार्थ देवांगना। श्रोते इंद्र पाहा आपुले नैना।
हे आक्षर कल्पतरू रचना। मनसा पुरवी जीवाची।।२४०।।

१. व्यापार. २. उत्कृष्ट ऋद्धी, वैभव. ३. चंद्र. ४. अमृत. ५. शोषून.

**सुमती पदि जे होती लीन। ते लघु परी अवधीर्यपन।**
**तेच वीवेकी राजहांस मन। सुशास्त्र मुक्ताफळ भक्षीती।।४१।।**
**सुमती शब्द मंगळसुत्र। निवृती गळा बांधा पवीत्र।**
**ईला प्रनुन घ्या होईल पुत्र। वीवेक नाम जयाते।।४२।।**
**सुमती कंटी पदकमाळा। वैरागे कर घ्या घाला गळा।**
**श्रोता शोभे पुराणमंडळा। आक्षये लेने जीवाच।।४३।।**
**श्री सुमतीप्रकाशे। येकादशे पुष्पमाळा आसे।**
**श्री जीनचरनि आर्पण केलि आसे। कवींद्रशेवक ह्मने।।४४।।**
**सुमतीप्रकाशे संपुर्न। कवींद्रशेवक ह्मने। श्रोते जेन तुह्मी क्षमा करन।**
**येकंदर वोवीसंख्या २४५।।**

**हे हास्ताक्षेर श्री वीशाळकीर्ती पटधारी तयाचा शेवक शीशा गोवींदा गंगाराम बोगार वस्ती उकळी ज्याहागीर तालोके वासीम यानी आज्ञापनाने सुमती ग्रंथ लिहिल। तो श्रोते जनानी आंगीकार करा आथवा न करा। ह्मनने हेच खोटेपना माझा आसे। मीती भाद्रपद शुद्ध १४ षमंत १९५० सक १८१५ रोजी सुमती ग्रंथ कळसास गेला१। सु(भं) भवतु। कल्यानमस्तु।**

* * *

महाराष्ट्री प्राकृत, महाराष्ट्री अपभ्रंश पासून मध्ययुगीन मराठी ते आधुनिक मराठी भाषा आणि साहित्य समृद्ध करण्यामध्ये मराठी जैन साहित्याचे महत्त्वाचे योगदान आहे. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी मध्ययुगीन मराठी जैन साहित्यातील शेकडो हस्तलिखित जैनग्रंथांचे संशोधन आणि संकलन केले आहे. त्यापैकी त्यांनी संशोधित आणि संपादित केलेल्या १७ हस्तलिखित ग्रंथांचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने होत आहे. **'मध्ययुगीन मराठी जैन साहित्यातील दुर्मीळ हस्तलिखित ग्रंथांचे संशोधन आणि संपादन'** या प्रकल्पामुळे मध्ययुगीन मराठी भाषा आणि साहित्याच्या अभ्यासाला नवे वळण प्राप्त होणार आहे. अभिजात अशी परंपरागत मराठी यानिमित्ताने वाचकांसमोर येत आहे.

**- डॉ. महावीर प्र. शास्त्री**, सोलापूर



**डॉ. गोमटेश्वर सातगोंडा पाटील**
प्राध्यापक-मराठी विभाग,
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.
Email - gomteshpt@gmail.com

**लेखन व संपादन**

१. मराठी कादंबरी तत्त्व आणि सिद्धान्त, दर्या प्रकाशन-पुणे, २०१२
२. मराठी कादंबरीची उपयोजित समीक्षा, दर्या प्रकाशन-पुणे, २०१४
३. मराठी भाषा सर्जन आणि उपयोजन-(सहलेखक), दर्या प्रकाशन-पुणे, २०१४
४. मराठी जैन साहित्याचे स्वरूप (१८५०-२०००), भारतीय ज्ञानपीठ -नवीदिल्ली, २०१८

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाद्वारे प्रकाशित हस्तलिखित ग्रंथांचे संपादन**

| | | |
|---|---|---|
| ०१. रामायण (४-भाग) | - आचार्य गुणकीर्ती | (इ.स.१४७०) |
| ०२. हरिवंशपुराण (३-भाग) | - महाकवी जिनदासनामा | (इ.स.१४९३) |
| ०३. सुमतिप्रकाश | - कवींद्रसेवक | (इ.स.१५६८) |
| ०४. यशोधरचरित्र | - गुणनंदी | (इ.स.१५८१) |
| ०५. सुदर्शनचरित्र | - वीरदास | (इ.स.१६२७) |
| ०६. श्री आदिनाथ पुराण | - महीचंद्र | (इ.स.१६९६) |
| ०७. शीलपताका | - महाकीर्ती | (इ.स.१६९८) |
| ०८. धर्मपरीक्षा | - विशालकीर्ती | (इ.स.१६८८) |
| ०९. अष्टकर्मप्रकृती | - यादवसुत | (इ.स.१७१८) |
| १०. उपदेशरत्नमाला (२ भाग) | - भट्टारक रत्नकीर्ती | (इ.स.१८१२) |
| ११. धर्मामृतकथा | - दयासागर | (इ.स.१८१३) |
| १२. हनुमंतपुराण | - दयासागर | (इ.स.१८१३) |
| १३. हरिलीळाप्रकाश (२ भाग) | - महाकवी गिरिसुत | (इ.स.१८५०) |
| १४. श्रीपाल चरित्र | - गिरिसुत | (इ.स.१८४८) |
| १५. कर्णामृत पुराण | - नेमाप्पा उर्फ दामोदरसुत | (इ.स.१८०२) |
| १६. सुक्तिमुक्तावली | - मधुकराया | (इ.स.१८१२) |
| १७. पंच पांडवांचे आदिमूल चरित्र | - जैनसुत उर्फ आदिनाथ पंडित | (इ.स.१८४८) |

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.